क्र: /983

मराठी भाषेची लेखनपद्धती

श्री हरिविजय–किं. १० आ ट. ख. २॥ आ. श्रीमद्भागवत दशमस्कंधांत सांगितलेल्या कृष्णलीला प्राकृतजनांस समजाव्या या हेतूनें श्रीधर कवीनें त्या प्राकृत ओवीबद्ध या ग्रंथांत यथार्थ वर्णिल्या आहेत. यांत श्रीकृष्णाची बाललीला, पूतनावध, गोपीगाऱ्हाणीं, राधाविलास, ब्राह्मणस्त्रियांची यज्ञाचे वेळीं निष्ठा, गोपाळकाला, सुदाम्यानें दिलेल्या मूठभर पोह्यांनीं जगदात्म्याची तृप्ती, इत्यादि विषय फारच हृदयंगम आहेत. एक अध्याय वाचला ह्मणजे पुढील अध्याय वाचल्याशिवाय रहावतच नाहीं.

श्री पांडवप्रताप–किं. १४ आणे ट. ख. ३ आणे. हा अमोलिक ग्रंथ राजनीति, वीररस, अद्भुतरस यांनीं पूर्ण ओथंबलेला असून सत्य, दया, तेज, औदार्य इत्यादि गुणांनीं मंडित अशा कृत्य[illegible] वर्णनांनीं ओतप्रोत भरलेला आहे. या ग्रंथाची भाषा सोपी, रसाळ व [illegible]ठ असून ग्रंथकर्त्याची वर्णन करण्याची शैली वाचकांच्या मनोवृत्तींस उचं[illegible]विणारी आहे. भीष्माचार्योचा स्वार्थत्याग आणि एकवचनीपणा, कर्ण औदार्य आणि मित्रप्रेम, दुर्योधनाचें कपट आणि हट्टीपणा, शकुनीचें कौटिल्य, धर्मराजाची सत्यप्रीति आणि पापभीरुता; भीमाचा सरळ स्व[illegible] आणि शौर्य, अर्जुनाचें वीर्य, चातुर्य आणि कृष्णभक्ति, द्रौपदीचें पा[illegible]त्य, अभिमन्यूचें पराक्रमशीलत्व, अश्वत्थाम्याची उद्दामवृत्ति वगैरे निर[illegible]ळ्या गुणांनीं युक्त अशा अनेक वीर पुरुषांचीं चरित्रें वाचीत जातां[illegible]न अगदीं दंग होऊन जातें. इंग्लिश भाषेंत मारल क्लास-बुक (M[illegible]l Class-book) म्हणून ग्रंथ आहे तो इंग्रजी शाळांत शिकवि[illegible]ल्याप्रमाणेंच मराठी शाळांतून पांडवप्रतापासारखा ग्रंथ मुलांच्या हा[illegible] दिल्यास खचित पुष्कळ हित होईल. सदाचरणाचें फल जें सुख [illegible]णि समाधान आणि दुराचरणाचें फल दुःख आणि तळमळ यांचीं हुबे[illegible] चित्रें महाभारत अगर पांडवप्रताप या ग्रंथांशिवाय इतरत्र सांपडणें कठिण आहे. शिवाजीमहाराजांनीं पूर्ववयांत महाभारतांतल्या गोष्टी कथारूपानें ऐकिल्या होत्या व त्यामुळेंच त्यांस स्वदेशभक्ति व स्वधर्मभक्ति यांची विलक्षण स्फूर्ति झाली हें वाचकांस सांगावयास नकोच.

श्री गुरुचरित्र–किं. ८ आणे. ट. ख. २ आणे. हा ग्रंथ बारीक पण रुंद व जाड अशा टाईपांनीं छापून तयार केला आ[illegible] व तो गरीबगुरीबांसही घेण्यास सुलभ व्हावा म्हणून त्याची किंमत फारच थोडी ठेविली आहे. अशा प्रकारचा मोठा ग्रंथ इतक्या अल्प[illegible] किंमतीस कोठेंही मिळत नाहीं. रेशमी बाइंडिंगचे प्रतीस १२ आणे [illegible] अना-

श्री संतलीलामृत–किं. ८ आणे. ट. ख. १॥ आणा. या ग्रंथांत महिपतींनें ईश्वरभक्ती व साक्षात्कार हीं मानवांच्या मनावर पूर्णपणीं ठसावीं म्हणून अनेक संतांनीं असाधारण केलेल्या चमत्कारांचें वर्णन फारच मनोवेधक केलें आहे.

श्री दासबोध–किं. ८ आ. ट. ख. १॥ आणा. यांत श्रीसमर्थांनीं प्रपंच व परमार्थ यांचें फारच मार्मिक रीतीनें विवेचन केलेलें आहे. हा प्रासादिक ग्रंथ सर्वांस वाचावयास मिळून त्यांतील उदात्त विचारांचा लोकांत होईल तितका जास्त प्रसार व्हावा या हेतूनें तो स्वल्प किमतींत मिळेल अशी आम्हीं तजवीज केली आहे. अक्षर मोकळें व सुवाच्य असून कागद चांगला.

श्रीशिवलीलामृत रेशमी गुटका. किंमत ४ आणे टपालखर्च ६) इतक्या अल्प किमतीस कोठेंही मिळत न

सुंदरी अथवा गर्वनिरसन–गोविंद विट्ठल काळे कृत. हें नाटक आंग्ल ग्रं लिटनसाहेब यांच्या लेडी आफ लियन्स या नाटकाच्या आधारें आहे. यांतील कथानक रम्य आहे. सुंदरी नांवाच्या एका गृहस्थाच्या मुलीवर नायक शिवाजी (बागवानाचा मुलगा) प्रेम जडून तो तिला मागणी घालतो. ती व तिची आई दोघीही त मागणीची अवहेलना करतात. त्याचप्रमाणें एका सावकाराच्या म चीही तीच गति होते. सावकार व त्याचा एक स्नेही सूड घे विचार करतात व आपल्या मागणीच्या अवहेलनेनें संतापलेला शि त्यांच्या हातीं सांपडतो. सुंदरीच्या आईच्या मनांत आपली मुलगी घराण्यांत पडावी असें होतें; तेव्हां या तिच्या इच्छेच्या द्वारेंच सूड यची मसलत ठरून ते शिवाजीला राजा बनण्याविषयीं सांगतात. र गाच्या भरांत हें आपण अन्यायी व कपटी कृत्य करीत आहों गोष्ट त्याच्या ध्यानीं न येऊन तो त्यांच्या बेतांत सामील होतो. खोट्या वेषानें त्याचें सुंदरीशीं लग्न होतें. तिला हें कळल्यावर ती त्याची निर्भर्त्सना करते. तो पश्चात्ताप पावून निघून जातो. त्याच्या पश्चात कपटी सावकार सुंदरीच्या बापाला कर्जाच्या पेंचांत आणून पहिलें लग्न खोटें ठरवून तिचा पुनः आपल्याशीं विवाह व्हावा याविषयीं त्याचा रुकार घेतो. इतक्यांत लढाईंत व शिपाईगिरींत शिवाजी कीर्ति व ... ति मिळवून परत येतो व आपल्या सासऱ्याला ऋणमुक्त करतो. असें या ...ांतील कथानक आहे. किं. ९आणे. ट. ह. १॥ आणा.

मराठी भाषेची लेखनपद्धती.

हा ग्रंथ

पुणें येथें " आर्यभूषण " छापखान्यांत

छापिला.

सन १९००.

किंमत १ रुपया.

प्रस्तावना.

माळ्याचें लक्ष बागेकडे नसल्यामुळें बागेंतील झाडें अस्ताव्यस्त वाढतात; जीं काहीं नकोत, तीं उगवलेलीं दृष्टीस पडतात; जीं पाहिजेत तीं नसतात; व केरकचरा, गवत वगैरे सांचून सुंदर झाडांची वाढ कुंठित होते, व दृष्टीचा संतोष नाहीसा होऊन इतर फायदा मिळावा, तोही मिळत नाही. त्याप्रमाणें मराठी भाषेची काहीं अंशीं स्थिती झाली आहे. विद्वान लोकांचा ओढा इंग्रजी व संस्कृत ह्या भाषांकडे फार, स्वभाषेविषयीं त्यांची आस्था जितकी असावी तितकी नाही, ही ओरड फार दिवसांपासून ऐकू येते; उपयुक्त ग्रंथसमूह थोडा आहे; त्यांतून स्वतंत्र विचार ज्यांत दृष्टीस पडतात असे ग्रंथ तर फारच थोडे. स्त्रिया व लहान मुलें ह्यांकरतां सोपीं, मनोरंजक व उपयुक्त पुस्तकें पाहिजेत असें आपण म्हणतो, परंतु तीं तयार करण्याविषयीं विशेष खटपट दिसून येत नाही. नवीन उपयुक्त ग्रंथांची गोष्ट एकीकडे ठेवू. परंतु सांप्रत भाषेची स्थिति. परंतु ए[illegible] काय, ह्याविषयीं कितीजणांनी विचार[illegible] वैचित्र्य समज[illegible]चार पांच शिक्षक अथवा भाषेचे हितचिं[illegible] आम्ही [illegible]त्र जमले असतां केव्हां केव्हां भाषाविषयक गोष्टींविषयीं थोडीबहूत वाटाघाट होते, किंवा एकाददुसऱ्या वर्तमानपत्रांत अथवा मासिक पुस्तकांत चर्चा केलेली दृष्टीस पडते. एकंदरीने विचार करतां जी स्थिती दृष्टीस पडते, ती समाधानकारक नाहीं, असेंच म्हणावें लागतें. कोणी शास्ता नसल्यामुळें ज्याप्रमाणें राज्यांत बेबंदशाही माजते, त्याप्रमाणें विद्वान लोकांच्या अना-

स्थेमुळें मराठी भाषेंत बंडाळी झालेली आहे; एकाचा धरबंद दुसऱ्यास नाहीं; ज्याने त्याने पाहिजे त्याप्रमाणें शब्द लिहावा, वाक्यरचना करावी व व्याकरण शिकवावें. पारिभाषिक शब्दांचा कोश तयार करणे अवश्य असून त्याविषयींचें काम लांबणीवर टाकणे, ग्रंथ लिहितांना कठीण संस्कृत शब्दांचा विनाकारण उपयोग करण्याची प्रवृत्ती दिसते तीविषयीं उदासीन असणे, अनेक दिवसांच्या सहवासाने इंग्रजी भाषेंतील शब्द किंवा दुसरे जे शब्द विशेष प्रचारांत आले आहेत त्यांचा संचय करून कोशांत कायम स्थळ देण्याविषयीं, व हिंदी, गुजराथी, कानडी वगैरे देशी भाषांतील व्यवहारास विशेष उपयुक्त शब्दांचा जितका भरणा करवेल तितका करण्याविषयीं यत्न न करणे, ह्या गोष्टी इष्ट नाहींत. असो. आज ह्या सर्वच गोष्टींविषयीं विचार करावयाचा नाहीं. भाषेचा पाया शब्द होत, ह्मणून शब्द लिहिण्याच्या बाबतींत जी स्थिती दृष्टीस पडते, तीविषयीं सांप्रत विचार करावयाचा आहे. ह्यासंबंधाचा सर्व गोंधळ काढून टाकून नीट व्यवस्था झाल्यास बरें. संस्कृत भाषेंत श[illegible]ची पद्धत बहुतेक ठरलेली आहे. त्याचप्रमाणें [illegible]धारलेल्या भाषांच्या संबंधाने विचार करतां लेखन[illegible] जीस ‘ स्पेलिंग ’ ह्मणतात, ती वस्तुतः जरी पुष्कळ वेळां अनियंत्रित असते, तरी ती ठरलेली आहे. इंग्रजी भाषेंत फारच थोडे शब्द दोन प्रकारांनी लिहिण्याची वहिवाट आहे. मराठी भाषेविषयीं विचार केला, तर एकच शब्द लिहिण्याच्या संबंधाने भिन्न मतें दृष्टीस पडून तो लिहिण्याचे भिन्न भिन्न प्रकार दृष्टीस पडतात. उदाहरणार्थः—सत्तेताळ, सत्तेताळीस, सत्तेचाळ, सत्तेचा-

ळीस; अंगुष्ठाण, अंगुस्तान, अंगुस्थान; किंव, कींव, कीव; इटीदांडू, विटीदांडू; कितीएक, कितेक, कित्येक; संवय, सवय, सवई; कुळीत-द-थ; टौंकारणें, टौकारणें, टवकारणें; तब्बेत, तबियत, तंब्यत; दऊड, दौड; दौत, दऊत; पंवाडा, पोंवाडा, पोवाडा, पवाडा; पोशाक-ख-ग, पोषाक-ख-ग; प्रचीत, प्रचीति, प्रतीत, प्रतीति; वरतवळा, वरतावळा, वर्तवळा, वर्तावळा, वर्ताळा; शिकेकाई, शिकेकई, शिकेकायी, शिकीकई, शिककई, शिककाई; सात, सांत, साथ, सांथ, (रोगाची); सहाय्य, साह्य, साहाय्य; सैंपाक, सैपाक, स्वयपाक, स्वयंपाक; हींव, हिंव, हीव; हातरी, हांतरी, हंतरी; हंसूं, हसूं, हसें, हंसें, हासें, हांसें; ताकतय, ताकतव, ताकतई, ताकतोय, ताकतेय, ताकतेव, ताकत्येय, ताकत्येव, ताकतोव, ताकतयी इत्यादी. ह्यांसारखीं शेकडा दुसरीं उदाहरणें आहेत. मोलस्वर्थचा कोश घेऊन सहज कोणी चाळीत बसला, तर त्यास असले शब्द हवे तितके सांपडतील. भाषेमध्यें शब्दवैचित्र्य असावें; ह्मणजे एकाच शब्दाच्या अर्थाचे अनेक शब्द असावे; ह्यापासून भाषेस प्रौढता, सौंदर्य इत्यादी फायदेही आहेत. परंतु एकच शब्द निरनिराळ्या प्रकारें लिहिणे हें वैचित्र्य समजावें, किंवा हा विचित्रपणा समजावा, हें ठरविणे आम्ही वाचकांकडे सोपवितो.

शब्द लिहिण्याच्या संबंधाने जो घोटाळा दृष्टीस पडतो, तो काहीं अंशीं अनुस्वार, ऱ्हस्व, दीर्घ, ल-ळ वर्ण संयुक्तवर्ण, प-त्र, म्ब-म वगैरे वर्ण ह्यांसंबंधाने आहे. काहींचें ह्मणणे परभाषेंतील जे शब्द मराठींत आले आहेत, ते जशाचे तसे लिहावे, त्यांत फेरफार करूं नये. उलट पक्षीं काहींचें म्हणणे असें आहे कीं, मराठी भाषेच्या धोरणास [The

Genius of the language] व उच्चारास अनुकूळ असल्यामुळें शब्दाचें रूप जसें प्रचारांत आलें असेल तसें लिहावें. ह्यामुळें काहीं अंशी घोटाळा दिसतो. तिसरी गोष्ट—स्थलपरत्वें उच्चार करण्याचा व लिहिण्याचा प्रघात निरनिराळा दिसतो, किंवा व्यक्तिविशिष्टांचे उच्चार व लेखन हीं देखील निरनिराळीं दिसतात. भाषेविषयीं सामान्यतः विचार करतां विवक्षित स्थळ अथवा व्यक्ती ह्यांकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं. त्याचप्रमाणें संस्कृत शब्दांची पूर्वपीठिका पाहून व विशेष काथ्याकूट करून ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार वगैरे बाबतींत निर्णय करावयाचा, व इतर शब्दांविषयीं यत्किंचित्‌ही विचार न करतां डोळे मिटून चालावयाचें, हें विसंगत दिसतें. मराठी भाषेंत संस्कृत शब्दांचा भरणा आहे, त्याप्रमाणेंच अरबी, फारसी वगैरे बऱ्याच शब्दांचें मिश्रण झालेलें आहे व सांप्रत इंग्रजी शब्दांचीही भरती होऊं लागली आहे. असें असतां संस्कृत भाषेंतून जे शब्द मराठींत आले आहते ते लिहितांनामात्र संस्कृत भाषेकडे धाव मारून व्युत्पत्ती पाहात बसावें, व अनुनासिक, रेफ, षकार, हकार, जोडाक्षर व द्वित्व ह्यांपैकीं काहीं असल्यास त्या शब्दांवरून येणाऱ्या मराठी शब्दांवर अनुस्वार द्यावा असें सांगावें; आणि ही स्थिती नसतां केवळ काहीं लोकांनी प्रघात पाडला आहे म्हणून केंस [केश], बीं [बीज] वगैरे शब्दांवर तो असावा म्हणून म्हणावें, व काहींच कारण नसतां झोंप, संवय, शेंवट, शेंपूट, लांकूड वगैरे शब्दांवर अनुस्वार द्यावा म्हणून ठरवावें; व अरबी, फारसी, इंग्रजी वगैरे भाषांतून जे शब्द आले आहेत ते लिहितांना त्या भाषांविषयीं काहींच विचार करूं नये, हें काहीं अंशीं चमत्कारिक आहे. शिवाय, अनु-

स्वार, ऱ्हस्व व दीर्घ एवढ्याच बाबींविषयीं विशेष काळजी कां करावी, व दुसऱ्या वर्णाबद्दल उदासीन कां असावें, हें समजत नाहीं. ॲक्ट, सेकंड, माईल, ड्रॅम, स्टॅम्प, रेजिस्टर, मार्केट, थिएटर, जॅनुआरी, सेप्टेंबर, आक्टोबर, क्यापूटन, नक़्शा, ज़ुल्म, रवाज्, हिसाब्, मकान्, खूब, बिल्कुल्, बर्, पुल्, आद्मी वगैरे शब्द मुळाप्रमाणें न लिहितां आक्ट, सेकंड, मैल, द्राम, स्टांप, रजिस्टर, मार्किट, थेटर, जानेवारी, सप्टंबर, आक्टंबर, कपतान, नकाशा, जुलूम, रिवाज, हिशेब, मकाण, खूप, बिलकूल, वर, पूल, अदमी असे कां लिहावे, हें कळत नाहीं.

संस्कृत शब्दांचा भरणा मराठी भाषेंत ज्याप्रमाणें आहे, त्याप्रमाणें अरबी, फारसी वगैरे काहीं भाषांतील शब्दांचाही आहे. ज्याप्रमाणें संस्कृत शब्द वतनदार झाले आहेत त्याप्रमाणें अरबी, फारसी वगैरे भाषांतील शब्दही वतनदार झाले आहेत; ते इतके कीं, त्यांचा परकीपणा अगदीं नाहींसा झाला आहे व ते आमचेच बनले आहेत. अशी स्थिती आहे, तर भाषेच्या दृष्टीने संस्कृत शब्द व इतर भाषांतील शब्द ह्या दोहोंची सारखीच मातब्बरी आहे; दोहोंस एकच तराजूने जोखलें पाहिजे; आपली विशेष सोय व फायदा कशांत आहे, हें पाहिलें पाहिजे; व योग्य कारण पाहून नवें जुनें करीत गेलें पाहिजे, पंक्तिप्रपंच करण्यांत अर्थ नाहीं, असें आह्मांस वाटतें. पण हे विचार आमच्या काहीं मित्रांस संमत नाहीत. त्यांचें ह्मणणे कीं, संस्कृत ही पवित्र भाषा असल्यामुळें तींतील शब्द पवित्र समजून त्यांचा मान श्रेष्ठ समजावा व त्यांस धक्का लावूं नये, व परकीय भाषांतील शब्द वतनदार असले तरी व आमचेच बनले असले तरी, ते कमी दरजाचे

समजून त्यांची वाटेल तशी व्यवस्था करावी; त्यांची व संस्कृत शब्दांची तुलनाच करूं नये.

शब्द लिहितांनाच जर त्यांची पूर्वपीठिका पाहावयाची, तर त्यांचें व्याकरण करतांनाही त्यांची पूर्वपीठिका ह्मणजे लिंग, वचन वगैरे कां पाहूं नये ? ‘ वीणा ’ शब्द मुळांत स्त्रीलिंगी व ‘मित्र’ शब्द नपुंसकलिंगी असून ते आपण पुल्लिंगी समजतो. कुटुंब, वस्तु, स्वप्न, शपथ, काच वगैरे शब्दांविषयीं विचार करतां लिंगाच्या संबंधानें विपर्यास केलेला दिसून येतो. कंदील, तोबा वगैरे शब्द मुळांत स्त्रीलिंगी असून पुल्लिंगी समजण्यांत येतात. नमाज, छाप वगैरे शब्द स्त्रीलिंगी असून प्रायः पुल्लिंगी क्वचित् स्त्रीलिंगी समजतात. दुकान हा शब्द स्त्रीलिंगी असून प्रायः नपुंसकलिंगी व क्वचित् स्त्रीलिंगी मानतात. बाग, तफावत, संदूक वगैरे काहीं शब्द पुल्लिंगी असून ते स्त्रीलिंगी आहेत, असें समजून त्याप्रमाणें चालविण्यांत येतात. अशीं आणखीं काहीं उदाहरणें देतां येतील, परंतु तीं देण्याचें कारण नाही.

वर जें निरूपण केलें त्यावरून मराठी शब्द लिहिण्याच्या बाबतींत फार घोटाळा व अनिश्चितपणा आहे, असें दिसून येईल. असें असणे इष्ट नाही. सुलभ व ठरीव लेखनपद्धती असणे हें शिष्य, शिक्षक, ग्रंथकार, वर्तमानपत्रकार व सामान्य लोक ह्या सर्वांस हितावह आहे. मराठी भाषेचा प्रसार कर्तव्य आहे व तिचा अभ्यास करण्यास सामान्य लोकांस सुलभ पडावें अशी आपली इच्छा आहे, तर ही पद्धत सोपी व ठरीव असणे फार अवश्य आहे. लेखनपद्धतीच्या संबंधानें आमचें असें मत आहे कीं, लिहिण्याची भाषा व बोलण्याची भाषा ह्या दोहोंत जितका मेळ ठेववेल

तितका ठेवण्याविषयीं यत्न करावा. निदान विद्वान लोक जी भाषा बोलतात व जी लिहितात त्यांमध्यें तरी बराच मेळ असावा. बोलण्याची भाषा कांहीं अंशीं अनियंत्रित असते, तेव्हां सर्वांशीं ही गोष्ट शक्य नाहीं; तथापि, परस्परांचें बंधन परस्परांस राहून दोहोंमध्यें बराच मेळ राहील, अशी योजना करणे इष्ट आहे. भाषेच्या संबंधाने विचार करतांना देशस्थांनी अमूक केलें, कोंकणस्थांनी तमूक केलें, असा वाद उपस्थित करणे ह्यांत तात्पर्य नाहीं. मराठी भाषेच्या उन्नतीस देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे, मराठे, वाणी, शिंपी वगैरे सर्वांनी मदत केली आहे. चुक्या झाल्या असतील, तर त्याही सर्वांच्या हातून झाल्या आहेत. मग नसता वाद उपस्थित करण्यांत काय अर्थ? आजमित्तीस विचार करावयाचा तो असा आहे कीं, शब्दाचा उच्चार करण्याचा समंजस लोकांचा प्रघात कसा आहे, बहुजनसमूहास कमी त्रासाची पद्धत कोणती व भाषेचें एकंदरीने धोरण कसें आहे. तात्पर्य, बऱ्याच दिवसांच्या अनुभवाने जें सौकर्य, जी सोय व जो फायदा कळून आला आहे, त्यांविषयीं मुख्यत्वें विचार करून लेखनपद्धती ठरविण्यास उद्युक्त होणे बरें, असें आह्मांस वाटतें.

इंग्रजी स्पेलिंग जसें अनियंत्रित आहे, तसें मराठी लिंग-प्रकरणही अनियंत्रित आहे. ह्यामुळें भाषेस अगोदरच कठीणपणा आला आहे. हा कठीणपणा कमी करणे फार कठीण झालें आहे. मग त्यांत आणखी भर घालणे बरें नाहीं. लेखनपद्धती सोपी करतां येण्यासारखी आहे व ती करणे अवश्य आहे. हें काम एकट्या दुकट्याचें नाहीं. भाषाभिज्ञ व कळकळ बाळगणाऱ्या गृहस्थांनी ह्या

बाबतींत लक्ष पोहोचविल्यांशिवाय ह्या गोष्टीचा लवकर निकाल लागावयाचा नाहीं, हें समजून आम्ही आपले विचार दोन तीनशे मित्रांस पुस्तकरूपानें कळविले व त्यांचे अभिप्राय मागविले. ह्यांपैकीं काहीं मित्रांनी आपले अभिप्राय लागलीच कळविले. ह्या अभिप्रायांवरून आमच्या विचारांच्या बाबतींत काहीं थोडया विद्वान मित्रांचा गैरसमज झाल्याविषयीं समजून आलें. हा गैरसमज दूर करण्यासाठीं शालापत्रकांत व केसरीपत्रांत आम्हांस खुलासा करावा लागला; व तो मित्रमंडळीस कळविणे अवश्य वाटल्यावरून शेदीडशे प्रती काढून त्या त्यांकडे पाठविण्यांत आल्या. मराठी भाषेच्या लेखनपद्धतीविषयींचा वाद हा आजकालचा नाहीं. तो शालापत्रक, विविधविज्ञानविस्तार वगैरे काहीं मासिक पुस्तकांतून कित्येक वर्षांपासून चालू होता. ह्या वादाचा निकाल लागल्यास बरें, असें वाटल्यावरून हा विषय आम्ही हातीं घेतला व मित्रमंडळीचे अभिप्राय मागविले. ते अशाकरतां कीं, सुशिक्षित लोकांची सभा (कानफरन्स) पुण्यांत भरवून तींत वादग्रस्त मुद्यांचा निर्णय करून घेण्यास साधन असावें. असा निर्णय करण्यास सुलभ पडावें, म्हणून लेखनपद्धतीच्या सामान्य तत्त्वांचा मसुदा प्रथम तयार करून त्याच्या छापील प्रती वाटण्यांत आल्या. जे अभिप्राय आले होते त्यांचा गोषवारा काढून तो सुधारक पत्राच्या अंकांतून प्रसिद्ध करण्याची व्यवस्था चालविली; व अनुस्वार व ऱ्हस्वदीर्घ ह्यांविषयीं जे अभिप्राय आले होते त्यांविषयीं व जीं अन्य साधनें उपलब्ध होतीं त्यांविषयीं पुनः विचार करून व येथील काहीं विद्वान मित्रांबरोबर वाटाघाट करून अनुस्काराविषयीं एक व ऱ्हस्वदीर्घाविषयीं

एक असे दोन मसुदे तयार करून त्यांचीं प्रुफें शे सव्वाशे निवडक सुशिक्षित गृहस्थांकडे पाठविलीं व अभिप्राय कळविण्याविषयीं त्यांस विनंती केली. त्याप्रमाणें काहीं अभिप्राय आले व १८९९ च्या मे महिन्यांत कानफरन्स भरवावें असा विचार ठरविला. एथपर्यंत पूर्वसंकल्पानुरूप बहुतेक व्यवस्था झाली. पण फेब्रुआरी महिन्यांतच तिसऱ्या खेपेस एथें प्लेग सुरू झाला व तो आक्टोबरआखेर राहिल्यामुळें कानफरन्स भरविण्याचा विचार जागच्याजागीं राहिला. आर्यभूषण छापखान्याचे म्यानेजरांनी केवळ आमच्या मुरवतीखातर पांचसहा महिने टाईप तसेच ठेवून दिले. प्लेग कमी होईना, शेवटीं जास्ती दिवस वाट पाहात बसण्यांत अर्थ नाही, असें समजून लेखनपद्धतीविषयींची सर्व सामुग्री पुस्तकरूपाने लोकांपुढें ठेवावी, ह्मणजे त्यांस विचार करण्यास व आखेरचा अभिप्राय देण्यास बरें पडेल, असें वाटून ह्या विषयावर स्वतंत्र पुस्तक काढण्याचा विचार ठरविला व त्याप्रमाणें प्रस्तुतचें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. ह्यांत नजरचुकीने, गैरसमजाने अथवा बरोबर माहिती न मिळाल्यामुळें दोष राहून गेले असतील. हे दोष, व आक्षेप घेण्यासारखीं काहीं स्थलें असतील तीं, कोणी दाखविल्यास आह्मी त्यांचे फार आभारी होऊं. हा विषय भिजत न पडतां त्याचा योग्य निर्णय व्हावा, एवढीच आमची इच्छा आहे. काहीं गोष्टींच्या बाबतींत साधारणपणे बराच निर्णय झाला आहे, असें ह्मणण्यास हरकत नाही. परंतु काहीं बाबतींत व विशेषें एकच शब्द अनेक प्रकारांनी लिहिणे ह्या बाबतींत निर्णय होणे आहे. एकंदर विषय आतां लोकांपुढें आहे. ह्याविषयीं विचार करण्यास त्यांस बरीच सवड आहे. तेव्हां ठिकठि-

काणच्या सुशिक्षित लोकांस आमची एवढीच विनंती आहे कीं, त्यांनी हा विषय हातीं घेऊन त्याविषयीं ऊहापोह करावा व जो निकाल होईल तो आह्मांस कळवावा, ह्मणजे मित्रमंडळीच्या सवडीप्रमाणें कानफरन्स भरविण्यास ठीक पडेल. आमच्या मित्रांनी वेळांत वेळ करून आपले अभिप्राय कळविल्यामुळें आह्मांस फार उपयोग झाला. त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडे आहेत. ह्या पुस्तकांत जर काहीं ग्रहण करण्यासारखें असेल, तर त्याचें बरेंच श्रेय त्यांकडे आहे. चित्रशाळेचे व्यवस्थापक, शाळापत्रककर्ते, केसरीकर्ते, सुधारककर्ते व आर्यभूषण छापखान्याचे म्यानेजर ह्यांपासून आह्मांस वेळोवेळीं फार मदत झाली, तिजबद्दल त्यांचे एथें आभार मानणे अवश्य आहे. वेळोवेळीं जीं पाम्पलेटें पूर्वी प्रसिद्ध करण्यांत आलीं व प्रस्तुतचें पुस्तक हल्लीं काढण्यांत आलें आहे त्यांच्या संबंधाचे छापाईचें काम फार त्रासदायक असतांही चित्रशाळेच्या व आर्यभूषण छापखान्याच्या व्यवस्थापकांनी तें मोठ्या खुषीनें तडीस नेलें, ह्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानले पाहिजेत.

पुणें, ज्यून १९००.

काशिनाथ नारायण साने.
रामचंद्र परशुराम गोडबोले.
शंकर रामचंद्र हतवळणे.

अनुक्रमाणिका.

मराठी भाषेची लेखनपद्धती.

सामान्य तत्त्वें.

बोलण्याची मराठी भाषा एक व लिहिण्याची दुसरी अशी व्यवस्था असावयाची नाही, तर ह्या दोहोंमध्यें जितका मेळ ठेववेल तितका ठेवण्याविषयीं यत्न करणे अवश्य आहे, असें आह्मांस वाटतें. ही गोष्ट सर्वांशीं शक्य नाही, तरी त्या भाषेची वृद्धी, तिचा जम, तिचें सौंदर्य व तिच्या अंगीं आलेला प्रौढपणा ह्यांस धक्का न बसतां मेळ ठेवण्याविषयीं सर्वांचें धोरण असणे इष्ट आहे; ह्मणून मराठी भाषेंत सुधारणा करतांना ती भाषा बोलणारांची व लिहिणारांची सोय पाहणे विशेष अगत्याचें आहे. ही भाषा लिहिण्याचें कारण फक्त विद्वानांसच पडतें, इतरांस नाही, असें नसून कमजास्त उभयतांस पडतें. ह्यासाठीं लेखनपद्धती ठरवितांना उभयतांची सोय जींत निघेल, अशी व्यवस्था असावी असें आह्मांस वाटतें.

मराठी भाषेच्या संबंधाने जी लेखनपद्धती आपण ठरविणार आहो, ती सर्वत्र लवकर अमलांत यावी अशी आपली इच्छा आहे, तर तिचा रिघाव क्रमिक पुस्तकांत होण्यास अडचण येणार नाही अशी, विद्वानांस साधारणपणे संमत पडेल अशी, व इतर लोकांस, निदान त्यांपैकीं बऱ्याच समंजस लोकांस ती सोईची वाटेल अशी असली पाहिजे; तिजसंबंधाने व्यक्तिविषयक आवडनिवड

किंवा हट्ट नसावा, हें सांगावयास नको. सुधारलेली लेखनपद्धती क्रमिक पुस्तकांतून सुरू करण्यापूर्वीं विद्याखात्याचे अधिकारी प्रथम अभिप्राय मागवितील. लेखनपद्धतींत येथून तेथून अकारण फेरफार केला आहे असें दिसून आल्यास, ती गोष्ट सदहू अधिकाऱ्यांस पसंत पडेल किंवा नाही हें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्याचप्रमाणें मनसोक्त लेखनपद्धती विद्वान लोकांस पसंत पडणार नाहीं; शब्दाची परंपरा कशी आहे, ती पाहिल्याशिवाय ते शब्दाचें रूप ग्रहण करणार नाहीत; जे शब्द निवळ मराठी बनले आहेत त्यांशिवाय संस्कृत वगैरे भाषांतील इतर शब्दांचीं मूळचीं रूपें होतां होईल तो कायम ठेवण्याविषयीं व तीं उपयोगांत आणण्याविषयीं त्यांची इच्छा असणार, हीही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे. लेखनपद्धती विद्वानांस पसंत पडल्याशिवाय तिचा विशेष प्रचार होण्यास काहींशी अडचण आहे. हल्लीं चालू असलेल्या पद्धतींत येथून तेथून सर्वत्र निष्कारण फेरफार करण्यास उद्युक्त होणे, शब्दांचा पूर्वापार इतिहास मुळींच न पाहतां मनसोक्त रूप ठरविणे, संस्कृत वगैरे भाषांतून जे शुद्ध शब्द मराठींत आजपर्यंत रूढ झाले आहेत किंवा पुढें होतील ते तसेच उपयोगांत आणण्याविषयीं त्यांस सवड न ठेवणे वगैरे गोष्टी त्यांस संमत होतीलच असें ह्मणतां येत नाही. भाषेचें सौंदर्य व प्रौढपणा वाढविण्यास व शब्दभांडार वाढवून तिची महती वाढविण्यास त्यांस सवड ठेवणे अत्यंत अवश्य आहे. असें न केलें, तर त्यांस जी पद्धत पसंत वाटेल तिचेंच ते अवलंबन करतील. दुसरे पक्षीं मराठी भाषेचा साधेपणा व सोपेपणा व तिचें विशिष्टत्व हीं काहीं अंशीं कायम राहिलीं

आहेत, तीं मुख्यत्वें सामान्य लोकांमुळें होत व तिचा प्रसार त्यांच्या द्वारें काहीं अंशीं झाला आहे व पुढें व्हावयाचा आहे, हीही गोष्ट विसरतां येत नाही. भाऊ, बहीण, हात, पाय, नाक, तोंड, वीस, तीस, घर, दार वगैरे शतशः साधे व सोपे शब्द प्रचारांत येऊन सर्वांस सारखे प्रिय झाले आहेत, ते विशेषें सामान्य लोकांमुळें होत. तेव्हां मराठी भाषेचें सोपें व साधें स्वरूप व तिचें विशिष्टत्व सतत कायम ठेवावयाचें आहे, तर सामान्य लोकांची सोय गैरसोय लक्षांत न आणतां सक्तीच्या अथवा एकदेशीय नियमांनी त्यांचे हातपाय जखडून टाकणे इष्ट नाही, हें सांगावयास नको. त्यांची सोय गैरसोय न पाहतां आह्मी आपलाच हट्ट चालवूं लागलो, तर त्यांस जी पद्धत पसंत वाटेल तिचें तेही अवलंबन करतील, हें उघड आहे. असें होणे इष्ट नाहीं. तेव्हां मराठी भाषेस ग्राम्यपणा न येतां किंवा जो जम जमून आला आहे त्यांत उगीच बिघाड न करतां विद्वान व सामान्य लोक ह्या उभयतांची जींत सोय निघेल, अशी तिची लेखनपद्धती ठरविण्याविषयीं यत्न करणे अवश्य आहे, व हा हेतू सिद्धीस नेण्याकरतां काहीं काहीं बाबतींतील पूर्वींची आवडनिवड बाजूस ठेवण्याचें कारण पडलें असतां तसें करणे अवश्य आहे.

मराठी भाषेची लेखनपद्धती मनसोक्त नसून ती ठरीव, सोपी व सुयंत्र असावी, ही गोष्ट बहुतेकांस कबूल आहे. पण ही पद्धत ठरीव असावयाची आहे, तर तिजसंबंधाचीं तत्त्वें प्रथम ठरलीं पाहिजेत. ती सोपी करावयाची, ह्मणजे ग्राम्यपणा अथवा अडाणीपणा सुरू करावयाचा नसून लि-

हिण्याच्या संबंधाने जे दोष आढळतात अथवा अडचणी भासतात त्या दूर करून ती होतां होईल तो सुलभ करावयाची. त्याचप्रमाणें ती सुयंत्र करावयाची, ह्मणजे तिची वाढ यत्किंचितूही कुंठित न करतां ती होतां होईल तो नियमबद्ध करावयाची. आतां मराठी भाषेची लेखनपद्धती ज्या तत्त्वांच्या आधारावर ठरवावयाची तीं पुढें दिल्याप्रमाणें असावीं, असा आमचा अभिप्राय आहे.

(१) तोंड, जीभ, कान, हात, ओठ, भाऊ, बहीण, दोन, तीन, पान, घर, भिंत, खांब, आज, काल, तेल, माती, गूळ वगैरे जे शतशः साधे, सोपे व गोड शब्द मराठी भाषेंत रूढ होऊन आज कित्येक वर्षें तिच्या हाडीं खिळले आहेत, व लहान, थोर, विद्वान, अविद्वान ह्या सर्वांच्यासारखे तोंडीं असून सर्वांस प्रिय झाले आहेत, त्यांच्या आंतररचनेस धक्का न लावतां ते जशाचे तसेच ठेवावें. त्यांची व्युत्पत्ती कोणती, हें कळण्यास जरी मार्ग आहे, तरी हे शब्द अग्राह्य धरून अथवा गौण समजून त्यांऐवजीं मूळच्या रूपांचा उपयोग करणे, किंवा त्यांस मूळच्या रूपाजवळ जवळ आणण्याचा यत्न करणे इष्ट नाहीं. ह्याचीं कारणें उघड आहेत. त्यांपैकीं मुख्य हें कीं, ते आज कित्येक वर्षेंपर्यंत कसोटीस उतरल्यामुळें ते भाषेचें जीवित होऊन बसले आहेत. तेव्हां भाषेच्या दृष्टीने अशा शब्दांची योग्यता विशेष आहे.

(२) ज्या ह्मणी, किंवा थोर पुरुषांचीं वचनें, किंवा पारिभाषिक शब्द संस्कृतांतून किंवा दुसऱ्या भाषांतून मराठींत येऊन रूढ झाले आहेत, त्यांतील शब्दांच्या रूपांविषयीं किंवा पूर्वींच्या कवींच्या ग्रंथांतील शब्दांच्या रूपां-

विषयीं व्युत्पत्ती, उच्चार वगैरे पाहून ढवळाढवळ करूं नये; खरा पाठ कोणता तो मात्र ठरवावा. त्यांतील शब्दांचीं रूपें जशींच्या तशींच ठेवावीं. अनुस्वार वगैरे बाबतींतील आमची पद्धत आह्मी त्यांस लागू केली आहे, ह्मणून तींत मात्र बदल करावा व तो आतां जी व्यवस्था ठरेल तीप्रमाणें करावा.

(३) लेखनपद्धतीच्या संबंधानें आजमित्तीस ज्या गोष्टी सर्वांशीं किंवा बहुतेक अंशीं संमत झाल्यासारख्या आहेत, त्या प्रचारावरून पसंत झाल्या आहेत, असें समजून त्या तशाच कायम ठेवाव्या. उ० निवळ मराठी बनलेल्या शब्दांच्या अंतींचे इ, उ नेहमीं दीर्घ लिहावे; (काहीं शब्दांबद्दल वाद आहे त्यांविषयीं स्वतंत्र विचार व्हावा); शब्दयोगी अव्ययें नेहमीं जोडून लिहावीं; अंतींच्या ‘ अ ’ वर केव्हांही अनुस्वार देऊं नये; सार्थ अनुस्वार कायम ठेवावा (अंग, भिंग, खांब इ०); ह्या व अशाचसारख्या ज्या दुसऱ्या गोष्टी अनुभवावरून अवश्य किंवा उपयुक्त व सोईच्या अशा ठरल्या आहेत, त्या तशाच पुढें चालू ठेवाव्या. त्याचप्रमाणें ज्या अगदीच निरर्थक किंवा ग्राम्य ह्मणून ठरल्या आहेत त्या नापसंत समजाव्या. उ० सर्वत्र अनुस्वाराचा कोंकणांतील प्रचार, किंवा तळ, घोसाळ, वांग वगैरे शब्द वापरण्याचा देशावरील प्रचार, अथवा तांदूळ, मूग, लुगडें, चोळी, सतरंजी, मीठ, गूळ वगैरे शब्दांऐवजीं तांदूय, मूंग, लुगडा, चुई, सत्रोंजी, मिट, गूय वगैरे शब्द वापरण्याचा खानदेश वगैरे काहीं ठिकाणच्या अडाणी लोकांचा प्रघात, हें सर्व लेखनपद्धतीच्या संबंधानें नापसंत असें समजावें.

(४) वर ज्या बाबी सांगितल्या त्यांशिवाय इतर गोष्टींचा निर्णय करणे झाल्यास व्युत्पत्ती व प्रचार पाहून नंतर निर्णय करावा. ह्मणजे शब्दाची परंपरा कशी आहे, विद्वान लोकांच्या आदरास जे ग्रंथ पात्र झाले आहेत त्यांत शब्दाचें रूप लिहिण्याचा आजपर्यंतचा सामान्य प्रघात कसा आढळतो, व त्या शब्दाचा सामान्यत्वें उच्चार कसा करण्यांत येतो हें पाहावें. तेव्हां लेखनपद्धतींतील वादग्रस्त शब्दांचा अथवा मुद्यांचा कायमचा निर्णय करण्यापूर्वी वरील तीन गोष्टींचा विचार केल्याशिवाय असा निर्णय होऊं नये. ह्या तीन गोष्टींत एकवाक्यता झाल्यास उत्तमच, पण असें होणे सर्वत्र शक्य नसल्यामुळें अनेक शब्दांविषयींचा अथवा वादग्रस्त मुद्यांविषयींचा वाद तसाच राहील. सबब, तीनपैकीं दोन गोष्टींची एकवाक्यता असल्याशिवाय कायमचा निर्णय होऊं नये, हें बरें. असें होणे ज्या ठिकाणीं अशक्यच असेल, त्या ठिकाणीं पुष्कळांची विशेष सोय कशांत आहे, तें पाहून निर्णय व्हावा. नुसत्या व्युत्पत्तीवरून, किंवा चालू लेखनपद्धतीवरून, किंवा उच्चारावरून, किंवा सोईवरून निर्णय होऊं नये. कारण, नुसत्या व्युत्पत्तीवरून निर्णय करावयास लागलें असतां हजारो शब्दांच्या आंतररचनेंत बदल करावा लागेल, व त्यामुळें येथून तेथून उलथापालथ होऊन नवीन भाषा बनवावी लागेल, व नवीन गैरसोई उद्भवतील. नुसत्या चालू लेखनपद्धतीवरून असें करावयाचें, ह्मणजे लेखनपद्धतींत जे कांहीं दोष हल्लीं आढळतात अथवा अडचणी भासतात त्या दूर करून सुधारणा करण्यास सवड राहणार नाहीं, व ह्यामुळें ते दोष व त्या अडचणी वतनदार होतील व त्या

दूर करण्यास पुढें फार त्रास पडेल. उच्चारावरून सर्वांशीं विचार करावयाचा, ह्मणजे हल्लींच्या शब्दांपैकीं काहीं शब्दांत बदल करावा लागेल; शिवाय, काहीं शब्दांच्या संबंधानें एकवाक्यता आहे, पण दुसऱ्या काहींविषयीं मतभेद असल्यामुळें अनिश्चितपणा राहील. हींच गोष्ट काहीं अंशीं सोईच्यासंबंधाने आहे. ह्या सर्व गोष्टींचा विचार करतां वादग्रस्त शब्दाचा अथवा लेखनपद्धतींतील मुद्याचा कायमचा निर्णय करणे झाल्यास व्युत्पत्ती, लेखनाचा प्रचार व उच्चाराचा समंजस लोकांचा सामान्य प्रघात पाहून निर्णय करावा, हें उत्तम; पण हें सर्वत्र शक्य नसल्यामुळें ह्यांपैकीं निदान दोहोंची तरी सांगड अथवा बंधन असावें हें बरें. जेथें हेंही शक्य नसेल तेथें सोय पाहून निर्णय व्हावा. ह्या तत्त्वांविषयीं आणखी खुलासा होणे अवश्य आहे.

(१) ज्या ठिकाणीं व्युत्पत्ती कळण्यास मार्ग आहे, त्या ठिकाणीं प्रथम व्युत्पत्ती पाहून तीप्रमाणें प्रस्तुतच्या लोकमान्य ग्रंथांच्या लेखनपद्धतीच्या अथवा उच्चार करण्याच्या प्रघाताचा आधार आहे किंवा नाहीं तें पाहावें, व त्याप्रमाणें रूप ठरवावें; किंवा वादग्रस्त मुद्याचा निकाल करावा. दोहोंपैकीं एकाचा जरी आधार मिळाला तरी हरकत नाही.

(२) व्युत्पत्तीविषयीं संशय असेल किंवा ती उपलब्ध नसेल, तर चालू लेखनाची पद्धत व उच्चाराचा प्रचार ह्या दोहोंचा मेळ जमल्यास रूप कायमचें ठरवावें; पण ह्या दोन पद्धतींत विरोध आहे, असें दिसून आल्यास दोहोंपैकीं सुलभ व सोईची पद्धत कोणती हें पाहून निकाल करावा.

(३) संस्कृत व प्राकृत व्युत्पत्तीमध्यें व त्याचप्रमाणें लेखन व उच्चार ह्यांमध्यें विरोध दिसून आल्यास वैकल्पिक रूपें लिहावीं, मात्र ह्या चोहोंपैकीं निदान दोहोंचा प्रत्येक वैकल्पिक रूपास आधार असावा. त्याचप्रमाणें विद्वान लोकांच्या लेखनपद्धतींत व उच्चाराच्या पद्धतींत मतभेद असल्यास व दोन्हीं रूपें सुलभ व सोपीं असल्यास दोन्हीं रूपें ग्राह्य समजावीं, अधीक असल्यास अधीक ठेवावीं.

(४) मराठी भाषेच्या लेखनपद्धतींत ह्या भाषेचें विशिष्टत्व व सामान्य धोरण होतां होईल तो कायम ठेवावें. ह्यावरून संस्कृत भाषेंतील किंवा प्रसंगोपात्त इतर भाषांतील शुद्ध शब्द वापरण्यास किंवा त्यांतील उपयुक्त नियम वगैरे घेण्यास प्रत्यवाय आहे असें नाहीं. शास्त्रीय अथवा प्रौढ भाषेंत किंवा कवितेंत प्रौढ शुद्ध संस्कृत शब्दांशिवाय कित्येक वेळां गत्यंतर नसतें; तेव्हां अशा ठिकाणीं अशा संस्कृत शब्दांचा विशेष उपयोग व्हावा, हें योग्य आहे. त्याचप्रमाणें फारसी, इंग्रजी वगैरे भाषांतील शुद्ध शब्दांचा प्रसंगोपात्त उपयोग करण्यास हरकत नाहीं; परंतु जेथें मराठींत असल्या शब्दांच्या अर्थाचे शब्द नसतील किंवा दुसरें विशेष कारण असेल तेव्हां असें करणे योग्य आहे. संस्कृत, फारसी व इंग्रजी भाषांतील सोप्या शब्दांच्या अर्थाचे शब्द मराठींत नसल्यास असे शब्द प्रचारांत येणे अनेक कारणांस्तव विशेष इष्ट आहे. अशा शब्दांबद्दल वेडेवाकडे मराठी शब्द बनविण्यांत तात्पर्य नाहीं. सामान्य लोकांकरतां असलेले लेखांत रूढ झालेले सोपे शब्द विशेष उपयोगांत यावे; मग ते मूळचे शब्द मराठी असोत, संस्कृत, प्राकृत वगैरे भाषांतून अपभ्रंश होऊन आलेले असोत, किंवा शुद्ध शब्द असोत.

(५) मराठी भाषेचा प्रसार देश व कोंकण येथेंच नसून, निजामचें राज्य, वऱ्हाड, मध्यप्रांत वगैरे ठिकाणींही पुष्कळ आहे. तेव्हां मराठी भाषेच्या लेखनपद्धतीविषयीं विचार करावयाचा ह्मणजे, देश व कोंकण येथीलच लोकांची सोय गैरसोय पाहावयाची असें नसून, वऱ्हाड वगैरे प्रांतांतील लोकांचीही सोय गैरसोय पाहावयाची, व शब्दांचीं रूपें ठरवितांना ह्या ठिकाणीं कोणतीं रूपें प्रचलित आहेत त्यांहीविषयीं विचार करावयाचा. रूपें ठरवितांना निरनिराळ्या प्रांतांविषयीं विचार करावा असें सांगितलें, त्याव-

---

टीप—मराठी भाषेच्या लेखनपद्धतीविषयीं सांप्रत विचार चालू आहे. तेव्हां ज्यांची ही स्वभाषा आहे असे हिंदुस्थानांत कोठें किती लोक आहेत, हें पुढील माहितीवरून समजून येईल.

हिंदुस्थानांत मराठी ज्यांची स्वभाषा आहे असे सुमारें १,८९,००,००० लोक आहेत; पण ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, मध्यहिंदुस्थानांतल्या संस्थानांतील लोक ज्या भाषा बोलतात त्यांसंबंधानें गणती झाली नाही. सबब, शिंदे, होळकर वगैरे संस्थानीक ह्यांच्या प्रांतांत मराठी भाषा बोलणारे किती आहेत हें समजण्यास मार्ग नाही. १,८९,००,००० लोकांपैकीं मुंबई इलाख्यांत १,०५००,००० ह्मणजे शेकडा सुमारें ५६, निजामच्या राज्यांत ३५ लाख ह्मणजे शेकडा १८, वऱ्हाडांत २३ लाख ह्मणजे शेकडा १२, मध्यप्रांतांत २१ लाख ह्मणजे शेकडा ११, मद्रास इलाख्यांत सुमारें ३ लाख म्हणजे शेकडा १½ असे आहेत. बाकीचे इतर ठिकाणीं—ह्मैसूर-७०,०००, बडोदें प्रांतः-५२,०००, वायव्यप्रांत :-७,२००, कुर्गः-४,८००, अजमीर मेरवाराः-१,६००, बंगालः-९००, पंजाबः-५५०, अयोध्याप्रांतः-२०० व आसामः-८५.

(पुढें चालू.)

रून पुणें, मुंबई, रत्नागिरी, अथवा खानदेश प्रांत असें समजावयाचें नसून, सामान्यत्वें देश, कोंकण, वऱ्हाड वगैरे प्रांत असें समजावयाचें. असें न करतां बारा कोसांवरची भाषा बदलते, हें तत्त्व घेऊन चाललें, ह्मणजे भाषेंत मेळ कधीं राहावयाचा नाही, व सर्वत्र घोटाळा होईल. बारा कोसांवरची भाषा बदलते, ह्या तत्त्वाऐवजीं प्रांताप्रांतांतील भाषा काहीं अंशीं बदलते, हें तत्त्व आतां धरून चाललें पाहिजे.

(६) वर जीं तत्त्वें सांगितलीं त्यांच्या आधारें किंवा इतर नियमांच्या अन्वयें जीं वैकल्पिक रूपें ठरविण्यांत येतील तीं सर्व शुद्ध आहेत असें समजावें. ह्याशिवाय इतर रूपांची वर्णरचना होतां होईल तो वरील सर्व प्रांतांत एक-

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

वरील माहितीवरून समजून येईल कीं, मराठी भाषा बोलणारे लोक फक्त देश व कोंकण याच ठिकाणीं नसून निजामचें राज्य, वऱ्हाड, मध्यप्रांत, मध्यहिंदुस्थान वगैरे अनेक ठिकाणींही आहेत. निजामच्या राज्यांतील व इतर काहीं ठिकाणच्या मराठी बोलणारांचें संघटन व व्यवहार उर्दू वगैरे भाषा बोलणारांशीं फार असल्यामुळें त्यांच्या भाषेंत उर्दू शब्द बरेच येतात ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. सांप्रत, ऐतिहासिक बखरी विशेष प्रचारांत येऊं लागल्या आहेत. त्यांत फारसी वगैरे शब्द बरेच असतात. बखरीच्या विशेष परिचयापासून असल्या शब्दांचा विशेष पुनः परिचय होत चालला आहे. तेव्हां मराठीविषयीं विचार करतांना फारसी वगैरे भाषांस एकीकडे सारून फक्त संस्कृताविषयीं विचार करणे युक्त आहे किंवा कसें, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. हल्लीं जितके इंग्रजी शिकतात त्यांपेक्षां संस्कृत शिकणारांची संख्या बरीच कमी आहे, व हेंच प्रमाण पुढें राहणार आहे, हीही गोष्ट विसरतां कामा नये.

सारखी ठेवण्यासाठीं यत्न करणे इष्ट आहे. वर्णयोजना एक असणे अगत्याची व मुख्य गोष्ट, तशी नसणे नाइलाजाची व गौण गोष्ट समजावी.

निरनिराळ्या प्रांतांत एकाच शब्दाचीं निरनिराळीं रूपें प्रचारांत असतील, तर त्यांपैकीं संस्कृत, प्राकृत, फारसी वगैरे भाषांतील किंवा गुजराथी, कानडी, उर्दू वगैरे भाषांतील शब्दाला जें रूप जवळ तें प्रधान समजावें; व्युत्पत्ती वगैरे कळण्यास मार्ग नसेल, तर जें रूप विशेष व्यापक प्रदेशावर प्रचारांत आहे तें प्रधान समजावें, व तें वापरण्याविषयीं शिफारस करावी. ह्यावरून प्रशस्त ठरलेल्या रूपांशिवाय इतर रूपें अग्राह्य किंवा हद्दपार झालीं, असें समजावयाचें नाहीं. तीं वापरणे किंवा न वापरणे हें त्या त्या प्रांतांतील समंजस लोकांच्या मर्जीवर ठेवावें.

(७) 'ल' चा 'ळ', 'न' चा 'ण', 'श' चा 'स' वगैरे विकार मूळ शब्दांत होऊन मराठींत आलेले शब्द मराठीच होत; ते शब्द संस्कृत शब्द समजूं नये.

(८) मुख्य शब्दाचें रूप एकदा ठरविलें, ह्मणजे त्यावरून साधलेल्या शब्दामध्यें मुख्य शब्दाच्या रूपांत संधिनियमास वगैरे व्यत्यय येत नसेल किंवा दुसरें विशेष कारण नसेल, तर बदल करूं नये. विशेष ह्मणण्याचें कारण, 'अष्ट' ह्यापासून 'आठ' हा शब्द झाला आहे, व आठ + वार यापासून 'आठवडा' असें रूप झालें आहे. तथापि, अठरा, अठ्ठावीस, अठ्ठेचाळीस वगैरे शब्दांमध्यें 'आ' चा उच्चार न होतां 'अ' चा होतो.

(९) वर ज्या बाबी सांगितल्या त्यांशिवाय विशेष

काहीं स्थिती असेल, तर तेवढ्यापुरती मात्र विशेष व्यवस्था असावी.

(५) ज्या मुद्याविषयीं किंवा शब्दाच्या रूपाविषयीं आज निकाल होईल त्याप्रमाणे पुढें व्यवस्था व्हावी. ज्यांचा आज निकाल लागणार नाही त्यांचा निकाल लागेपर्यंत पूर्वीची वहिवाट कायम आहे असें समजावें.

(६) मराठी भाषेंतील वादग्रस्त मुद्याविषयीं निर्णय करण्यासाठीं ठिकठिकाणच्या विद्वान लोकांची एक कायमची कमिटी असावी. ती डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीने नेमली असतां बरें. म्हणजे सोसायटीच्या इतर कामांबरोबर हेंही काम निदान बरेच दिवस सुयंत्र चालेल. जीं तत्त्वें आज ठरतील त्यांच्या आधारें कमिटीने वादग्रस्त गोष्टींचा निर्णय करावयाचा, हें सांगावयास नको. कमिटींत विशेष भरणा विद्वान मराठी ग्रंथकारांचा व वर्तमानपत्रकर्त्यांचा असल्यास विशेष फायदे आहेत. त्यांपैकीं विशेष हा कीं, ते जो निर्णय करतील त्याची अंमलबजावणी करण्याकरतां त्यांस इतर लोकांवर अवलंबून बसण्याचें कारण राहणार नाही. त्यांस स्वतःच लौकर अंमलबजावणी करतां येईल.

मराठी भाषेची लेखनपद्धती.

अनुस्वाराविषयीं विचार.

लेखनपद्धतीविषयीं आजमित्तीस विचार करावयाचा आहे, तर ती जितकी सोपी व ठरीव असेल तितकें चांगलें, ह्या मताच्या संबंधाने बरीच एकवाक्यता दृष्टीस पडते; ती स्वेच्छाचारी असावी, असें मत असल्यास तें फारच थोड्या लोकांचें असेल. सांप्रत जो प्रश्न आहे तो—सोपी, सुयंत्र व ठरीव लेखनपद्धती कोणती, व ती अमलांत कशी आणतां येईल. मराठी भाषेच्या लेखनपद्धतीविषयीं विचार करतां विद्यार्थ्यांचा व इतर सामान्य लोकांचा जो विशेष घोटाळा व जी विशेष अडचण आढळून येते, ती अनुस्वार, ऱ्हस्व-दीर्घ व एकच शब्द अनेक रितींनी लिहिणे, ह्यांसंबंधाने मुख्यत्वें होय. हा घोटाळा व ही अडचण दूर झाली, म्हणजे इष्ट हेतू सिद्धीस जाण्याचा बराच संभव आहे, असें आह्मांस वाटल्यावरून त्या बाबतींत आमचें मत काय आहे, तें कळविलें. लेखनपद्धतीविषयीं आज विचार कर्तव्य आहे, तर एकंदर शब्दांच्या पूर्वपीठिका धुंडाळीत बसण्यांत विशेष तात्पर्य नाही. तसें करण्यापासून इष्ट हेतूची सिद्धी झाल्यास फारच थोडी होऊन निर्णय म्हणण्यासारखा होणार नाही, तव्हां शब्दाचा उच्चार करण्याचा समंजस लोकांचा सामान्य प्रघात कसा आहे, बहुजनसमूहास कमी त्रासाची पद्धत कोणती वाटेल, व भाषेचें एकंदरीने धोरण कसें आहे वगैरे गोष्टी पाहून—

तात्पर्य, बऱ्याच दिवसांच्या अनुभवाने जें सौकर्य, जी सोय व जो फायदा कळून आला आहे, त्यांविषयीं मुख्यत्वें विचार करून लेखनपद्धती ठरवावी, असें आह्मी सुचविलें होतें. सांप्रत, मराठी भाषा बनलेली आहे ती वररुची व हेमचंद्र, किंवा ज्ञानदेव व तुकाराम ह्यांच्या वेळीं जी भाषा प्रचलित होती तीहून बरीच भिन्न आहे. पूर्वींच्या काळचे नियम प्रस्तुतच्या स्थितीस सर्वथैव लागू करणे जसें हितावह नाही, तसेंच वररुची वगैरे आचार्यांनी प्राकृत भाषेच्या संबंधाने काहीं शब्दांवरून जे नियम केले आहेत, तेही सांप्रतच्या मराठी भाषेस सर्वथैव लागू करणें हितावह होणार नाही. दोन्ही काळांमध्यें पुष्कळ गोष्टींच्या संबंधाने फार अंतर पडलें आहे. तेव्हां ह्या सर्व गोष्टींचा विचार करून काय करणे तें करावें, अशी आमची सूचना होती; परंतु त्या सूचनेच्या बाबतींत काहीं मित्रांचा गैरसमज झाला असावा, असें दिसतें. मराठी भाषेचें वैभव जो अनुस्वार तो अजी नाहीसा करण्यास, विद्यादेवीच्या राज्यांत बंडाळी करण्यास अथवा अडाणीपणाची सर्वत्र प्रवृत्ती करण्यास आह्मी उद्युक्त झालो आहो, असा काहींचा समज झाला आहे. हा समज चुकीचा आहे. अनुस्वार न दिल्यामुळें अर्थविपर्यास होत असेल, किंवा काहींच अर्थ होत नसेल, तर अनुस्वार अवश्य असावा; एकवचन व अनेकवचन हीं ओळखतां येण्याकरतांही तो असावा; काहीं नपुंसकलिंगी नामांच्या व त्यांसंबंधाच्या विशेषणांच्या व क्रियापदांच्या अंत्यावर हल्लीं अनुस्वार देतात, तो कायम ठेवावा. हे व अशासारखे दुसरे अनुस्वार खरोखर अवश्य आहेत. ह्यावरून अनुस्वारास अजी फाटा देऊन ‘ भाषेचें वैभव ’ नाहीसें करावें, असा

आमचा हेतू नाही, हें समजून येईल. लेखनपद्धतीच्या बाबतींत ठरीव व्यवस्था करतां आल्यास पाहावी, ह्मणून सांप्रत आमचा यत्न चालू आहे, हें सांगावयास नको. काहीं अनावश्यक अनुस्वार गाळले असतां भाषेचें वैभव कमी होतें, अथवा काहीं शब्द निष्कारण ऱ्हस्व लिहितात, ते दीर्घ लिहिल्याने अडाणीपणाची प्रवृत्ती होते, असें काहींचें ह्मणणे आहे, तें गैरसमजामुळें असावें, असें दिसतें.

हल्लीं जे शब्द मराठींत रूढ झाले आहेत त्यांच्या पूर्वपीठिकेवरून जर काहीं सामान्य नियम बसवितां येतील, तर ती पीठिका अवश्य पाहावी. कारण, शास्त्र व रूढी ह्या दोहोंचा मिलाफ होऊन एकादी विचाराची गोष्ट ठरल्यास उत्तमच आहे. मराठी भाषेंत संस्कृत व प्राकृत या भाषांतील शब्द असून शिवाय अन्य भाषांतीलही बरेच शब्द आहेत, व दिवसेदिवस अधीक अधीक तसे शब्द रूढ होऊं लागले आहेत. तेव्हां पूर्वपीठिका पाहावयाची ती फक्त संस्कृत व प्राकृत शब्दांपुरतीच पाहावयाची, किंवा विदेशी शब्दांच्या संबंधानेही पाहावयाची, असा एक प्रश्न आहे. हा प्रश्न एकीकडे ठेवूं. आतां मराठी भाषेंतील वादग्रस्त काहीं गोष्टींविषयीं निर्णय करणे झाल्यास कोणत्या शास्त्रांतील गोष्टी प्रमाणभूत धराव्या, असा प्रश्न आहे. मराठींत जे प्राकृत शब्द आहेत त्यांपैकीं काहींच्या संबंधानें वररुची वगैरे विद्वानांनी विचार केलेला दिसतो; तेव्हां अशा प्राकृत शब्दांविषयीं विचार करतांना त्यांच्या मतास मान देणे योग्य दिसतें; परंतु इतर प्राकृत शब्दांवरून किंवा अन्य रितीनें मराठींत जे अनेक शब्द रूढ झाले आहेत त्यांची माहिती उपलब्ध नसली, तर त्यांविषयीं काय करावयाचें ? दुसरें

असें कीं, जे शुद्ध संस्कृत शब्द मराठींत उपयोगांत आले आहेत, त्यांच्याही पूर्वपीठिकेविषयीं जुन्या संस्कृत किंवा प्राकृत ग्रंथांतून विचार केलेला आढळण्यांत येत नाहीं; तेव्हां त्यांच्या ऱ्हस्वदीर्घांविषयीं निर्णय करण्यास साधन असा प्रमाणभूत ग्रंथ समजेपर्यंत त्यांची पूर्वपीठिका पाहण्यास अडचण आहे. संस्कृत शब्दांचा विशेष प्रचार प्रथम वामन पंडिताने सुरू केला असावा, असें ह्मणण्यास चिंता नाही. हा क्रम नंतर मोरोपंत, रघुनाथ पंडित वगैरे इतर महाराष्ट्र कवींनी चालू ठेवला. पद्यात्मक ग्रंथांत जी लेखनपद्धती आढळते, तीविषयीं सांप्रत विचार करावयाचा नाही, गद्यात्मक ग्रंथांच्या लेखनपद्धतीविषयीं विचार करावयाचा आहे. वरील महाराष्ट्र कवींच्या कृती पद्यात्मक आहेत ही गोष्ट, व 'निरंकुशाः कवयः' ही गोष्ट लक्षांत आणतां शे दोनशे वर्षांपूर्वींच्या पद्यात्मक ग्रंथांतील लेखनपद्धतीविषयींचे विचार सांप्रतच्या गद्यात्मक ग्रंथांतील लेखनपद्धतीस लागू करावयाचे की काय, असाही एक प्रश्न आहे.

मराठी भाषेंत गद्यात्मक ग्रंथ होऊं लागल्यास सुमारें पन्नास साठ वर्षें झालीं. सदाशीव काशिनाथ छत्रे, बाळ शास्त्री जांबेकर, महादेव शास्त्री कोल्हटकर, दादोबा पांडुरंग, कृष्णशास्त्री चिपळूणकर, मेजर क्यांडी वगैरे विद्वानांनी जी लेखनपद्धती चालू केली, तीच बऱ्याच अंशीं आज चालू आहे; परंतु शब्दांच्या पूर्वपीठिकेविषयीं विचार करून त्यांचें रूप ठरविण्याचा कोणी म्हणण्यासारखा यत्न केल्याचें दिसून येत नाही. नाही ह्मणण्यास, कृष्णशास्त्री ह्यांनी थोड्या शब्दांविषयीं माजी शालापत्रकांत काहीं स्थूल विचार प्रदर्शित केले आहेत; परंतु तेवढ्याने प्रकृत वि-

षयाच्या संबंधाने निर्वाह लागत नाही. ज्या पूर्वपीठिकेपासून प्रस्तुतच्या विषयास चांगली मदत होईल व सामान्य नियम बसविण्यास साहाय्य होईल, अशी पूर्वपीठिका मिळण्याचें चांगलें साधन दिसत नाही. शब्दव्युत्पत्तीच्या संबंधाने माहिती मिळते, पण ती फारच अपुरी आहे; व ती थोड्या शब्दांपुरती आहे. शिवाय, संस्कृत व प्राकृत ह्या दोहोंमध्यें विरोध दिसून आल्यास संस्कृताची मातबरी मानावयाची किंवा प्राकृताची मानावयाची, व जेथें दोहोंचाही आधार नाही तेथें काय करावयाचें, असा प्रश्न उत्पन्न होतो. ह्या कारणांमुळें लेखनपद्धतीविषयीं सामान्य नियम ठरविणे आहे, तर केवळ पूर्वपीठिका पाहून निर्वाह होणार नाही; तथापि, अनुस्वाराच्या व्युत्पत्तीविषयीं जी माहिती आह्मांस मिळाली आहे ती आमच्या मित्रांच्यापुढें ठेवली असतां, आमच्या म्हणण्याची यथार्थता त्यांस कळून येईल, असें वाटतें. शिवाय, त्यांस आणखी काहीं माहिती असेल, ती कळली असतां विशेष उपयोग होईल, असें समजून ज्या शब्दांवर अनुस्वार देण्यास काहीं अथवा पुष्कळ लोकांचा प्रघात आहे ते शब्द, व त्यांच्या व्युत्पत्तीविषयीं जी माहिती मिळाली ती, या प्रकरणाच्या शेवटीं जोडलेल्या परिशिष्टांत दिली आहे; व प्राकृत भाषेच्या व्याकरणांतील माहिती पुढें दिली आहे. जे शब्द परिशिष्टांत दिले आहेत तेवढ्याच शब्दांवर अनुस्वार देण्यांत येतो, असें नाही. मोलस्वर्थ साहेबांचा कोश चाळून पाहतां आणखी काहीं शब्द आहेत; परंतु ते विशेषसे प्रचारांत नाहीत, असें वाटल्यावरून ते दिले नाहीत. जे शब्द दिले आहेत त्यांवरून विचार करण्यास अडचण येणार नाही, असें वाटतें.

(१) मोऽनुस्वारः

(अ) अंत्यमकारस्यानुस्वारो भवतिः—जसें जलं, फलं इत्यादी.

(ब) क्वचिदनंत्यस्यापिः—जसें वणम्मि, वणंमि (वने).

(२) वा स्वरे मश्च.

अंत्यमकारस्य स्वरे परेऽनुस्वारो वा भवति । पक्षे लुगपवादःमस्य मकारश्चः–अंतींच्या 'म्'च्या पुढें स्वर आला असतां 'म्'चा विकल्पें अनुस्वार करावा. जसें:—फलमाहरति. = फलं आहरइ, फलमाहरइ. केव्हां केव्हां 'म्' शिवाय इतर व्यंजन अंतीं असेल, तर त्या व्यंजनाच्याऐवजीं 'म्' होतो. जसें:—पृथक् = पिहम्; सम्यक् = सम्मम्.

(३) ङञणनो व्यंजने.

ङ्, ञ्, ण्, न् इत्येतेषां स्थाने व्यंजने परेऽनुस्वारो भवति. ङ्, ञ्, ण्, न् ह्यांपुढें व्यंजन आलें असतां त्यांऐवजीं अनुस्वार होतो. जसें:–पङ्क्तिः = पंत्ती; कञ्चुकः = कंचुओ; षण्मुखः = संमुहो; कन्सः = कंसो.

(४) वक्रादावन्तः–

वक्रादिषु यथादर्शनं प्रथमादेःस्वरस्यान्त आगमो रूपोऽनुस्वारो भवति. वक्र वगैरे शब्दांत अनुस्वाराचा उपयोग आगम ह्मणून करण्यांत येतो. जसें.—

वक्रं = वंकं; अश्रु = अंसू; स्मश्रु = मंसू; गृष्टिः = गुंठी; मस्तं = मंथं; पुच्छं = पुंच्छं; गुच्छं = गुंच्छं; मूर्द्धन् = मुंडं; स्पर्शः = फंसो; वृध्नः = वुंधो; कर्कोटः = कंकोडो; कुद्मलं

= कुंपलं; दर्शनं = दंसणं; वर्णः = वंणो; अश्वः = अंसो; वृश्चिकः = विंच्छिओ; मार्जारः = मंजारो.

वर जे शब्द सांगितले त्यांच्या पहिल्या अक्षरावर अनुस्वार असावयाचा व पुढील शब्दांच्या दुसऱ्या अक्षरावर तो द्यावयाचा. जसें:—

वयस्यः = वयंसो; मनस्विनी = मणंसिणी; मनःशिला = मणंसिला; प्रतिश्रुतं = पडिंसुदं; प्रतिश्रुत् = पडिंसुआ.

उपरि = उवरिं व अभिमुक्तः = अहिमुंको ह्या शब्दांच्या तिसऱ्या अक्षरावर अनुस्वार असावयाचा.

(५) क्त्वास्वादेर्णस्वोर्वा.

क्त्वायाः स्वादीनां च यो णः सुश्च तयोरनुस्वारोऽन्ते वा भवति. क्त्वा व स्वादिप्रत्यय (सु, औ वगैरे) ह्यांतील 'ण' व 'सु' ह्यांच्यांऐवजीं विकल्पें अनुस्वार करावा. जसें:—कृत्वा = काऊणं, काऊण; वृक्षेण = वच्छेणं, वच्छेण; वृक्षेषु = वच्छेसुं, वच्छेसु.

(६) विंशत्यादेर्लुक्.

विंशत्यादीनामनुस्वारस्य लुग्भवति। विंशति वगैरे शब्दांतील अनुस्वाराचा लोप होतो. जसें:—विंशतिः—वीसा, त्रिंशत् = तीसा; संस्कृतं = सक्कअं; संस्कारः = सक्कारो; संस्तुतं = सत्तुअं.

(७) मांसादेर्वा.

मांसादीनामनुस्वारस्य लुग्वा भवति. मांसादी शब्दांतील अनुस्वाराचा लोप विकल्पें होतो.

मांस = मासं, मंसं; मांसलं = मासलं, मंसलं; कांसं = कासं, कंसं; पांसु = पासू, पंसू; कथं = कह, कहं; एवं = एव,

एवं; नूनं = णूण, णूणं; किम् = कि, किं; इदानीं = इआणी, इअणीं; किंशुकं = किसुअं, किंसुअं; सम्मुखं = समुह, समुहं; सिंहः = सीहो, सिंघो.

(८) वर्गेऽन्त्यो वा.

अनुस्वारस्य वर्गे परे तस्यैव वर्गस्यान्त्यो वा भवति.

पांच वर्गांपैकीं कोणतें एकादें व्यंजन पुढें आलें असतां अनुस्वार हा, ज्या वर्गांतील अक्षर असेल त्या वर्गाचा अनुनासिक विकल्पें होतो, असें समजावें. जसें:—पङ्कः = पंको, पङ्को; कञ्चुकः = कुंञ्चुओ, कंचुओ; शङ्का = संका, सङ्का; सन्तरति = संतरइ, सन्तरइ.

प्राकृत ग्रंथांच्या आधारें अनुस्वाराच्या संबंधानें जी माहिती दिली, तिजवरून वीस, तीस, अंसू, वांक वगैरे थोड्या शब्दांशिवाय इतर अनेक वादग्रस्त शब्दांविषयीं कितपत माहिती मिळते व तिचा वास्तविक किती उपयोग करतां येईल, हें वाचकांच्या लक्षांत येईल.

परिशिष्टांत जे शब्द दिले आहेत तेवढ्याच शब्दांवर अनुस्वार देण्यांत येतो असें नाहीं, आणखीही काहीं शब्दांवर तो दिलेला आढळतो, असें मागें सांगितलेंच आहे. सांचणें, सांवरणें, कांटा, सांपडणें, रंवथ, सांखळी वगैरे शब्दांवर अनुस्वार देतात, त्यास काहीं तरी कारण दाखविण्यांत येतें; परंतु झोंप, संवय, शेंवट, नाहीं, हंसणें सोंटा, हांक वगैरे जे कित्येक शब्द आहेत, त्यांवर अनुस्वार देण्याच्या बाबतींत काहींच कारण दाखविण्यांत येत नाहीं. काहीं एक सयुक्तिक कारण नसतां जी वहिवाट सुरू झाली ती परंपरेनें आजतागाईत चालू आहे. सांपडणें, सोंपविणें,

कांग वगैरे काहीं शब्दांवर अनुस्वार देण्याचा बऱ्याच लोकांचा प्रघात दिसतो, परंतु इतर शब्दांवर काहीं लोक अनुस्वार देतात व काहीं देत नाहीत; विद्वान देतात व सामान्य लोक देत नाहीत, असा प्रकार नसून दोघेही देतात! व निष्कारण अनुस्वार देण्याची वहिवाट मोडून टाकली असतां मराठी भाषेचें वैभव जाऊन ती विशोभित दिसेल, असें उभयतांस वाटत आहे!!! आतां खरी स्थिती काय आहे तिजविषयीं विचार करूं.

परिशिष्टांत जे शब्द दिले आहेत ते सुमारें ४०० आहेत. मोलस्वर्थसाहेबांचा कोश, व प्राकृत व मराठी व्याकरण ह्यांवर जे ग्रंथ आह्मांस उपलब्ध होते ते चाळून पाहतां ह्यांपैकीं बऱ्याच ह्मणजे सुमारें १९० शब्दांची व्युत्पत्ती कळण्यास मार्ग नाही. बाकी राहिलेल्या २१० शब्दांची जी पूर्वपीठिका आढळली ती दिली आहे. तीवरून असें दिसून येतें कीं, २१० शब्दांपैकीं सुमारें ९५ शब्द असे आहेत कीं, ते ज्या संस्कृत किंवा प्राकृत शब्दांपासून मराठींत आले आहेत त्यांत अनुनासिक दिसून येतो; सुमारें ४५ शब्दांत जोडाक्षर दिसून येतें; सुमारें १० शब्दांत रेफ दिसून येतो; व बाकी राहिलेल्या शब्दांत निरनिराळे वर्ण असल्याचें समजून येतें.

वर जी ठोकळ माहिती दिली तिजवरून काहीं सामान्य नियम बसवितां येतो किंवा कसें हें समजेल. ४०० शब्दांपैकीं सुमारें १९० शब्दांच्या पूर्वपीठिकेचा आज पत्ता लागत नाही; बाकी राहिलेल्या शब्दांपैकीं काहीं शब्दांच्या व्युत्पत्तीविषयीं संशयच आहे. असे संशयात्मक शब्द वजा करतां बाकी उरलेल्या शब्दांच्या व्युत्पत्तीवरून समजतें कीं,

काहींत अनुनासिक, काहींत जोडाक्षर, काहींत रेफ व काहींत निरनिराळे वर्ण दृष्टीस पडतात. अशी स्थिती आहे, तर अनुस्वाराच्या संबंधानें सामान्य नियम काय बसवावा व हल्लीं ज्या शब्दांवर अनुस्वार देण्यांत येतो त्यांचा इतिहास आहे, ह्मणून सांगण्यांत येतें तो इतिहास कोणता, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. जोडाक्षर, रेफ वगैरे निरनिराळ्या वर्णांवरून निरनिराळे नियम करावयास लागलें असतां तसें करतां येईल, नाहीं असें नाहीं; परंतु अशा नियमांखालीं येणाऱ्या शब्दां इतकेच किंबहुना त्यांहून जास्त, अपवादक शब्द आढळून येऊं लागले, तर अशा नियमांची व ज्या इतिहासावरून हे नियम बसविण्यांत येतील त्याची किंमत राहणार नाहीं. शिवाय, जोडाक्षर, रेफ वगैरे वर्णांचा व अनुस्वाराचा काहीं संबंध जुळवितां येईल, असें म्हणावें, तर तसा प्रकार दिसत नाहीं. तेव्हां मराठी भाषेंत निष्कारण अनुस्वारांची गर्दी उगीच झाली आहे, असें म्हणावें लागतें.

जोडाक्षर, रेफ वगैरे वर्णांचा अनुस्वाराशीं अर्थाअर्थी संबंध नाहीं; तशी अनुनासिकाची गोष्ट नाहीं. ह्या दोहोंचा निकट संबंध असून कित्येक वेळां अनुस्वाराच्याऐवजीं अनुनासिकाचा अथवा अनुनासिकाच्याऐवजीं अनुस्वाराचा उपयोग केला तर चालतो. तेव्हां ज्या मूळच्या शब्दांत अनुनासिक आहे, त्यांवरून मराठींत आलेल्या शब्दांवर अनुस्वार द्यावा हें म्हणणें सयुक्तिक दिसतें; परंतु मूळच्या शब्दांतील अनुनासिकाविषयीं निर्णय करावयाचा झाल्यास मूळचा शब्द कोणता, संस्कृत किंवा प्राकृत, किंवा दोन्ही? संस्कृत शब्द मूळ शब्द मानला, तर थोडीबहुत माहिती

मिळते; परंतु प्राकृत मूळ शब्द मानला, तर त्याविषयीं तितकीही माहिती मिळत नाहीं; तेव्हां काय करावयाचें, असा प्रश्न उत्पन्न होतो. संस्कृत शब्द मूळ शब्द मानला, तर एक अडचण उत्पन्न होते. ती ही कीं, शब्द संस्कृतांतून प्राकृतांत येतांना त्यांचें बरेंच रूपांतर होतें. हें रूपांतर होतांना जर अनुनासिकाचा अनुस्वार होऊन तो प्राकृतांत कायम राहिला असेल, तर प्राकृतावरून आलेल्या त्या मराठी शब्दांवर अनुस्वार द्यावा, हें रास्त दिसतें; परंतु ज्या मराठी शब्दांवर अनुस्वार असावा, असें आपण ह्मणतो, त्यांच्या मातृस्थानीं जे प्राकृत शब्द ते रूपांतर पावल्यावर त्यांवर अनुस्वार कायम आहे, हें पाहावयास नको का? संस्कृताचें प्राकृत रूप होत असतां काहीं शब्दांचें विलक्षण रूपांतर झालें आहे, असें दृष्टीस पडतें. अनुनासिकाची परंपरा संस्कृत व प्राकृत ह्या दोन पिढ्यांपर्यंत कायम असेल, तर तिसऱ्या पिढींतील, ह्मणजे मराठी शब्दांवर अनुस्वार द्यावा, हें ह्मणणे योग्य आहे; परंतु असें नसेल, तर काय करावयाचें हा प्रश्न आहे. पण हाही प्रश्न एकीकडे ठेवूं; व ज्या संस्कृत शब्दांत अनुनासिक आहे त्यावरून आलेल्या मराठी शब्दांवर अनुस्वार असावा, असा नियम करूं. परंतु असा नियम केला असतां जोडाक्षर, रेफ वगैरे वर्ण शब्दांत असल्यामुळें आलेल्या अनुस्वारास फाटा दिला पाहिजे, हें सांगावयास नको. शिवाय, असा नियम केला, तर मंचक, युग्म, दंष्ट्रा, तीक्ष्ण, दशम, रश्मि, विस्मरण, आत्मीय, झंपा, नवम, सप्तम, उत्खनन, दंशति, भूमि, निर्गमन, उद्गमन, जेमन, वामलूर, रंजन, विरंजन, दाम, नमन, अवनमन, सपत्नी, अग्नि वगैरे कित्येक शब्द आहेत,

त्यांवरून माचवा, जूग, दाढ, तिखट, दहावा, रशी, विसरणे, आपला, झडप, नववा, सातवा, उखळणे, डसतो, भुई, निघणे, उगवणे, जेवण, वारूळ, रिझवणे, विरजणे, दावें, लवणे, ओगवणे, सवत, आग वगैरे शब्द आले आहेत, त्यांवर हल्लीं अनुस्वार देत नाहीत, तो द्यावा लागेल.

अनुस्वाराच्या पूर्वपीठिकेविषयीं उपलब्ध असलेली जी माहिती दिली, त्या बाबतींत ज्या अडचणींचें दिग्दर्शन केलें व एकंदर प्रकरणासंबंधाने जे विचार सुचविले, त्यांवरून सामान्य नियम बसविण्याच्या कामांत नुसत्या इतिहासाच्या दृष्टीने विचार करण्यांत कितपत तात्पर्य आहे, हें लक्षांत येईल. आतां शास्त्रदृष्टी, ह्मणजे इतिहासाचा विचार एकीकडे ठेवून प्रत्यक्ष चालू व्यवहाराकडे वळूं. ह्याविषयीं विचार करतां आपणांस असें दिसून येतें कीं, सार्थ अनुस्वार देणे, ह्मणजे ज्या ठिकाणीं अनुस्वार न दिल्याने अर्थाचा विपर्यास होत असेल, किंवा काहींच अर्थ होत नसेल, तर त्या ठिकाणीं अनुस्वार देणे अवश्य आहे, ही गोष्ट सर्वांस कबूल आहे; ह्याबद्दल मतभेद मुळींच नाही. त्याचप्रमाणें एकवचनी रूप व अनेकवचनी रूप अशीं निरनिराळीं ओळखतां यावीं, ह्मणून अनुस्वाराचा उपयोग करावा व नपुसकलिंगी काहीं नामें व त्यांसंबंधाचीं विशेषणें व क्रियापदें ह्यांवरही तो द्यावा, ह्याविषयीं पुष्कळ एकवाक्यता आहे; मतभेद असल्यास फारच थोड्या लोकांचा आहे.

एकच शब्दाचे दोन अर्थ होत असतील, तर निरनिराळे अर्थ समजण्यासाठीं एका शब्दावर अनुस्वार द्यावा व एकावर तो नसावा, ह्या मुद्याविषयीं विचार करतां अर्थ

निरनिराळे समजण्यासाठीं काहीं शब्दांवर अनुस्वार देण्याचा बराच प्रघात दिसून येतो; तथापि, काहीं लोकांचें ह्मणणे असें आहे कीं, संदर्भावरून निरनिराळे अर्थ समजण्यास मार्ग आहे, तर अशा अनुस्वाराची जरुरी नाहीं, व असे शब्द भाषेंत फार थोडे असून त्यांचा उपयोग करण्याचा प्रसंग वारंवार येत नाहीं; तेव्हां असे अनुस्वार गाळावे, हें उक्त आहे. अनुस्वाराच्या संबंधाने आणखी दोन प्रकार आहेत. त्यांपैकीं एक शब्दाच्या प्रत्ययाच्या अंत्याक्षरावर व दुसरा इतर अक्षरांवर अनुस्वार देणे. जो मुख्य वाद आहे तो ह्या दोन बाबींविषयीं आहे. हे दोन प्रकारचे अनुस्वार काढून टाकले असतां अर्थविपर्यास होण्याचें किंवा भलताच अर्थ होण्याचें भय नाहीं; किंवा निरनिराळे अर्थ समजणे, हा जो एक अनुस्वाराचा उपयोग तोही व्यवहारांत होत नसून त्यांपैकीं बहुतेकांचा वस्तुतः उपयोग काय, तोही कळत नाहीं. शिवाय, ते वारंवार येत असल्यानें त्यांपासून विद्यार्थ्यांस व सामान्य जनांस अडचण होऊन त्यांचा विनाकारण घोटाळा होतो, अर्थनिष्पत्ती म्हणण्यासारखी होत नाहीं, व शतशः अनुस्वार देण्याचें कारण पडल्याने कालाचा मात्र अपव्यय होतो. अशा अनुस्वारांच्या इतिहासाच्या संबंधाने माहिती देणे अवश्य आहे, असें वाटत असेल, तर ती निरनुस्वार शब्दांच्या माहितीबरोबर खुशाल द्यावी; परंतु लेखनपद्धतींत तिची भानगड असण्याचें योग्य कारण समजेपर्यंत ती नसावी, असें काहींचें म्हणणे आहे. हें म्हणणे बरोबर आहे किंवा कसें, ह्याविषयीं भाषाभिज्ञ लोकांनी विचार करावयाचा आहे.

झोंप, संवय, शेंवट, शेंपूट वगैरे जे कित्येक शब्द आहेत त्यांवर अनुस्वार देण्याची रूढी पडली आहे; पण तींत अर्थ नाही, तेव्हां ती मोडली असतां हरकत नाही, असें बऱ्याच सुज्ञ लोकांचें ह्मणणे दिसतें. बाकी राहिलेल्या शब्दांवर अनुस्वार देण्याची रूढी सकारण व फायदेशीर असेल, तर त्यांवर अनुस्वार अवश्य द्यावा. योग्य कारण व फायदा हीं कोणी दाखविलीं असतांही अनुस्वार देऊं नये, असें ह्मणणे दुराग्रहाचें आहे. तेव्हां आज ज्या गोष्टीविषयीं भाषाभिज्ञ लोकांनी मुख्यत्वें विचार करावयाचा आहे ती ही कीं, निरर्थक अनुस्वार कोणते व सार्थ कोणते, हें ठरवून त्यांस जे सार्थ अनुस्वार वाटत असतील त्यांची परंपरा कशी आहे व त्यांचा उपयोग कोणता हें ठरविणे. असें करण्यास साधन असावें, म्हणून आम्हांस जी माहिती उपलब्ध झाली ती, व तिजसंबंधाने आमचे विचार काय आहेत ते पुढें दिले आहेत.

मराठी भाषेची लेखनपद्धती.

अनुस्वार विचार.

मराठी भाषेच्या लेखनपद्धतीच्या संबंधाने ज्या तत्त्वांचें विवेचन मागें करण्यांत आलें आहे, त्यांविषयीं व जे अभिप्राय मित्रमंडळीकडून आले आहेत त्यांविषयीं विचार करतां मराठी भाषेच्या लेखनपद्धतीच्या बाबतींत जी अखेर व्यवस्था असावी, असें आह्मांस वाटतें तीः—

मराठी भाषेच्या लेखनपद्धतींत जे दोष अथवा अडचणी आहेत त्या मुख्यत्वें अनुस्वार, ऱ्हस्वदीर्घ व एकच शब्द अनेक रितींनी लिहिणे ह्यांसंबंधाने आहेत. बाकीच्या गोष्टी किरकोळ आहेत. प्रथम अनुस्वाराविषयीं विचार करून नंतर इतर गोष्टींचा विचार करूं.

१ अनुस्वारः—

अनुस्वारांत मुख्य दोन प्रकारचे अनुस्वार ग्राह्य धरले आहेत. एक अर्थाच्या किंवा सोईच्या दृष्टीने व दुसरे इतिहासाच्या किंवा परंपरेच्या दृष्टीने. ह्यांशिवाय विशेष कारणांसाठीं अनुस्वार असावे, असें ठरल्यास तेही ग्राह्य समजून बाकीचे निराधार, सबब अग्राह्य समजावे.

अर्थाच्या अथवा सोईच्या दृष्टीने ग्राह्य अनुस्वारः—

१ (अ) ज्या शब्दांवर अनुस्वार न दिला, तर अर्थविपर्यास होतो, किंवा काहींच अर्थ

होत नाहीं (ह्मणजे अर्थात ते शब्दच होत नाहीत) त्या शब्दांवर अनुस्वार अवश्य असावा; मग असे शब्द शुद्ध संस्कृत असोत, संस्कृतांतून अपभ्रष्ट होऊन आलेले असोत, किंवा विदेशी असोत.

उ० आंबा, मांडी, संख्या, सोंड, कंड, पेंढा, रांग, सांधा इ०.

अंक, पंचा, सुंठ, गंध, दंभ, संयोग, संरक्षण, संवाद, संशय, संसार, सिंह इ०.

टीप—आंबा, मांडी वगैरे शब्दांवर अनुस्वार न दिला, तर ह्या शब्दांच्या मूळ अर्थाहून भलताच अर्थ होतो. अंक, पंचा वगैरे शब्दांवर तो न दिला, तर काहींच अर्थ होत नाही. अंक, दंभ वगैरे काहीं शब्दांस व्युत्पत्ती, लेखनपद्धती व उच्चाराचा प्रघात ह्या तिहींचा आधार आहे; बाकीच्यांस दोहोंचा आहे; सबब असले अनुस्वार ग्राह्य व अवश्य होत.

(ब) सविभक्तिक शब्दांच्या अनेकवचनीं सामान्यरूपाच्या अंत्यस्वरावर अनुस्वार अवश्य द्यावा, पण पुढील सविभक्तिक अशा शब्दाच्या योगानें झालेल्या सामान्यरूपावर तो द्यावयाचा नाहीं.

उ०—माळ्यांस, झाडांनी, इंग्रजांहून, वाद्यांचा, बालकांनो, भाषांविषयीं, दिवसांपासून, मनुष्यांमध्यें, त्यांकडे, आह्मांस, तुह्मांस, आपणांस, ज्या बायकांची, त्या झाडांवर, चांगल्या मुलांना, चौघां भावांस, चोहों बाजूंनी इ०.

टीप—आह्मां मनुष्यांस, तुह्मां लोकांस इत्यादी स्थलीं

आह्मां, तुह्मां हीं सामान्यरूपें पुढील सविभक्तिक अशा शब्दांच्या योगानें झालेलीं नाहीत, तर प्रत्यय लागूनच हीं रूपें झालेलीं आहेत, ह्मणून त्यांजवर अनुस्वार येतो. ह्या शब्दांचा पुढील शब्दांशीं अभेदसंबंध (In apposition) आहे.

सविकरण विभक्तीच्या सामान्य रूपावर अनेकवचन असूनही अनुस्वार नसतो. जसें:—आमचा, तुमचा, आमच्याहून, तुमच्याहून, त्यांच्याहून, यांच्याहून, ज्यांच्याहून इ०. येथें आमच्याहून, तुमच्याहून, त्यांच्याहून इत्यादी शब्दांचा अर्थ आह्मांहून, तुह्मांहून, त्यांहून असा करावयाचा. जेथें हे शब्द विशेषणासारखे असतील तेथें सामान्यरूपावर अनुस्वार येईल. जसें—आमच्यांहून म्हणजे आमच्या मुलांहून असा अर्थ असतां अनुस्वार येतो.

प्रथमा विभक्तीस सामान्यरूप होत नाहीं. घर, हात, तोंड वगैरे थोड्या शब्दांस ऊन, ईं अथवा आं प्रत्यय लागून घरून, हातून, तोंडून, घरीं, हातीं, तोंडीं, पायीं, पायां वगैरे रूपें बनतात; येथें स्वरादी प्रत्ययांपूर्वीं पररूप संधी होऊन सामान्यरूपाच्या प्रत्ययांचा लोप झाला आहे; तेव्हां ह्या ठिकाणीं अनुस्वाराचा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं. वरील उदाहरणांत ज्या, त्या, चांगल्या हीं पुढील बायका, झाडें, मुलें ह्या सविभक्तिक शब्दांच्या योगानें सामान्यरूपें झालीं आहेत, म्हणून त्यांवर अनुस्वार नसावयाचा.

रा० रा० आचार्य वगैरे दोनतीन मित्रांचें असें म्हणणे आहे कीं, वरील नियम नसावा; कारण, प्रथमेचीं एकवचनी व अनेकवचनी रूपें संदर्भावरून ओळखतां येतात; सप्तमीचीं उभयवचनी रूपें सारखींच असतात; सप्तमीस

व प्रथमेस सामान्यरूपच नाही; तृतीयेचे अनेकवचनी प्रत्यय व संबोधनाचा एकवचनी प्रत्यय भिन्न असल्यामुळें अनेकवचन ओळखण्यास नड पडत नाही वगैरे.

विविधविज्ञानविस्तारकर्त्यांचें म्हणणे कीं:— “ आम्हांस, तुम्हांस इत्यादिकांतील आम्हा, तुम्हा हीं जीं विभक्तिसामान्यरूपें, तीं एकवचनी सामान्यरूपांहून सर्वथा भिन्न असल्यामुळें त्यांवरील अनुस्वाराचें कारण नाहीं. आमचा, तुमचा, ह्यांतील ‘आम,’ ‘तुम’ ह्यावर अनुस्वार नसतो, हा एक आधार आहे.”

प्रचलित लेखनपद्धतीविषयीं विचार करतां वरील नियमांत सांगितल्याप्रमाणें अनुस्वार देण्याची सार्वत्रिक वहिवाट आहे ; काहीं विभक्तींत येणाऱ्या अनुस्वाराप्रमाणें उच्चारही करण्यांत येतो ; एकवचनी व अनेकवचनी सामान्यरूपें निरनिराळीं ओळखतां येण्यासाठीं अशा अनुस्वारांचा उपयोग फार आहे; काहीं विभक्तींच्या संबंधानें एक नियम व दुसऱ्यांच्या संबंधानें निष्कारण दुसरा ही सुयंत्र व्यवस्था नाही; आलेल्या मतांपैकीं बहुतेक मतें अशा प्रकारच्या अनुस्वारास अनुकूल आहेत वगैरे कारणांचा विचार करतां हा अनुस्वार अवश्य आहे, असा आमचा अभिप्राय आहे.

(क) एकाच शब्दाचे दोन अर्थ होत असतील, तर भिन्न अर्थ दर्शविण्यासाठीं हल्लीं अनुस्वाराचा उपयोग करतात त्याप्रमाणें तो करावा, असा नियम सुचविला होता. परंतु एकंदर कारणांचा विचार करतां असल्या नियमाची आवश्यकता दिसत नाही, सबब हा रद्द समजावा.

टीपः—संदर्भावरून दोन निरनिराळे अर्थ समजण्यास अडचण पडत नाही, अशा अनुस्वारापासून नसती अडचण करून घेण्यासारखें आहे, त्यापासून श्लेषादी अलंकाराचें एक साधन कमी केल्यासारखें होतें, ही नवी कल्पना पाश्चात्यांची आहे, व आमच्या लेखनपद्धतीस तिची जरुरी नाही, समान शब्दांमध्यें अर्थभेदास्तव बुद्ध्या सूक्ष्म उच्चारभेद कल्पून तो ध्यानांत ठेवून उच्चारणे आणि लिहिण्यामध्यें तो मोठ्या प्रयत्नाने दाखविणे, ही गोष्ट लेखनकलेला विनाकारण काठिन्य आणणारी आहे, वगैरे आक्षेप वरील नियमाच्यासंबंधाने घेण्यांत आले आहेत. त्यांपैकीं काहीं विचार करण्यासारखे आहेत. सर्वांत मोठी अडचण आहे ती ही कीं, पांच, पाच; घांट, घाट; कांपणे, कापणे; कांच, काच; भांजणी, भाजणी; वांचणे, वाचणे; नांव, नाव ह्यांपैकीं पांच (संख्या) घांट (घंटा) वगैरे शब्दांवर अनुस्वार देण्याची व पाच (रत्नविशेष), घाट (नदीचा) वगैरे शब्दांवर न देण्याची वहिवाट आहे; परंतु मठ (मटकी), मठ (गोसाव्यांची राहण्याची जागा); द्रव्य (पैका), द्रव्य (पदार्थ); नातू (मुलाचा मुलगा), नातू (आडनाव); दळ (सैन्य), दळ (गर); दारू (पिण्याची), दारू (बंदुकीची); वार (पोटांतील), वार (दिवस); हूक (बटनाची कडी), हूक (पाठींत भरणारी उसण); चूक (बारीक खिळा), चूक (दोष); दिवटी (लहान दिवा), दिवटी (द्वाड); घूस (प्राणी विशेष), घूस (आज्ञार्थी शीर) वगैरे शब्दांपैकीं मठ, द्रव्य इत्यादी शब्दांवर मुळींच अनुस्वार देत नाहीत, तो निष्कारण द्यावा लागेल.

ह्याशिवाय काहीं ठिकाणीं एकाच शब्दाचे तीन तीन, चार चार अर्थ होतात, त्या ठिकाणीं काय करावयाचें, असा प्रश्न उत्पन्न होतो. उ० टाच (पायाची), टाच (जप्ती), टाच (शिवणे ह्या अर्थी टाचणे धातूचें आज्ञार्थी एकवचनी रूप); वाट (रस्ता), वाट (परिणाम), वाट (बारीक वाट); फाटा (बरतर्फ), फाटा (कामटीची लेखणी), फाटा (शाखा); खाट (बाज), खाट (मिरच्या उधळतात ती), खाट (वाईट); रवा (गंधाचा), रवा (गव्हाचा), रवा (गुळाची ढेप); फळी (बाजू), फळी (लाकडाची), फळी (शत्रूची), फळी (ढग); पट्टी (वर्गणी), पट्टी (जमिनीचा सारा), पट्टी (पानाची पट्टी), पट्टी (कागदाचा किंवा कापडाचा लांबट तुकडा).

वरील एकंदर निरूपणावरून भिन्न अर्थ दर्शविण्यासाठीं नसती अडचण करण्याचें कारण दिसत नाही. द्रव्य, दळ, वार, पट्टी वगैरे अनेक शब्दांवर अनुस्वार न देतां जर गैरसोय झाली नाही, तर नाव वगैरे शब्दांवर भिन्न अर्थ दर्शविण्यासाठींच केवळ अनुस्वार देण्याचें कारण नाही. इतर दुसऱ्या कारणासाठीं तो द्यावयाचा असेल, तर गोष्ट निराळी. तेव्हां भिन्नार्थदर्शक अनुस्वाराविषयींचा नियम नसल्यास हरकत नाही. काहीं शब्दांच्या संबंधाने हल्लीं जी सोय आहे ती घालवूं नये, असें एकदोन मित्रांचें ह्मणणे आहे; पण जी सोय म्हणून म्हणण्यांत येते ती सोय आहे किंवा कसें हा प्रश्न आहे. जे आक्षेप सांगितले त्यांविषयीं विचार करतां असा अनुस्वार असण्याचें योग्य कारण दिसत नाही.

(ड) नपुंसकलिंगी शब्दांवर अनुस्वार देण्यासंबंधी नियम.

(अ) उकारान्त व एकारान्त नपुंसकलिंगी नामाच्या एकवचनी व अनेकवचनी, व अकारान्त आणि ईकारान्त नपुंसकलिंगी नामाच्या अनेकवचनी रूपाच्या अंत्याक्षरावर अनुस्वार द्यावा.

उ० करडूं—करडें; केळें—केळीं; केंबरें—केंबरीं; फूल—फुलें, मोती—मोत्यें.

अपवादः—करणे, देणे, बसणे वगैरे शब्दांच्या शेवटीं अनुनासिक वर्ण आहे, ह्मणून अशा एकारान्त क्रियावाचक नामांच्या व त्यांच्या ईकारान्त अनेकवचनी रूपांच्या अंत्याक्षरावर अनुस्वार देतात तो देऊं नये. उ० करणे—करणी, बोलणे—बोलणी इ०.

टीप—अकारान्त नपुंसकलिंगी नामांच्या अंत्याक्षरावर कधींच अनुस्वार देत नाहीत, व अनुस्वारासारखा कोणी उच्चारही करीत नाहीत. दहीं, बीं, मोतीं, गुळीं, कुणी, पाणी लोणी, चिंचवणी, ताकवणी, तेलवणी वगैरे काहीं शब्द ईकारान्त नपुंसकलिंगी नामांचीं उदाहरणें आहेत. ह्यांपैकीं पाणी, लोणी वगैरे शब्दांवरच्या अनुस्वारास पूर्वींच फाटा देण्यांत आला आहे व ही गोष्ट आतां बहुतेकांस संमत झाली आहे. बाकी राहिले दहीं, बीं, मोतीं ह्यांच्या व्युत्पत्तीविषयीं विचार करतां अनुस्वारास फारसा आधार दिसत नाही व उच्चारांत बहुधा अनुस्वार येत नाही. पाणी वगैरे ईकारान्त शब्दांवर अनुस्वार न दिल्याने जर गैरसोय होत नाही, तर दही वगैरे शब्दांवरील तो काढल्याने गैरसोय

होईल असें दिसत नाही वगैरे कारणांचा विचार करतां ईकारान्ताच्या नियमाची आवश्यकता दिसत नाही, ह्मणून तो वगळला आहे.

करणे, बोलणे वगैरे क्रियावाचक नामांवरचा अनुस्वार न ठेवण्याचीं कारणें अशीं:—ह्या नामावरच्या अनुस्वारास प्रचलित लेखनपद्धतीशिवाय इतर कोणत्याही गोष्टीचा आधार असल्याचें दिसत नाहीं. संस्कृतांतील 'अन' प्रत्ययापासून मराठींत 'णें' हा प्रत्यय बनला आहे. ह्या "णें" प्रत्ययांत अनुनासिक आहे; अनुस्वाराचा उच्चारही प्रायः होत नाही; अनुस्वार काढून टाकल्याने सोईपेक्षां गैरसोय होईल, असें दिसत नाही; काढून टाकावा अशाबद्दल काहींची सूचना आहे; पाणी, लोणी वगैरे शब्दांत अनुनासिक आहे, म्हणून त्यांवरील अनुस्वार काढून टाकला आहे, तर करणे, बोलणे वगैरे शब्दांत अनुनासिक आहे म्हणून तोच नियम लागू करण्यास हरकत नाही. करणे, देणे ह्यांचीं अनेकवचनी रूपें करणी, देणी अशीं होतात. अशासारख्या थोड्या शब्दांच्या संबंधाने शंका उत्पन्न झाल्यास संदर्भावरून सहज दूर होईल वगैरे कारणांचा विचार करतां अनुस्वार नसावा, हें योग्य दिसतें. शब्दाच्या अंत्य वर्णाचा 'बचाव' करणे हा अनुस्वाराचा मुख्य उपयोग आहे, असें काहींचें ह्मणणे आहे. पण पाणी, लोणी वगैरे शब्दांवरील अनुस्वार काढून टाकला असतांही जर अंतींचा 'ई' कायम राहिला आहे, तर करणे, बोलणे वगैरे शब्दांच्या अंतींचा 'ए' लिहिण्यांत कां कायम राहणार नाही?

ऊकारांत, एकारान्त वगैरे नामांच्या अंत्याक्षरावरही अनुस्वार देण्याचें कारण नाही, असें दोघातिघा मित्रांचें

म्हणणे आहे; परंतु ती कुत्री आली, ती घोडी गेली वगैरे स्वतंत्र वाक्यांविषयीं विचार केला, तर कुत्री, घोडी हीं एकवचनी स्त्रीलिंगी रूपें आहेत किंवा नपुंसकलिंगी अनेकवचनी रूपें आहेत, हें समजण्यास मार्ग नाहीं हें एक कारण, प्रचलित लेखनपद्धतीचा आधार वरील नियमास आहे हें दुसरें कारण, ह्या संबंधाचा आक्षेप दोघातिघांचा आहे, बाकीच्यांस असा नियम असावा, असें आलेल्या मतांवरून समजून येतें; म्हणून अनुस्वाराचा वरील नियम कायम ठेवला आहे.

(आ) नपुंसकलिंगी नामें, मग त्यांचा अंत्य कोणताही स्वर असो, त्यांच्या संबंधाच्या सर्वनामांच्या, जीं विशेषणें तिन्ही लिंगी समान असतात त्यांशिवाय राहिलेल्या इतर विशेषणांच्या व क्रियापदांच्या अंत्याक्षरावर हल्लीं अनुस्वार देण्याची वहिवाट आहे, तीप्रमाणें तो द्यावा.

उ० शहाणें मूल उठून बसतें; त्यानें लंगडीं घोडीं आणलीं; तें मूल; हीं मुलें इत्यादी. अकारान्त विशेषणें हीं नेहमीं तिन्ही लिंगी असतात; जसें—सुंदर मुलगा, सुंदर मुलगी, सुंदर मुलगें. त्याप्रमाणें गुणी, गुलाबी, लोखंडी, लाकडी, मऊ, कडू इत्यादी ईकारान्त व ऊकारान्त विशेषणें तिन्ही लिंगी आहेत, सबब त्यांच्याही अंत्यावर अनुस्वार नको.

(इ) नपुंसकलिंगी सर्वनामांच्या व त्यांसंबंधाच्या क्रियापदांच्या अंत्याक्षरावर हल्लीं अ-

नुस्वार देण्याची वहिवाट आहे, तीप्रमाणें अ-नुस्वार द्यावा.

जसें—काय झालें ? कोणी आलें तरी चालेल. जें गेलें तें गेलें, हीं आलीं आहेत इ०.

(ई) शिंपणे, शिपणे; झुंजणे, झुजणे; खुंटणे, खुटणे; लिंपणे, लिपणे; कुंपण, कुपण; खुंटी, खुटी; कुंथणे, कुथणे कळंक, कळक; आंथरूण, आथरूण; मोंगल, मोगल; रत्नांगिरी, रत्नागिरी; अटीव, अटींव; ऐकींव, ऐकींव; सांचीव, सांचींव; भरीव, भरींव; ओतीव, ओतींव; कातीव, कांतींव; खोदीव, खोदींव; ठरीव, ठरींव; सोलीव, सोलींव; कोरीव, कोरींव; घोटीव, घोटींव वगैरे शब्दांपैकीं कोणता शब्द लिहिणे प्रशस्त, असा अनुस्वाराच्या संबंधाने एक प्रश्न आहे. ह्यांपैकीं ईव प्रत्यय लागून जे शब्द बनले आहेत त्यांतील सानुस्वार ईव प्रत्ययास व्युत्पत्तीवरून मुळींच आधार नाही; उच्चारांत प्रायः अनुस्वार येत नाही; लिहिण्याच्या बाबतींत द्विधामत आहे; अनुस्वार असल्याने काहीं सोय होते असें दिसत नाही; ईव प्रत्यय निष्कारण सानुस्वार समजून अनुस्वार देण्याची काहींची वहिवाट दिसते; तेव्हां ह्या अनुस्वारास फाटा देणे योग्य आहे.

शिंपणे, शिपणे वगैरे एकदोन शब्दांशिवाय बहुतेक शब्दांस व्युत्पत्तीचा आधार आहे, तेव्हां त्याविषयींचा विचार पुढें करण्यांत येईल.

(२) इतिहासाच्या अथवा परंपरेच्या दृष्टीनें जे अनुस्वार कायम ठेवावयाचे त्यांविषयींची व्यवस्था.

(अ) मूळ भाषेंतील ज्या शब्दावरून अथवा प्रत्ययावरून मराठींत एकादा शब्द अथवा प्रत्यय रूढ झाला असेल, त्या शब्दाचा अथवा प्रत्ययाचा मूळ भाषेंत पूर्ण सानुस्वार उच्चार होत असेल किंवा अनुस्वारासारखा निदान उच्चार होत असेल व त्यास प्रचलित लेखनपद्धतीवरून आधार मिळत असेल, तर रूढ झालेल्या शब्दावर अथवा प्रत्ययावर अनुस्वार अवश्य द्यावा. मूळ शब्दांत नुसता अनुनासिक वर्ण असून उपयोगी नाहीं; त्याचा उच्चार अनुस्वारासारखा असला पाहिजे.

(ब) संस्कृत व प्राकृत मूळ रूपांमध्यें विरोध दिसून आल्यास व लेखनाच्या व उच्चाराच्या प्रघातांतही विरोध दिसून आल्यास सानुस्वार व निरनुस्वार अशीं दोन्हीं रूपें ग्राह्य धरावीं.

(क) एकाद्या शब्दास अथवा प्रत्ययास फक्त व्युत्पत्तीचा अथवा लेखनपद्धतीचा अथवा उच्चाराचा आधार आहे, एवढ्याच कारणावरून त्या शब्दावर अथवा प्रत्ययावर अनुस्वार देऊं नये.

(ड) ज्या ठिकाणीं व्युत्पत्ती कळत नाहीं किंवा तिच्याविषयीं संशय आहे, त्या ठिकाणीं लेखनाची पद्धत व उच्चाराची पद्धत ह्यांमध्यें

अनुस्वारासंबंधानें मेळ असल्यास अनुस्वार द्यावा. असा मेळ नसल्यास अनुस्वार देणें विशेष सोईचें किंवा न देणे विशेष सोईचें, हें पाहून अनुस्वार द्यावा किंवा न द्यावा.

वरील नियमांप्रमाणें ज्या शब्दांवर अनुस्वार अवश्य किंवा विकल्पें द्यावयाचा तेः—

नामें व विशेषणें.

(१) **अङ्कुक**–आंख, आंकडा, आंखटणे, आंखणे, आंखपट्टी. (व्युत्पत्ती व लेखनपद्धती ह्या दोहोंचा आधार आहे.)

(२) **आकुञ्चन**–आंखूड, आंखडणे, आंखुडणे. (व्यु + ले.)

(३) **अञ्चल**–आंचळ, आंचळ्या. (व्यु + ले.)

(४) **अंत्र**–आंतडें. (व्यु + ले.)

(५) **आमंत्रण**–आंवतण, आंवतणे. (व्यु + ले.)

(६) **अश्रु** (प्रा० अंसू)–अंसूं, असूं, आंसवें, आसवें, अंसवें, असवें. (मोलस्वर्थकृत कोशांत आंसूं रूप नाही.)

वरील सर्व वैकल्पिक रूपें ग्राह्य समजावीं कीं काय, असा प्रश्न उत्पन्न झाला असतां, खरोखर रितीनें असूं व असवें हीं रूपें प्रशस्त होत. कारण, अनुस्वार देण्यास फारच थोडा आधार आहे.

(७) **अमंगल**–ओंवळा. (व्यु. + ले.)

(८) **कङ्कण**–कांकण. (व्यु. + ले.)

(९) **कञ्चुकी**–कांचोळी, कांचोळीपंथ. (व्यु. + ले.)

(१०) **कांस्य,** (प्रा. कंस,)–कांसें (व्यु. + ले.)

(११) **कांस्यकार**–ह्या शब्दापासून कासार हें रूप झालें आहे. मोलस्वर्थकृत कोशांत कासार, कांसार, अशीं दोन्हीं रूपें आढळतात. बोलण्यांत निरनुस्वार रूप उच्चारतात. संस्कृत

व प्राकृत व्युत्पत्ती ह्या दोहोंचा अनुस्वारास आधार आहे, पण लेखनपद्धती व उच्चार ह्या जोडीचा तितका नाही. सबब कासार व कांसार अशीं दोन्हीं रूपें ग्राह्य समजावीं. ह्याचप्रमाणें, कासारडा, कासारथळ, कासारभट्टी (बांगडी-वरील कर), कासारभात ह्यांचीं सानुस्वार व निरनुस्वार अशीं दोन्हीं रूपें ग्राह्य समजावीं

(१२) **कम्प्** (हलणे)-कांप, कांपरा, कांपरें, थरकांप. (व्यु.+ले.)

(१३) **कण्टक** (प्रा. कंटओ)-कांटा, कांटेरी, कांटवन, कांटे-कुटे, कांटेलगाम. (व्यु + ले.)

(१४) **कृंतन**,-कांतणे, कांतीण, कांतारी, कांतीव (व्यु. + ले.)

(१५) **कोङ्कण**-कोंकण, कोंकणस्थ, कोंकणपट्टी, कोंकण्या, कोंक्या. (व्यु. + ले.)

(१६) **ग्रन्थ्, ग्रान्थि, ग्रन्थन** (प्रा. गंठी)-गांठ, गांठणे, गांठण, गांठोडें, गांठलें, गांठाळ, गांठी, गांठीव, गांठी-हळद. (व्यु + ले.)

(१७) **घंटा**-घांट, घांटी, घांटपान, घांटपट्टा, घांटसर (व्यु.+ले)

(१८) **घुटः, घुण्टः**-घोटा, घोंटा अशीं दोन्हीं रूपें ग्राह्य; कारण मूळ रूपें सानुस्वार व निरनुस्वार अशीं दोन्हीं आहेत. त्याचप्रमाणें लेखनांत अनुस्वार आहे, परंतु उच्चार निरनुस्वार करतात; सबब विकल्पें रूपें लिहावीं. त्याचप्रमाणें घोटेस्नान, घोंटेस्नान अशीं दोन्हीं रूपें ग्राह्य.

(१९) **चम्पक**-चांपा, चांफा. (व्यु. + ले.)
चम्पककलिका-चांपेकळी, चांफेकळी.
चम्पक तैल-चांपेल.

(२०) **चंचु**-चोंच, चोंचि, चोंचावणे. (व्यु. + ले.)

(२१) **यंत्र** (प्रा. **जन्त्र**)-जातें व जांतें अशीं दोन्हीं रूपें ग्राह्य. (लेख + उच्चार) ह्यांप्रमाणें निरनुस्वार रूप ग्राह्य व सं· व्यु + प्रा· व्यु. ह्यांप्रमाणें सानुस्वार रूप ग्राह्य)

त्याचप्रमाणें जातण, जातणी, जातुली, जातेउकट्या वगैरे शब्दांची सानुस्वार व निरनुस्वार रूपें ग्राह्य, असें समजावें.

(२२) **झंपः, झंपा**–झांप (एकदम उडी मारणे) ह्या अर्थी.
(सं. व्यु. + लेखन)

(२३) **झंपा**–झांप (डोळे मिटणे), झांपड, झांपडी, झांपण.
(व्यु. + ले.)

(२४) **टङ्कणक्षार**–टांकणखार (सं. व्यु. + लेखन)

(२५) **टङ्क**— टांकी, टांकें, टांकणे (टांकी देणे), टांकेकरी. (सं. व्यु. + लेखन).

(२६) **टङ्कशाला**–टांकसाळ, टांकसाळी, टांकसाळ्या
(सं. व्यु. + लेखन)

(२७) **दंशन**–डसणें, डंसणे–लेखनपद्धतींत दोन प्रकार दिसतात; उच्चार निरनुस्वार होतो, परंतु मूळ रूप सानुस्वार, सबब दोन्हीं रूपें ग्राह्य.

(२८) **दंश** (**प्रा. डंसो,**)–डांस, डांसळणे (सं. व प्रा. व्यु. + लेखन.)

(२९) तन्तु–तांत, तांतू (सं. व्यु. + लेखन)

(३०) दधि, दधिं, (मागधी-दहिं, शौरसेनी दहीं)–दही, दहीं, (सं. व्यु + उच्चार; प्रा. व्यु. + लेखन).
लेखनपद्धतींतसुद्धां दोन प्रकार आहेत. नपुंसकलिंगी ईकारान्त शब्दांवर अनुस्वार नको, असा नियम सांगण्यांत आला आहे. तेव्हां एवढाच शब्द अपवाद ठेवावयाचा किंवा कसें हा प्रश्न आहे. नसावा असें आमचें मत आहे.

(३१) दन्त–दांत, दांतकिरकिटी, दांताळें (दंत + आलय), दांतकोरणें, दांतखीळ–ळी, दांतवण, दांते (फणीचे), दांताड (बत्तिशी). (सं. व्यु. + लेखन.)

(३२) दन्तुर–दांतरा, दांतरखिंड, दांतरी (वृद्धपणांत व बाळपणांत दांत येतो तो) (सं. व्यु. + लेखन.)

(३३) **पञ्च**-पांच (संख्या) व त्यापासून आलेले शब्द पांचकळशा, पांचधारी (निवडुंग), पांचपट, पांचपावली, पांचपेच, पेचपांच, पांचवा, पांचवी, पांचशेरी, एकेपांची पांच (सं. व्यु + लेखन.)पासरी ह्या शब्दांत ' पा ' वर अनुस्वार अग्राह्य, (ले व उच्चार.)

(३४) **वक्र, वङ्क,(प्रा. वंको, मा. वंकं)**-बांक, बाक; बांका, बाका; बांकून, बाकून; बांकबूक, बाकबूक' बांक, वाक; वांकडा, वाकडा; वांकण, वाकण; वांकणे' वाकणे; वांकस, वाकस; वांकी, वाकी; वांकुल्या, वाकुल्या अशीं दोन्हीं रूपें ग्राह्य, कारण वक्र हें मूळ संस्कृत रूप असून त्यांत अनुस्वार नाही व उच्चारांत तो नाही, सबब निरनुस्वार रूप ग्राह्य; परंतु प्राकृत रूपांत व लेखनांत अनुस्वार आढळतो, सबब सानुस्वार रूप ग्राह्य.

(३५) **बांको (पोर्चुगीज)**-बांक (बसावयाचें) (पोर्चु. व्यु. + लेखन)

(३६) **रोमन्थ**-(प्राकृत रोमंथो)रवंथ, रवंथणे (सं. व्यु. + ले.)

(३७) **लंपट**-लांपट, (सं. व्यु. + ले).

(३८) **लञ्चा-(प्राकृत-लंचा)**-लांच, लांचखाऊ, लांचलुचपत, लांचाविणे; (सं. व प्रा. व्यु + ले),

(३९) **वण्ट्** (विभागणे) (हिंदी-वांटणा)=वांटा, वांटणे (विभागणे) व ह्यापासून आलेले शब्द जसें:— वांटणी, वांटणीपत्र, वांटप, वांटावांट, वांटेकरी, वांटेदार, (सं. व्यु + ले.)

(४०) **वञ्च्, वञ्चन**.-वांचणे, वांचून (शिवाय) (सं. व्यु + ले.)

(४१) **वंश (प्रा. वंसो)**-वांसा, वांसोडी-ळी (लहान वासा). (सं. व प्रा व्यु + ले.)

(४२) **विष्, वेष्टन**, (मागधी वेंट)=वेंट वेट; वेंटाळें, वे-

टाळें; वेंटाळणे, वेटाळणे; वेंटाळणी, वेटाळणी. (संस्कृत व्युत्पत्ती व उच्चार निरनुस्वार, सबब निरनुस्वार रूप ग्राह्य, प्राकृत व्युत्पत्तींत व लेखनांत अनुस्वार, सबब सानुस्वार रूप ग्राह्य.)

(४३) **सेमंती**–शेंवती. (सं. व्यु + ले.)

(४४) **सामंत**–सावंत. (सं. व्यु + ले.)

(४५) **शृङ्खला** (**प्रा० सिंखला**)=सांखळी, सांखळणे, सांखळ (मोठी सांखळी), सांखळदंड, सांखळरिती, सांखळीलगाम. (सं. व प्रा. व्यु + ले)

(४६) **सञ्चि, सञ्चय, सञ्चन**–सांचणे, सांचवणी, सांचीव. (सं. व्यु + ले)

(४७) **सम्+स्था, संस्थान, संस्थापन**–(प्रा. सण्ठावण) सांठा, सांठणे, सांठविणे, सांठवण, सांठवणी, सांठवासांठव. (सं. व्यु + ले)

(४८) **सङ्कट**–सांकडें. (सं. व्यु + ले)

(४९) **संवरण, संस्मरण** ? = सांवरणे. (सं. व्यु + ले)

(५०) **संपादन**–सांपडणे. (सं. व्यु + ले)

(५१) **स्वयंपाक**–सैंपाक, स्वयंपाक, सैंपाकघर, सैंपाकी, सैंपाकीण. (सं. व्यु + ले)

(५२) **सुमंगल**–सोंवळा, सोंवळें (वस्त्र).

(५३) **द्विशत, त्रिशत**–इत्यादी रूपांपासून दोनशे, तीनशे वगैरे रूपें झालीं आहेत. मुळांत व उच्चारांत अनुस्वाराला आधार नाही; तेव्हां 'शे' वर अनुस्वार देण्याची आवश्यकता नाही. शतम् हें मूळ रूप नसून शत हें आहे. शतम् हें मूळ रूप मानून जर 'शे' वर अनुस्वार दिला, तर फलम्, ज्ञानम् वगैरे मूळ रूपें मानून फलं, ज्ञानं अशीं रूपें लिहावीं लागतील. त्याचप्रमाणें 'शेकडों' 'लाखों' अशीं रूपें न लिहितां निरनुस्वार रूपें लिहिणे प्रशस्त.

(५४) **शिंपणे, शिपणे**-कुंपण, कुपण-हे निवळ मराठी शब्द आहेत. ह्या दोन शब्दांपैकीं शिंपणे व कुंपण असें लिहिण्याचा व बोलण्याचा विशेष प्रचार आहे, सबब सानुस्वार रूपें प्रशस्त.

(५५) **झुंझणे-झुझणे**-हीं रूपें झुंज यापासून आलेलीं असून झुंज हें रूप युद्ध (प्रा. जुज्झ) यापासून झालें आहे; तेव्हां मुळांत अनुस्वार नाही. परंतु झुंझणे असा लिहिण्याचा व बोलण्याचा विशेष प्रघात आहे, तेव्हां सानुस्वार रूप प्रशस्त.

(५६) **खुंटणे, खुटणे**; खुंटी खुटी; कुंथणे, कुथणे; कळंक, कळक व लिंपणे, लिपणे हीं रूपें कुण्ठ, कुन्थ, कलंक, लिप, लिम्प ह्यांपासून आलीं आहेत असें दिसतें. लिहिण्याचा व उच्चारण्याचा विशेष प्रचार सानुस्वार आहे; तेव्हां सानुस्वार रूपें प्रशस्त; निरनुस्वार गौण होत.

(५७) **आंथरूण, आथरूण**-हीं रूपें आस्तरण ह्यापासून आलेलीं आहेत. लिहिण्यांत व बोलण्यांत दोन्हीं रूपें येतात. आथरूण हें रूप व्युत्पत्तीला जवळ, सबब तें विशेष ग्राह्य; पण आंथरूण हेंही प्रचारांतलें असल्यामुळें तेंही ग्राह्य धरण्यास हरकत नाही.

(५८) **मोंगल, मोगल.**-मोगल हें रूप दोन्ही तऱ्हांनी प्रचारांत आहे. पण अनुस्वाराचें कारण दिसत नाही, कारण मूळ शब्द ' मुगल् ' आहे, सबब निरनुस्वार रूप प्रशस्त.

(५९) **रत्नांगिरी, रत्नागिरी**-रत्नांचें आगर किंवा रत्नांचा गिरी अशी व्युत्पत्ती करतात ती खरी आहे, असें घेऊन चाललें, तर निरनुस्वार रूपच ग्राह्य, कारण प्रचाराचा आधार अशा रूपास आहे. सानुस्वार रूप अगदी एकदेशीय आहे.

टीप:—मुळांत अनुस्वार अथवा अनुस्वारासारखा उच्चार होत असून जर लेखनपद्धतीचा अथवा उच्चारप्रचा-

राचा आधार असला, तर त्या मूळ रूपापासून आलेल्या शब्दावर अनुस्वार द्यावा असा नियम सुचविण्याचें कारण कीं, मूळ रूपांत अनुस्वार आहे एवढ्याच गोष्टीवरून अनुस्वार देण्याचा नियम केला, तर ज्या शब्दांवर हल्लीं तो देण्याचा प्रघात नाहीं त्यावर द्यावा लागतो. उ. रिझविणे व विरझणे हीं रूपें रंजन व विरंजन ह्यांपासून अनुक्रमें आलीं असून त्यांवर अनुस्वार देत नाहीत. त्याचप्रमाणें अंवस (अमावास्या), आंव (आम), आंवळा (आमलक), कोंवळा (कोमल), गहूं (गोधूम), चंवरी (चमर), जांवई (जामात), नांव (नाम), फांटा (स्फटन), फेंकणे (क्षेपण), फेंस (फेन), भोंवणे (भ्रमण), भोंवरा, भोंरा (भ्रमण), भोंवळ (भ्रमण), भोंवतीं (भ्रमण), लंव (लोम), लोंकर (लोम), विसांवा (विश्राम), शींव (सीमा), शेंकडो (शतम्), शेंवरी, सांवर (शाल्मली), सांवळा (श्यामल), सोंपणे (समर्पण), हींव (हिम), आचंवणे (आचमन) वगैरे शब्द ज्या शब्दांपासून आले आहेत त्यांत अनुनासिक वर्ण आहे एवढ्याच कारणावरून त्यांवर अनुस्वार द्यावा, असा नियम केला, तर मंचक, युग्म, दंष्ट्रा, तिग्म (तीक्ष्ण), दशम, रश्मि, विस्मरण, आत्मीय, नवम, सप्तम, उत्खनन, भूमि, निर्गमन, उद्गमन, जेमन, वामलूर, अवनमन, दाम, कुमारी ह्या शब्दांपासून माचवा, जूग, दाढ, तिखट, दहावा, रशी, विसरणे, आपला, नववा, सातवा, उखळणे, भुई, निघणे, उगवणे, जेवण, वारूळ, ओणवणे, दावे, कुवारी हे शब्द आले आहेत, त्यांवर हल्लीं अनुस्वार देत नाहीत, तो द्यावा लागेल. मूळ शब्दांत अनुनासिक वर्ण असून त्यांपासून आलेल्या ज्या शब्दांवर अनुस्वार देत नाहीत, असे शब्द थोडे

असते, तर गोष्ट निराळी; परंतु असा अपवाद करण्यास विशेष कारण काय, असा प्रश्न उत्पन्न होतो. पहिल्या गटांतील शब्दांवर अनुस्वार कां द्यावा व दुसऱ्या गटांतील शब्दांवर तो कां देऊं नये, असा कोणी प्रश्न केला असतां आह्मी आजपर्यंत तो देत आहो, या उत्तराशिवाय दुसरें उत्तर नाही. जर हें उत्तर समर्पक मानलें, तर झोप, सवय, शेपूट वगैरे कित्येक शब्दांवरही असा अनुस्वार देत आहेत, तेव्हां तोच क्रम पुढें ठेवावा लागेल; व जी स्थिती आहे तीच कायम ठेवावी लागेल. हल्लींच निष्कारण अनुस्वारांची गर्दी फार होऊन भाषेस व्यर्थ काठिन्य आलें आहे व घोटाळा होत आहे. निष्कारण अनुस्वार कमी करून साधार अथवा सकारण तेवढे कायम ठेवावे अशा मताविषयीं पुष्कळांची एकवाक्यता आहे.

वरील कारणांचा विचार करतां मुळांत अनुनासिक वर्ण असल्यामुळें काहीं शब्दांवर अनुस्वार देतात व काहींवर देत नाहीत हें बरोबर नाही. तो द्यावयाचा असेल, तर दोन्ही प्रकारच्या शब्दांवर द्यावा; नाही तर दोन्हींवर देऊं नये, हें एक वेळ सयुक्तिक दिसेल. निष्कारण अनुस्वार देण्याचा नवीन प्रघात पाडूं नये, अशाविषयीं बहुतेक एकवाक्यता आहे. तेव्हां मुळांत अनुनासिक वर्ण आहे, ह्मणून अनुस्वार देण्याची वहिवाट नसावी. त्याचप्रमाणें जोडाक्षर, रेफ, द्वित्त, षकार वगैरे कारणांवरून आंकसणे (आकर्षण), ओंठ (ओष्ठ), आंख (अक्षि), आंच (अर्चिस्), ऊंस (इक्षु), कांख (कक्षा), कांसव (कच्छप), कूंपर (कोंपर), ढांकणे (ढक्क), पोंखर (पुष्कर), भोंकणे (बुक्क) वगैरे शब्दांवर अनुस्वार देणे प्रशस्त नाही;

व झोप, शेवट, शेपूट, खवचट, खेटर वगैरे कित्येक शब्दांवर जो अनुस्वार देतात तो तर अगदीच निष्कारण आहे. ज्या शब्दांवर अनुस्वार अवश्य अथवा विकल्पें असावा ह्मणून वर सांगितलें आहे त्यांवरील, व वरील नियमाखालीं जे शब्द येतील त्यांवरील अनुस्वार ग्राह्य; त्यांवांचून दुसरे अग्राह्य असें समजावें.

सर्वनामें:--ज्या सर्वनामांवरील अनुस्वाराविषयीं विचार करावयाचा तीं:–मी, आह्मी, तूं, तुह्मी, म्यां, त्वां, आह्मांस, तुम्हांस, आमचा, तुमचा, तें, तीं, जें, जीं, हें, हीं असें, अशीं, तसें, तशीं, कसें, कशीं, कांहीं.

आतां तें, तीं, जें, जीं, हें, हीं, असें, अशीं, तसें, तशीं, कसें, कशीं हीं एकारान्त व ईकारान्त नपुंसकलिंगी सर्वनामें होत. ह्यांविषयींची व्यवस्था एकारान्त, ईकारान्त वगैरे नपुंसकलिंगी शब्दांविषयीं विचार करतांना सुचविलीच आहे. त्याचप्रमाणें आह्मांस, तुह्मांस, आमचा, तुमचा ह्यांविषयींची व्यवस्था अनेकवचनी सामान्यरूपांवर अनुस्वार देण्याविषयीं विचार करतांना सुचविली आहे; तेव्हां ह्याविषयीं पुनः विचार करण्याचें कारण नाही. मी, आह्मी, तुह्मी ह्यांची प्रथमा असतां त्यांवर अनुस्वार देण्याची कांहीं विद्वान लोकांची पूर्वी वहिवाट होती, ती आतां नापसंत ठरल्यामुळें त्यांवर अनुस्वार देत नाहीत व त्याबद्दल आतां वादही नाही. आतां, कांहीं ह्या सर्वनामाच्या दोन्ही अक्षरांवर, तृतीया विभक्तीचीं रूपें असतां मी, म्या, आह्मी, त्वा, तुह्मी व कोणी ह्यांच्या, व प्रथमा व तृतीया विभक्तींचीं रूपें असतां तूं ह्याच्या अंत्याक्षरावर अनुस्वार द्यावयाचा किंवा नाही, ह्याविषयीं विचार करावयाचा आहे.

कांहीं:––(सं. केभिः, प्रा. केहिं) अशी ‘ कांहीं ’ ह्या सर्वनामाची व्युत्पत्ती समजते. ही जर बरोबर आहे, तर कांहीं ह्या दोन अक्षरांवर अनुस्वार न येतां फक्त ‘ हीं ’ अक्षरावर तो देण्यास काहीं आधार आहे, ह्मणून त्यावरच देणे योग्य दिसतें. ‘ कां ’ वरचा अनुस्वार निष्कारण दिसतो.

तूं:––संस्कृत त्वम्; प्रा–तुमं, तुं, तं; पाली–त्वं, तुवं अशी तूं या शब्दाची पूर्वपीठिका आहे. हिजवरून असें दिसून येईल कीं, अनुस्वार देण्यास मुळांत आधार आहे. शिवाय, लेखनप्रचार सानुस्वार आहे. तेव्हां ठरलेल्या तत्वाप्रमाणें ‘ तूं ’ वर अनुस्वार देणे अवश्य आहे. म्या, त्वा–ह्यांचा प्रचार पूर्वींच्या ग्रंथांतून विशेष आढळून येतो, हल्लींच्या गद्य लेखनपद्धतींत क्वचित् दिसून येतो. त्याचप्रमाणें विद्वान लोकांच्या उच्चारांतदेखील क्वचित् आढळतो. तेव्हां त्याविषयीं विचार करण्याचें तादृश कारण नाही. तथापि, विचारच कर्तव्य आहे, तर मी, आह्मी, तुह्मी ह्यांचीं तृतीयेचीं रूपें असतां अनुस्वार द्यावा किंवा नाही, ह्याबरोबरच तो विचार होईल. आतां ज्या मुद्याबद्दल विचार करणे राहिलें तो हा कीं, तृतीया विभक्ती असतां मी, आह्मी, तुम्ही, म्या, त्वा व कोणी ह्यावर अनुस्वार द्यावा किंवा नाही. मया, अस्माभिः, त्वया, युष्माभिः, अशीं मी व तूं ह्यांचीं संस्कृतांत तृतीयेचीं रूपें होतात, व ह्या दोहोंचीं प्राकृतांत एकवचनी रूपें–मिमे, ममं, मए, ममए, मइ, ममाई व मआ; तुमं, तुमई, तुमए, तुमे व तुमाइ वगैरे एकवचनी रूपें होतात; व अम्हेहिं व अम्हाहिं, अम्ह, अम्हो व तुम्हेहि, तुज्झेहिं अशीं अनेकवचनी रूपें होतात. ह्यावरून एकवचनी-

रूपास अनुस्वाराचा आधार कितपत आहे हें दिसून येईल. उच्चारांत तर तो नाहीच; तेव्हां तो देण्याचें कारण काय असा प्रश्न उत्पन्न होतो. जर असा अनुस्वार देण्याने कांहीं विशेष प्रकारची सोय होत असेल, तर मात्र तो देणे योग्य होईल. वरील शब्दांची तृतीया कर्मणी अथवा भावी प्रयोग असतां नेहमीं असते व त्या वेळेस ते कर्ते असतात. पण ह्या दोन्ही प्रयोगांत क्रियापदाचा कर्त्यांशीं तादृश संबंध नसतो. कर्ता प्रथमान्त अथवा तृतीयान्त आहे, हें समजण्याची प्रयोग ठरविण्यास जरुरी नाही. आजपर्यंत अनुस्वार देत आले आहेत, तेव्हां प्रयोग अथवा विभक्ती ओळखण्याच्या कामीं अशा अनुस्वारापासून कितपत उपयोग होत आहे हें सांगतां येत नाही. प्रथमा असतां मी, आह्मी वगैरेवर अनुस्वार नको, तृतीया असतां द्यावा, ह्या नियमापासून विद्यार्थ्यांस साहाय्य न होतां उलट त्यांचा घोटाळा मात्र होईल. प्रथमा व तृतीया ह्यांचीं रूपें केव्हां समजावयाचीं व कर्मणी व भावी प्रयोग केव्हां समजावयाचे हें ज्या विद्यार्थ्यांस कळण्याचें ज्ञान आहे, त्यांचें अनुस्वाराकडे लक्ष पोहोचविण्याचेंसुद्धां कारण पडत नाही. तेव्हां वरील भेद दाखविण्यासाठीं अनुस्वाराची आवश्यकता दिसून येत नाही. ही गोष्ट तृतीयेच्या एकवचनासंबंधाने झाली. अनेकवचनी रूपास संस्कृतांत आधार नाही; प्राकृतांत आहे असें दिसतें. लेखनांत आधार आहे, परंतु उच्चाराचा नाही. तेव्हां सानुस्वार, व निरनुस्वार अशीं रूपें विकल्पें करावीं लागतात. आतां वरील विवेचनावरून जें निष्पन्न होतें तें:—प्रथमा एकवचन तूं सानुस्वार व तृतीया निरनुस्वार; प्रथमा व तृतीया एकवचन मी निरनुस्वार; प्रथमा अनेकवचन तुह्मी नि-

रनुस्वार; तृतीया अनेकवचनी 'आह्मी' सानुस्वार किंवा निरनुस्वार; 'कोणी' वर अनुस्वार देण्यास काहींच आधार नाही. 'कांहीं' ह्यांतील दोन अक्षरांपैकीं 'ही' वर देण्यास आधार आहे. ही जी व्यवस्था सांगितली ती भानगडीची आहे हें समजेल. हिजपासून काहींच सोय न होतां उलट गैरसोय मात्र होते. ह्यापेक्षां अनुस्वाराची भानगड मोडून टाकली, तर काहीं गैरसोय होईल असें नाही. फार झालें तर फक्त 'तूं' वरचा अनुस्वार कायम ठेवावा. काहीं हें विशेषण असून सर्व लिंगी आहे; तेव्हां त्यावर अनुस्वार देण्याचें कारण राहात नाही; देणेच असेल, तर व्युत्पत्तीप्रमाणें 'ही 'वर अनुस्वार द्यावा.

क्रियापदें:—क्रियापदांच्या संबंधानें ज्या ठिकाणीं हल्लीं अनुस्वार देत नाहीत त्या ठिकाणीं व्युत्पत्ती, अर्थभेद, उच्चार, सोय वगैरे कारणांसाठीं तो द्यावा, अशाविषयीं कोणाचा वाद नाही. ज्या ठिकाणीं तो देतात त्या सर्व ठिकाणीं तो द्यावा किंवा नाही, ह्याविषयीं विचार करणे आहे.

१. जुना वर्तमानकाळः—ह्याच्या प्रथम पुरुषी तिन्ही लिंगी उभयवचनी अंतीं अनुस्वार असतो. जसें:-मी करीं, आह्मी करूं.

२. रीतिभूतः—हा जुन्या वर्तमानाप्रमाणें असल्यामुळें त्याच्या प्रथमपुरुषी तिन्ही लिंगी अंतीं अनुस्वार देतात. जसें:-मी निजें, आह्मी निजूं.

३. चालू वर्तमान--(अ) प्रथम पुरुषी तिन्ही लिंगी उभयवचनी अनुस्वार असतोः-मी बसतों, बसतें, बसतें; आह्मी बसतों-बसतों-बसतों.

(ब) द्वितीय पुरुषी नपुंसकलिंगी एकवचनी रूपाच्या उपांत्य अक्षरावर. जसें-तूं येतेंस.

(क) द्वितीय पुरुषी तिन्ही लिंगी अनेकवचनी रूपावर. जसें–तुह्मी येतां.

(ड) तृतीय पुरुषी नपुंसकलिंगी एकवचनी रूपावर. जसें–तें करतें. ह्यास अपवाद–आहे व असे हीं रूपें होत. जसें:–तें आहे किंवा असे.

(४) भूतकाळः– –वर्तमानाप्रमाणें सर्व व्यवस्था असून शिवाय तृतीय पुरुषी नपुंसकलिंगी अनेकवचनी रूपावर अनुस्वार असतो. जसें:–तीं मेलीं.

(५) भविष्यकाळ—ह्यांत फक्त प्रथम पुरुषी तिन्ही लिंगी अनेकवचनी रूपावर असतो व तो कदाचित् संस्कृत विधिलिंग यांतील मकारावरून आला असावा. उ. आह्मी जाऊं.

(६) पाहिजे, नको, नये, नलगे, नव्हे ह्यांवर केव्हांही अनुस्वार नसतो.

(७) आज्ञार्थ––ह्यांत फक्त प्रथमपुरुषी अनुस्वार येतो. उ. मी करूं, आह्मी करूं (सं–करवाणि, करवाम).

(८) विध्यर्थी––ह्यांत फक्त नपुंसकलिंगी मात्र अनुस्वार असतो. उ० तिनें तें खावें.

(९) **नाहीं**—(सं. नास्ति, प्रा. नात्थि, णत्थि). 'नाहीं' ह्यांतील 'हीं' वर सर्वत्र अनुस्वार असतो.

आतां वरील रूपांतील अनुस्वारास संस्कृताचा व प्राकृताचा कितपत आधार आहे तें पाहूं. संस्कृत, प्राकृत व मराठी ह्या भाषांतील काळ व अर्थ ह्यांच्या संबंधाने एकवाक्यता नाही, इतकेंच नाही, तर भेद पुष्कळ आहे. काळाच्या व अर्थाच्या बाबतींतील प्रकार संस्कृत व प्राकृत ह्यांशीं न जुळतां इंग्रजीशीं विशेष जुळतो. संस्कृतांत काळ दहा आहेत. प्राकृतांत ते दोन आहेत–वर्तमान व सामान्य भविष्य; व

अर्थ आज्ञार्थच आहे. अशी व्यवस्था आहे, तथापि काय स्थिती आहे ती पुढील उदाहरणांवरून समजेल.

वर्तमानकाळ—हस धातू.

एकवचन.	अनेकवचन.
प्र. पु. (म) हसतों, हसतें, हसतें; (प्रा) हसामि, हसमि हसह्मि; (सं.) हसामि.	१ (म) हसतों; (प्रा) हसामो-मु-म, हसिमो-मु-म, हसमो-मु-म-ह्मो-ह्म; (सं) हसामः (महे-आत्म. प.)
द्वि. पु. (म) हसतोस, हसतेस, हसतेंस; (प्रा) हससि; (सं.) हससि (से-आत्मनेपदि प्रत्यय)	२ (म) हसतां; (प्रा) हसह, हसध, हसधं, हसित्था, हसत्थ; (सं) हसथ, ध्वे (आत्म)
तृ. पु. (म) हसतो, हसते, हसतें; (प्रा) हसदि, हसइ; (सं) हसति (ते-आत्मनेपदि प्रत्यय)	३ (म) हसतात; (प्रा) हसंति; (सं) हसंति, (अंते-आत्मनेपदि प्रत्यय)

भविष्यकाळाचे प्रत्यय.

एकवचन.	अनेकवचन.
प्र. पु. (म) एन, ईन; (प्रा.) स्सं, स्सामि; (सं.) स्यामि, स्ये.	१ (म) ऊं; (प्रा) स्सामो; (सं) स्यामः, स्यामहे.
द्वि. पु. (म) सील, शील; (प्रा) स्स, सि; (सं) स्यसि, स्यसे.	२ (म) आल; (प्रा) स्सध, स्सह; (सं) स्यथ, स्यध्वे.
तृ पु (म) एल, ईल; (प्रा) स्सदि, स्सई; (सं) स्यति, स्यते.	३ (म) तील; (प्रा) स्संति; (सं) स्यंति, स्यंते.

भूतकाळचे प्रत्यय.

एकवचन.	अनेकवचन.
प्र. पु. (म) लों; लें, ल्यें; ला. (सं) अम्, इ.	१ (म) लों. (सं) म, मंहि.
द्वि. पु. (म) लास, लीस, लेंस. (सं) स, यास.	२ (म) लां, (कचित् लांत वलेंत); (सं) त, ध्वम्.
तृ. पु. (म) ला, ली, लें; (सं) त्, त.	३ (म) ले, ल्या, लीं; (सं) अन्, अन्त.

प्राकृतांत भूतकाळ नाही. संस्कृतांतील भूतकाळाचे वरील प्रत्ययांचा मराठी प्रत्ययांशीं अर्थाअर्थीं संबंध नाही. मराठींतील भूतकाळी प्रत्यय जे वर दिले आहेत ते संस्कृतांतील भूतकालवाचक विशेषणांचे प्रत्यय तः, ता, तं ह्यांपासून झालेले आहेत, असें ह्मणणे आहे.

वर जे संस्कृत व प्राकृत प्रत्यय दिले आहेत त्यांविषयीं विचार करतां, मराठींतील प्रत्ययांवर अनुस्वार कसे आले हें समजत नाही. तात्त्विक अथवा व्युत्पत्तीच्या दृष्टीने काहीं आधार आहे असें ह्मणावें, तर तसा प्रकार दिसत नाही. सामान्यत्वें उच्चाराचाही आधार नाहीं. वर्तमानकाळी प्रथम पुरुषी प्रत्ययावर मराठींत अनुस्वार आला आहे, तो मूळ प्रत्ययांत अनुनासिक वर्ण आहे, ह्मणून देण्याची वहिवाट आहे, असें कारण सांगण्यांत येतें. पण भूतकाळी प्रथम पुरुषी मूळ प्रत्ययांत अनुस्वार तर नाहींच, पण अनुनासिक वर्णही नाहीं. त्याचप्रमाणें द्वितीय पुरुषी वर्तमानकाळी अनेकवचनी मूळ प्रत्ययांत अनुस्वार किंवा अनुनासिक वर्ण नाही. मग मराठी प्रत्ययांवरच अनुस्वार कां असावा, असा प्रश्न निघणे साहजिक आहे. आतां

'म' हा अनुस्वाराचा प्रतिनिधी आहे, म्हणून असा अनुस्वार असणे योग्य आहे असें म्हणावें, तर मूर्तिमंत अनुस्वार असून किंवा अनुस्वाराचा चांगला उच्चार मूळ प्रत्ययांत (वर्त. व भविष्य) होत असून मराठी प्रत्ययांवर अनुस्वार देण्यांत येत नाही असें दिसतें (तृतीय पुरुषी अनेकवचनी प्रत्यय पाहा). ह्यावरून मुख्याचा मान कमी, प्रतिनिधीचा जास्त असें आपण समजतो असें होतें. बरें, अनुनासिक वर्णाबद्दल अनुस्वार असावा, असा नियम सर्वत्र पाळल्याचें दिसत नाही. भविष्यकाळी प्रथम पुरुषी एकवचनाच्या रूपाच्या संबंधाने तो मोडलेला दिसतो. (भविष्यकाळचे प्रत्यय पाहा). अंतीं 'अ' असेल तर केव्हांही अनुस्वार यावयाचा नाही, असा मराठी भाषेचा नियम आहे. ह्या नियमास अनुसरून व्यवस्था झाली असावी, असें म्हणावें, तर ज्याप्रमाणें नपुंसकलिंगी करतेंस (द्वि. पु. एक. वर्तमान) ह्याच्या उपांत्य अक्षरावर अनुस्वार देण्यांत येतो, त्याप्रमाणें तो वरील प्रत्ययांच्या उपांत्य अक्षरावर देण्यांत यावा; परंतु तसें दिसत नाही. मूळ शब्दांत अनुनासिक वर्ण असतां त्यावरून आलेल्या शब्दावर अनुस्वार द्यावा असा नियम केल्याने काय अडचण येते, ह्याविषयीं मागें खुलासा केला आहे; तेव्हां त्याबद्दल पुनः द्विरुक्ती करण्याचें कारण नाही.

क्रियापदांच्या प्रत्ययांवरील अनुस्वारांविषयीं जें विवेचन केलें त्यावरून समजून येईल कीं, ह्या बाबतींत व्युत्पत्तीच्या दृष्टीने काहीं आधार असावा असें वाटत नाही. जरी तो असला, तरी त्यावरून पुढें काहीं मुस्तकीम व सयुक्तिक व्यवस्था करतां येईल अशा प्रकारचा निदान तो नाही.

हल्लींची व्यवस्था जर व्युत्पत्तीस धरून नाही, तर ती अर्थभेदाच्या दृष्टीने ह्मणजे लिंगभेद, पुरुषभेद व वचनभेद समजण्यास उपयोगी कितपत पडते व त्यासाठीं अनुस्वाराची कितपत आवश्यकता आहे, ह्याविषयीं विचार करणे अवश्य आहे. असा विचार करतां तसा प्रकार दिसत नाही. प्रथम पुरुषी वर्तमान व भूतकाळी सर्व प्रत्ययांवर, द्वितीय पुरुषी ह्याच काळी अनेकवचनी सर्व प्रत्ययांवर, त्याचप्रमाणें भविष्यकाळी प्रथम पुरुषी अनेकवचनी सर्व प्रत्ययांवर सरसकट अनुस्वार आहे. ह्यांत लिंगपरत्वें काहीं भेद केल्याचें दिसून येत नाही. मात्र आणखी दोन तीन ठिकाणीं नपुंसकलिंगाच्या प्रत्ययावर स्वतंत्र अनुस्वार दिलेला आढळतो. (द्वितीय पु. ए. व तृ. पु. एकवचनी वर्तमान व भूतकाळाचीं रूपें पाहा). तेव्हां लिंगभेद वगैरेसंबंधाने मूळची व्यवस्था आहे तिजपेक्षां अनुस्वारापासून विशेष काहीं व्यवस्था झाली आहे असें नाही. हे अनुस्वार न दिले, तर लिंगभेद कळण्यास अडचण येईल असें ह्मणावें, तर तों, तां, तात, ऊं, आल, तील वगैरे प्रत्यय तिन्ही लिंगी आहेत. असे असतां ते ओळखतां येत नाहीत, अशाविषयीं आजपर्यंत वाद नाही. भूतकाळी एकवचनी तिन्ही पुरुषी तिन्ही लिंगी बहुतेक प्रत्यय निरनिराळे आहेत; मग त्यांपैकीं काहींवर हल्लीं अनुस्वार देतात त्यांविषयींचे कारण काहींच समजत नाही. ह्या सर्व कारणांचा विचार करतां क्रियापदांवरील अनुस्वारांची अर्थभेददृष्टीने आवश्यकता समजत नाही; व्युत्पत्तीचा त्यास आधार नाही; उच्चारतांना सानुस्वार उच्चार होत नाही; त्यापासून सुयंत्र व्यवस्था होत आहे असें नाही; असे अनुस्वार न दिले तर गैरसोय होत नाही; काढून टा-

कले तर पुष्कळ घोटाळा कमी होतो; कर्त्यावरून अथवा कर्मावरून क्रियापदांचे लिंग, वचन, पुरूष वगैरेविषयीं माहिती सहज कळते; क्रियापदावर अनुस्वार असल्यास जास्त कळते व नसल्याने मुळींच कळत नाही असें नाही; ह्मणून असले अनुस्वार नसावे हें बरें. परंतु नपुंसकलिंगी नामांच्या अथवा सर्वनामांच्या संबंधी क्रियापदांवर अनुस्वार असावा, असें पूर्वीं सांगितलें आहे ह्मणून, व क्रियापदांवरील सर्वच अनुस्वार काढून टाकले, तर ती गोष्ट पुष्कळांस कदाचित् पसंत पडणार नाही सबब, नपुंसकलिंगी प्रत्ययांवर हल्लीं ज्या ठिकाणीं अनुस्वार देतात तेवढ्या ठिकाणीं ते द्यावे. फार झालें, तर अनेकवचनी ज्या प्रत्ययांवर हल्लीं अनुस्वार देतात त्यांवर तो द्यावा. म्हणजे एकवचनी व अनेकवचनी काहीं रूपें मात्र निरनिराळीं आहेत, तीं बरींच निरनिराळीं होतील.

नाही:–ह्याची व्युत्पत्ती वर दिली आहे तिजवरून समजून येईल. 'नाही' ह्यावर अनुस्वार देण्यास संस्कृताचा किंवा प्राकृताचा मुळींच आधार नाही; त्याचप्रमाणें उच्चाराचा नाही. तेव्हां 'आहे' ह्याची जी व्यवस्था तीच 'नाही' ह्याची व्हावी.

अव्ययें:–काहीं थोडीं अव्ययें शिवाय करून बाकीच्या बऱ्याच अव्ययांवर अनुस्वार देण्याचा संप्रदाय दिसतो. ज्यांवर असा अनुस्वार देण्याचा बहुतेक अथवा सार्वत्रिक प्रचार दिसतो तीं:–

क्रियाविशेषणें:—

एकारान्त—जेथें, जिथें; एथें, इथें; तेथें, तिथें; कुठें, कोठें; प, हिल्यानें, दुसऱ्यानें, कर्मधर्मसंयोगानें, अधिकारपरत्वें, पुढें, मागें, नुकतें, विशेषें, मुख्यत्वें, संथपणें, इ०.

आकारान्त--आतां, मधां, एव्हां, केव्हां, तेव्हां, गुदस्तां, कां, उद्यां, परवां, तेरवां, स्वतां, प्रथमतां, पुन्हां, हां हां ह्मणतां, उठल्यांबसल्यां, धावऱ्यांधावऱ्यां, करतांकरतां, सध्यां, एरवां, एकदां, दोनदां, यंदां, गटांगटां, देतांघेतां, मरतांमरतां, कांहींकेल्यां, करुनियां इ०

ईकारान्त—केवीं, जेवीं, तेरवीं, एरवीं, अगदीं, शेवटीं, चटदिशीं, टपदिनीं, गतसालीं, पुरतेपणीं, अनशेपोटीं, नेहमीं, खरोखरीं, अनवाणीं, अर्थाअर्थीं, अंगाऱ्यावारीं, दुपारीं तिपारीं, दिवसाउजेडीं, हल्लीं, मघाशीं, खालीं, आधीं मागुतीं, पुढतीं, सकाळीं, कर्णोपकर्णीं, कधीं, कधींच्यामधीं इ०

ऊकारान्त--जाऊं, करूं इ०

ओकारान्त--जेथपावेतों, जों, तों, इ०

ज्या विशेषणांचा उपयोग क्रियाविशेषणासारखा होतो, व विशेषणें असतां ज्यांवर अनुस्वार देण्यांत येतो, त्यांचा उपयोग क्रियाविशेषणासारखा झाल्यास त्यांवर अनुस्वार द्यावयाचा किंवा कसें ? उ. तीं पुस्तकें उभीं ठेवतां येत नाहीत. असा अनुस्वार कायम ठेवावा, असें आम्हांस वाटतें.

उभयान्वयी अव्ययें:--कां, जरकरतां, नाहींतर, पेक्षां, कीं, कारण कीं, असें असतां, तसें केल्यानें, जणूं, जाणों, न जाणों इ०

शब्दयोगी अव्ययें:--लागीं, संबंधीं, हातीं, ऐवजीं, अर्थीं, खालीं, पूर्वीं, ठायीं, पाशीं, साठीं, करवीं, विशीं, पैकीं,

विषयीं, भोंवतीं, सभोवतीं, सांगातीं, भीतरीं, माजीं, मधीं, माझारीं, उलटें, प्रमाणें, पुढें, मागें, मध्यें, मुळें, पुरतें, वाटें (तोंडावाटें), निमित्यें, सवें, विणें, पाडें, द्वारें, संगें, कारणें, आंत, आंतून, द्वारां, करतां, देखतां, सुद्धां, बद्दलां, पावेतों, पेक्षां, लागोनियां, इ०

केवलप्रयोगी अव्ययें:--उं, अं:, फूं, बेटें, कीं, हाँ, हँ, आहां, अँ, उँ, इ०

वर अव्ययांचीं जीं उदाहरणें दिलीं आहेत, तीं दादोबा वगैरे जे व्याकरणकार त्यांच्या ग्रंथांतून जीं आढळलीं तीं मुख्यत्वें दिलीं आहेत. काहीं एकाच प्रकारचीं आहेत, तीं वजा करतां निरनिराळीं जरी धरलीं, तरी त्यांची बेरीज शंभरापेक्षां थोडी जास्त, निदान शंभराजवळ तरी येईल. व्युत्पत्तीच्या दृष्टीनें विचार करतां फारच थोड्या अव्ययांवर अनुस्वार देण्यास आधार दिसतो. उच्चाराविषयीं विचार करतां कोंकणाशिवाय फारच थोड्या ठिकाणच्या लोकांच्या उच्चारांत अनुस्वार असल्याचें समजून येतें. तर मग हे अनुस्वार असेच कायम ठेवावयाचे किंवा काहीं विद्वान मित्रांनी सुचविल्याप्रमाणें ह्यांस अजीबात फाटा द्यावयाचा; किंवा व्युत्पत्ती, सोय, लोकांची आवड वगैरे गोष्टींचा विचार करून व सारासार विचार पाहून काहीं ठेवावयाचे असा प्रश्न उत्पन्न होतो. ही गोष्ट खरी आहे कीं, बहुतेक अनुस्वार निष्कारण आहेत. ते जशाचे तसेच ठेवावयाचे, तर मग झोप, शेवट, शेपूट, सवय वगैरे कित्येक शब्दांवर अनुस्वार देतात ते काढून कां टाकावे असा प्रश्न उत्पन्न होतो. तेव्हां सर्वच अनुस्वार ठेवणे हें बरें नाहीं. उलट पक्षीं हे सर्वच काढून टाकणे ठीक नाही.

व्युत्पत्तीच्या संबंधाने किंवा सोईच्या संबंधाने किंवा दुसऱ्या कारणाने जे ठेवण्याची आवश्यकता आहे ते ठेवावे. अव्ययांवरील सर्व अनुस्वार काढल्याने सोय होते हें खरें आहे, तथापि नुसती सोय होते एवढीच गोष्ट धरून चालणे बरें नाहीं, हें पूर्वींच सांगण्यांत आलें आहे. जी व्यवस्था करावयाची ती निदान बऱ्याच समंजस लोकांस पसंत पडेल, अशी असली पाहिजे. ती केवळ एकदेशीय असली, तर संमत पडण्याचा कमी संभव आहे. ह्याकरतां व्युत्पत्ती, सोय वगैरे गोष्टींचा विचार करून व्यवस्था करणे अवश्य आहे. केवळ धारवाडी कांटा घेऊन भाषेच्या संबंधाने सर्वत्र व्यवस्था करतां येत नाही, हें समजून तशी व्यवस्था, निदान अव्ययें व प्रत्यय ह्यांच्या बाबतींत केल्याशिवाय सोय नाही. जीं अव्ययें वर नमूद करण्यांत आलीं आहेत, त्यांपैकीं काहीं प्रत्ययांवरून बनलेलीं आहेत. तेव्हां प्रत्ययांविषयीं प्रथम व्यवस्था सुचविल्यावर अव्ययांविषयीं व्यवस्था सुचविणे बरें, असें आम्हांस वाटतें; ह्मणून प्रथम प्रत्ययांविषयीं विचार करूं.

प्रत्यय:—नपुंसकलिंगी नामांच्या व क्रियापदांच्या बाबतींत काय व्यवस्था असावी, तें मागें सांगितलें आहे. आतां ज्या प्रत्ययांवरील अनुस्वाराविषयीं विचार करावयाचा ते प्रत्यय:—

नां, तें (द्वितीया व चतुर्थी) ; नें, णें, एं, शीं, नीं, णीं, हीं, ई (तृतीया); तून (पंचमी); तँ, इँ. आँ (सप्तमी); नों (संबोधन).

णें, ऊं, तां, तांना, तांनां (मूळ धातूस प्रत्यय लागून धातुसाधित शब्द होतात ते.)

ना—द्वितीयेचा व चतुर्थीचा अनेकवचनी प्रत्यय 'ना' हा षष्ठीचा अनेकवचनी संस्कृत प्रत्यय 'नाम्' ह्यापासून आलेला आहे. तेव्हां मुळांत अनुस्वार आहे, ह्मणून त्यावरून आलेल्या 'ना' प्रत्ययावर अनुस्वार असावयाचा; दादोबा देत होते; परंतु ह्यांत अनुनासिकवर्ण आहे व अनुस्वाराचा उच्चार मुळींच होत नाही, सबब तो नसावा, असें वाटून अशा अनुस्वारास फाटा दिला आहे. असें करणे आतां बहुतेकांस पसंत पडलें आहे; हा अनुस्वार देण्याची आतां वहिवाट नाही; उच्चारांत तर तो मुळींच येत नाही; तेव्हां तो देऊं नये, हेंच योग्य होय. हीच गोष्ट संबोधनाचा प्रत्यय 'नो' ह्यास लागू आहे.

तें—हा प्रत्यय संस्कृत 'अंते' ह्यापासून आला आहे; परंतु हा सबंध प्रत्यय उपयोगांत नसून फक्त 'ते' च उपयोगांत आला आहे. जर सबंध प्रत्यय उपयोगांत आला असता, तर विचार करण्यास जागा असती व 'ते' ह्याच्या पूर्वीच्या वर्णावर अनुस्वार देणे रास्त झालें असतें; अनुस्वार न दिल्यामुळें काहीं घोटाळा होईल असें ह्मणावें, तर तसें दिसत नाही; तेव्हां हा अनुस्वार देण्याचा प्रघात कसा पडला, हें समजत नाही, वगैरे कारणांचा विचार करतां असा अनुस्वार देण्याचें कारण नाही.

नें, णें, नीं, णीं, एं, शीं, हीं, ईं—हे मराठींत तृतीयेचे प्रत्यय आहेत. संस्कृतांत तृतीयेचे एकवचनी व अनेकवचनी प्रत्यय एन, इन, भिः असे, व प्राकृतांत इण, णा, इ, एअ, आ, हिं, हि असे आहेत. पैकीं नें, नीं, हे इन व इना ह्यांपासून, व णें, णीं हे इण, णा ह्यांपासून किंवा

इन, इना ह्यांपासून आले असावे. 'हीं' हा संस्कृत 'भिः' चो प्राकृतांत 'हिं' अथवा 'हि' असा अपभ्रंश होऊन आला आहे. 'एं' हा 'एन' पासून झाला आहे. 'ई' हा 'एं'चा अनेकवचनी प्रत्यय आहे असें काहींचें ह्मणणे आहे. काहीं ह्मणतात 'ई' हा प्रत्यय 'हीं'पासून 'हीं' वर अनुस्वार कायम झाल्यावर उत्पन्न झाला असावा. 'शीं' हा प्रत्यय 'सह' पासून झालेला असावा असें काहींचें ह्मणणे आहे; व काहींचें ह्मणगे प्राकृत प्रत्यय 'हि' ह्यापासून 'सीं,' व 'सीं' पासून 'शीं' असा झाला असावा. 'आं' प्रत्ययाच्या व्युत्पत्तीविषयीं घोटाळा आहे; निश्चयात्मक काहींच सांगतां येत नाही. ह्याप्रमाणें नें, णें वगैरे प्रत्ययांची व्युत्पत्ती आहे. प्रथम नें, णें, नीं, णीं, ह्या प्रत्ययांविषयीं विचार करून नंतर इतर प्रत्ययांविषयीं विचार करूं.

वर जी व्युत्पत्ती दिली आहे तिजवरून दिसून येईल कीं, ने, णे, नी, णी हे ज्या मूळच्या प्रत्ययांवरून मराठींत आले आहेत, त्यांत अनुस्वार मुळींच नाही; उच्चारांत अनुस्वार नाही; अनुनासिक वर्ण ज्यांत कायम आहे, त्यावरील अनुस्वाराचा उच्चार देश कोंकण वगैरे कोणत्याही ठिकाणीं प्रायः करीत नाहीत, इतकेंच नाही, तर अनुस्वाराचा उच्चार सहजगत्या शक्यच नाही; पाणी, लोणी वगैरे ईकारान्त नपुंसकलिंगी नामांत त्याचप्रमाणें तांना, नो व ना ह्या प्रत्ययांत अनुनासिक वर्ण असल्यामुळें त्यावर अनुस्वार देऊं नये, असें पूर्वींच बहुतेक विद्वानांनी ठरवून टाकलें आहे; मुळांत अनुनासिक वर्ण आहे एवढ्याच कारणावरून अनुस्वार द्यावयास लागलें असतां ज्यांवर हल्लीं तो देत नाहींत त्यावर तो द्यावा लागेल व तसें करणे बरें नाही;

" सृष्टिजन्य ईश्वरज्ञान " वगैरे कांहीं जुन्या ग्रंथांत असा अनुस्वार दिलेला आढळत नाही; असा अनुस्वार काढल्याने कांहीं गैरसोय होईल असें नाही; तेव्हां ह्या सर्व कारणांचा विचार करतां ने, णे, नी, णी ह्या प्रत्ययांवर अनुस्वार देण्याचें कांहींच कारण दिसत नाही; ह्मणून हा न देणे हेंच प्रशस्त समजावें. ' ही ' ह्यावर अनुस्वार देण्यास आधार असल्यास फारच थोडा आहे. संस्कृतांत मुळींच आधार नाही; प्राकृतांत 'हिं ' व ' हि ' अशीं विकल्पें रूपें होतात; तेवढ्यावरून कांहीं थोडा आधार आहे. ह्याकरतां सानुस्वार व निरनुस्वार अशी वैकल्पिक रूपें ग्राह्य मानावीं. ' शी ' हा प्रत्यय 'सह' पासून आला असल्यास अनुस्वार देण्यास कांहींच आधार नाही, पण ' हि ' पासून आला असल्यास फारच थोडा आहे; ह्मणून " ही " प्रमाणें ' शी 'ची व्यवस्था करावी.

' इं, ' ' एं ' तृतीयेचे प्रत्यय व ' आं ' सप्तमीचा प्रत्यय ह्यांवर अनुस्वार देण्यास व्युत्पत्तीच्या दृष्टीने खरा आधार दिसत नाही. ह्या प्रत्ययांवरील अनुस्वार काढले, ह्मणजे बहुतेक विभक्तिप्रत्यय व अव्ययें ह्यांवर अनुस्वार देण्याचें कारण पडत नाही, व त्यामुळें ह्या दोन बाबींच्या संबंधाने अनुस्वारास अजी फाटा द्यावा लागतो. असें केलें असतां लोकांची नाखुषी होईल किंवा कसें एवढ्याच प्रश्नाविषयीं विचार करणे आहे. ने, णे वगैरे इतर प्रत्यय स्वतंत्र निराळे ठेवण्यांत येऊन आणखी त्यांवर अनुस्वार देण्यांत येतो. तशी गोष्ट ह्या प्रत्ययांची नाही. हे प्रत्यय शब्दाच्या रूपांत मिळून जातात व ते ओळखण्यास केव्हां केव्हां पंचाईत पडते; तेव्हां ते ठेवणे झाल्यास प्रत्ययांची

खूण राहावी ह्या साठीं, व येथून तेथून अनुस्वारास फाटा देणे कदाचित् पसंत पडणार नाही ह्या साठीं, तो अनुस्वार कायम ठेवावा, असा आमचा अभिप्राय आहे.

त—हा सप्तमीचा प्रत्यय आहे, असें काहीं मानतात, परंतु, असें मानणे बरोबर आहे किंवा नाही हा प्रश्न आहे. 'आंत' ह्यांतील 'आं' निराळा ठेवून नुसता 'त'च घेतला, तर अनुस्वाराचें कारण दिसत नाही; ' आंत ' असाच प्रत्यय मानला, तर अनुस्वार येतोच. त्याचप्रमाणें 'तून' ह्याची गोष्ट आहे. तेव्हां सोईसाठीं किंवा विशेष कारणासाठीं ह्मणून अनुस्वार ठेवावयाचाच आहे, तर आँ, एँ, ईँ, आंत, आंतून असे सानुस्वार प्रत्यय घेऊन चालावें लागतें. आतां ऊं, तां, तांना, तांनां ह्या प्रत्ययांविषयीं मात्र विचार करावयाचा. ऊं हा प्रत्यय संस्कृत ' तुम् ' वरून आला आहे; तेव्हां त्यावर अनुस्वार देण्यास मुळांत आधार आहे; शिवाय लेखनपद्धतीचाही त्यास आधार आहे, म्हणून त्यावर अनुस्वार असणे योग्य आहे. ' ता ' एवढाच स्वतंत्र प्रत्यय नाही. संस्कृतांत वर्तमानकालवाचक विशेषणाचा प्रत्यय ' त् ' असा असून मराठींत त्याचा त होतो (उ. बसत, हसत, उठत इ०). ह्या 'त' प्रत्ययाला 'आं' हा सप्तमीचा प्रत्यय लागून बसतां, हसतां, उठतां इ० रूपें होतात. जर ' आं ' ह्या प्रत्ययावर अनुस्वार ठेवावयाचा आहे व तो ठेवावा असें वर सुचविलें आहे, तर तो ' तां ' प्रत्ययावर ठेवणे अवश्य आहे, हें निराळें सांगावयास नको. त्याचप्रमाणें ' तांना ' ह्यांतील 'तां'वरही अनुस्वार ओघाने द्यावा लागतो; ' ना ' वर मात्र तो नको. ह्याचीं कारणें वर सांगण्यांत आलींच

आहेत; तेव्हां त्याची द्विरुक्ती नको. आतां अव्ययांवरील अनुस्वारांविषयीं विचार करूं व अनुस्वार प्रकरण संपवूं.

कोणत्या अव्ययांवर प्रस्तुत अनुस्वार देतात, हें मागें सांगितलेंच आहे. व्युत्पत्तीच्या दृष्टीने पाहतां फारच थोड्या अव्ययांवर अनुस्वार देण्यास मुळांत आधार सांपडतो. तेव्हां जेवढ्या अव्ययांस व्युत्पत्तीचा आधार आहे तेवढ्यांवर अनुस्वार द्यावयाचा, किंवा प्रत्यय लावून जीं अव्ययें बनलीं आहेत त्यांवर, व ज्यांचा सानुस्वार उच्चार करतात त्यांवरही अनुस्वार असावा, असा प्रश्न आहे. व्युत्पत्तीवरून ज्यांस आधार सांपडतो त्यांवर तो देणे अवश्य आहे. त्याचप्रमाणें ज्यांचा सानुस्वार उच्चार होत असेल त्यांवरही तो असणे जरूर आहे. पण आं, ईं, एं, आंत, आंतून वगैरे प्रत्ययांवर तो विशेष कारणाकरतां असावा, असें सांगण्यांत आलें आहे ; तेव्हां हे प्रत्यय लागून जीं अव्ययें बनलीं आहेत त्यांवरही तो देणे अवश्य आहे.

आं, एं, ईं वगैरे विभक्तिप्रत्यय असतां असा अनुस्वार असावा व अव्ययें असतां तो नसावा, हें ह्मणणे चमत्कारिक दिसेल. विभक्तिप्रत्यय असतांना जर तो द्यावयाचा, तर अव्ययें असतांना तो दिला पाहिजे. आतां अशीं अव्ययें कोणतीं ह्याचा विचार करावयाचा.

पहिल्याने, दुसऱ्याने, वगैरेंत ने प्रत्यय आहे ह्मणून ; शेकडो, लाखो वगैरेंत ओ प्रत्यय आहे ह्मणून ; दोनदा, तीनदा वगैरेंत दा प्रत्यय आहे ह्मणून ; उठल्याबसल्या, घाबऱ्याघाबऱ्या, गटागटा, भडाडा वगैरे अनुकरणवाचक शब्दांवर अनुस्वार नको, अशाविषयीं बहुतेक अंशीं एकवाक्यता आहे ह्मणून ; कडे हा प्रत्यय लागून बनलेले इक-

डे, तिकडे, अलीकडे, पलीकडे वगैरे शब्द इकडेस, तिकडेस, अलीकडेस, पलीकडेस ह्यांपासून आलेले आहेत ह्मणून ; सदा, शास्त्रदृष्ट्या, सहजगत्या, जात्या, सर्वदा, कदा, एकदा, यदा, तदा वगैरे शुद्ध संस्कृत शब्द जशाचे तसे ठेवण्यांत आहेत ह्मणून; अन्यथा, सर्वथा वगैरेंत था प्रत्यय आहे ह्मणून; दीनवाणे, संथपणे वगैरेंत शेवटीं अनुनासिक वर्ण आहे ह्मणून, त्यांवर अनुस्वार नको. आतां ज्या अव्ययांवर तो असावा तीं:—

(१) मुळें (श. अ.)	मूळ + एं (सं. 'ल'चा ळ होऊन)
(२) मध्यें, मधें (श. अ; क्रि. अ.)	मध्य + एं (सं)
(३) विषयीं, विशीं (श. अ.)	विषय + ई (सं)
(४) पाशीं (श. अ.)	(सं. पार्श्व-प्रा. पास्स + ई)
(५) ऐवजीं (श. अ.)	ऐवज + ई (अरबी)
(६) पूर्वीं (श. अ.)	पूर्व + ई (सं)
(७) मागें (श. अ; क्रि. अ.)	माग + एं (संस्कृत मार्ग. प्रा. मग्गो ह्याचा अपभ्रंश माग झाला)
(८) अर्थीं (श. अ.)	अर्थ + ई (सं)
(९) जेथें (क्रि. अ.)	(सं. यत्र; प्रा. जत्थ) जेथ + ई = जेथें
(१०) तेथें (क्रि. अ.)	(सं. तत्र. प्रा. तत्थ)-तेथ + ई = तेथें
(११) एथें, येथें (क्रि. अ.)	(सं. अत्र; प्रा. एत्थ) ह + थ + ई = हेथें, -प्रायः एथें, येथें
(१२) कोठें (क्रि. अ.)	(सं. कुत्र, प्रा. कुत्थ + ई)
(१३) विशेषें (क्रि. अ.)	विशेष + एं (सं)
(१४) मुख्यत्वें (क्रि. अ.)	मुख्यत्व + एं (सं)
(१५) अधिकारपरत्वें (क्रि. अव्यय)	अधिकारपरत्व + एं. (सं)
(१६) नुकतें (क्रि. अ.)	नुकता + एं

(१७) **कां** (क्रि. अ.) (सं. किम्)
(१८) **उद्यां** (क्रि. अ.) उद्य + आं (सं)
(१९) **परवां** (क्रि. अ.) परश्व + आं (सं)
(२०) **स्वता, प्रथमता, पुन्हा, उभयता, क्रमशा, शब्दशा, बहुशा, अल्पशा, अनेकशा** वगैरे रूपें **स्वतः, प्रथमतः, पुनः, उभयतः, क्रमशः, शब्दशः, बहुशः, अल्पशः, अनेकशः** ह्यांपासून आलीं आहेत; तेव्हां मूळ रूपें सोपीं आहेत, तर तींच कायम ठेविलीं असतां अनुस्वाराची भानगड राहणार नाही. अपभ्रष्ट रूपांत (स्वता, प्रथमता इ०) विसर्गाचा "आ" झाला आहे, तेव्हां अनुस्वाराची प्राप्ती होत नाही.
(२१) **गुदस्तां** (क्रि. अ.) गुदस्त + आं (फारसी)
(२२) **शेवटीं** (क्रि. अ. श. अ.) शेवट + ई (मराठी)
(२३) **गतसाळीं** (क्रि. अ.) गतसाल + ई. (सं+ फा)
(२४) **अनशेपोटीं** (क्रि. अ.) अनशेपोट + ई (अनशन ह्या संस्कृत रूपावरून अनशे रूप झालें व पोट हा शुद्ध मराठी शब्द लागून सर्व रूप झालें आहे).
(२५) **दुपारीं** (क्रि. अ.) दुपार + ई } द्विप्रहर, त्रिप्रहर
(२६) **तिपारीं** (क्रि. अ.) तिपार + ई } पासून हीं रूपें बनलेलीं आहेत.
(२७) **दिवसाउजेडीं** (क्रि. अ.) दिवसा + उजेड + ई (सं. म.)
(२८) **हल्लीं** (क्रि. अ.) हाल (अरबी) + ई = हालीं व त्यावरून हल्लीं. हाली असें रूप मुळांत आहे. त्यावरून हल्लीं हें रूप झालें असल्यास अनुस्वारास आधार नाहीं. हाली रूपापासून हल्लीं हें रूप झालें असावें असा विशेष संभव आहे. कृष्णशास्त्री गोडबोले ह्यांनी हाल असें रूप दिलें आहे.

(२९) **कधीं** (क्रि. अ.)	कदा + ईं (सं)
(३०) **कर्णोपकर्णीं** (क्रि. अ.)	कर्ण + उपकर्ण + ईं (सं)
(३१) **खरोखरीं** (क्रि. अ.)	खरोखर + ईं (हिं)
(३२) **आधीं** (क्रि. अ.)	आदि + ईं (सं)
(३३) **सकाळीं, संध्याकाळीं** इ. (क्रि. अ.)	सकाळ + ईं (सुकाल ह्यापासून हा शब्द आला असावा). संध्याकाल + ईं ह्यापासून संध्याकाळीं हें रूप बनलें आहे.
(३४) **तशांत** (क्रि. अ.)	तसा + आंत; त्याचप्रमाणें इतक्यांत, तितक्यांत इ०
(३५) **संबंधीं** (श. अ.)	संबंध + ईं. (सं)
(३६) **भोंवतीं** (क्रि. अ; श. अ.	भोंवता + ईं (संस्कृत भ्रम् पासून)
(३७) **मधीं** (क्रि. अ; श अ.)	मध्य + ईं (सं)
(३८) **निमित्यें** (क्रि. श.)	निमित्य + एं (सं).
(३९) **उलटें** (क्रि. अ.)	उलट + ईं (हिं)
(४०) **पुरतें** (क्रि. अ. श. अ.)	पुरतां + ईं
(४१) **वाटें** (क्रि. अ.)	वाट + ईं (म)
(४२) **द्वारें** (श. अ.)	द्वार + ईं (सं.)
(४३) **संगें** (श. अ.)	संग + ईं (सं)
(४४) **देखतां** (श. अ. क्रि. अ.)	देखत + ईं (सं. दृश् पासून)
(४५) **बदलां** (श. अ.)	बदल + आं (अरबी–बद्ल)

(४६) **उं:, अं:, हां, हूं, अँ, उँ** वगैरे केवलप्रयोगी अव्ययांचा सानुस्वार उच्चार करतात, सबब त्यांवरील अनुस्वार कायम ठेवावा.

(४७) **पक्षीं** (उभय. अ.) पक्ष + ईं (सं.)

(४८) **कीं** (उ. अ).

(४९) **केव्हां, जेव्हां, तेव्हां, येव्हां** (क्रि. अ.):— केव्हां हें रूप 'केधवां' पासून आलें असून केधवां हें संस्कृत कदा + आं ह्यापासून आलें आहे. जेव्हां, तेव्हां हीं रूपें जेधवां व तेधवां ह्यांपासून आलीं असून जेधवां

व तेधवां हीं रूपें यदा + आं, व तदा + आं ह्यांपासून आलीं आहेत. एव्हां हें रूप एधवां पासून आलें आहे. पण एधवां हें ईदृश पासून 'आं' प्रत्यय लागून झालेलें आहे असें ह्मणतात.

(५०) **जई, तई, कई** हीं रूपें यदा, तदा, कदा ह्यांतील 'द' चा लोप होऊन व सप्तमीचा 'ई' प्रत्यय लागून बनलेलीं आहेत. हीं कवितेंत येतात; गद्यात्मक ग्रंथांत प्रायः येत नाहीत. ह्यांत अनुस्वार देण्याची वहिवाट कायम ठेवावी.

(५१) **जेवीं, तेवीं, एवीं, एरवीं**–हीं रूपें यद्वत्, तद्वत्, एतद्वत्, इतरवत्, ह्यांतील अंत्य व्यंजनाचा लोप होऊन मूळ रूपांत काहीं विकार होऊन व शेवटीं सप्तमीचा प्रत्यय ई लागून बनलेलीं आहेत. हीं रूपें प्रायः कवितेंत येतात. त्यांवरील अनुस्वार कायम ठेवावा.

(५२) **पुढें** (क्रि. अ., शब्द. अ.) (सं.–प्रभृति ?) प्रा. पहुडि) अशी पुढें याची व्युत्पत्ती आहे. पहुडि ह्यापासून 'पुढ' असें रूप होऊन त्यास एं प्रत्यय लागून पुढें असें रूप झालें असावें.

(५३) **सभोंवतीं** (क्रि. अ.; श. अ.)-(सं. संभ्रमतः + ई)

(५४) **माजीं** (श. अ.) (सं. मध्य + ई) मध्य ह्याचा अपभ्रंश होऊन मज्झ व नंतर माज हें रूप बनलें असावें.

(५५) **खालीं** (क्रि. अ.,) खाल + ई (म.)

(५६) **आतां** (क्रि. अ.) सं. अत्र. प्रा. अत्थ ?

(५७) **नेहमीं** (क्रि. अ) नियम ह्याचा अपभ्रंश होऊन व ई प्रत्यय लागून नेहमीं हें रूप झालें आहे.

परिशिष्ट १.

ज्यांविषयीं कांहीं तरी माहिती मिळते अशा शब्दांची यादीः-

(ह्या यादींत प्रथमतः मराठी शब्द देऊन त्यापुढें संस्कृत शब्द दिला आहे; व प्राकृत, मागधी, पाली वगैरे भाषांतील शब्द कौंसांत घातले आहेत.)

अंवळ, आंवळ, आ +वळ्.
अंवस, अमावास्या.
आंतडें, अंत्र.
आतां, अत्र? (अत्त, अत्थ).
आंठ, अष्टिः.
आंकसणें, आकर्षण.
आंठळी, अष्टीला.
आंखणें, अंक.
आंचळ, अंचल.
आंखुड, आ + खुड् ?
आंखुडणें, आकुंचन.
आंख, अक्षि; (अक्ख).
आंवरणें, आ + वृ.
आंवतण, आमंत्रण.
आंव, आम.
आंवळा, आमलक.
आंच, अर्चिस्.
आधीं, आदि, (आदी पाली).
आंस, अक्ष.
आंसवें, अश्रु (अंसू).
उद्यां, उदय + आँ. (उदआ).
ऊंस, इक्षु (उच्छू, मागधी.)
एकदां, एकदा.
एथें, अत्र; (मा) एत्थु, एत्थ; (पा अत्त.)
एव्हां, ईदृश ? (एहिं).
एरवीं, इतरवत्.
ओंठ, ओष्ठ.
ओंवा, अजमोदा ?
ओंवाळणें, अवज्वलन ? उद्वलन ?
ओंवळा, अमंगल.
कंवठ, कपित्थ. (कइत्थं).
कधीं, कदा. (किहां, कहिं).
कांकण, कंकण.
कांकूं, काकु-कुरकुर करणें.
कांचोळी, कंचुकी.
कांच (भिंग) काच.
कांचणें, कच्-बांधणें.
कांचणी, क्रकच.
कांसें, कांस्य. (कंस).
कांकडी, कर्कटी. (हिंदी-ककडी).
कांख, कक्षा.
कांहीं, केभिः (केहिं-हि).
कांच्या, कच्छ, कच्.
कांप (हलणें), कंप.
कांटा, कंटक.
कांठ, काष्ठा.
कांतणें, कृंतन.
कांतीण, कृंतन.
कांसोटा, कच्छ.
कांस, कच्छ.
कांसव, कच्छप.
कांसार, कांस्यकार.
किरस्तांव, (ख्रिश्चन).
कीं, किम्.
कींव, कृपा.
केव्हां, कदा; (कइआं किहां?).
केंस, केश.
कैंची, कर्तरी ?; (हिंदी-कैंची).
कोंकण, कोङ्कण.
कोंपर, कूर्पर.

कोंपरा, कूर्पर.
कोंवळा, कोमल.
कोठें, कुत्र; (कुत्थ).
खंवट, क्षवण ?.
खांक, कक्षा.
खांच, खच्.
खेंकडा, कर्कटक.
खेंचणें, (हिंदी खेचना.
खोंकड, खिखि ?.
गहिंवर, गव्हर.
गहूं, गोधूम; (गहूअ).
गांठ, ग्रंथि; (गांठि).
गांठणे, ग्रंथन.
गांठोडें, ग्रंथ्.
गांठलें, ग्रंथ्.
गांव, ग्राम. (गामं).
गांवठण, ग्राम.
गोंवरी, गोविट्.
गोंवर, गोवर्ण.
गोंसावी, गोस्वामी.
घांसणें, घर्षण
घांट, घंटा.
घांस, ग्रास.
घिवर, घृतवर.
घोंट, घुट्ट ?
घोंटणें, घुट्.
घोंटा (पायाचा) घुटः घुंटः.
घोंटाळा, घुट्.
घोंस, गुच्छ; (गुंच्छ).
चंवरी, चमर.
चांपेकळी, चंपककलिका.
चोंच, चंचु.
जसें, यथा (जहा, जह, जहं).
जांचणें, यातना.
जांतें, यंत्र; (जंत)
जांवई, जामात. (जामाउओ).
जेथें, यत्र (जत्थ).
जिरें, जीरक.
जेव्हां, यदा (जम्मि ?)
झांक, झांकणें, चकास–प्रकाशणें ?
झांपड, झंपा.
टांकळा, तर्किल ?.
टांकण(खार) टंकण.
टांकी, टंक.
टांकसाळ, टंकशाला
टांकें, टंक.
ठोंठावणें, (ठुठो).
डंसणें, दंशन.
डांकिनी, डाकिनी.
डांस, दंश; (डंसो).
ढाकणें, (ढक्क-झांकणें).
तांत, तंतु.
तूं, त्वम्. (तुमं)
तेथें, तत्र.
(तत्थु, तेत्थ. जुनें मराठी, तेथ).
तों, तावत् ?.
दंव, द्रव. (द्व).
दहीं, दधि; (मा. दहिं शौ. (दहीं).
दांत, दंत.
धांवणें, धावन.
नांव, नाम.
नाहीं, नास्ति (प्रा० नात्थी).
पंवाडा, पोंवाडा, प्रतिपत्ति-कीर्ति;
(मा) (पडिव र्दा).
परवां, परश्वः.
पहांट, प्रभात. (पभाद्).
पांक, (पंक).
पांखरूं, पक्षी; (पक्खि).
पांच, पंच.
पाशीं, पार्श्व. (पस्स ?)
पिंवळें, पीतल, (पिअल).
पुढें, पुरस्तात्, प्रभृति ?
पेंच, (फारसी-पेच)
पोंखर, पुष्कर; (मा) पोक्खरो)
पों (शेणाचा), पवम्. (मा पाअ).
पोंवळें, प्रवाल (पवल).
फांटा, स्फटन.
फांस, पाश.
फांसा, पाश.
फेंकणें, क्षेपण.
फेंस, फेन.

बांक, वंक, वक्र.
(वंको)
बीं, बीज (बीअं).
बींमोड, बीज.
भिंवई, भोंवई, भ्रू.
भिंवरथडी (भीमातट)
भूंस, बुस. (बुसं.)
भेंकड, भी
भोंक, भूक.
भोंकणें, बुक्क.
भोंवणें, भ्रमण.
भोंरा, भ्रमण.
भोंवरा, भ्रमण.
भोंवळ, भ्रमण.
भोंसकणें, भूक.
भोंपळा, बहुफल ?
भोंवतीं, भ्रमण.
महांकाळी, महाकाली.
मिरें, मरीच.
मोत्यें, मौक्तिक.
येथें, अत्र. (एत्थ).
रेंकणें (ओरडणें), रेषण.
रोंप, रुह्.
रोंवणें, रुह्, रोपण.
रवंथ, रोमंथ.
लंव, लोम.
लांपट, लंपट.
लांकूड, लगुड. (हिंदीलकडी).
लांच, लञ्चा.
लोंकर, लोम.
लोंचट, लव+चट.
लाखों, लक्ष.
लोंढणें, लुठ्.
वांक, वंक्.
वांकी, वक्र.
वांकडा, वक्र. (मा. वंकं).
वांटणें. वंट्, [विभागणें]. (हिंदी) [बाटणा].
वांचणें, वंचन ?;
वांचून, वंचन.
वांसरूं, वत्स.
वांसरी, वत्सतरी, (वत्सदरी).
वांसा, वंश.
विसांवा, विश्राम.
वेंचणें, विवेचन.
वेंच (खर्चवेंच), (व्यय).
वेंटाळणें, वेष्टन.
वेंट, वेष्टन. (मा. वेंट).
वेंटाळें, वेष्टन.
शींव, सीमा.
शेंकडों, शतम्.
शेंकणें, (हिंदी-शकना).
शेंपूट, शेंप.
शेंवती, सेमंती.
शेंवरी, सांवर, शाल्मली.
सदां, सदा.
संवड, सुवेला.
सांखळी, शृंखला. (सिंखला).
सांचणें, संचय.
सांवे, श्यामाक.
सांठा, सम्+स्था.
सांकडें, संकट.
सांत (रोग) सतत ?
सांवरणें, संवरण, संस्मरण !
सांवली, छाया.
सांवळा, श्यामल.
सांपडणें, संपादन.
सांवजें (श्वापद).
सैंपाक, स्वयंपाक.
सोंपणें, समर्पण.
सोंवळा, सुमंगल.
सांचा, सत्य.
हंशा, हंसू, हंसें=हस्.
हांक, हक्-बोलावणें.
हिंसळणें, उच्चलन ?
हींव, हिंव=हिम.

———

सर्वनामें.

मी, अहम्, (अहं, हं, अम्मि, अहं;) आम्ही, वयम (अम्हे, वअं, अम्हे, अम्हं). तू, त्वम्, (तुमं, तं, तु); तुम्ही, (तुम्हे, तुज्झे).

परिशिष्ट २.

ज्या शब्दांच्या संबंधाने माहिती मिळाली नाही असे शब्दः-

अगदीं. अध्यांमध्यांत. अंसडा. आंठी. आंब (ऐट). आंवा. आहों. ऊनियां (पूर्वकाल. प्रत्य). ओनियां. आँतीव. ओंवणें. ओंटी. ओंलांडणें. ओंवी. कंवटाळणें कंवची. कांच (जाच). कांकडा. कांन. कांकडणें. कोंकी. कोंकणें. कोंकरू. कोंकलणें. कोंतवाल. कोंता. कोंरिव. कोंरिव. कोंस. कोंयकोंय ओरडणें. कौंटाळणें. खंवचट. खांकरणें. खुंट. खेंचर. खेंकाळणें. खेंटर. खेंवणें. खोंकला. खोंपा. खोंपणें. गंवसणें. गोंवणें. गोंवें. गोंवारी. गायांवायां. घांटणें. घांव. घांट (साचा). चहूंकड. चंवळी. चांचणी. चांचे. चांचपणें. चिंवट. चांचरणें चांपेखग. चोंथा. चेंचणें. छाछूं. जणोंकाय. झांकी. झांगा. झेंपणें. झेंग. झोंक. झोंट. झोंड. झोंप. झोंपडी. झोंपाळा. टंवका. टांप. टांचण टांपू. टांक (लेखणी). टांच. टांका. टेंकण. टेंकाड. टेंकणें. टांकणें. टोंक. टोंकर. टोंचणें. टौंकारणें. टौंका. ठांठूं. ठांसणें. ठेंच . ठोंकर. ठोंरर. ठोंसा. ठोंसरा. डंवचणें. डांक. डांफरणें. डांकणें. डांका. डेंख. डांखळणें. डोंचणें. डोंकें. ढांस. ढांपण. ढेंकर. ढेंकूण. ढेंकूळ ढेंग. ढांसळणें. ढेंपर. ढोंसला. तांतड. थोंपणें. देंठ. धांवा. धांपा. धांटा. पांकोळी. पेंठ. पोंकळ. पांच. पांचू. पोंच. पांपणी. पोंहोंचणें पेंव. पेंच पोंक. पेंट. पोंची. पोंचट. पोंहणें. पोहोंचणें. फांवणें. फांकडा. फांसणें. फेंपरें. फेंटा फोंफावणें. फेंफें. बांका (धाडशी) बेंळकें. बोंचणें. बोंथट. भुंसर. भोंसले. भोंकर. भोंपळा. भोंकसा. रोंख. रंवदूळ. रें-रें. रांकट. रांठ. रेंवट. रोंठ.

रोंवळी. लवंडी. लांकूडफांटा. वांकस. वेंठ. वांकुल्या. वेंचे. वांट (रस्ता) वांपरणें. शेंवट. संवगडी. सोंगडी. संवरणें. सांपळा. सांवळागोंधळ. सांकशी. संवय. संवकणें. सोंटा. सांचा (नमुना). सांपट. शिळपेंच. सांवा. सोंकणें. सोंट. स्वांर. सोंसों. हंशील. हंसडणें. हळूं. हांकणें. हांहूं. हांकाट्या. हेंका. हांव. हांहां. हिंसणें. हिंसडा. हांक. होंसतोंपर्यंत. हांतून.

ऱ्हस्वदीर्घाविषयीं विचार.

मराठींत ऱ्हस्वदीर्घाविषयींचा विचार म्हणजे मुख्यत्वें अंत्य, उपांत्य व इतर ठिकाणचे इ, उ ह्यांविषयींचा विचार होय. निवळ मराठी बनलेल्या शब्दांच्या संबंधाने फारशी भानगड नाही. त्या बाबतींत ठरीव, सोपे व सामान्य नियम करतां येतात ते:—

(१) अंतींचे इ, उ दीर्घ असावे. जसें—जाई, जुई, लेखणी. (२) अंत्याक्षर अकारान्त असेल, तर उपांत्य ऱ्हस्व इ, उ दीर्घ असावे; मात्र उपांत्याचा अनुस्वारासारखा स्पष्ट उच्चार होत असेल, तर तो उपांत्य वर्ण ऱ्हस्व लिहावा. जसें—जमीन, वाघीण, कापूस, मुंगूस, भिंत, शिंग. इ० (३) अंत्य व उपांत्य इ, उ अशीं दोन्हीं दीर्घ असावयाचीं नाहीत; अंत्य इ, उ सामान्यत्वें दीर्घ असावयाचीं; तेव्हां उपांत्य इ, उ हीं सामान्यत्वें ऱ्हस्व असावयाचीं. (४) विभक्तिप्रत्यय लावण्यापूर्वी, अंत्य वर्ण ऱ्हस्व असल्यास दीर्घ करावा, व उपांत्य ऱ्हस्व करावा व इतर प्रत्यय लागला असतां अंत्यवर्ण दीर्घ असल्यास तो तसाच दीर्घ ठेवावा. (५) शब्दांत इतर ठिकाणीं दीर्घ ई अथवा ऊ आला असतां ऱ्हस्व असावा. (६) समासघटित शब्दांतील दोन शब्द जशाचे तसे ठेवावे.

वरील सहा नियमांस अपवाद आहेत, परंतु ते फार थोडे आहेत. मराठी भाषेंत ऱ्हस्वदीर्घाची भानगड मुख्यत्वें शेकडो शुद्ध संस्कृत शब्द प्रचारांत आले आहेत त्यांमुळें होय.

शुद्ध संस्कृत शब्दांशिवाय इतर शब्दांची सामान्यतः सुयंत्र व्यवस्था लावतां येते; परंतु अशी किंवा अशा प्रकारची दुसरी सोपी व सुयंत्र व्यवस्था शुद्ध संस्कृत शब्दांच्या संबंधाने लावतां येत नाही. कारण, अशा शब्दांपैकीं काहीं शब्दांचे अंत्य इ, उ कधीं ऱ्हस्व असतात व कधीं दीर्घ असतात. त्याचप्रमाणें उपांत्य व इतर ठिकाणचे इ, उ कधीं ऱ्हस्व व कधीं दीर्घ असतात. ह्यामुळें सामान्य नियम बसविण्यास अडचण येते. उपांत्य इ, उ ह्यांच्या संबंधाने बरीच सुयंत्र व्यवस्था करतां येईल. परंतु अंतींच्या व इतर ठिकाणच्या इ, उ वर्णाबद्दल काहींच तशी व्यवस्था करतां येत नाहीं. अंत्य, उपांत्य व इतर ठिकाणचे इ, उ ह्यांपैकीं अंतींचे इ, उ दीर्घ लिहिण्याचा नियम केला असतां विशेष सोय होईल. असा नियम करणे अनेक कारणांनी अवश्य आहे. तें कसें, हें पुढें दाखविण्यांत येईल. उपांत्याच्या बाबतींत काहीं शब्द अपवादादाखल देऊन बरीच पसंत पडेल, अशी सुयंत्र व सोपी व्यवस्था करतां येईल; व तशी व्यवस्था करण्याचा आमचा यत्नही आहे. बाकीचे शब्द जशाच्या तसेच लिहावे, असें सुचविलें आहे.

हल्लींची व्यवस्था अशी आहे कीं, शुद्ध संस्कृत शब्द मराठींत आले असतां ते मुळांत जसे असतील तसेच कायम ठेवावे, असा सक्तीचा नियम आहे. ह्या नियमामुळें मराठी

भाषेच्या स्वराघाताच्या नियमांचें उल्लंघन होवो, तीस निष्कारण काठिन्य येवो, किंवा अडचण वाटो, तो नियम अमलांत आलाच पाहिजे. ह्या नियमाच्या संबंधानें काहीं सौलत कां ठेवूं नये, असें विचारतां संस्कृत शब्दास धक्का लावण्याचा कोणासही अधिकार नाही, असें काहीं ह्मणतात. काहीं ह्मणतात संस्कृत शिकण्याची सोय अनायासें होत असतां ती घालवूं नये; जणू काय संस्कृत शिकण्याची सर्वांसच आवश्यकता आहे व ही सोय अन्य रितीनें करण्यास मार्गच नाही. हा नियम प्रथम कोणी व केव्हां केला, हें समजण्यास मार्ग नाही. हा नियम सख्त आहे किंवा कसें, व हा सर्वांशीं पाळणे झाल्यास सामान्य लोकांस अडचणी येऊन त्याचें अतिक्रमण होईल किंवा नाही, ह्याविषयीं विशेष विचार झाला नसावा, असें ह्मणावें लागतें. ह्या नियमाप्रमाणें चालण्यास विद्वान लोकांस अडचण पडत नसेल, ह्मणून त्यांचें ह्या अडचणीकडे लक्ष गेलें नसेल. परंतु ह्या नियमाचें सामान्यतः अतिक्रमण होत आहे, व तें वारंवार होत आहे ह्यांत नवल नाही. भाषा ही फक्त विद्वानांकरतां नाही; ती सामान्य लोकांकरतांही आहे. तेव्हां ज्या लेखनपद्धतीचें लोकांस उठल्या बसल्या कारण पडतें, ती होतां होईल तो सोपी, ठरीव व सुयंत्र असावी, व तिजविषयींच्या नियमांप्रमाणें वागण्यास होतां होईल तो सोपें जावें, असें आह्मांस वाटतें.

आतां शुद्ध संस्कृत शब्द जशाचे तसेच ठेवावे, हें ह्मणणे कितपत सयुक्तिक आहे, ह्याविषयीं आपण विचार करूं. मराठी भाषेच्या इतिहासाविषयीं स्थूल दृष्टीनें विचार करतां आपणांस असें दिसून येतें कीं, ज्या शब्दांत संयुक्त व्यंजनें आ-

हेत असे शब्द संस्कृतांत शेकडो आहेत; सामान्य लोकांस संयुक्त व्यंजनांचा उच्चार करणे प्रायः कठीण जातें; ह्मणून हजारो शब्द अपभ्रंश होऊन साध्या व सोप्या रूपाने मराठींत प्रचालित झाले आहेत. अपभ्रंश होण्याची जीं काहीं कारणें आहेत, त्यांपैकीं शब्द उच्चारण्यास व लिहिण्यास सोपा जावा, हें प्रधान कारण असावें असें दिसतें. संयुक्त व्यंजनांनी घटित असे संस्कृत शब्द मराठींत येऊं लागले, तेव्हां काहीं व्यंजनांचा लोप होऊन व दुसरा फेरफार होऊन साधे व सोपे शब्द मराठी भाषेंत प्रचारांत आले. ही गोष्ट पुढील उदाहरणांवरून समजून येईल.

पुढील शब्दांत पहिला शब्द संस्कृत, दुसरा प्राकृत व तिसरा मराठी, असे आहेत.

१ तर्क्र, तक्कं, ताक.
२ शय्या, सेज्जा, शेज.
३ हरिद्रा, हलिद्दा, हळद.
४ युग्मं, जुग्गं, जूग.
५ विद्युत्, विज्जू, वीज.
६ अद्य, अज्ज, आज.
७ गर्भिणी, गब्भिणी, गाभण.
८ जामातृक, जामाउओ, जावई.
९ निद्रा, णिद्दा, नीज.
१० भक्तं, भत्तं, भात.
११ माक्षिका, मच्छिआ, माशी.
१२ मूल्यं, मोल्लं, मोल.
१३ चतुर्दश, चउद्दह, चौदा.
१४ कर्तरी, कत्तरी, कातर.
१५ उत्तिष्ट, उट्ठहि, ऊठ.
१६ अरण्यं, रण्णं, रान.
१७ आक्षि, अच्छी, आख.
१८ आत्मीयः, अप्पुलो, आपला.
१९ प्रतिपद्, पडिवआ, पाडवा.
२० रुदित्वा, रोत्तूण, रडून.
२१ लज्जाशीलः, लज्जिरो, लाजरा.
२२ वृश्चिकः, विंछुओ, विंचू.
२३ शर्करा, सक्करा, साकर.

वर जीं उदाहरणें दिलीं आहेत तशीं आणखीं पुष्कळ आहेत. जीं दिलीं आहेत त्यांवरून असें दिसून येईल कीं, ज्या शब्दांत संयुक्त वर्णांची वगैरे भानगड आहे, असे संस्कृत शब्द मराठींत आले असतां ते सर्व जशाचे तसेच

न राहतां त्यांत बदल झालेला आहे व उच्चार करण्यास व लिहिण्यास सोपें पडेल, अशा रितीने ते रूढ झालेले आहेत. असें होणे हें मराठी भाषेचें सामान्य धोरण होय.

दुसरें असें धोरण आहे कीं, संस्कृत शब्द व्यंजनान्त असून तो मराठींत आला असतां व्यंजनाचा लोप होऊन मग रूढ व्हावयाचा. पूर्वपीठिका, ह्मणजे इतिहास पाहावयाचा आहे, तर सामान्यत्वें[1] व्यंजनान्त शब्द असावयाचा नाही. इतिहास पाहावयाचा नाही, तर बोलावयास नको.

वर जे नियम सांगितले त्यांशिवाय आणखी एक नियम आहे. तो हा कीं, ज्या संस्कृत शब्दांत विसर्ग आहे ते शब्द प्राकृत भाषेंत आले असतां त्या विसर्गाचा लोप होतो. परंतु विसर्गाचा नुसता लोप होऊन चालत नाही. लोप तर होतोच, पण अंत्य अथवा उपांत्य वर्णांत विकार होतो व केव्हां केव्हां काहीं अक्षरांच्या संबंधाने ठरलेल्या नियमाप्र-

---

१-**अंत्यव्यंजनस्य**-शब्दानां यदंत्यं व्यंजनं तस्य लुग् भवति; ह्मणजे शब्दांच्या अंतींच्या व्यंजनाचा लोप होतो. हा नियम प्राकृत भाषेचा आहे. ह्या नियमास अपवाद दिले आहेत तेः–(१) शब्दाच्या अंतीं म् अथवा न् आल्यास त्याऐवजीं अनुस्वार होतो. जसें-निरंतरम्=निरंतरं. (२) श्रत् व उत् ह्यांच्या अंतींच्या त्चा लोप होत नाही. जसेंः-श्रद्धा-सद्धा. (३) निर् व दुर् ह्यांतील र् चा विकल्पें लोप होतो. जसें–निस्सहम्= णिस्सहं, णीसहं; दुस्सहः = दुस्सहो, दूसहो (४) अंतर्, निर्, व दुर् ह्यांपुढें स्वर आला असतां र्चा लोप होत नाही. जसें– निरंतरम् = निरंतरं; दुरुत्तरम् = दुरुत्तरं; अंतरात्मा = अंतरप्पा. ज्या व्यंजनांचा लोप होतो त्यांऐवजीं आ, रा, हा, स वगैरे वर्णांपैकीं कोणता तरी वर्ण येतो. व्यंजनाचा लोप करावयाचा, व्यंजनान्त मूळ शब्द ठेवावयाचा नाही, असा प्राकृत भाषेचा मुख्य स्वभाव आहे व त्याप्रमाणें मराठीची व्यवस्था अगोदर होऊन चुकली आहे व ती सोईची आहे.

माणें बदल होतो. अशा प्रकारें विकृत शब्दांत पुनः बदल होऊन तो मराठींत बहुधा सोपा शब्द होऊन रूढ होतो. तेव्हां संस्कृत शब्द जशाचे तसेच ठेवावे, ह्या ह्मणण्यास आधारभूत नियम कोणता, हें समजत नाही. संस्कृत भाषेंतून प्राकृताच्या द्वारें जे शब्द मराठींत आले आहेत त्यांविषयीं किंवा जे शब्द कदाचित् परभारें रूढ झाले असावे असें वाटतें, त्यांविषयीं कशी व्यवस्था आहे ती पाहूं.

१. जे शब्द संस्कृतांतून प्राकृताच्या द्वारें मराठींत रूढ झाले आहेत, त्यांत विसर्ग जाऊन कसकसे विकार झाले आहेत, ते पुढील उदाहरणांवरून कळून येईल.

पुढील शब्दांत पहिला शब्द संस्कृत, दुसरा प्राकृत व तिसरा मराठी असे आहेत.

१ चतुर्थः, चउत्थो, चौथा.
२ चंद्रः, चंदो, चांद.
३ दुर्बलः, दुब्बलो, दुबळा.
४ पुष्यः, पुस्सो, पूस.
५ नग्नः, णग्गो, नंगा, नाग-डा.
६ प्रदीप्तः, पलित्तो, पालता.
७ प्रहरः, पहारो, पाहारा.
८ गर्दभः, गड्डहो, गाढव.
९ मत्स्यः, मच्छो, मासा.
१० मुद्गरः, मुग्गरो, मोगरा.
११ योग्यः, जोग्गो, जोगा.
१२ वर्णः, वण्णो, वाण.
१३ वत्सः, वच्छो, बच्चा.
१४ विश्रामः, विसामो विसावा.
१५ मनुष्यः, मणूसो, माणूस.
१६ बुद्बुदः, बुब्बुडो, बुडबुडा.
१७ व्रणः, वणो, वण.
१८ कच्छपः, कच्छवो, कासव.
१९ कुष्मांडः, कुह्मंडो, कोहळा.
२० आत्मीयः, अप्पुलो, आपला.
२१ आर्यः, अज्जो, आजा.
२२ क्लेशः, किलेसो, किळस.
२३ कुब्जः, खुज्जो, खुजा.
२४ तडागः, तलाओ, तलाव.
२५ स्कंदः, खंदो, खांदा.
२६ मर्कटः, मक्कडो, माकड.
२७ सर्पः, सप्पो, साप.
२८ हस्तः, हत्थो, हात.
२९ क्षारः, छारो, खार.
३० वृद्धः, वड्ढो, बुड्ढा.
३१ देवरः, दिअरो, दीर.
३२ धृष्टः, धिट्ठो, धीट.
३३ व्याघ्रः, वग्घो, वाघ.

वर जीं उदाहरणें दिलीं त्यांसारखीं आणखी पुष्कळ आहेत. जीं दिलीं आहेत त्यांवरून असें दिसून येईल कीं, संस्कृत शब्द अकारान्त असून, त्यापुढें विसर्ग असला, तर तो शब्द प्राकृतांत आला असतां विसर्गाचा ओ होतो. (अत ओत्सोः; वररूची परिच्छेद ५ सूत्र १ पाहा.) अंतींचा 'अ' पररूपसंधीने 'ओ'मध्यें लुप्त होतो; व मराठींत ह्या 'ओ'च्या ठिकाणीं 'अ' किंवा 'आ' होतो, असा सामान्य नियम सिद्ध होतो. तेव्हां मूळ संस्कृत शब्दांतील विसर्गयुक्त 'अ'चा 'ओ' होऊन त्याचा मराठींत 'अ' किंवा 'आ' असा आदेश होणें, हा मराठी भाषेच्या इतिहासावरून तिचा सामान्य स्वभाव दिसतो.

आतां जे मराठी शब्द परभारें संस्कृतांतून कदाचित् आले असावे असें दिसतें, त्यांविषयीं विचार करतां मूळ शब्दांतील विसर्गाचा लोप होऊन अंत्य अथवा उपांत्य वर्णांत बदल होतो, मूळचा शब्द जशाचा तसा राहात नाही, हें पुढील उदाहरणांवरून समजेल.

संस्कृत.	मराठी.	संस्कृत.	मराठी.
शिष्यः	शिष्या.	काणः	काणा.
तिलः	तीळ.	पुराणः	पुराणा.
स्वतः	स्वता.	पुनः	पुन्हा.
बालः	बाळा.	रामः	रामा.
कृष्णः	कृष्णा.	गोविंदः	गोविंदा.
उभयतः	उभयता.	मूकः	मुका.
वरः	बरा.	विरलः	विरळा.
दंतुरः	दांतरा.	दंतः	दांत.
नीलः	निळा.	नवः	नवा.

शशः	ससा.	वलंबः	वळंबा.
ऊनः	उणा.	हिंगुलः	हिंगूळ.
कंदः	कांदा.	एडकः	एडका.
कुसुंभः	कुसुंबा.	कालः	काळा.
गुग्गुलः	गुग्गूळ.	गलः	गळा.
घुटः	घोटा.	गौरः	गोरा.
झरः	झरा.	चणकः	चणा.
तोलः	तोळा.	टंगः	टांग.
		मालवः	माळवा (देश)

वरील उदाहरणांवरून पूर्वी सांगितलेल्या नियमास, ह्मणजे विसर्गाचा लोप होऊन अंत्य अथवा उपांत्य वर्णांत बदल होणे, तशाचा तसाच शब्द न राहणे, या सामान्य नियमास जास्त पुष्टीकरण मिळतें; शिवाय संस्कृत शब्दांतील 'ल'च्या ठिकाणीं 'ळ' हा वर्ण येणे, हें विशेष प्रचारांतील आहेसें दिसतें. असो. एवढ्यावरून वादग्रस्त मुद्याचें समाधानकारक समर्थन झालें, असें समजतां येणार नाही. कारण, काहीं ह्मणतील कीं, अकारान्त शब्दांपुढें विसर्ग आला असतां विसर्गाचा लोप होऊन मूळ शब्दांत बदल होत असेल, परंतु एवढ्यावरून इकारान्त व उकारान्त मूळच्या शब्दांपुढें विसर्ग आला असतां विसर्गाचा लोप होऊन अंत्य अथवा उपांत्य वर्णांत विकार झालाच पाहिजे, असें ह्मणतां येत नाही. ही शंका सयुक्तिक आहे, ह्मणून तिजविषयीं विचार करूं.

प्रथम इकारान्त शब्द घेऊं व नंतर उकारान्त शब्द घेऊं.

संस्कृत.	प्राकृत.	संस्कृत.	प्राकृत.
समृद्धिः	सामिद्धी, समिद्धी.	प्रसिद्धिः	पासिद्धी.
ऋद्धिः	इड्ढी, रिद्धी, रिड्ढी.	कृतिः	किई.

वृद्धिः	विद्दडी.	धृतिः	धिई.
ऋषिः	इसी.	वृत्तिः	वित्ती.
मौलिः	मउली.	कपिः	कई.
गृहपतिः	गहवई.	ध्वनिः	धुनी.
पदातिः	पाआई.	नीविः	णीवी.
भ्रुकुटिः	भिउडी.	वसतिः	वसही.
वृष्टिः	विट्टी.	गिरिः	गिरी.
गुरुः	गुरू.	बुद्धिः	बुद्धी.

मूळ इकारान्त संस्कृत शब्द व त्यांवरून मराठींत रूढ झालेले शब्द.

खानिः	खाण.	कुटिः	कुडी
पाल्लिः	पाल.	तिथिः	तीथ.
वर्तिः	वात.	राशिः	रास.
वाल्लिः (वेल्ली)	वेल.	वलिः	वळी.
वीटिः	विडी.	शुंठिः	सुंठ.
कुक्षिः (कुच्छी)	कूस.	अग्निः (अग्गी)	आग.
जातिः	जात.	भ्रान्तिः	भ्रांत.
रात्रिः (रात्ती)	रात्र, रात.	रीतिः	रीत.
गतिः	गत.	संगतिः	संगत.
अतिथिः	अतीत.	अंजालिः	ओंजळ.
पापर्द्धिः (पारद्धी)	पारध.	सप्ततिः (सत्तरी)	सत्तर.
ज्योतिः	ज्योत, जोत.	शुद्धिः	शुद्ध.
प्रतीतिः	प्रतीत.	पंक्तिः	पंगत.
वितस्तिः	वीत.	मुष्टिः	मूठ.
नीतिः	नेत, नीत, नीट.	विंशतिः (वीसा)	वीस.
संपत्तिः (संपत्ती)	संपत.	संततिः	संतत.
		दृष्टिः (दिट्ठी)	दृष्ट.

उकारान्त संस्कृत शब्द व त्यांवरून प्राकृतांत रूढ झालेले शब्द.

भृगुः	भिऊ.	कृशानुः	किसानू.
रिपुः	रिऊ.	स्नायुः	ण्हाऊ.
जन्हुः	जन्हू.	अभिमन्युः	अहिमणू.
ऋतुः	रिऊ, उऊ.	धेनुः	धेणू.

उकारान्त संस्कृत शब्द व त्यांवरून मराठींत रूढ झालेले शब्द.

तरक्षुः	तरस.	इक्षुः (उच्छू)	ऊस.
कंडुः	कंड	पंगुः	पांग.
कटुः	कडू.	गडुः	गडूं, गळू.
हिंगुः	हिंग.	तालुः	टाळू.
मृदुः	मऊ.	दयालुः (दआलू)	दयाळू.
सक्तुः	सातू.	ऋजुः (उज्जू, रिज्जू)	उजू.
वेणुः (वेळू)	वेळू.	साधुः (साहू)	शाहू.

वर जीं उदाहरणें दिलीं आहेत, त्यांवरून दिसून येईल कीं, शुद्ध संस्कृत शब्द अकारान्त असो, इकारान्त असो, किंवा उकारान्त असो, त्यापुढें विसर्ग आला असतां त्याचा लोप होतो इतकेंच नाही, तर अंत्य वर्णास विकार होतो व तो कधीं अ, कधीं आ, कधीं दीर्घ ई व केव्हां केव्हां दीर्घ ऊ. ही जी स्थिती सांगितली ती आमची ढवळाढवळ सुरू होईपर्यंत, ह्मणजे नवीन गद्यात्मक ग्रंथरचना सुरू होईपर्यंत असावी असें वाटतें. प्राकृत काळांत वरील स्वाभाविक व्यवस्था बहुतेक अंशीं अबाधित चालू होती. कविकालांत ऱ्हस्वदीर्घाकडे कवी फारसें लक्ष देत नसत. पद्यरचनेस त्यांस जसें सोईचें वाटलें, तसें ते करीत आले. बखरी वगैरेची लिपी मोडी असल्यामुळें ऱ्हस्व दीर्घाकडे लक्ष नसे. मराठी भाषेच्या स्वभावाविरुद्ध जी कृत्रिम व्यवस्था सुरू

झाली ती अलीकडील, ह्मणजे नवीन तऱ्हेने गद्यात्मक ग्रंथ लिहिण्याचा प्रघात पडला, तेव्हांपासून असावी असें दिसतें. मराठी बादशाहीच्या ऊर्जितकालास सुरवात झाली, तेव्हां संस्कृताकडे विशेष लक्ष पोचविण्यांत आलें. सरकार, शास्त्री, पंडित, कवी, हरदास, पुराणीक ह्या सर्वांनी संस्कृत भाषेस उचलून धरल्यामुळें संस्कृत भाषेंतील शब्द विशेष प्रचारांत येऊं लागले, व त्यांविषयींची आवड विशेष वाढली. मराठी भाषेच्या धोरणाविषयीं व सामान्य लोकांच्या अडचणींविषयीं तादृश विचार न होऊन संस्कृताकडे जो ओढा होता, तोच बलवत्तर झाला. अर्थातच अलीकडील गद्यात्मक ग्रंथरचना सुरू झाली, तेव्हां संस्कृत शब्द जशाचे तसे लिहिण्याची विद्वानांची प्रवृत्ती झाली; व मराठी भाषेचें स्वाभाविक धोरण लक्षांत न ठेवतां संस्कृत शब्द पूर्वीच्या रूढीविरुद्ध जशाचे तसे लिहिण्याचा प्रघात सुरू झाला. नाही ह्मणतां, त्यांपैकीं एका विद्वान व मार्मिक गृहस्थाचें लक्ष ह्या विषयाकडे गेलें. ते विद्वान गृहस्थ कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर होत. हे संस्कृताचे कमी अभिमानी होते असें नाही. संस्कृत व मराठी ह्या दोन भाषांत त्यांचें प्राविण्य किती होतें व मराठी भाषेच्या इसिहासाचें परिशीलन त्यांनी कसें केलें होतें, हें सर्वांस महशूर आहे. तेव्हां असल्या गृहस्थाचें मत किती विचार करण्यासारखें आहे, हें सांगावयास नको. कै. शास्त्रीबुवा हे माजी शालापत्रकाचे संपादक होते हें सर्वांस माहीत आहे, व व्याकरण विषयावरील त्यांचे मार्मिक निबंध पुष्कळांच्या वाचण्यांत आलेअसतील. ह्या निबंधांपैकीं सहावे निबंधांत प्रकृत विषयाविषयीं पुढें दिल्याप्रमाणें त्यांचें मत दिसून येतें.

" प्रातिपदिकें अकारांत, आकारांत, इकारांत, उकारांत व ओकारांत अशीं पांच प्रकारचीं आहेत. आतां इकारांत व उकारांत प्रातिपदिकांचे प्रत्येकीं ऱ्हस्व व दीर्घ या भेदेंकरून दोन दोन वर्ग करितात; व कवि, मति, बुद्धि इत्यादि शब्द ऱ्हस्व इकारांत; हत्ती, माळी, स्त्री, घोडी इत्यादि दीर्घ इकारांत; भानु, सेतु, वायु, धेनु इत्यादि ऱ्हस्व उकारांत, असा भेद करितात. परंतु आह्मांस वाटतें कीं, हा वरील भेद संस्कृत भाषेंत आहे; मराठींत असा भेद करण्यास सबळ आधार नाहीं. मराठी भाषेच्या स्वभावाप्रमाणें पाहतां असें दिसतें कीं, तींत शब्दाच्या शेवटीं इकार किंवा उकार आला असतां त्याचा उच्चार दीर्घच होतो. आतां वायु, रवि, कवि, धेनु, गति, मति इत्यादि शब्द संस्कृतांत ऱ्हस्व स्वरांत आहेत खरे, तथापि ते प्राकृतांत आले असतां त्यांच्या अंत्यस्वराचा उच्चार बोलण्यांत दीर्घ होतो, हें सर्वानुभवसिद्ध आहे; व ते उच्चाराप्रमाणेंच दीर्घ स्वरांत समजावे व लिहावे असें आह्मांस प्रशस्त वाटतें. हें आमचें ह्मणणें कोणास मान्य न होऊन त्यांनीं संस्कृतांतल्याप्रमाणें ऱ्हस्व स्वरांतच ते मानण्याचा व लिहिण्याचा प्रघात ठेविला, तर त्यांत मोठी चिंता आहे असें नाहीं. तथापि ती रीत मराठी भाषेच्या स्वभावास अनुसरून नाहीं अशी आमची समजूत आहे; व तीप्रमाणें अंत्यवर्णाच्या संबंधानें आह्मीं प्रातिपदिकांचे पांच वर्ग कल्पिले आहेत. "

आतां वरील मतावरून हें स्पष्ट दिसतें कीं अंतींचे इ, उ दीर्घ करण्याची मराठीची प्रवृत्ती असतां कवि, भानु, वगैरे कित्येक संस्कृत शब्द ऱ्हस्व लिहितात; पण असा

भेद करण्यास शास्त्रीबुवासारख्या संस्कृतज्ञ व प्राकृतज्ञ शोधक पुरुषास सबळ आधार सांपडला नाही; शब्दांच्या शेवटीं इकार किंवा उकार आला असतां त्यांचा उच्चार दीर्घच होतो, मग ते शब्द शुद्ध संस्कृत असोत किंवा मराठी असोत. ते उच्चाराप्रमाणें दीर्घस्वरान्त समजावे इतकेंच नाही, तर ते दीर्घच लिहिणे प्रशस्त आहे, असें शास्त्रीबुवांचें स्पष्ट मत आहे. आतां त्यांनी सोडवणूक जी ठेवली आहे, ती केवळ त्या वेळच्या विद्वानांच्या मतास मान देण्याकरतां किंवा मुरवतीकरतां असावी, असें उघड दिसतें. अंतींचे इ ई, उ ऊ असा भेद संस्कृत भाषेस लागू आहे; परंतु असा भेद करणे, हें मराठीच्या स्वभावाच्या विरुद्ध आहे, व तो न करावा हें उत्तम, असें शास्त्रीबुवांचें ह्मणणे आहे.

इतका वेळ जो विचार केला तो एकीकडे ठेवून निराळ्या दृष्टीने ह्याविषयीं आणखी विचार करणे अगत्याचें दिसतें.

शुद्ध संस्कृत शब्द मराठींत लिहिणे झाल्यास ते मूळचे जशाचे तसेच लिहावे, असें काहीं लोकांच्या सांगण्यांत येतें; परंतु मूळचे मराठी शब्द ह्मणजे काय, ह्याची स्पष्ट रितीने व्याख्या केलेली दृष्टीस पडली नाही, ह्मणून आमच्या विद्वान मित्रांपाशीं ह्या गोष्टीचा तपास केला, परंतु त्यांच्या सांगण्यावरून सदरील व्याख्येच्या संबंधाने एकवाक्यता दिसून आली नाही. तथापि, मूळ शब्द ह्मणजे प्रातिपदिक असावें असें अनुमान होतें. “ अर्थवदधातुरप्रत्ययः ” अशी प्रातिपदिकाची व्याख्या आहे. मूळ शब्द ह्मणजे प्रातिपदिक, असें मानावयाचें आहे, तर क्रियापदांचा विचार

करावयाचा नाही हें उघड आहे. संस्कृत भाषेच्या नियमाप्रमाणें अव्ययांस प्रत्यय लावण्याचा व लागलीच त्यांचा लोप करण्याचा विधी एका कालीं होत असल्यामुळें तींही वगळावयाचीं असें दिसतें. बाकी राहिलीं नामें, सर्वनामें व विशेषणें. ह्यांपैकीं सर्वनामांस प्रत्यय लागतात, परंतु तीं मराठींत अपभ्रंश होऊन प्रायः आलीं असल्यामुळें तीं शुद्ध नाहीत. तेव्हां त्यांविषयीं येथें विचार कर्तव्य नाही. ह्या हकीकतीवरून मूळ संस्कृत शब्दांविषयींचा विचार, ह्मणजे जीं संस्कृत नामें अथवा विशेषणें मराठींत रूढ झालीं आहेत, त्यांविषयींचा मुख्यत्वें विचार होय. आतां ही गोष्ट येथें सांगणे जरूर दिसतें कीं, अकारान्त, आकारान्त, ईकारान्त व ऊकारान्त नामें ह्यांविषयीं प्रस्तुत ह्मणण्यासारखा वाद नाही. बाकी राहिलीं व्यंजनान्त व इकारान्त अथवा उकारान्त नामें व विशेषणें, ज्यांच्यापुढें विसर्ग असतो, तीं कशीं लिहावयाचीं याविषयीं मुख्यत्वें वाद आहे. तथापि, एकंदर स्थिती कशी आहे, हें समजलें असतां बराच उपयोग होईल असें वाटल्यावरून अकारान्त, आकारान्त वगैरे शब्दांबद्दलही विचार करूं.

संस्कृत मूळ शब्द, प्रथमेचें एकवचनी रूप व मराठींतील प्रस्तुतचें रूप.

राम, रामः, रामा.
मारुति, मारुतिः, मारुती, मारुति.
भ्रांति, भ्रांतिः, भ्रांत, भ्रांति.
रीति, रीतिः, रीत, रीति.

हरि, हरिः, हरी, हरि.
बंधु, बंधुः, बंधू, बंधू.
शतायुस्, शतायुः, शतायु.
वपुस्, वपुः, वपु.
दुर्वासस्, दुर्वासः, दुर्वास.

विद्वस्, विद्वान्, विद्वान, विद्वान्.
श्रीमत्, श्रीमान्, श्रीमंत, श्रीमान, श्रीमान्.
यशस्, यशः, यश.
पक्षिन्, पक्षी, पक्षी.
आत्मन, आत्मा, आत्मा.
कर्तृ, कर्ता, कर्ता.
ज्ञान, ज्ञानम्, ज्ञान.
ऋत्विज्, ऋत्विक्, ऋत्विज.
कर्मन्, कर्म, कर्म.

वर जे शब्द दिले आहेत त्यांवरून असें दिसून येईल कीं, शुद्ध संस्कृत शब्द जशाचे तसे लिहावे, हें ह्मणणे एक कोडेंच आहे. ह्याची निश्चित व्याख्या न समजल्यामुळें हें कोडें उकलण्यास पंचाईत पडते. प्रातिपदिक मूळ शब्द धरून चालावें, तर काहीं ठिकाणीं प्रथमेचें एकवचनी रूप प्रचारांत दिसतें; प्रथमेचें एकवचनी रूप घेऊन चालावें, तर काहीं ठिकाणीं प्रातिपादिक रूप प्रचारांत दिसतें; काहीं ठिकाणीं दोन्हींही रूपें उपयोगांत नसून तिसरेंच रूप लिहिण्याचा प्रघात आढळतो. तात्पर्य सांगावयाचें तें हें कीं, मूळ संस्कृत शब्द जशाचा तसा लिहावा, हें ह्मणणे फारच मोघम असून त्याच्या संबंधानें एक ठरीव नियम असावा असें दिसत नाहीं. ह्या बाबतींत नियम असल्यास निरनिराळ्या प्रकारच्या शब्दांच्या संबंधानें निरनिराळे नियम असावे. एकंदरींने विचार करतां हल्लींची व्यवस्था काहीं अंशीं परंपरेने चालत आलेली आहे असें दिसतें.

सांप्रत अशी स्थिती दृष्टीस पडते कीं, संस्कृत शब्दांच्या ऱ्हस्वदीर्घापुरतीच आमची विशेष काळजी दिसते. इतर भाषांतील शब्दांच्या ऱ्हस्वदीर्घाबद्दल तितकी दिसत नाहीं, इतकेंच नाहीं, तर त्याबद्दल उलट औदासीन्य दिसून येतें. इतर भाषांतील शब्दांचा उच्चार, व्युत्पत्ती वगैरे समजण्यास पूर्वी सोय नसेल; पण हल्लीं सर्व गोष्टींची सोय असून जर त्या बाबतींत आमची उदासीनता

दिसत आहे, तर आमच्याकडे दुराग्रहाचा किंवा पक्षपाताचा दोष येऊं पाहतो किंवा नाहीं, हीं विचार करण्यासारखी गोष्ट आहे. असो. प्रथम अंतींच्या इ, उ ह्यांविषयीं विचार करून नंतर उपांत्य व इतर ठिकाणचे इ, उ ह्यांविषयीं विचार करूं.

अंतींचे इ, उ.

(१) जे शब्द मराठींत रूढ झाले आहेत अथवा होतील त्यांच्या अंतींचे इ, उ दीर्घ लिहावे. जसें:-

माती, आणखी, दिवली, वेळू, खडू, चाकू इ०.

अपवाद १-मराठींत रूढ झालेले अथवा होणारे शुद्ध संस्कृत शब्द किंवा इतर भाषांतून आलेले अथवा येणारे शुद्ध शब्द ऱ्हस्व इकारान्त अथवा उकारान्त असतील, तर ते विकल्पें ऱ्हस्व अथवा दीर्घ लिहावे. जसे:-कवि, कवी, बिंदु, बिंदू.

अपवाद २-थोडीं अव्ययें व अनुकरणवाचक शब्द.

अव्ययें:-आणि, परंतु, हुं, निशिदिनि, अद्यापि, तथापि, यथामति, यथाविधि, यथाशक्ति, आसमाप्ति, अद्यप्रभृति, यद्यपि, पुनरपि, अति, इति, कदापि, किमपि, कुत्रापि, तदपि, नेति, यथातृप्ति, यथानुशक्ति, यथापद्धति, यथाप्रति, यथारीति, यदि, यर्हि, यथाबुद्धि, त्राहि त्राहि भगवन्, शापादपि शरादपि, संप्रति. (मराठी कवितेंत):-झटिति, जेविं, तेविं, जेथोनि, कोठोनि, वरूनि.

अनुकरणवाचक शब्दः—लुटुमुटु, लुटुपुटु, लुटुलुटु, रुटुरुटु, तुरुतुरु, रुटुखुटु, पुटुपुटु. टुरुटुरु, पुरुपुरु, हुतुतु, झुळुझुळु, मुळुमुळु, चुरुचुरु इ०.

टीप—'ही' (अव्यय) हें रूप ऱ्हस्व असावें किंवा दीर्घ असावें, ह्याचा निर्णय करण्यास व्युत्पत्तीवरून सबळ आधार नाही. अपि ह्यांतील अ जाऊन 'पि' चे 'भि' व नंतर हि असें रूप झालें आहे, असें काहींचें म्हणणे आहे, तें कितपत सयुक्तिक आहे ह्याचा निर्णय करतां येत नाही. 'ही' हें रूप ऱ्हस्व व दीर्घ लिहिण्याचा प्रचार आढळून येतो; परंतु उच्चार दीर्घ होत असल्यामुळें व विशेषतः प्रचारही दीर्घ लिहिण्याचा असल्यामुळें 'ही' हें रूप दीर्घ लिहावें.

आतां शुद्ध संस्कृत शब्दांच्या बाबतींत विकल्प ठेवण्याचीं कारणें अशीं कीं, नवीन गद्यात्मक लेखनपद्धती सुरू झाल्यापासून ऱ्हस्व इकारान्त व उकारान्त शुद्ध संस्कृत शब्द प्रायः ऱ्हस्व लिहिण्याचा प्रघात पडला आहे; मूळ शब्द जशाचा तसाच ठेवण्याकडे विद्वानांची विशेष प्रवृत्ती दिसून येते; संस्कृत मूळ शब्दांस होतां होईल तो धक्का लावूं नये असें त्यांचें म्हणणे आहे; आजपर्यंत ऱ्हस्व इकारान्त व उकारान्त मूळ शब्द असाच वापरण्याचा साधारण प्रघात पडल्यामुळें त्याऐवजीं नुसता दीर्घ शब्द वापरणे, म्हणजे अडाणीपणांत शिरणे, असें त्यांपैकीं काहींस वाटतें; संस्कृत शिकणारांस हल्लींच्या व्यवस्थेपासून सोय होते, अशीं कारणें व संस्कृत ही मराठी भाषेची जननी असून तींत धर्मविषयक ग्रंथ आहेत व संस्कृत शब्दांच्या रचनेंत बिघाड करण्याचा

कोणास अधिकार नाही, अशींही कारणें पुढें करण्यांत येतात. ह्यांपैकीं मराठी भाषेची लेखनपद्धती ठरवितांना धर्मप्रकरणाची बाब अथवा अधिकाराची बाब कितपत सयुक्तिक आहे, ह्याविषयीं विचार करण्यास नको. जीं तत्त्वें मागें सांगितलीं आहेत त्यांविषयीं विचार करतां हल्लीं काहीं शुद्ध संस्कृत शब्द रूढ झाले आहेत ते ऱ्हस्व लिहिण्यास संस्कृत व्युत्पत्तीचा व लेखनपद्धतीचा आधार आहे, म्हणून जे ऱ्हस्व इकारान्त अथवा उकारान्त शुद्ध संस्कृत शब्द प्रचारांत आहेत व पुढें येतील ते तसेच लिहिण्याविषयीं सवड असणे इष्ट आहे.

उलट पक्षीं ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, असे शुद्ध संस्कृत शब्द जशाचे तसेच ठेवावे अशाविषयीं अलीकडील लेखनपद्धतीशिवाय दुसरा सबळ आधार नाही. मूळ शुद्ध संस्कृत शब्द जशाचे तसे ठेवावे असें म्हणणे आहे, पण हें फार मोघम आहे. मराठींत व्यंजनान्त शब्द नाहीत, त्याचप्रमाणें ऱ्हस्व इकारान्त अथवा उकारान्त शब्द थोड्या अनुकरणवाचक शब्दांशिवाय मुळींच नाहीत, असें म्हटलें असतां चालेल. ऱ्हस्व इकारान्त अथवा उकारान्त शब्द कधीं कधीं लिहिण्यांत येतात, परंतु ते प्रायः संस्कृत असतात. इतर भाषांतून जरी ऱ्हस्व इकारान्त अथवा उकारान्त शब्द आले, तरी ते दीर्घच लिहावे, असें कृष्णशास्त्री गडबोले वगैरे व्याकरणकारांचें ह्मणणे आहे व त्याप्रमाणें आजपर्यंत व्यवस्था चालू आहे. विद्वान, भगवान वगैरे व्यंजनान्त शब्द असतील, तर अकारान्त करावयाचे व हा प्रघात काहीं विद्वान ग्रंथकारांचाही दृष्टीस पड-

तो. संस्कृत भाषेंतील व इतर भाषांतील शुद्ध शब्द कठीण वाटल्यास अथवा मराठीच्या सामान्य धोरणास विलग वाटल्यास ते शब्द जशाचे तसेच न ठेवतां सोईला पडतील त्याप्रमाणें ते सोपे करून रूढ होऊं देणे, असा मराठी भाषेचा सामान्य स्वभाव आहे, व ह्याप्रमाणें हजारो शब्दांची कित्येक वर्षांपासून व्यवस्था लागत आहे, व तिजसंबंधाने संस्कृत शिकण्याच्या सोईचा अथवा संस्कृत शब्दांच्या आंतररचनेस धक्का लावण्याचा अधिकार नाही वगैरे प्रश्न कोणी काढला नाही; जशी सोय वाटली तशी व्यवस्था करण्यांत आली व ती आजमित्तीस बरीच पसंत पडली आहे इतकेंच नाही, तर जे शब्द अपभ्रंश होऊन रूढ झाले आहेत ते भाषेचे जीवित होत, असें समजण्यांत येत आहे. संस्कृत शब्दांच्या अंत्यवर्णापुढें विसर्ग असल्यास त्याचा लोप[३] करावयाचा इतकेंच नाही, तर अंत्य स्वरास अ, आ, ई अथवा ऊ असा विकार करावयाचा; ऱ्हस्व इ, उ प्रायः ठेवावयाचा नाही. ही व्यवस्था प्राकृत कालापासून नवीन लेखनपद्धती सुरू होईपर्यंत होती. मात्र कवितेंत

१–संस्थापन–सण्ठावण–सांठवणे; पिष्टम्–पिट्ठं–पीठ; प्रावृष्-पाउसो-पाऊस; जामातृकः-जामाउओ-जावई; योग्यः-जोग्गो-जोगा; चौर्यम्, चोरिअं-चोरी; पर्यस्त-पल्हथ-पालथा; उदुम्बर, उंबर, उंबर.

२–तुर्रः-तुरा; हुज्जत्-हुजत; अफ़्वः-अफवा; मशहूर्- महशूर; फारिखत्ति-फारकत; File-फैल; Hospital, इसपितळ; Office-हपीस; Troop-तुरूप.

३–मनुष्यः-मणूसो-माणूस; ऋजुः-उज्जू, उजू; बधिरः-बाहिरो-बाहिरा; इक्षुः-उच्छू ऊस; आर्यः-अज्जो-आजा; पापर्द्धिः, पारद्धी-पारधी; मयूर-मोरो-मोर; यष्टिः-लट्ठी-लाटी; वेणुः-वेलू वेळू; रश्मिः-रस्सी-रशी; कुक्षिः-कुच्छी-कूस.

शुद्ध संस्कृत शब्द ऱ्हस्व व दीर्घ असे लिहिण्याचा प्रघात असे. एकच संस्कृत शब्द ऱ्हस्व व दीर्घ लिहिण्याचा प्रघात फक्त तुकारामासारखे मराठी जाणणारांचा होता, असें नसून वामन व मोरोपंत ह्यांचाही होता व तो त्यांच्या उत्तम मानलेल्या काव्यांतही होता, असें समजून येतें. तो फक्त चरणाच्या शेवटीं होता, असें नसून वाटेल तेथें होता, अशाविषयीं कित्येक उदाहरणें आहेत. ह्यामुळें अडाणीपणाची प्रवृत्ती झाल्याचा, अथवा व्युत्पत्ती कळण्याची अथवा संस्कृत शिकण्याची कमी सोय झाल्याचा बोभाटा आजपर्यंत नाही.

---

१ ॥ तुझ्या बहुत शोधिले अघ-निधी पदाच्या रजें ॥
(मो. केका)
॥ स्तवार्थ तुझिया तुझ्या सम कवी कधीं जन्मती ॥
(मो. केका)
॥ प्रकूप-खनका कसा जल-निधी नवा खाणवे ॥
(मो. अंबरीषाख्यान)
॥ ऐसे स्त्रीचे प्रिय हित भाषण ऐकुनि मुनी सुखावे ॥
(मो. सुदामचरित्र)
नको रे मना द्रव्य तें पूढिलांचें ॥ अतिस्वार्थबुद्धी नको पाप सांचे
(राम. मनाचे श्लोक)
॥ विद्या पूज्य नृपास हा नरपशू तीवेगळा तत्त्वतां ॥
(वामन-स्फुट श्लोक)
॥ कीं जो गुरू अंतर रामपायीं ॥ पाडी, त्यजावा गुरु तो उपायीं॥
(वाम. भरत भाव)
॥ झाली बहू बुद्धि अधीर-वाणी॥ तों बोलली हो अशरीर-वाणी॥
(वाम. नृसिंव्हावतार)
॥ कवळिति निजबंधू बाष्पबिंदू गळाले ॥
((रघु. नळदम)
॥ नको चिंता तूं करूं अरिध्वंसा॥ ऐक शुभ्रांशू-वंशजावतंसा॥
(रघु. नळदम)

ऱ्हस्वदीर्घाच्या बाबतींतील सक्तीचा नियम प्रास वगैरे कारणांसाठीं कवींस पाळतां येत नाही, ह्मणून त्यांस सवड ठेवावयाची आहे, तर प्रचारांत येणारे शुद्ध संस्कृत शब्द शतशः आहेत, त्यांपैकीं अमूक ऱ्हस्व असावयाचे व अमूक दीर्घ असावयाचे, अशाविषयीं काहीं ठरीव नियम नाहींत, ह्यामुळें कोणता ऱ्हस्व व कोणता दीर्घ समजावा, हें कळण्यास पाठांतराशिवाय किंवा फार दिवसांच्या सवईशिवाय दुसरें साधन नसल्यामुळें विद्यार्थ्यांचा व इतर सामान्य लोकांचा घोटाळा होतो, ह्मणून त्यांसही वरील सवड कां ठेवूं नये ?

मूळ संस्कृत शब्द ह्मणजे काय, ह्याची व्याख्या बरोबर झाली नाही. ह्या बाबतींत जशी व्हावी तशी समाधानकारक ठरीव व्यवस्था झाली नसून कधीं प्रातिपदिक रूप, कधीं प्रथमेचें रूप, कधीं निराळेंच रूप घेण्याचा संप्रदाय दिसतो व तोच परंपरेने अलीकडे चालू आहे. विभक्तिप्रत्यय लावतांना अथवा इतर प्रत्यय लावतांना, त्याचप्रमाणें वर, खालीं वगैरे शब्दयोगी अव्ययें लावण्यापूर्वीं अंतींचे इ, उ दीर्घ करण्याची वहिवाट आहे; व ही शुद्ध संस्कृत शब्दांसही लागू केल्यामुळें काहीं अडाणीपणा झाला नाही, तर प्रथमेचें रूप उच्चाराप्रमाणें दीर्घ लिहिण्याने कसा होतो हें समजत नाहीं.

हल्लींची ऱ्हस्वदीर्घाची व्यवस्था फक्त प्रथमेच्या रूपापुरती आहे. पण रुचि, कवि, भानु वगैरे स्त्रीलिंगी व पुलिंगी जीं नामें इकारान्त व उकारान्त आहेत त्यांची, किंवा यश, पय वगैरे नपुंसकलिंगी नामें त्यांचीं प्रथमेचीं रूपें मळांत रुचिः, कविः, भानुः, यशः, पयः, अशीं अनुक्रमें असून

तींच मराठींत प्रथमेचीं रूपें ठेवलीं नाहीत; मराठीच्या स्वभावास अनुसरून त्यांतील विसर्ग झुगारून दिला आहे, तर मराठीच्या स्वभावास अनुसरूनच अंतींचे इ, उ दीर्घ लिहिणे अवश्य आहे. परंपरा पाहावयाची आहे, तर इ, उ दीर्घ केले पाहिजेत. विसर्गासह प्रथमेचीं एकवचनी रूपें रुचिः, कविः, भानुः अशीं ठेवावयाचीं आहेत, तर मग वाद नाही. परंतु विसर्ग वगळावयाचा, तर तो कोणत्या नियमाप्रमाणें वगळावयाचा, तो वगळला असतां भाषाशास्त्राच्या नियमाप्रमाणें अंत्य वर्णास काहीं विकार होतो किंवा कसें, विसर्गाच्या योगाने अंत्य वर्णास गुरुत्व येतें त्यास कारणाशिवाय एकदम लघुत्व कसें आणावयाचें वगैरे कारणांचा विचार करणे अवश्य आहे; परंतु सोईसाठीं हें सर्व एकीकडे ठेवलेलें दिसतें. बार + ह = बारा, तेर + ह = तेरा, चउद्द + ह = चउदा अशीं रूपें होतात; त्याप्रमाणें त्याच नियमास अनुसरून रुचि + हि = रुची, कवि + हि = कवी, भानु + हु = भानू अशीं रूपें झालीं पाहिजेत. विसर्गाचा हकारासारखा उच्चार होतो हें येथें सांगण्याचें कारण नाही. मराठी भाषा ही संस्कृत-मराठी करावयाची नसून तिचें विशिष्टत्व कायम ठेवणे आहे, तर त्या भाषेचे नियम, तिचा स्वभाव, ती बोलणारांची व लिहिणारांची सोय पाहणे ही मुख्य गोष्ट, इतर किरकोळ गोष्टी पाहात बसणे गौण आहे.

कोणत्याही भाषेंतून मराठींत शब्द आला, तरी तो रूढ झाला म्हणजे तो आमचाच झाला (तो कसा रूढ झाला ह्याबद्दल इतिहास खुशाल पाहावा), मग त्या बाबतींत पंक्तिप्रपंच करणे योग्य नाही. आमच्या भाषेंत त्याची कायमची वस्ती झाली, म्हणजे तो इतर शब्दांपैकींच एक ब-

नला, असें समजावें व इतरांस जे नियम लागू तेच त्यास लागू करणे योग्य आहे. हें करणे हा प्रत्येक भाषेचा हक्क आहे व इंग्रजी वगैरे कोणतीही भाषा घेतली, तरी ह्या हक्काची बजावणी सामान्यत्वें करण्यांत आली आहे. अमूक शब्द ल्याटिन किंवा ग्रीक भाषेंतील शुद्ध शब्द, एवढ्याच कारणावरून ते जशाचे तसेच ठेवलेले दिसून येत नाहीत, इतकेंच नाही, तर त्यांसंबंधाने सोईस पडेल तशी व्यवस्था करण्यांत आली आहे. फार लांब जाणे नको. जे वेद आह्मी पवित्र मानीत आलो आहो त्यांतील शब्दांतसुद्धां वाटेल तसा फेरफार करण्यास आह्मी मागें पुढें पाहिलें नाही. उदाहरणार्थः—शृधि, कृधि, वृधि, या सुरथा, शक्ती, मध्वा, शिश्वे, पश्वः, मध्वः, कल्याणीः, कथा, सध, भरामसि, पीत्वी, गत्वी, गत्वाय, गन्तवे, पताति, जीवाति, हीं रूपें झुगारून देऊन त्यांबद्दल शृणु, कुरु, वृणु, यौ सुरथौ, शक्त्या, मधुना, शिशवे, पशोः, मधुना, कल्याणी, कथम्, सह, भरामः, पीत्वा, गत्वा, गत्वा, गन्तुम्, पततु, जीवतु हीं रूपें आतां वापरूं लागलो आहो. ज्या हक्कावरून वेदभाषेंत बदल करण्याचा आह्मांस पूर्वी अधिकार प्राप्त झाला त्याच हक्कावरून मराठींत येणाऱ्या संस्कृत शब्दांत फेरफार करण्याचा आपणांस सांप्रत अधिकार आहे, हें निराळें सांगण्याचें कारण नाही. ह्या सर्व गोष्टींचा विचार केला तर, व फारसी वगैरे भाषांतून आलेल्या शब्दांस जर अंतींच्या दीर्घाचा नियम

१–वैद्यकग्रंथांत मात्र बरेच पारिभाषिक शब्द जशाच्या तसेच ठेवण्यांत आले आहेत. अशा प्रकारें पारिभाषिक शब्द जशाचे तसे ठेवणे एक वेळ योग्य आहे, पण त्यांच्या अंतींचे इ, उ विकल्पें ऱ्हस्व दीर्घ लिहिल्याने बाध येत नाही.

लागू करण्यांत आला आहे, तर तो संस्कृत शब्दांसही लागू करणे जरूर आहे. आमची विशेष सोय कशांत आहे, हें आम्ही आपल्या भाषेच्या स्थितीवरून पाहिलें पाहिजे; व खुद्द संस्कृत भाषेंतही असेंच केलेलें आहे. संस्कृत भाषेंत जे हजारो शब्द आहेत तेवढे मूळचे संस्कृत आहेत असें म्हणतां येत नाही. कांहीं येथील मूळच्या लोकांच्या विशेष संघट्टनाने त्यांच्या भाषेंतून आले असले पाहिजेत. ह्या शब्दांस विसर्ग वगैरे संस्कृत पोषाक देऊन ते संस्कृताचे धोरण राखण्यासाठीं बनविलेले आहेत, तर संस्कृत शब्दांसही हाच नियम लागू करणे कां योग्य नाही हें समजत नाही.

रवि, कवि वगैरे शब्द समासांत पूर्व अवयव असतांना दीर्घ ठेवावयाचे की काय, अशी काहींची शंका आहे. या शंकेवर आमचें ह्मणणे असें आहे कीं, ते दीर्घ ठेवावयाचे नाहीत, ऱ्हस्व करावयाचे. गुणी, धनी वगैरे दीर्घ ईकारान्त

१—Dr. Stevenson says in the journal of the B. B. R. A. S. for January 1859 :—The Bramins scattered through all the different provinces of Hindustan no doubt adopted many of the words of the languages of the tribes among whom they resided, and introduced them into the Sacred tongue. Dr. H. Gundert in his paper "The Dravidian elements in Sanscrit" remarks :—It was to be expected *à priori* that a number of Dravidian words must have found their way into Sanscrit-ज्या ज्या ठिकाणीं भिन्न भिन्न भाषा बोलणारांचें नेहमीं फार दळणवळण असतें त्या त्या ठिकाणीं परस्परांनी परस्परांचे थोडे फार शब्द घेणें स्वाभाविकच आहे. आह्मी एकही शब्द दुसऱ्याचा घेतला नाही हें ह्मणणे वेडेपणाची फुशारकी होय. ज्योतिःशास्त्राच्या संबंधानें काहीं शब्द आह्मी 'यवनां' पासून घेतले आहेत, ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. उ० तावुरि, आकोकेर, होरा, द्रेष्काण, रिफ़, सुनफा, अनफा, हिबुक, आस्फुजित् इ०.

शब्द समासांत असतांना जर ऱ्हस्व करतात, तर रवि, कवि वगैरे शब्दही दीर्घ असून ऱ्हस्व करण्यास हरकत कोणती? शिवाय अंत्य व उपांत्य अक्षरें खेरीज करून इतर ठिकाणचे इ, उ ऱ्हस्व लिहावयाचे, असा नियम सुचविला आहेच. ह्याकरतां वरील शंकेचें कारण राहात नाही. इतर ठिकाणीं असूनही इ, उ दीर्घ असतात, अशीं अपवादक उदाहरणें पुढें दिलेलीं आहेतच (परिशिष्ट ७ पाहा). उपांत्य स्थळीं इ, उ असतां ते ऱ्हस्व असावयाचेच (उपांत्याविषयीं नियम पाहा). दुसरा असा आक्षेप घेण्यांत येत आहे कीं, रुचि, मति, शुद्धि, कृति वगैरे शब्द दीर्घ ईकारान्त केले, तर त्यांचीं अनेकवचनी रूपें रुच्या, कृत्या, मत्या वगैरे करावयाचीं की काय? ह्यासंबंधाने इतकें सांगणे पुरें आहे कीं, सती, नारी देवी, साध्वी वगैरे कित्येक शब्दांचीं अनेकवचनी रूपें जशीं होतात तशीं ह्यांचीं होतील.

काहीं मित्रांचें आणखी असें म्हणणे आहे कीं, संस्कृत ही मराठीची जननी आहे, तींत धर्मविषयक ग्रंथ आहेत, ती पूर्वजांची भाषा आहे, ती पवित्र भाषा आहे, तिचे मराठीवर फार उपकार झालेले आहेत व होणारे आहेत, ती समजणारे व बोलणारे पुष्कळ आहेत, तींतील शुद्ध रूपें समजण्यास मार्ग आहे, सबब तीस यत्किंचित् धक्का लावूं नये व असा धक्का लावण्याचा कोणास अधिकार नाही, व तिची व इतर भाषांची तुलना करणे योग्य नाही. आतां संस्कृत भाषा प्रत्यक्ष जननी आहे किंवा प्राकृत भाषा प्रत्यक्ष जननी आहे, संस्कृतापासून जसा मराठीस उपयोग झाला तसा प्राकृतापासूनही झाला किंवा नाही, झाला असल्यास प्रमाण किती, फारसी

वगैरे परकीय भाषांपासूनही मराठीस काहीं फायदा झाला आहे किंवा नाही, पूर्वी संस्कृत भाषाभिज्ञांनी प्राकृत भाषेचा बोज कितपत ठेवला व तिची सेवा किती केली वगैरे वादग्रस्त गोष्टींचा विचार करण्याचें येथें कारण नाही. मराठी भाषेविषयीं विचार करतांना संस्कृत भाषेस मान देणे योग्य आहे, हें कोणास नाकबूल असेल असें वाटत नाही, परंतु हा मान किती द्यावयाचा हा प्रश्न आहे. जे संस्कृत शब्द मराठी बनले नाहीत त्यांच्या अंतींचे इ, उ जशाचे तसेच वापरण्याविषयीं प्रत्येकास पूर्ण मोकळीक आहे, इतकेंच नाही, तर थोडे अपवादक शब्दांशिवाय बाकीचे शब्दांतील उपांत्य इ, ई, उ, ऊ संस्कृत नियमाप्रमाणेंच ठेवले पाहिजेत व इतर ठिकाणचे म्हणजे अंत्य व उपांत्य ह्यांखेरीज इतर ठिकाणचे इ, ई, उ, ऊ ह्यांसंबंधाने विशेष अपवादही न ठेवतां ते शब्द जशाचे तसेच ठेवण्याविषयीं सक्त नियम असतां संस्कृताच्या बाबतींत आणखी मान तो काय ठेवावयाचा? विद्वानांची आवडनिवड व सोय मात्र पाहावयाची आहे, तर इतरांची थोडी तरी पाहणे न्याय्य नाही का? मराठी भाषेच्या लेखनपद्धतीचे नियम फारच सोपे आहेत; परंतु ह्या भाषेस जें काठिन्य आलें आहे तें मुख्यत्वें संकृत शब्दांमुळें होय; विशेष नियम करण्याचें जें कारण पडत आहे तें मुख्यत्वें संस्कृत शब्दांमुळें होय; जी अडचण भासत आहे ती ह्या शब्दांमुळें होय; ह्मणून हें काठिन्य व ह्यामुळें उत्पन्न होणारा घोटाळा अंशतः तरी कमी करणे जरूर आहे, व तो अंतींचे इ, उ ऱ्हस्व दीर्घ विकल्पें लिहिण्याची सवड ठेवल्याने काहीं कमी होऊन सोय होईल. असें केलें असतां कोणास कुरकुर करण्याचें कारण

राहणार नाही; विद्वान व सामान्य लोक ह्यांची सोय होईल; व कवींकडे हल्लीं निष्कारण निरंकुशत्व येत आहे तें तितकें येणार नाही.

मराठींत संस्कृताच्या धर्तीवर बरीच व्यवस्था अगोदर झाली आहे. संस्कृतांत एकच शब्द ऱ्हस्व दीर्घ असल्याचें दिसून येतें. अंगुलि-ली, अवन्ति–न्ती, आधि–धी, आलि–ली, आवलि–ली, ओषधि–धी, काशि–शी, कटि–टी, कंडु–डू, तनु–नू वगैरे कित्येक शब्द संस्कृतांत ऱ्हस्व दीर्घ आहेत, तर मराठींत तशी व्यवस्था असण्यास हरकत दिसत नाही.

मराठी भाषेचे ऱ्हस्वदीर्घाचे नियम भेदाभेद न करतां संस्कृत, फारसी, अरबी वगैरे शब्दांस सारखे लागू करणे जरूर असून तसें करण्यांत येत नाही, फक्त संस्कृत शब्दांपुरतीच काळजी करण्यांत येते, हें न्याय्य नाही. संस्कृताशिवाय इतर भाषांतील मात्र शब्दांच्या अंतींचे इ, उ दीर्घ असावे असा सक्तीचा नियम असावा, व तो संस्कृत शब्दांस लागू करूं नये, हें चमत्कारिक दिसतें. ऱ्हस्व,

---

१ वरील विधानाची सत्यता पुढील उदाहरणांवरून समजेलः–आबादि (फा), कारकुन् (फा), काबिज् (अ), जवाहिर् (अ), जामिन् (अ), जाहिर् (अ), फाजिल् (अ), खजिल् (फा), चाबुक् (फा), महीना (फा), मलीदा (फा), रूमाल् (फा), तूफान् (अ), दूकान् (फा) वगैरे शुद्ध अरबी व फारसी मूळ रूपांविषयीं विचार न करतां मराठी भाषेच्या सामान्य नियमाप्रमाणें आबादी, कारकून, काबीज, जवाहीर, जामीन, जाहीर, फाजील, खजील, चाबूक, महिना, मलिदा, रुमाल, तुफान, दुकान अशीं रूपें करण्यांत आलीं आहेत व तींच मराठींतील शुद्ध रूपें समजण्यांत येतात.

दीर्घ अशीं वैकल्पिक रूपें लिहिण्यासदेखील प्रत्यवाय असावा इतकेंच नाही, तर ते शब्द ऱ्हस्व असल्यास सर्वांनी ऱ्हस्वच लिहिले पाहिजेत, मग ते तसे लिहिण्यास आधार असो वा नसो; ते समजण्यास सामान्य लोकांस पंचाईत पडो वा न पडो; ते शुद्ध लिहितां येवोत वा न येवोत; ते कोणते हें समजण्यासाठीं निराळी व्यवस्था असो वा नसो; ते केवळ संस्कृत ह्मणून तसेच लिहिले पाहिजेत, असा आग्रह धरणे तर फारच चमत्कारिक आहे.

काहींचें ह्मणणे असें आहे कीं, प्राकृताच्या द्वारें जे संस्कृत शब्द आले आहेत, त्यांच्या अंतींचे इ, उ दीर्घ करावे; परंतु जे शब्द परभारें संस्कृतांतून आले आहेत ते तसेच वापरावे. असें कां ? तर, ते संस्कृत ह्मणून, असें उत्तर देण्यांत येतें. आतां अमूक शब्द संस्कृतांतूनच परभारें आले आहेत, असें समजण्यास विश्वसनीय आधार कोणता ? जे शुद्ध संस्कृत शब्द हल्लीं प्रचारांत आहेत त्यांपैकीं अही, कली, तरू, गुरू, गिरी, बुद्धी वैगेर काहीं शब्द प्राकृत व्याकरणांत दिसतात व ते दीर्घ लिहिलेले आढळतात. कवी तर दोन्ही प्रकारांचें अवलंबन करीत होते. तेव्हां हा निर्णय व्हावा कसा ? प्राकृतकाल व कविकाल ह्यांत प्रचलित असणाऱ्या सर्व शुद्ध संस्कृत शब्दांचा कोश असून शुद्ध संस्कृत शब्द जशाचे तसेच दाखविण्यांत आले असते, तर विचार करण्यास साधन होतें, परंतु हें साधन उपलब्ध नाही. शिण्या, रामा, कृष्णा, काणा, पुराणा, नवा, एडका वैगेरे शब्द परभारें शिष्य, राम, कृष्ण, पुराण, नव, एडक ह्या संस्कृत शब्दांपासून आले आहेत व त्यांचा अंत्य दीर्घ केल्याने काहीं गैरसोय झाली नाही, तर रुचि, भानु वैगेरे

ऱ्हस्व इकारान्त व उकारान्त शब्द दीर्घ केल्याने गैरसोय कशी व्हावी, हें समजत नाही.

भानु, कवि, रुचि वगैरे काहीं संस्कृत शब्दांच्या अंतींचे इ, उ हे ऱ्हस्व लिहावे, अशाबद्दल सबळ आधार नाहीं; असें करण्यास योग्य कारण दाखवितां येत नाही; असे शब्द दीर्घ उच्चारण्याचा प्रघात आहे; असे शब्द दीर्घ लिहिणे मराठी भाषेचा स्वभाव आहे; न लिहिणे हें तिच्या स्वभावाविरुद्ध वागणे आहे; सबब ते दीर्घ लिहिणे प्रशस्त आहे, असें कै० कृष्णशास्त्री चिपळूणकर ह्यांसारख्या काहीं संस्कृत व प्राकृत भाषा जाणणाऱ्यांचें मत आहे.

वरील एकंदर कारणांचा विचार केला असतां मराठी भाषेंत कोणताही शब्द आला तरी त्याच्या अंतींचे इ, उ दीर्घ लिहिणे उत्तम व जरूर आहे; परंतु असें करण्यास काहीं विद्वानांची हरकत आहे, ह्मणून निदान ऱ्हस्व किंवा दीर्घ अशीं वैकल्पिक रूपें लिहिण्यास तर कोणत्याही गोष्टीची हरकत असूं नये, असें समजून वरील नियम सुचविण्यांत आला आहे. होतां होईल तो शुद्ध संस्कृत शब्दच वापरावा, अशी विद्यार्थ्यांस व इतर सामान्य लोकांस इच्छा झाली, तर त्यांस तसें करतां यावें, ह्मणून जेवढे शब्द आम्हांस आढळले तेवढे स्वतंत्र देण्याची तजवीज केली आहे (परिशिष्ट १ लें पाहा). संस्कृत शिकण्याची सोय घालवूं नये, असें ज्या काहीं मित्रांचें म्हणणे आहे त्यांसही मग कुरकुर करण्याचें कारण राहणार नाहीं.

व्युत्पत्तीविषयीं विचार करतां 'आणि' शब्द ऱ्हस्व कां लिहावा ह्याचें कारण समजत नाहीं; पण हा ऱ्हस्व लिहिण्याचा प्रघात पडला आहे, व ह्याचा उच्चार

ऱ्हस्वासारखा काहीं होतो, सबब तो ऱ्हस्व ठेवला आहे. अद्यापि, तथापि वगैरे काहीं अव्ययें अपवादादाखल ठेवण्याचें कारण कीं, रवि,कवि वगैरे शब्दांप्रमाणें विभक्तिप्रत्यय वगैरे लागून तीं कधींच दीर्घ होत नाहींत, त्यांपुढें विसर्ग नसल्यामुळें त्यांच्या अंत्यवर्णास गुरुत्व येत नाहीं, तीं जुन्या कवितेंतून दीर्घ असल्याचें आढळून येत नाहीं, तीं ऱ्हस्व लिहिण्याचा प्रचार आहे; व मुख्य कारण हें कीं, तीं फारच थोडीं असल्यामुळें लक्षांत ठेवण्यास कठीण पडणार नाहीं, असें समजून तीं ऱ्हस्व ठेवलीं आहेत.

लुटपुटु वगैरे थोडे अनुकरणवाचक शब्द अपवादाखालीं दिले आहेत, ते अशाकरतां कीं, त्यांचा उच्चार ऱ्हस्व होतो व तीं लिहिण्याचाही तसाच प्रचार आहे.

'ल'चा 'ळ' होऊन किंवा 'न'चा 'ण' होऊन किंवा अशाच प्रकारचा विकार होऊन रूप बनलें, ह्मणजे तें मराठीच रूप होय, व त्यास मराठीचा सामान्य नियम लागू झाला पाहिजे. आळू प्रत्ययाचा अंत्य दीर्घ आहे, हें लक्षांत आणतां हा प्रत्यय लागून जे शब्द बनतात त्यांचें अंत्याक्षर दीर्घ पाहिजे; मग ते शब्द संस्कृत असोत, किंवा इतर भाषांतील असोत. जसें:—दयाळू, सोसाळू, कृपाळू, मायाळू, कनवाळू, झोपाळू इत्यादी.

उपांत्य इ, उ, ऋ—

(१) अंत्याक्षर अकारान्त असतां उपान्त्य ऱ्हस्व इ व उ ह्यांचा उच्चार दीर्घ करावा, असा मराठी भाषेचा सामान्य स्वभाव आहे, ह्मणून त्याप्रमाणें असे उपांतींचे इ, उ दीर्घ लिहावे.

मराठीः- बत्तीस, चाळीस, हत्तीण, कठीण, करमणूक, वागणूक, निर्भीड इ०.

इंग्रजीः–स्कीम, डयूक, स्कूल, ज्यून, पोलीस, सील इ०.

संस्कृतः–(**अ**) अधीन, रूप, रूढ, वीर, शालीन, लीन, दीन, शील, शूर, दूर, हीन, तीर, गूढ, ईश, गंभीर, त्रिशूल, गीत, भूत, जीव, कूट, कीर (राघू) दीप, धूत, धूप, नीच, पीठ, स्थूल, पीत (पिवळें), बीज, भीम, समूह, चिरंजीव, अनुकूल, प्रतिकूल, यूथ (समुदाय), केयूर (भूषण), नीर (पाणी), शीत, समीप, अधीश, दिवाभीत, भस्मीभूत, धूपदीप, तीर्थरूप, तीर्थस्वरूप, निकषभूत, अभिभूत, अवधूत, असंभूत, अंतरीप, उलूक, गांडीव, गिरीश, गूज, जंबीर, जीमूत, ताराधीश, नवनीत, अनाहूत, पुरुहूत, मंडूक, मीन, यूप, आरंभशूर, आरूढ, इत्थंभूत, आदिपीठ, आदिबीज, आद्यपीठ, आमशूल, इंद्रनील इ०.

(**ब**) ईय प्रत्यय लागून झालेले शुद्ध संस्कृत शब्द. जसें:– भ्रात्रीय, शास्त्रीय, राष्ट्रीय, स्वीय, आत्मीय इ०. जास्त उदाहरणें परिशिष्ट २ वरून समजून येतील.

(**क**) उपांत्य जोडाक्षर असलेले संस्कृत शब्द. जसें:- व्यूह, क्रूर, न्यून, स्थूल, दीप, क्षीण, द्यूत, क्लीब, तल्लीन, अश्लील, क्षीर, निर्जीव, शुचिर्भूत, आविर्भूत, यावज्जीव, धत्तूर, निर्धूत, नीलग्रीव, अन्यून, अपक्षीण, सच्छील, खर्जूर, उद्भूत, उपद्वीप, कर्चूर (वनस्पती), कृष्णधत्तूर, चक्रव्यूह, चिद्रूप, जंबुद्वीप, निर्धूम, निर्बीज, निर्मूल, निर्वीर, निस्सीम, प्रादुर्भूत, प्रीत, बहिर्भूत, भ्रूण, महद्भूत,

महाद्वीप, शकटव्यूह, शार्दूल, श्वेतद्वीप, सद्गीत, सप्तद्वीप, सुग्रीव, स्थूण (खांब).

अरबी–अमीन, अमीर, कंदील, कबीर, तार्जीम, दस्तूर, दीनदीन, नूर, सबूर इ०.

फारसी–अंगूर, कूच, खरीद, जमीन, ताकीद, नमूद, संगीन इ०.

अपवाद १:–काहीं अनुकरणवाक शब्द. जसें:–ठुसठुस, धुसफुस, टिकटिक, टुकटुक, लुबलुब, झिमझिम, कुटकुट, फुसफुस, टुरटुर, किटकिट, गुदगुद, गुपचिप, गुपचुप, गुणगुण, चुरचुर, चुळबुळ, छुमछुम, झिगझिग, झुळझुळ, दुडदुड, पिचपिच, तुडुमतुडुम, भुळभुळ, लिकलिक, कुडबुड, गुलगुल, चिरचिर, भिरभिर, भुरभुर, गुडगुड, फुरफुर, टुणटुण, मिरमिर, फुणफुण, मिणमिण, मुळमुळ, रिपरिप, लुकलुक, हुरहुर, हुलहुल, खिसखिस, घिसघिस, किरकिर, कुरकुर, तुरतुर, शिवशिव, हिडिसपिडिस, किडुकमिडुक, पुटपुट, पुरपुर, चुकचुक, लुटलुट, झुंजुकमुंजुक, तिळतिळ (जसें तिळतिळ तुटणे), किलबिल, झुरझुर इत्यादी.

अपवाद २:–उपांत्य, इ उ अथवा ऋ ह्यावर अनुस्वार असून त्याचा खणखणीत अनुस्वारसारखा उच्चार होत असेल, तर असा उपांत्य इ, उ अथवा ऋ नेहमीं ऱ्हस्व असावा; मग असा शब्द कोणत्याही भाषेंतील असो. जसें:-शिंग, भिंग, भिंत, इंच, शृंग, ड्राइंग, प्लिंथ, स्टाकिंग, शिंप इ०.

अपवाद ३:–इंग्रजी शब्द:–नेटिव (एतद्देशीय), आफिस (कचेरी), कमिट (सेशन कोर्टांत खटला पाठविणे), टेनिस

(चेंडूफळीचा खेळ), नोटिस (जाहिरात, ताकीद), शेरिफ (कामगार), बुक (पुस्तक), क्याथलिक (ख्रिस्तीधर्मपंथाचे लोक), मिनिट (क्षण, निवाडा), स्कालरशिप (पगारी जागा), एंजिन (यंत्र), बिल (कायद्याचा मसुदा), क्यार्बालिक आसिड (औषध), डिपाजिट (अनामत ठेव), एप्रिल, बेलिफ, बिसकिट, सरकिट (फिरती), डिटेकटिव्ह, डिसमिस, ह्यांडबिल, लाइन, ल्याटिन, मिडवाइफ, मिल (गिरणी), निब (टाक), पेनसिल, टाइप, टाइम, व्हिजिट बुक, युक्लिड, सिव्हिल सर्व्हिस (सनदी नौकरीची परिक्षा), कौनसिल (सभा), जस्टिस (न्यायमूर्ती किंवा न्याय), इश प्रत्यय लागून बनलेले शब्द. जसें:–इंग्लिश, आयरिश, स्काटिश, टर्किश, डयानिश, स्वीडिश, स्प्यानिश, बुकिश इ०.

अपवाद ४:-शुद्ध संस्कृत शद्वांस इक प्रत्यय लागून बनलेलीं नामें अथवा विशेषणें. जसें: क्षणिक; चमत्कारिक, कार्तिक, रसिक, क्रमिक, आकस्मिक इ०. इक प्रत्यय काहीं विशिष्ट संस्कृत शब्दांसमात्र लागतो. ते शब्द कोणते, हें समजावें म्हणून पुढें बरींच उदाहरणें दिलीं आहेत. (परिशिष्ट ३ पाहा.)

टीप:–इक प्रत्यय संस्कृत प्रत्यय असून तो एकाद्या शब्दास लागला असतां त्या शब्दाचा उपान्त्य ऱ्हस्व करावयाचा. पाल्हाळ, जग, खर्च, ठराव, मोकळा, सोस वगैरे शब्दांस इक प्रत्यय लागून बनलेलीं रूपें पाल्हाळीक, जगीक, खर्चीक, ठरावीक, मोकळीक, सोशीक, हीं मराठी रूपें होत; तेव्हां ह्यांचा उपान्त्य ऱ्हस्व लिहिणे उक्त नाही. सामान्य नियमाप्रमाणें तो दीर्घ लिहिणे

उक्त आहे. त्याचप्रमाणें पुराण व संस्थान हीं संस्कृत रूपें होत; परंतु पुराणीक व संस्थानीक ह्यांचा जो प्रस्तुत अर्थ आहे त्या अर्थानें तीं संस्कृत रूपें नाहीत. पुराण ह्या शब्दास इक प्रत्यय लागून पौराणिक असें रूप होतें व त्याचा अपभ्रंश पुराणीक असा झाला आहे. संस्थानीक म्हणजे राज्यप्रवर्तक या अर्थानें उपयोग केलेला संस्कृत कोशावरून आढळून येत नाही. मंडलीक, अगळीक, नजीक, खाटीक, त्रासीक वगैरे रूपें 'इक' प्रत्यय लागून बनलेलीं नाहीत. मंडलीक (उपनाव) एवढाच स्वतंत्र शब्द आहे व त्याचा अर्थ ताल्यांतील राजा असा आहे (तेजोनिजं मुकुलयंति च मंडलीकाः; किरात). अगळीक व नजीक हे परभाषेंतील शब्द आहेत. खाटीक हें संस्कृत खट्टिक ह्याचा अपभ्रंश होऊन बनलेलें मराठी रूप होय.त्रासीक हें रूप'त्रासक'ह्याचा अपभ्रंश होय. सबब ह्या रूपांचा उपान्त्य इ ऱ्हस्व लिहिणे उक्त नाही. पढीक, सडीक, पडीक, कणीक, सोयरीक, उदयीक वगैरे शब्दांत ईक प्रत्यय आहे, सबब त्यांचा उपान्त्य दीर्घच लिहावयाचा. उदयीक असें रूप असावें किंवा उदईक असें असावें असा प्रश्न आहे. उदईक हें रूप विशेष प्रचारांतील, सबब तेंच ग्राह्य समजावें. य व ई ह्यांचा विपर्यय होऊन उदईक हें रूप बनलें आहे. सवयीचें सवई, गायीचें गाई अशीं अनेक उदाहरणें आहेत. त्याचप्रमाणें खटलेवाईक, तऱ्हेवाईक, शिरस्तेवाईक, आठवडेवाईक, आस्थेवाईक वगैरे शब्दांत आईक प्रत्यय आहे व त्याचा उपांत्य दीर्घ आहे. कपर्दीक शब्दाची व्युत्पत्ती पाहतां कपर्दकः किंवा कपर्दिका अशी समजते; तेव्हां कपर्दीक हें शुद्ध रूप नसल्यामुळें त्याचें अंत्याक्षर दीर्घ पाहिजे. क्षणिक, धनिक वगैरे थोडे शब्द शिवायकरून

बाकीचे बहुतेक इक प्रत्ययान्त शब्द शुद्ध संस्कृत मूळ रूपास वृद्धी होऊन बनलेले असतात व ते संस्कृत शब्दच असतात.

अपवाद ५:––मूळ संस्कृत रूपास इत प्रत्यय लागून बनलेले शुद्ध संस्कृत शब्द. जसें प्रचलित, सुशिक्षित, मंडित, विरहित, नियमित, क्रोधान्वित, अनन्वित, नामांकित, स्नेहांकित इ० (जास्त उदाहरणें परिशिष्ट ४ वरून कळून येतील.

टीप––(अ) कर, लिह, मांड, लाव, मार, रंग, ठेव, पाठव, बडव, दाखव, पाज, काढ, लूट, सोड, धर, धाड, हाक, भर, खण, निवार, फोड, भाज, वाढ (पदार्थ वाढणें), दळ, कांड, भाज, नांगर, कुळप, तुरप, काप (लाकूड वगैरे), शिव (सुईदोऱ्याने), रगड, शिजव, खुरप, पेर, दाब, गाठ, झाड, ठोक, उकड, चाट, पीळ, घाल, सांड, तोड, चिर, करव, चालव, वाच (पुस्तक), घड (भांडीं वगैरे), उकळ, बांध वगैरे मराठी रूपें होत व त्यांस इत प्रत्यय लागून झालेलीं वर्तमानकालवाचक धातुसाधितें मराठी शब्द होत; तेव्हां त्यांचे उपांत्य सामान्य नियमास अनुसरून दीर्घ लिहावे. इत प्रत्यय संस्कृत शब्दांस लागून त्या शब्दाचा उपांत्य संधी वगैरेची भानगड नसेल तर ऱ्हस्व राहतो. मराठी शब्दाच्या अंतीं अ असल्यास सामान्यत्वें उपांत्य दीर्घ होतो. सबब हा प्रत्यय मराठींत आला असतां तो ईत होतो, ही गोष्ट लक्षांत ठेवली असतां भानगडच मिटेल. मग असा प्रत्यय लागून बनलेलीं रूपें ऱ्हस्व लिहावीं किंवा दीर्घ लिहावीं याबद्दल भानगडच राहणार नाही.

(ब) अनुकरणवाचक शब्दांसंबंधानेही हीच गोष्ट लागू आहे. त्यांससुद्धां ईत प्रत्यय लागून दीर्घ रूपें होतात; जसें—गरगरीत, लटपटीत, लुसलुशीत, चकचकीत, गुटगुटीत, झगझगीत, खडखडीत, तुकतुकीत, बटबटीत, कुळकुळीत, तकतकीत, खरमरीत, खुसखुशीत, घणघणीत, चरचरीत, चुबचुबीत, टचटचीत, टुमटुमीत, ठणठणीत, ठसठशीत, ढळढळीत, तुळतुळीत, दमदमीत, दलदलीत, धडधडीत, पचपचीत, फटफटीत, भणभणीत, मुळमुळीत, मळमळीत, रखरखीत, रसरशीत, विरविरीत, सणसणीत, खणखणीत, करकरीत, खरखरीत, भरभरीत, तुरतुरीत, खुरखुरीत, डबडबीत, भुसभुशीत, फुसफुशीत, गुबगुबीत, विसाविशीत, किडकिडीत, सडसडीत, भळभळीत, चुणचुणीत, झणझणीत, गुळमुळीत, लखलखीत, गुळगुळीत, कडकडीत इ०.

(क) बागाईत, जिराईत, तागाईत, चढाईत, पटाईत वगैरे शब्दांत आईत प्रत्यय आहे, तेव्हां त्यांचे उपांत्य ऱ्हस्व लिहावयाचे नाहीत.

(ड) प्रणीत, प्रीत, भीत, मीत, वीत, ऱ्हीत, ईत, क्रीत इत्यादी शब्दांत प्र + नी, प्री, भी, मी, वी, ऱ्ही, ई, क्री असे अनुक्रमें धातू असून 'त' प्रत्यय लागून रूपें बनलेलीं आहेत. मूळ धातू दीर्घ ईकारान्त असून 'त' प्रत्यय लागलेला आहे, सबब उपांत्याक्षर दीर्घच लिहावयाचें. त्याचप्रमाणें विपरीत, सुपरीत, अनुगृहीत, आनीत, अनुवीत ह्यांचे उपांत्य दीर्घ लिहावयाचे.

(इ) माहीत हा सिद्ध शब्द आहे, त्यास इत प्रत्यय लागला नाही. त्याप्रमाणें खचीत ह्याचा अर्थ खरोखर असा असेल तेव्हां तो सिद्ध शब्द समजावा, व त्याचें उपां-

त्याक्षर दीर्घ असावें. खचित ह्याचा अर्थ मिश्रित, युक्त, बद्ध असेल, तेव्हां तो खच् धातूस 'इत' प्रत्यय लागून झालेला असतो. सदोदीत हा शुद्ध संस्कृत शब्द नाही. सदा + उदित अशी ह्याची व्युत्पत्ती असावी, असें वाटत नाही. हा मराठीच असावा, व असा असेल तर उपांत्य दीर्घ लिहिला पाहिजे.

(**फ**) कामातीत, क्रोधातीत, मोहातीत, विषयातीत, जरातीत, मानातीत, देहातीत, वयातीत, देशातीत, कालातीत, गुणातीत, मर्यादातीत, लोभातीत, दुःखातीत, सुखातीत, बोधातीत, अवस्थातीत, धर्मातीत वगैरे शब्दांत अतीत प्रत्यय नाही. ह्या ठिकाणीं अति + इत ह्यांचा संधी होऊन अतीत रूप झालेलें आहे, सबब उपांत्य दीर्घ पाहिजे.

अपवाद ६—अंत्याक्षर जोडाक्षर असेल, तर उपांत्य इ, उ, ऋ ऱ्हस्व लिहावे; जसें:—समृद्ध, उद्विग्न, निरिच्छ, कर्तृत्व, गुरुत्व, प्राचुर्य, कर्मनिष्ठ, इष्ट, प्रवृत्त, कनिष्ठ, धष्टपुष्ट, शिस्त, भिस्त, खुद्द, ख्रिस्त, सोफिस्त, सोशियालिस्ट, निहिलिस्ट, डिस्ट्रिक्ट, पुस्तदरपुस्त, खुर्द, सुस्त, शागिर्द, दुरुस्त, गिल्ट, लिस्ट इ० (जास्त उदाहरणें परिशिष्ट. ५ वरून, कळून येतील)

प्रत्यपवाद.— कीर्द, रोजकीर्द, कारकीर्द, तूर्त.

संस्कृतः–सूर्य, मूत्र, पूर्व, मूर्त, संकीर्ण, पूज्य, तीक्ष्ण, धूर्त, सूक्त, मुहूर्त, विस्तीर्ण, शीघ्र, तीर्थ, शून्य, मूर्ख, सूत्र, सूक्ष्म, जीर्ण, भीष्म, पूर्ण, अपूर्ण, शूद्र, मूल्य, अमूल्य, अजीर्ण, अपूर्व, गोमूत्र, ग्रीष्म, दीर्घ, परिपूर्ण, वीर्य, संपूर्ण, ऊर्ध्व, कूर्म, चूर्ण, तीव्र, धूम्र, धूर्त, अवतीर्ण, सामीप्य, औदासीन्य, प्रावीण्य, उत्तीर्ण, अश्रुतपूर्व, तूर्ण, तूर्य, व्यापारशून्य, कथासूत्र, पंचसूक्त,

गृह्यसूत्र, कर्तृत्वशून्य, अननुभवपूर्व, आतिशूद्र, अमूर्त, अमोघवीर्य, आकीर्ण, आनुकूल्य, ईश्वरसूत्र, उदरसूत्र, उपजीव्य, कटिसूत्र, कळसूत्र, कालसूत्र, कालानुकूल्य, खर्परसूत्र, गतवीर्य, गर्भसूत्र, गोरखमुहूर्त, ग्रहानुकूल्य, दयापूर्ण, दीप्त, प्रदीप्त, दीर्घसूत्र, द्रव्यानुकूल्य, धारातीर्थ, नासिकाचूर्ण, निरूप्य, निर्वीर्य, पितृतीर्थ, पूर्त, प्रकीर्ण, प्रतिसूर्य, प्रमाणसूत्र, बहुमूल्य, बाहुवीर्य, ब्रह्मसूत्र, मृतपूर्व, मंगलसूत्र, मंदवीर्य, मनुष्यतीर्थ, मलसूत्र, मार्गशीर्ष, मृदूच्च, यथासूत्र, रणतूर्य, रूप्य, लग्नमुहूर्त, लघुमूत्र, लोकानुकूल्य, लोहचूर्ण, वज्रतीर्थ, विदग्धाजीर्ण, विशीर्ण, व्यवहारशून्य, शतचूर्ण, शतमूर्ख, शब्दवैपरीत्य, शिखासूत्र, शूर्प, सभाधूर्त, समवीर्य, समसूत्र, साधनसूत्र, सारूप्य, ताद्रूप्य (तत् + रूप=एकपणा), पापापूर्व (पूर्व पापाचें फळ), सतीर्थ (सहाध्यायी).

अपवाद ७—आतुर, आकुल, रहित, विरहित ह्या शब्दांचे किंवा हे शब्द ज्या शब्दांस जोडले असतील त्यांचे किंवा परिशिष्ट ६ मध्यें दिलेल्या शुद्ध संस्कृत शब्दांचें उपांत्य अक्षर नेहमीं ऱ्हस्व लिहावें. जसें—चिंतातुर, भयाकुल, चिंताविरहित, प्रचुर, नकुल, प्रिय, सन्निध इ०.

टीप—अंकूर, शकून, अमूक, गरूड, तरूण, यूग, वरूण, चतूर, पूर (शहर), मीष, विदूर, शीर, हरीण, मंदीर, मधूर, वीष, विपूल, व्याकूल, क्षणभंगूर, सूख, गूण, पुरूष, अधीक, निपूण हे शब्द फार परिपाठांतले असल्यामुळें ते मराठीच बनले आहेत, तेव्हां मराठींत त्यांचा उच्चार दीर्घ होतो; सबब ते दीर्घच लिहिणे योग्य आहे; परंतु मूळ रूप वापरण्याचाही प्रघात असल्यामुळें विकल्पें ऱ्हस्व किंवा दीर्घ लिहिले असतां चालेल; ह्मणजे समास आला असतां

काय करावें वगैरे आक्षेपांस जागा राहणार नाही. गूंण वगैरे शब्द जरी संस्कृत आहेत, तरी मराठींत उच्चाराच्या संबंधाने जो व्यापक नियम आहे त्यास अनुसरूनच दीर्घ उच्चार होतो.

अपवाद ८——फारसी व अरबी शब्द. जसें:=मुष्किल, खुष, बिन, बहादुर.

वर ऱ्हस्व उपांत्यासंबंधाने जे अपवाद सांगितले त्यांशिवाय इतर शब्दांचे उपांत्य सामान्य नियमाप्रमाणें नेहमीं दीर्घ लिहावे, मात्र संस्कृत अथवा इतर भाषांतील शुद्ध शब्द ठेवण्यांत येतील, तर त्यांची व्यवस्था सामान्य नियमांप्रमाणें व्हावी अथवा त्या त्या भाषांतील नियमांप्रमाणें झाली असतां चालेल. जे शुद्ध संस्कृत शब्द म्हणून वर एकंदर दिले आहेत त्यांपैकीं एकादा शब्द दुसऱ्या शब्दांत येऊन सामासिक शब्द बनला, किंवा त्यास ता, त्व वगैरे प्रत्यय किंवा उप, परा वगैरे उपसर्ग लागले,

---

१ The final अ of words is silent in the vernaculars, but at the same time the vowel of the preceding syllable is lengthened. Thus गुण 'virtue' is, as a Sanskrit word pronounced guṇa, but in Marathi and Guzerathi it is gûṇ and in Hindi gún; Sanskrit गुड guḍa-molasses is in Marathi gùḷ, Sanskrit तिल tila 'sesamum' is in Marathi and Guzerathi tîḷ and Hindi til ...... The long अ and the short are found side by side in such a word as मदन which as pronounced in Sanskrit is Madana with three consonants each followed by the Sanskrit or short अ. In the modern languages, however, the first syllable has its अ as in Sanskrit, but that of the second is lengthened, and in the last it is dropped, and the word thus becomes Madan. (Dr. Bhandarkar's lectures on the Vernaculars in Northern India, Journal B. A. S. Vol 17, Pt 2, 1889 P. 119).

तरी त्याच्या आंतररचनेंत बदल करावयाचा नाही. तो जशाचा तसाच ठेवावयाचा. उ० क्षीणता, रूपवान, अश्लीलत्व, वीरमाता, शून्यवाद वगैरे.

उपांत्यसंबंधानें नियम २:–शब्दांच्या अंतीं अ (जोडाक्षर सह) शिवाय दुसरा कोणताही स्वर आला असतां उपांत्य इ, उ अथवा ऋ ऱ्हस्व लिहावा. जसें:––विनू, फजिती, विळा, शिक्षा, शिवी, प्रतिज्ञा, आगंतुकी, केरसुणी, तरजुमा, ऋणी इ०.

अपवाद:––शुद्ध संस्कृत शब्द:--ईर्ष्या, मूर्च्छा, द्वितीया, तृतीया, पूर्वा, मनीषा, क्रीडा, प्रतीक्षा, कूर्चा, गीता, दीक्षा, दुःशीला, दीर्घसूत्री, भूषा, लीला, शूद्री, असूया, अनसूया, जीवी प्रत्यय लागून बनलेले शब्द (चिरंजीवी, मांसोपजीवी, अनूजीवी इ०), ईहा (इच्छा).

फारसी व अरबी:—मखूफी, अमीरी, बगीचा, अजीजी, बलूची, मीठा, धीमे-धीमे.

मराठी:—पूर्वी, झूर्या, कळसूत्री.

टीप:–पीडा, पूजा, शुश्रूषा, दूर्वा, टीका, वीणा, परीक्षा हे शब्द फार परिपाठांत असल्यामुळें सामान्य नियमाप्रमाणें त्यांचे उपान्त्य[1] ऱ्हस्व असावे; परंतु अलीकडील विद्वान लोकां-

---

१—अशा प्रकारच्या शब्दांचे उपांत्य ऱ्हस्व करावे अशी सूचना काहींस संमत नाही. पण शुद्ध फारसी व अरबी शब्दांची काय व्यवस्था करण्यांत आली आहे, हिकडे त्यांचें लक्ष गेलें नसावें असें दिसतें. जे फारसी अथवा अरबी शुद्ध शब्द रुळले आहेत त्यांची व्यवस्था मराठीच्या नियमाप्रमाणें केली

च्या परिपाठांत संस्कृत रूपें लिहिण्यांत येतात, तेव्हां तीं विकल्पें लिहिलीं असतां चालेल.

अंत्य व उपांत्य ह्यांशिवाय इतर ठिकाणचे इ, उ, ऋ.

(१) शब्दांतील अंत्य व उपांत्य अक्षरांशिवाय इतर ठिकाणचे इ, उ, ऋ ऱ्हस्व लिहावयाचे. जसेः-शिक्षक, विषयक, लिहितांना, तितका, दिसतो, कैफियत, ऋणानुबंध, जिवंत. इ०.

अपवाद १ः-संस्कृत शब्द जशाचे तसे ठेवावे. (परिशिष्ट ७ पाहा).

टीप—जिवंत हें रूप जीवंत ह्यापासून बनलेलें आहे. हा शब्द आतां मराठीच बनला आहे. ह्यांतील पहिले अक्षराचा उच्चार ऱ्हस्व होतो, व त्याप्रमाणें तो ऱ्हस्व लिहिणे जरूर आहे. सूतक[१] ह्या मूळ रूपांतील पहिल्या अक्षराचा उच्चार

[मागील पृष्ठावरून चालू.]
आहे, हें पुढील उदाहरणांवरून समजेलः—ईजा (अ)-इजा; मनसूबा (अ)-मनसुबा; कूजा (**फा**)-कुजा; खूनी (**फा**) -खुनी; खूबी (**फा**)-खुबी; खूर्दा (**फा**)-खुर्दा; दस्तूरी (**फा**) -दस्तुरी; नमूना (**फा**)-नमुना; पलीता (**फा**)-पलिता; मलीदा (**फा**)-मलिदा; महीना (**फा**)-महिना.

१ The Sanskrit सूतक 'mourning,' नूतन 'new,' पीतल 'brass' and the Sanskrit and Prakrit जीवन्त (from जीवंतः or जीवन्तो) are pronounced as सुतक्, नुतन्, पितळ्, जिवन्त &c. with the penultimate अ long and the first vowel short. In this way in a word composed of three syllables with the final अ silent, the first syllable must be short in Marathî. When a word is composed of more than three syllables, the अ of the anti-penultimate is slided, as in अडचण, शहाणपण pronounced as अड्चण्, शहाण्पण्. (Dr. Bhandarkar's lectures. ibid)

ऱ्हस्व करण्यांत येऊं लागल्यामुळें आतां सूतक असें न लिहितां सुतक असें रूप लिहिण्याचा प्रघात आहे, व त्या बाबतींत आतां कोणाचा वाद नाही, तर जीवंत असे रूप काहीं लिहितात, तें तसें न लिहितां जिवंत असें लिहिणे हें मराठीच्या स्वभावास अनुसरून आहे. ईमान् (अ), कीमत् (अ), कूवत् (अ), तूफान् (अ), सूरत् (अ), खूराक् (फा), दूकान् (फा), तीरंदाज़् (फा), रूमाल् (फा) ह्या शब्दांतील अंत्य व उपांत्य ह्यांशिवाय इतर ठिकाणचे इ, उ दीर्घ असून ते ऱ्हस्व लिहिण्याचा प्रघात पडला आहे. कारण हे शब्द रुळले असल्यामुळें त्यांस भाषेचा नियम लागू करण्यांत आला आहे. तो हा कीं, इतर ठिकाणचे इ, ऊ ऱ्हस्व करावे. ह्या बाबतींत विकल्पही ठेवलेला नाही. ह्या बाबतींत जी व्यवस्था असणे जरूर आहे ती ही कीं–जे शब्द मराठी बनले आहेत त्यांस मराठीचा नियम लागू असावा, व जे तसे बनले नाहीत त्या बाबतींत मात्र अपवाद करणे जरूर वाटल्यास तसें करणे योग्य आहे.

अपवाद २:—मराठी सामासिक शब्द. जसें:—दाढीमिशा, भाजीपाला, साळीकोष्टी, चिठीचपाटी, चोळीबांगडी, जाईजुई, स्त्रीजात इ०.

प्रत्यपवादः—कुळकथा, कुळकहाणी, कुळकरंटा, कुळशीळ, कुळकरणी, चुलखंड, चुलपोतेरें, टिपनीस, पिकदाणी, डिकदाणी, तिरकमठा, तिसमारखा (तीस माशा मारणारा), तुटपुंजी, तुटपुंजा, दिपमाळ, निमगोरा, निमगोल, निमशाई, पुर्भया (पूर्व + भ्रातृ), फूल पूर्वपद असून बनलेले शब्द (फुलझाड, फुलपाखरूं, फुलबरडा, फुलबाग, फुलबाजी, फुलमाळी, फुलवात इ०), बिगबाळी (भीक + बाळी), भुपाळी, भुलथाप,

घाशिरामी, रिणकरी, सुनमूख (सून + मूख), हिणकस, हिरमोड, मुतखडा, मुळाक्षर, मुळव्याध, सुरपारंब्या, मुतसळई, बुटबैंगण, गुळंबा, गुळपापडी, तिळपापड.

टीप—मराठी सामासिक शब्द कोणते हें परिशिष्ट ८ वरून समजेल. विद्यार्थ्यांस त्यांपासून विशेष उपयोग करून घेतां येईल असें समजून ते देणे अवश्य वाटलें.

साहेब, पंत, राव, महाराज, जी, बाई, बोवा, बुवा, कर, राजा वगैरे सन्मानार्थी शब्द शेवटीं जोडून बनलेले शब्द वस्तुतः सामासिक शब्द होत. जसेः—भाऊसाहेब, आईसाहेब, वहिनीसाहेब, बाईसाहेब, विसाजीपंत, सयाजीराव, जोतीराव, बाजीराव, शिवाजीमहाराज, शाहूमहाराज, विठूजी, दगडूजी, येसूजी, आजीबाई, काशीबाई, लक्ष्मीबाई, जावईबोवा, शास्त्रीबुवा, काशीकर, वाईकर, लोटलीकर, बळीराजा इ०.

प्रत्यय लागले असतां ऱ्हस्वदीर्घाच्या संबंधाने काय व्यवस्था करावयाची ह्याबद्दल विचारः—

(१) विभक्तिप्रत्ययः-(अ) ज्या शब्दास विभक्तिप्रत्यय लागतो त्यास असा प्रत्यय लावण्यापूर्वी त्या शब्दाचा अंत्य वर्ण ऱ्हस्व असल्यास तो दीर्घ करावा; मग असा शब्द शुद्ध मराठी, अपभ्रष्ट, शुद्ध संस्कृत किंवा शुद्ध विदेशी असो.

जसें:—मुनीचा, रवीने, शत्रूस, घराला, गावीं, कमिटीचा, मार्चांत, पंतोजींना.

अपवाद १:—काहीं सर्वनामें. उ० मला, मजला, मशीं,

मजशीं, मजहून, तुला, तुजला, तुतें, तुशीं, तुजशीं, तुजहून-तुझा-झी-झें, तिला, तिजला, तिते, तिने, तिशीं, तिजशीं, तिजहून, तिचा, इला, इजला, इते, इने, इशीं, इजशीं, इजहून, इचा, हिला, हिजला, हितें, हिने, हिशीं, हिजशीं, हिचा, असला, तसला, कसला, जिला, जिजला, जिते, जिने, जिशीं, जिजशीं, जिजहून, जिचा-ची-चें, आपला-ली-लें, स्वतःला.

अपवाद २.—स्थलकालादिदर्शक काहीं शब्द. जसें— कोठचा, कोठला, एथचा, एथला, तेथचा, तेथला, आजचा, आजला, कालचा, इंग्लंडचा, इंग्लंडहून, हिंदुस्थानचा-हून, मनचें; पहाट, सकाळ, दुपार, दोनप्रहर, संध्याकाळ, सायंकाळ ह्या शब्दांस चा आणि ला हे विशेषण प्रत्यय लागले असतां जीं रूपें होतात तीं; व मूळचा, वेळचेवेळेवर, गावचा हे शब्द.

टीप—विभक्तिप्रत्यय लावण्यापूर्वीं ठरलेल्या नियमांप्रमाणें सामान्यरूप करून नंतर असा प्रत्यय लावावयाचा, हें सांगावयास नको. सामान्यरूपें निरनिराळ्या रितींनी होतात, व असें सामान्यरूप झाल्यावर अंतींचा वर्ण दीर्घ असावयाचा. वर जे अपवादक शब्द दिले आहेत त्यांपैकीं असला, तसला, कसला, एथचा, तेथला वगैरे काहीं विभक्तीचीं रूपें नाहीत; विशेषणें आहेत. इंग्लंड, हिंदुस्थान, मन, गाव वगैरे शब्दांची इंग्लंडाचा, इंग्लंडाहून, हिंदुस्थानाचा, हिंदुस्थानाहून, मनाचा, गावाचा, गावाहून अशीं रूपें होतात, तीं विभक्तिप्रत्यय लागून सिद्ध झालीं आहेत. मला हें रूप प्रचारांतील होय; माला असें रूप क्वचित् आढळतें; तें प्रचारांतील नाही.

(ब) विभक्तिप्रत्यय लावण्यापूर्वीं शब्दाचा उपांत्य इ, उ ऱ्हस्व करावयाचा.

जसें:—जमिनीचा, मजुरास, उशिरानें, गरिबाचे, वजिराचा, मशिदींत, रिकिबींत, मोहिमेंत, शिबिरांत, नशिबाला, रितीने, जिवाला, कशिद्याचा, शरिरास इ०.

अपवाद:—शुद्ध संस्कृत शब्द अथवा इतर भाषांतील शुद्ध शब्द जशाचे तसेच ठेवण्यांत येतील, तर त्यांचे उपांत्य इ, उ दीर्घ असले, तरी ते जशाचे तसेच ठेवावयाचे; ते ऱ्हस्व करावयाचे नाहीत. जसें:—सूर्याला, पूर्वेचा, तीर्थीं, डयूकाने, ज्यूनांत.

टीप—उपांत्य ऱ्हस्व असल्यास तो तसाच ठेवावयाचा हें सांगणे नको. मजूर, नशीब व मूळ हे शुद्ध शब्द नाहीत. ते मज़्दूर, नसीब व मूल ह्यांपासून विकार होऊन रूढ झाले आहेत; तेव्हां त्यांची व्यवस्था सामान्य नियमाप्रमाणें होणे योग्य आहे. ' जीव ' हा शुद्ध शब्द आहे; परंतु परिपाठांतला झाल्यामुळें त्याचीं रूपें जिवास, जिवंत अशीं लिहिण्याचा प्रघात पडला आहे, व उच्चारही तसाच होतो; तेव्हां त्याची व्यवस्था मराठीच्या स्वभावाप्रमाणें व्हावी. जमीन हा फारसी शुद्ध शब्द आहे; परंतु तो रुळला आहे. रीति, रीत अशीं दोन्ही रूपें आहेत; पैकीं ' रीत ' हें विशेष प्रचारांतलें आहे, व त्याचें रितीने असें रूप होतें. ' रीति ' ह्याचें रीतीने असें रूप होणे योग्य आहे, पण ज्याप्रमाणें जीव शब्दाची रूपें जिवास, जिवंत अशीं उच्चाराप्रमाणें लिहिण्यांत येतात, त्याप्रमाणें उच्चाराप्रमाणें रीति ह्याही शब्दाचीं रूपें रितीने, रितीस अशीं लिहिणे प्रशस्त आहे. त्याचप्रमाणें शरिराने, शरिरास, रुपाने, रुपाला अशीं रूपें लिहिणे प्रशस्त.

(२) शब्दयोगी अव्ययें:—**विभक्तिप्रत्ययाच्या संबंधानें वर जे नियम सांगितले तेच शब्दयोगी अव्ययांच्या संबंधानें लागू आहेत असें समजावें, ह्मणजे अशीं अव्ययें लागलीं असतां अंत्यवर्ण दीर्घ व उपांत्य इ, उ ऱ्हस्व करावयाचे.** जसें मुनीपर्यंत, रवीपासून, घराखालीं, जमिनीखालीं, गरिबांवर इ०.

टीप—शुद्ध शब्दांच्या बाबतींत जी व्यवस्था वर सांगितली तीच शब्दयोगी अव्ययांच्या बाबतींत आहे असें समजावें. पासून, पर्यंत वगैरे शब्दयोगी अव्ययें, मज, तूज, तीज, इज, हिज, जिज ह्यांस लागलीं असतां मजपासून, मजपर्यंत, तुजपासून, तुजपर्यंत, तिजपासून, तिजपर्यंत, इजपासून, इजपर्यंत, हिजपासून, हिजपर्यंत, जिजपासून, जिजपर्यंत, अशीं रूपें होतात. त्याचप्रमाणें कोठ, एथ, तेथ, आज, काल, इंग्लंड, हिंदुस्थान, पहाट, सकाळ, दुपार, दोनप्रहर, संध्याकाळ, सायंकाळ ह्या शब्दांस ‘ पासून ’ अथवा ‘ पर्यंत ’ हीं शब्दयोगी अव्ययें लागलीं असतां अंत्यवर्ण दीर्घ करावयाचा नाहीं, जशाचा तसाच ठेवावयाचा. जसें, कोठपासून, आजपर्यंत इ०.

च, ही, ना, देखील, मात्र हीं शुद्ध शब्दयोगी अव्ययें शब्दांस लागलीं असतां ते शब्द जशाचे तसेच ठेवावयाचे, त्यांचा अंत्य वर्ण दीर्घ करावयाचा नाहीं अथवा उपांत्य ई, ऊ ऱ्हस्व करावयाचा नाहीं. जसें, तूंदेखील, सूर्यच, शक्तिही.

(३) इतर प्रत्यय:—वाला, सा, दार, निशी, गिरी, आई, लायक, पूर्वक, पणा, गर, वार, मान, वंत, मंत, खोर,

भर, वाणा, कडे वगैरे प्रत्यय शब्दांस लागले असतां मूळ शब्दांचे अंत्य अथवा उपांत्य ई, ऊ जशाचे तसेच ठेवावे. जसें. मीपणा, रतीभर, दीनवाणा, श्रीमान, इ०.

अपवादः—चिडखोर, जिनगर, कुळवंत, टुमदार, पिळदार, जातिवंत, उबदार, गोजिरवाणा, मुठभर.

वरील प्रत्ययांचीं जास्त उदाहरणें पुढें दिलीं आहेत. (परिशिष्ट १ पाहा).

परिशिष्ट १ लें.

ज्या शब्दांचे अंत्य इ, उ विकल्पें ऱ्हस्व अथवा दीर्घ लिहावयाचे तेः—

अंकलिपि.	अतिवृष्टि.	अनावृष्टि.
अकीर्ति.	अत्रि.	अनिवारगति.
अंगुलि.	अत्युक्ति.	अनीति.
अग्नि.	अतृप्ति.	अनुकृति.
अंघ्रि.	अंत्येष्टि.	अनुध्वनि.
अचक्षु.	अदिति.	अनुनीति.
अंजलि.	अद्रि.	अनुपपत्ति.
अजातरिपु.	अधिपति.	अनुभूति.
अजातशत्रु.	अधोगति.	अनुमति.
अटवि.	अधोवायु.	अनुमानोक्ति.
अणु.	अध्वर्यु.	अनुरक्ति.
अणुरेणु.	अनन्यगति.	अनुवृत्ति.
अंतरचक्षु.	अनन्यभक्ति.	अन्नशांति.
अंतरदृष्टि.	अनादि.	अन्नशुद्धि.
अतिथि.	अनादिसिद्धगति.	अन्योक्ति.

अन्वयव्यतिरेकव्या-
प्ति.
अन्वयव्याप्ति.
अपकीर्ति.
अपन्हुति.
अपमृत्यु.
अपरीति.
अपर्णापति.
अपांपति.
अपूपराशि.
अप्रतीति.
अप्रीति.
अंबु.
अंबुधि.
अब्धि.
अभक्ति.
अभिमन्यु.
अभिरुचि.
अभिविधि.
अभिवृद्धि.
अभिव्यक्ति.
अभिव्याप्ति.
अभिसंधि.
अभेद्भाक्ति.
अभ्रमु.
अमरतरु.
अमृत्यु.
अयाचितवृत्ति.
अरणि.
अराति.
अरि.
अरुचि.
अर्थबुद्धि.
अर्थसंगति.
अर्थसिद्धि.
अर्थापत्ति.
अर्धांगवायु.
अलि.
अल्पगति.
अल्पदृष्टि.
अल्पबुद्धि.
अल्पशक्ति.
अवगति.
अवंति.
अवधि.
अवनति.
अवनि.
अवस्तु.
अवस्थिति.
अवाप्ति.
अविधि.
अव्याप्ति.
अशनि.
अशुचि.
अशोधितधातु.
अश्रु.
अष्टप्रकृति.
अष्टवसु.
अष्टसिद्धि.
असंगति.
असद्वृत्ति.
असि.
असु.
अस्त्रतति.
अस्फूर्ति.
अस्थि.
अस्थिति.
अहंकृति.
अहंदेहबुद्धि.
अहंमति.
अहि.
अक्षरशत्रु.
अक्षांति
अक्षि.
अज्ञानबुद्धि.
आकारशुद्धि.
आकृति.
आखु.
आचारपद्धति.
आजानुबाहु.
आत्मगति.
आत्मप्रतीति.
आत्मप्राप्ति.
आत्मबंधु.
आत्मबुद्धि.
आत्मविधि.
आत्मशुद्धि.
आत्मस्तुति.
आत्मास्थिति.
आदरबुद्धि.
आदि.
आदिकवि.
आदिशक्ति.
आधि.
आनकदुंदुभि.
आनंदमूर्ति.
आनंदवृत्ति.
आनंदाश्रु.
आपत्ति.
आर्ति.
आलु. (ना. पु. कंद)
आवरणशक्ति.

आसनविधि.
आसनशुद्धि.
आसक्ति.
आसन्नसमाधि.
आसुरीसंपत्ति.
आस्तिक्यबुद्धि.
आहुति.
इच्छातृप्ति.
इच्छापूर्ति.
इत्यादि.
इंदु.
इंद्रियाविप्रतिपत्ति.
इषु.
इष्टापत्ति.
इष्टि.
इष्टराशि.
इक्षु.
ईति. (सातविपत्ती)
ईर्षालु.
ईश्वरकृति.
ईश्वरप्रीति.
ईश्वरभक्ति.
ईश्वरो वेवेत्ति.
उक्ति.
उंच्छवृत्ति.
उत्क्रांति.
उत्क्रांतिधेनु.
उत्तमगति.
उत्तरकुरु.
उत्तरगति.
उत्तरापति.
उत्थिति.
उत्पत्ति.

उत्साहबुद्धि.
उत्साहमूर्ति.
उत्साहशक्ति.
उदधि.
उदयगिरि.
उदरपूर्ति.
उदरंभरि.
उदरवृत्ति.
उदासस्थिति.
उन्नति.
उन्मत्तवायु.
उपकारस्तुति.
उपकारस्मृति.
उपकृति.
उपपत्ति.
उपमिति.
उपरति.
उपरिभूमि.
उपश्रुति.
उपस्थिति.
उपाधि.
उपास्ति.
उपेक्षाबुद्धि.
ऊर्ध्वगति.
ऊर्ध्वदृष्टि.
ऊर्ध्ववायु.
ऊर्मि.
ऋणमुक्ति.
ऋतु.
ऋद्धिसिद्धि.
ऋषि.
एकभुक्ति.
एकराशि.

एकविधाभक्ति.
एकेरी इष्टराशि (म+ सं)
एतदवधि.
एतावधि.
ओतु.
औषधि.
कटि.
कटु.
कंठमणि.
कंडु.
कदर्यु.
कनकाद्रि.
कपटमूर्ति.
कपटसिंधु.
कपटस्तुति.
कंपवायु.
कपि.
कफप्रकृति.
कंबु.
कमंडलु.
कमलापति.
करांगुलि.
करेणु.
कर्णकटु.
कर्णपालि.
कर्तरि.
कर्मगति.
कर्मबंधु.
कर्मभूमि.
कर्मविधि.
कलि.
कल्पतरु.

कल्पनाशक्ति.
कल्पनासृष्टि.
कल्पादि.
कवि.
कविताशक्ति.
कक्षापति.
काकदृष्टि.
काचबिंदु.
काचमणि.
कांति.
कामक्रोधलोभादि.
कामधेनु.
कामनापूर्ति.
कामभक्ति.
काम्यप्रीति.
काम्यभक्ति.
कामारि.
कारु (ना. पु. संस्कृत–कारागीर.)
कार्यसिद्धि.
कार्यनिष्पत्ति.
कालगति.
कालमूर्ति.
कालरात्रि.
कालिकवृद्धि.
काश्मिरीमूर्ति.
काळतिथि.
कीर्तनभक्ति.
कीर्ति.
कुकीर्ति.
कुटुंबकवि.
कुनीति.
कुबुद्धि.

कुभक्ति.
कुमति.
कुरीति.
कुलपति.
कुलरीति.
कुशाग्रबुद्धि.
कुसृष्टि.
कुक्षि.
कुक्षिभरि.
कूर्मदृष्टि.
कुलगति.
कृतकृत्यताबुद्धि.
कृतमुष्टि.
कृतांजलि.
कृति.
कृत्रिमभूमि.
कृत्रिमशत्रु.
कृपालु.
कृमि.
कृशानु.
कृषि.
कृष्णग्रंथि.
कृष्णतालु.
कृष्णमूर्ति.
कृष्णागरु.
कृति.
केतु.
केंद्रच्युति.
केलि.
कोटि.
कोट्यवधि.
कोशशुद्धि.
कोषवृद्धि.

कोष्ठशुद्धि.
क्रतु.
क्रांति.
क्रांतिपातगति.
क्रिमि.
क्रोधाग्नि.
क्लांति.
खनि.
खंडमेरु.
खंडवृष्टि.
खरतरशरवृष्टि.
खोलबुद्धि.
ख्याति.
गजगति.
गजपति.
गडपति.
गणपति.
गतशक्ति.
गतायु.
गति.
गभस्ति.
गर्भच्युति.
गर्भवायु.
गर्भशंकु.
गर्वोक्ति.
गव्यूति.
गहनगति.
गहनबुद्धि.
गालिप्रदानाविधि.
गिरि.
गीति.
ग्रीष्मऋतु.
गीष्पति.

गुणस्तुति.
गुरु.
गुरुप्रचीति.
गुरुबंधु.
गूढजत्रु. (विशेषण, सं.–गुबगुबीत).
गूढस्मृति.
गृहबुद्धि.
गृहभूमि.
गृहशांति.
गृहसंपत्ति.
गृहस्थिति.
गृह्याग्नि.
गेहेपटु.
ग्रंथि.
ग्रहगति.
ग्रहणि.
ग्रहशांति.
ग्लानि.
घाततिथि.
घृतधेनु.
घृतबुद्धि.
चक्रगति.
चक्रपाणि.
चक्रवृद्धि.
चक्षु.
चंचु.
चंडालवृत्ति.
चंडांशु
चतुष्षष्ठि.
चतुर्विधजाति.
चतुर्विधामुक्ति.
चंद्रज्योति.
चंद्रमणि.
चरणधूलि.
चरमयुक्ति.
चरमसूर्ति.
चराचरपति.
चर्मचक्षु.
चर्मदृष्टि.
चारु.
चिकीर्षु.
चिच्छक्ति.
चिताग्नि.
चिताभूमि.
चिंतामणि.
चित्तचमत्कृति.
चित्तनिर्वृत्ति.
चित्तवृत्ति.
चित्तशुद्धि.
चित्रलेखसृष्टि.
चित्राहुति.
चिरायु.
चैतन्यज्योति.
चैतन्यमूर्ति.
च्युति.
छत्रपति.
छवि.
छायानिधि.
छेकापन्हुति.
छेकोक्ति.
छेदनबिंदु.
जगद्गुरु.
जगत्पति.
जगत्प्रभु.
जगद्बंधु.
जघन्यवृत्ति.
जटायु.
जठराग्नि.
जडग्रंथि.
जडबुद्धि.
जडमति.
जंतु.
जननीति.
जनप्रवृत्ति.
जनरीति.
जनश्रुति.
जन्मप्रभृति.
जन्मभूमि.
जन्मराशि.
जंबु.
जमदग्नि.
जयदुंदुभि.
जयध्वनि.
जरत्कारु.
जरायु.
जलजंतु.
जलधि.
जलनिधि.
जलसमाधि.
जलांजुलि.
जागृति.
जाति.
जातिबंधु.
जानु.
जाबालि.
जिगीषु.
जिष्णु.
जिज्ञासु.

जीवजंतु.
जीवनमुक्ति.
जीवनयोनि.
जीवनहेतु.
जीवयोनि.
जीवसृष्टि.
जुत्पति (युद्धपती-चा अपभ्रंश)
जेनबुद्धि (जेन+बुद्धि=मंदमती)
ज्योति.
ज्वरसृष्टि.
ज्वालाग्राहीवायु.
तक्काधिपति.
तति.
तंतु.
तदाकारवृत्ति.
तंद्रालु.
तनु.
तपोनिधि.
तमारि.
तरणि.
तरक्षु.
तरु.
तरुणास्थि.
ताटस्थवायु.
तालु.
तिथि.
तिथिवृद्धि.
तिर्यग्योनि.
तिलांजलि.
तीर्थवृद्धि.
तुष्टि.

तृणजाति.
तृणमणि.
तृणशत्रु.
तृतीयाप्रकृति.
तृप्ति.
तेजोनिधि.
तेजोवृद्धि.
तैलबुद्धि.
त्रसरेणु. (ना. पु+स्त्री. संस्कृत=सूर्य-किरणांतील दृश्य परमाणू)
त्रिमूर्ति.
त्रिशंकु.
त्रिशुद्धि
त्रिसंधि.
त्रुटि.
त्रैलोक्यचिंतामणि.
दग्धातिथि.
दंडनीति.
दंडपाणि.
दंतकांति.
दंतपंक्ति.
दंतशुद्धि.
दंतावलि.
दद्रु (ना. पु. सं. रोग-विशेष).
दधि.
दयानिधि
दयाब्धि.
दयालु.
दयोक्ति.
दशमभ्रांति.

दारु.
दावाग्नि.
दिति.
दिनमणि.
दिनवृद्धि.
दिनशुद्धि.
दिवाकीर्ति,
दिव्यचक्षु.
दिव्यवपु,
दिव्यसुमनवृष्टि.
दीनबंधु.
दीपावलि.
दीप्ति.
दीर्घदृष्टि.
दीर्घवर्तुलाकृति.
दीर्घायु.
दुग्धोदधि.
दुंदुभि.
दुरुक्ति.
दुर्गति.
दुर्बुद्धि.
दुर्मति.
दुर्वृत्ति.
दुष्कीर्ति.
दुष्कृति.
दुष्टबुद्धि.
दूरदृष्टि.
दृढमुष्टि.
दृढसंधि.
दृष्टि.
देवकृति.
देवतरु.
देवदारु.

देवबुद्धि.
देवभक्ति.
देवभूमि.
देवमणि.
देवमति.
देवयोनि.
देवर्षि.
देहदृष्टि.
देहबुद्धि.
दैवगति.
दैवीसंपत्ति.
दैवीसृष्टि.
दोषदृष्टि.
द्रव्यदृष्टि.
द्विगु.
द्विजाति.
द्विरावृत्ति.
द्विरुक्ति.
द्युति.
द्युमणि.
द्रुति.
द्वेषबुद्धि.
धनाधिपति.
धनु.
धनुष्कोटि.
धन्वंतरि.
धर्मजिज्ञासु.
धर्मनिष्पत्ति.
धर्मबंधु.
धर्मबुद्धि.
धर्मसंतति.
धर्मोन्नति.
धातु.

धारणापटु.
धारावाहिकबुद्धि.
धूमकेतु.
धूमाग्नि.
धूर्जटि.
धूलि.
धृति.
धृष्टकेतु.
धेनु.
ध्रुवोन्नति.
ध्वनि.
नति.
नदीपति.
नम्रबुद्धि.
नरतनु.
नरपशु.
नरबलि.
नवति (नवल)
नवनिधि.
नवविधाभक्ति.
नाकर्षि.
नाभि.
नामधातु.
नामावलि.
नारायणबलि.
निष्कामबुद्धि.
निजमूर्ति.
निजवस्तु.
नित्यजागृति.
नित्यविधि.
निद्रालु.
निधि.
निपोतशांति.

(नि+पोत=पुत्र+शांति =निसंतान, वाटोळें)
निरवधि.
निरुक्ति.
निरुपाधि.
निर्ऋति.
निर्बुद्धि.
निर्मोहि.
निर्युक्ति.
निर्वृत्ति.
निवृत्ति.
निश्चिति.
निषेधवृत्ति.
निष्क्रांति.
निष्कृति.
निष्पत्ति.
नीति.
नीवि.
नृपति
न्यायनीति.
पंक्ति.
पंगु
पंचकोटि.
पंचगति.
पंचांगशुद्धि.
पंचाग्नि.
पटु.
पति.
पदाति.
पद्धति.
पद्मयोनि.
पद्यरत्नावलि.
पयोधि.

परक्रांति.
परत्रगति.
परपाकरुचि.
परमक्रांति.
परमगुरु.
परमागति.
परमाणु.
परमायु.
परमार्थबुद्धि.
परमार्थदृष्टि.
परमावधि.
परमोन्नति.
परवस्तु.
परशु.
परान्नरुचि.
परावृत्ति.
परिणति.
परिपूर्ति.
परिमिति.
परिसमाप्ति.
परिस्थिति.
पर्याप्ति.
पर्वसंधि.
पाल्हि.
पवनारि.
पवि.
पशु.
पशुपति.
पश्चिमबुद्धि.
पश्चिमवायु.
पक्षवायु.
पक्षिपति.
पाऊलबुद्धि. (प्रत्येक पावलीं विचार करणारा, चंचल बुद्धीचा)
पांक्तोपस्थिति. (प्रत्येक ओळीचें ज्ञान असणे)
पाठशक्ति.
पांडु.
पाणि.
पापबुद्धि.
पापमति.
पापभीरु.
पापमूर्ति.
पापराशि.
पालि.
पांसु.
पितृतिथि.
पितृभक्ति.
पित्तप्रकृति.
पित्तवायु.
पिशाचाधिपति.
पीलभक्ति.
पुण्यकीर्ति.
पुण्यतिथि.
पुत्रदृष्टि.
पुत्रेष्टि.
पुनरपि.
पुनरावृत्ति.
पुनर्वसु.
पुंव्यक्ति.
पुष्परेणु.
पुष्पवृष्टि.
पुष्पांजलि.
पूजाविधि.
पूर्णाहुति.
पूर्ति.
पूर्ववस्ति.
पूर्वस्थिति.
पृथु.
पोरबुद्धि.
प्रकृति.
प्रख्याति.
प्रजापति.
प्रजोत्पत्ति.
प्रणति.
प्रतिकृति.
प्रतिध्वनि.
प्रतिनिधि.
प्रतिविधि.
प्रतीति.
प्रत्युक्ति.
प्रथिति. (ना. स्त्री. सं. लौकिक)
प्रभागजाति. (ना. स्त्री सं. संयुक्त अपूर्णांक)
प्रभु.
प्रभुशक्ति.
प्रभृति.
प्रमिति.
प्रत्युक्ति.
प्रवृत्ति.
प्रश्नावलि.
प्रसक्ति.
प्रसंगसिद्धि.
प्रसिद्धि.

प्रसूति.
प्रसृति.
प्रलयाग्नि.
प्रज्ञाचक्षु.
प्राणपति.
प्राणवायु.
प्राणवृत्ति.
प्राणांतबुद्धि.
प्रातर्विधि.
प्राप्ति.
प्रारब्धगति.
प्रियंगु.
प्रीति.
प्रेतभूमि.
प्रेमळस्थिति.
प्रेमाश्रु.
प्रौढि.
प्लुति.
फलश्रुति.
फलोत्पत्ति.
बटु.
बद्धमुष्टि.
बद्धांजलि.
बद्धायु.
बंधु.
बलि.
बहिर्प्रकृति.
बहिःप्रीति.
बहिष्कृति.
बहु.
बहुव्रीहि.
बाईलबुद्धि.
बाहु.

बाह्यस्थिति.
बालदृष्टि.
बिंदु.
बिरुदावलि,(ना.स्त्री. सं. श्रेष्ठपणाच्या खु-
णाची मालिका)
बिसतंतु.
बीभत्सु (अर्जुन)
बुद्धबृहस्पति.
बुद्धि.
बुभुक्षु.
बृहस्पति.
ब्रह्मप्राप्ति.
ब्रह्मबंधु.
ब्रह्मबिंदु.
ब्रह्मयोनि.
ब्रह्मरात्रि.
ब्रह्मर्षि.
ब्रह्मसृष्टि.
ब्राह्मणादिकजाति.
ब्राह्मीसंपत्ति.
ब्राम्हीस्थिति.
भक्ति.
भगवृत्ति.
भडाग्नि.
भयप्रीति.
भयभक्ति.
भवति न भवति.
भवभूति.
भवाब्धि.
भागजाति.
भानु.
भावभक्ति.

भावसंधि.
भिकारबुद्धि.
भिक्षु.
भीति.
भीरु.
भुक्ति.
भुवनेश्वरिशांति.
भूतशुद्धि.
भूतसृष्टि.
भूति.
भूपति.
भूमि.
भूमिति.
भृति.
भेददृष्टि.
भेदबुद्धि.
भोगपति.
भोगभूमि.
भोगमूर्ति.
भोजनविधि.
भ्रांति.
भ्रुकुटि.
मंगलमूर्ति.
मंडलाकृति.
मणि.
मति.
मंत्रपुष्पांजलि.
मंत्रशक्ति.
मंत्रसिद्धि.
मंत्राग्नि.
मंदगति.
मंदबुद्धि.
मंदमति.

मंदाग्नि.
मधु.
मधुयष्टि.
मनश्शांति.
मनःस्थिति.
मनु.
मनुष्यहानि.
मनोगति.
मनोवृत्ति.
ममतालु.
मरु.
मलशुद्धि.
मल्लारि.
महति.
महर्षि.
महापत्ति.
महाबलि.
महामणि.
महामति.
महामृत्यु.
महारात्रि.
महाव्याधि.
महाशिवरात्रि.
महासिद्धि.
महीपति.
मांगल्यतंतु.
मातलि.
मातृबंधु.
मानससृष्टि.
मानहानि.
मानेच्छु.
मायालु.
मायिकवृत्ति.

मारुति.
मिति.
मिथ्यात्वोपपत्ति.
मुखशुद्धि.
मुमुक्षु.
मुमूर्षु.
मुरारि.
मुष्टि.
मूढमति.
मूत्रग्रंथि.
मूर्ति.
मूलप्रकृति.
मृगपति.
मृगनाभि.
मृततिथि.
मृति. (ना. स्त्री. सं. मरण)
मृत्तिकाबुद्धि.
मेदोग्रंथि.
मेदोवृद्धि.
मेरु.
मृत्यु.
मृदु.
मोतीबिंदु.
मोदराशि.
मोक्षगुरु.
मौलि.
यति.
यष्टि.
यष्टिमधु.
यशोदुंदुभि.
यज्ञपशु.
याचकवृत्ति.

युक्ति.
युगादि.
यति.
युवति.
योनि.
रक्तधातु.
रक्तवृद्धि.
रंगभूमि.
रंगमूर्ति.
रज्जु.
रणभीति.
रणभूमि.
रति.
रश्मि.
रससंपत्ति.
रससिद्धि.
रसहानि.
रसोत्पत्ति.
राजक्रांति.
राजनीति.
राजपद्धति.
राजरीति.
राजावलि.
रात्रि.
रावणि
राशि.
राहु.
रक्तपाणि.
रिद्धि.
रिद्धिसिद्धि.
रिपु.
रीति.
रीतिस्थिति.

रुचि.
रुद्रबलि.
रुद्रभूमि.
रुद्रयोनि.
रूपावलि.
रूढि.
रेणु.
रोमहर्षवायु.
रोमावलि.
लखपति. (ना. पु. म+सं. लक्षाधीश.)
लग्नशुद्धि.
लघु.
लड्डु.
लब्धस्मृति.
लब्धि.
लक्षावधि.
लाभदृष्टि.
लिपि.
लिप्सु.
लोकनीति.
लोकप्रवृत्ति.
लोकबंधु.
लोकरीति.
लौकिकरीति.
वक्रगति.
वक्रदृष्टि.
वक्रोक्ति.
वज्रबुद्धि.
वज्रमुष्टि.
वडवाग्नि.
वतनबंधु.
वनपशु.
वनस्पति.
वपु.
वर्णसंधि.
वर्षर्तु.
वर्षवृद्धि.
वल्लि.
वंशवृद्धि.
वंशावलि.
वसति.
वसनग्रंथि.
वसु.
वस्ति (ना. स्त्री. सं. बेंबीखालचा भाग)
वस्तु.
वस्तुशक्ति.
वस्तुस्थिति.
वन्हि.
वाक्पटु.
वाक्शक्ति.
वाक्सिद्धि.
वाग्वधु.
वाचस्पति.
वाचाशक्ति.
वांझतिथि. (ना. स्त्री. म+सं. ज्या तिथीस काहीं एक संस्कार करावयाचा नसतो ती.)
वातप्रकृति.
वातव्याधि.
वांति.
वानरदृष्टि.
वामकुक्षि.
वामनमूर्ति.
वायु.
वाल्मीकि.
वासरमणि.
वासवि.
वास्तु.
वास्तुशांति.
विकलमति.
विकृति.
विख्याति.
वितस्ति.
विदेहस्थिति.
विद्यागुरु.
विद्याबंधु.
विद्रधि. (सं. एका प्रकारचा रोग)
विधि.
विधिवृत्ति.
विधु.
विधुमणि.
विधुराग्नि.
विनंति.
विपत्ति.
विप्रविपत्ति.
विभक्ति.
विभु.
विभूति.
विमति.
विमुक्ति.
वियुक्ति.
विरक्ति.
विरति.
विरहाग्नि.

विरोधभक्ति.
विंशति.
विशुद्धि.
विशेषोक्ति.
विश्रांति.
विश्लेषजाति.
विश्वव्याप्ति.
विश्वामित्रसृष्टि.
विश्वासनिधि.
विषदृष्टि.
विषालु.
विषु.
विष्टि. (ना. स्त्री. सं. पैसा न देतां कामगिरी करून घेणे; सातवा करण)
विष्णु.
विष्णुबलि.
विस्तृति.
विस्मृति.
विज्ञप्ति.
विज्ञानसंतति.
विज्ञाप्ति.
वीरमुनि.
वृत्तपालि.
वृत्ति.
वृद्धि.
वृष्टि.
वेणु.
वेतसवृत्ति.
वेत्रपाणि.
वेदमूर्ति.
वैधृति.
वैय्यर्थ्यापत्ति.
वैरशुद्धि.
व्यक्ति.
व्यंग्योक्ति.
व्यतिरेकव्याप्ति.
व्ययबुद्धि.
व्यष्टि.
व्याजस्तुति.
व्याजोक्ति.
व्याधि.
व्याप्ति.
व्याप्यकोटि.
व्याप्यवृत्ति.
व्यावृत्ति.
व्यासज्यवृत्ति. (वि. सं. दोन अथवा अधिक विषयांना लागू पडणारे)
व्याहृति.
शंकु.
शकुनि.
शक्ति.
शंखध्वनि.
शंखमणि.
शतकोटि.
शतक्रतु.
शतायु.
शत्रु.
शनि.
शब्दध्वनि.
शब्दयोनि.
शब्दशक्ति.
शब्दशुद्धि.
शंभु.
शरधि.
शरीरकांति.
शरीरप्रकृति.
शरीरयष्टि.
शरीरसंपत्ति.
शस्त्रपाणि.
शांति.
शांतिजलधि.
शाब्दिकसृष्टि.
शालि (ना. स्त्री+पु. सं. तांदुळाचें भात)
शास्त्रव्युत्पत्ति.
शिखरमणि.
शिखामणि.
शिलोंच्छवृत्ति.
शिवधातु.
शिवरात्रि.
शिशु.
शीघ्रकवि.
शीघ्रबुद्धि.
शीतभानु.
शुक्ति.
शुक्रयुति.
शुक्लवृत्ति.
शुचि.
शुद्धप्रीति.
शुद्धमति.
शुद्धवृत्ति.
शुद्धि.
शुष्केष्टि.
शून्यलब्धि.
शृंगऋषि.

शेषजाति.
शेषपूर्ति.
शोधकबुद्धि.
शौचाविधि.
श्मशानभूमि.
श्मश्रु.
श्रद्धाभक्ति.
श्रद्धालु.
श्रांति (ना. स्त्री. थकवा)
श्रीपति.
श्रुति.
श्रुतिकटु.
श्रेणि.
श्रोणि.
श्लेषोक्ति.
श्ववृत्ति.
श्वानवृत्ति.
षडूर्मि.
षड्रिपु.
षड्ऋतु.
षड्बाहु.
षाष्ठ.
सक्ति.
सक्तु.
संक्रांति.
संगति.
संग्रहणि.
संघशक्ति.
सजाति.
संतति.
संतानवृद्धि.
संतावलि.
सत्कृति.
सत्तानिवृत्ति.
सत्यापत्ति.
सत्वमूर्ति.
सत्वशुद्धि.
सत्वहानि.
संदर्भशुद्धि.
सद्गति.
सद्गुरु.
सद्बुद्धि.
सद्वस्तु.
संधि.
सनाभि.
सन्नाति.
सन्मति.
संपत्ति.
संपातबिंदु.
संपीति (ना. स्त्री. सं. एकत्र पिणे)
सप्तऋषि.
सप्तति.
सप्तधातु.
सप्तप्रकृति.
सप्तविधाप्रकृति.
सप्तर्षि.
सप्ताद्रि.
संप्राप्ति.
सप्रेमभक्ति.
संबुद्धि.
सभानीति.
सभाभीति.
सभाभीरु.
सभास्फूर्ति.
संभूति.
संमति.
समदृष्टि.
समधातु.
समबुद्धि.
सममिति.
समयस्फूर्ति.
समरभूमि.
समवृत्ति.
समशंकु.
समष्टि.
समाधि.
समानवृत्ति.
समाप्ति.
समृद्धि.
सम्यग्वृत्ति.
संयुक्तधातु.
संयुति.
संयोगभूमि.
सराणि.
सरूपतामुक्ति.
सर्जि. (ना. स्त्री सं. एकाप्रकारचा क्षार. सज्जीक्षार)
सर्पमणि.
सर्पारि.
सर्वसिद्धि.
सर्वौषधि.
संवत्सरवृद्धि.
संवृद्धि.
संशयनिवृत्ति.
संशयालु.
संशुद्धि.

संशृति (ना. स्त्री. सं. आश्रय)
संसक्ति.
संसिद्धि.
संसृति.
संसृष्टि.
संस्कृतोक्ति.
संस्थिति.
सहजशत्रु.
सहजस्थिति.
सहजारि.
सहनशक्ति.
सहस्रबाहु.
सहस्त्ररश्मि.
सहस्त्रावधि.
सहानुभूति.
सहिष्णु.
सहेतु.
सहोक्ति.
सह्याद्रि.
संक्षेपोक्ति.
सात्याकि.
साधु.
साधुवृत्ति.
साध्यास्थिति.
सारथि.
सारि. (ना. स्त्री. सं. सोंगटी)
सितधातु.
सिंधु.
सिद्धि.
सीताशुद्धि.
सुखोत्पत्ति.
सुगति.
सुगंधि.
सुतनु.
सुधापाणि.
सुधांशु.
सुनीति.
सुप्ति.
सुबुद्धि.
सुभाक्ति.
सुमेरु.
सुयुक्ति.
सुरंगधातु.
सुरगुरु.
सुराभि.
सुरासिंधु.
सुवृष्टि.
सुषुप्ति.
सुस्थिति.
सूति.
सूनु.
सूर्यमणि.
सूक्ष्मदृष्टि.
सूक्ष्मबुद्धि.
सृष्टि.
सेतु.
सेनापति.
सेनाधिपति.
सोहंमूर्ति.
सौभाग्यतंतु.
स्खलितगति.
स्तुति.
स्त्रीबुद्धि.
स्थलशुद्धि.
स्थाणु.
स्थिति.
स्थितिरीति.
स्थिरबुद्धि.
स्थूलबुद्धि.
स्नानविधि.
स्नायु.
स्नेहबुद्धि.
स्नेहानुवृत्ति.
स्पर्धालु.
स्पर्शमणि.
स्पष्टक्रांति.
स्पष्टपरिधि.
स्पष्टप्रतिपत्ति.
स्पृहयालु.
स्फीति.
स्फूर्ति.
स्मृति.
स्मृतिहेतु.
स्वजाति.
स्वज्योति.
स्वतःसिद्धवस्तु.
स्वत्वनिवृत्ति.
स्वत्वहानि.
स्वत्वहेतु.
स्वत्वोत्पत्ति.
स्वदेशपरिधि.
स्वदेशमध्यपरिधि.
स्वनि.
स्वप्नसृष्टि.
स्वयंज्योति.
स्वयमुक्ति. (जवानी)
स्वरुचि.

स्वरूपप्राप्ति.
स्वरूपस्थिति.
स्वर्गगति.
स्ववृत्ति.
स्वार्थबुद्धि.
स्वार्थसिद्धि.
स्वादु.
स्वैरगति.
हनु.
हरयुक्ति. (हर फा. =प्रत्येक+युक्ति)
हरि.
हरिन्मणि.
हर्षवायु.
हल्संधि.
हवि.
हंसगति.
हानि.
हिंगु.
हितबुद्धि.
हितशत्रु.
हिमांशु.
हिंसालु.
हीनजाति.
हीनशक्ति.
हृदयालु.
हेतु.
हेमंतऋतु.
हेमाद्रि.
हेलि.
होमाग्नि.
ऱ्हस्वमूर्ति.
क्षणबुद्धि.
क्षणावधि.
क्षणिकबुद्धि.
क्षतदृष्टि.
क्षतवृत्ति.
क्षति.
क्षयतिथि.
क्षयवृद्धि.
क्षयिष्णु.
क्षांति.
क्षिति.
क्षीणशक्ति.
क्षीणायु.
क्षुद्रदृष्टि.
क्षेत्रभूमि.
क्षेत्रराशि.
ज्ञप्ति.
ज्ञाति.
ज्ञानचक्षु.
ज्ञानदीप्ति.
ज्ञानदृष्टि.
ज्ञानमूर्ति.
ज्ञानवायु.

परिशिष्ट २ रें.

ईय प्रत्यय लागून बनलेले शुद्ध संस्कृत शब्द.

एकदेशीय.
एकीय.
कमनीय.
करणीय.
कर्त्तनीय.
कल्पनीय.
काकतालीय.
कीर्त्तनीय.
खंडनीय.
खननीय.
गणनीय.
गमनीय.
गर्हणीय.
गलनीय.
गुणनीय.
गोपनीय.
ग्रंथीय.
ग्रहणीय.
चिकित्सनीय.
चिंतनीय.
छेदनीय.
जातीय.
जिह्वामूलीय.
तदीय.
त्यजनीय.
त्वदीय.
दंडनीय.

दमनीय.
दर्शनीय.
दहनीय.
दुर्विभावनीय.
दूषणीय.
देशीय.
दोहनीय.
नगरीय (नगरसंबंधी).
नारकीय (नरकसंबंधी).
निंदनीय.
निरूपणीय.
निर्धारणीय.
निर्वचनीय.
निर्वहणीय.
निवारणीय.
निवेदनीय.
पठनीय.
पतनीय.
परकीय.
परिगणनीय.
परिधानीय.
पर्वतीय (पर्वतसंबंधी).
पुत्रीय.
पूजनीय.
पोषणीय.
प्रशंसनीय.
प्रार्थनीय.
प्राशनीय.
बोधनीय.
भजनीय.

भवनीय.
भक्षणीय.
भावनीय.
भेदनीय.
भोजनीय.
भ्रात्रीय.
मदीय.
माननीय.
मिश्रणीय.
यदीय.
याचनीय.
रमणीय.
रक्षणीय.
राजकीय.
राष्ट्रीय.
लेखनीय.
वचनीय.
वंदनीय.
वधूपक्षीय.
वरणीय.
वरपक्षीय.
वर्गीय.
वर्जनीय.
वर्णनीय.
वर्त्तनीय.
वर्धनीय.
वंशीय.
वहनीय.
वांच्छनीय.
वारणीय.
विचारणीय.
विजातीय.
विदारणीय.

विभजनीय.
विभावनीय.
विलोकनीय.
विवेचनीय.
विश्वजनीय.
विश्वसनीय.
विज्ञापनीय.
वैत्रकीय (वेतां भरलेला).
वेधनीय.
वेष्टनीय.
शंकनीय.
शयनीय.
शासनीय.
शास्त्रीय.
शिक्षणीय.
शोचनीय.
शोधनीय.
शोषणीय.
श्रवणीय.
श्रोत्रीय.
श्लाघनीय.
सजातीय.
सन्माननीय.
संभावनीय.
समर्थनीय.
संरक्षणीय.
सहनीय.
साधनीय.
सेवनीय.
स्तवनीय.
स्थापनीय.
स्नानीय.

स्पर्शनीय.
स्पृहणीय.
स्मरणीय.
स्वकीय.
स्वजातीय.
स्वर्गीय.
स्वस्रीय (बहिणीचा मुलगा).
स्वीकरणीय.
हननीय.
हरणीय.
ज्ञापनीय.

परिशिष्ट ३ रें.

इक प्रत्यय लागून बनलेल्या शुद्ध संस्कृत शब्दांचा उपांत्य नेहमीं ऱ्हस्व लिहावयाचा तेः—

अकारणिक.
अनुभविक.
अप्रासंगिक.
अरसिक.
अलौकिक.
आकस्मिक.
आकालिक.
आत्यंतिक.
आधिदैविक.
आधिभौतिक.
आधुनिक.
आध्यात्मिक.
आनुमानिक.
आनुषंगिक.
आन्हिक.
आमुष्मिक.
आलंकारिक.
एककालिक.
एकांशिक.
ऐकाहिक.
ऐच्छिक.
ऐतिहासिक.
ऐंद्रजालिक.
ऐष्टिक.
ऐहलौकिक.
ऐहिक.
औत्पादिक.
औत्सर्गिक.
औद्योगिक.
औद्धारिक.
और्ध्वदेहिक.
औपचारिक.
औपरोधिक.
औपसर्गिक.
औपाधिक.
कापालिक.
कायिक.
कारुणिक
काल्पनिक.
केवलनैयायिक.
कौलिक (कुलाच्या संबंधाने)
क्रमिक.
गाथिक.
ग्रांथिक.
चमत्कारिक.
चांद्रिक.
जांगुलिक.
तात्कालिक.
तांत्रिक.
तात्विक.
तार्किक.
त्रैकालिक.
त्रैमासिक.
त्रैलोकिक.
त्रैवर्गिक.
त्रैवार्षिक.
त्र्याहिक (तीन दिवसांचा ज्वर वगैरे)
दांभिक.
दीर्घकालिक.
दुर्लौकिक.
दाशिक.
दैविक.
दैशिक.
दैहिक.
द्व्याहिक. (दोन दिवसांचा ज्वर वगैरे)

किंवा दिवसांतून दोनदा येणारा ज्वर)
धनिक.
धार्मिक.
नवरसिक.
नागरिक.
नाविक.
नित्यनैमित्तिक.
निर्मायिक.
नैतिक.
नैमित्तिक.
नैयमिक.
नैयायिक.
नैष्ठिक.
नैसर्गिक.
पारत्रिक.
पारदारिक.
पारंपरिक.
पारमार्थिक.
पारलौकिक.
पारितोषिक.
पारिभाषिक.
पाक्षिक.
पैत्तिक.
पौराणिक.
प्रतिवार्षिक.
प्रतिसांवत्सरिक.
प्राकरणिक. (प्रकरण अथवा विषय ह्या संबंधानें)
प्राकृतिक.
प्रातिमासिक.

प्रात्ययिक.
प्राथमिक.
प्रापंचिक.
प्रामाणिक.
प्रामादिक.
प्रायिक. (वि. साधारण)
प्राश्निक.
प्रासादिक.
प्रास्ताविक.
प्रास्थानिक
भौतिक.
मांगलिक.
मांडलिक.
मांत्रिक.
माध्यान्हिक.
मानसिक.
मायिक.
मार्मिक.
मासिक.
मौक्तिक.
यांत्रिक.
याथार्थिक.
याज्ञिक.
यौक्तिक.
रसिक
लाक्षणिक.
लौकिक.
वाचानिक.
वाचिक.
वातिक. (वातासंबंधी.)
वार्धुषिक.

वार्षिक.
वांशिक.
वास्तविक.
वैकल्पिक.
वैतालिक.
वैदिक.
वैरंगिक.
वैवाहिक.
वैशेषिक.
वैषयिक.
व्यावहारिक.
शतवार्षिक.
शाब्दिक.
शारीरिक.
शाश्वतिक.
श्लैष्मिक.
सर्वांशिक.
ससंबंधिक.
संक्षेपिक.
सांकल्पिक.
सांकेतिक.
सांक्रमिक.
सांग्रामिक.
सात्विक.
सानुनासिक.
सान्निपातिक.
सांपत्तिक.
सांप्रदायिक.
सामयिक.
सामरिक.
सामवायिक.
सामाजिक.
सामासिक.

सामुदायिक. सामुद्रिक. सार्वकालिक. सार्वजनिक. सार्वत्रिक. सार्वभौतिक. सार्वलौकिक.
सांवत्सरिक. सांशयिक. सांसर्गिक. सांसारिक. साहजिक. साहसिक. सुवासिक.
सैद्धांतिक. सोपाधिक. सौमिक(चंद्रासंबंधी) स्थानिक. स्थायिक. स्वाभाविक. स्वारासिक. क्षणिक.

परिशिष्ट ४ थें.

इत प्रत्यय लागून झालेले शुद्ध संस्कृत शब्द. (ह्यांचा उपांत्य नेहमीं ऱ्हस्व लिहावयाचा).

अकथित. अकल्पित. अंकित. अकुंठित. अखंडित. अगणित. अघटित. अचलित. अचिंतित. अचुंबित. अतर्कित. अंतर्गर्भित. अतिशयित. अनन्वित. अनपेक्षित. अनियमित. अनुकंपित. अनुचित. अनुमित. अनुमोदित.
अन्यजन्मार्जित. अन्यायोपार्जित. अन्वित. अपंडित. अपरक्षित. अपसारित. अपेक्षित. अबाधित. अभिमंत्रित. अरण्यपंडित. अरक्षित अर्जित. अर्धोन्मीलित. अर्पित. अलक्षित. अवगुंठित. अवधारित. अवलंबित. अवलोकित. अवाहित.
अविवाहित. अविविक्षित. अव्यवस्थित. अव्यवहारित. अशित. अंशित. अशिक्षित. असंभावित. अस्खलित. आकर्णित. आकर्षित. आकलित. आचरित. आनंदित. आमोदित. आराधित. आरोपित. आलिंगित. आलोडित. आशंकित.

आश्वासित.
आसादित.
आल्हादित.
आज्ञापित.
ईश्वरनियमित.
ईहित.
उचित.
उच्चारित.
उच्छेदित.
उज्ज्वलित.
उज्झित.
उत्कंठित.
उत्तेजित.
उत्थापित.
उत्प्रेक्षित.
उत्सर्जित.
उत्साहित.
उद्घाटित.
उद्यापित.
उद्वाहित.
उन्मीलित.
उपपादित.
उपमित.
उपलक्षित.
उपस्थापित.
उपहसित.
उपार्जित.
उपासित.
उपेक्षित.
उपोषित.
उभयान्वित.
उल्लंघित.
उल्लसित.

ऊनित. (कमी झालेलें)
ऋणमोचित.
कथित.
कंपित.
कलंकित.
कलुषित.
कल्पित.
कामपीडित.
कामव्यथित.
कामान्वित.
कांक्षित.
कीर्तित.
कुंठित.
कुत्सित (निंदित.)
कुपित.
क्रोधान्वित.
खचित.
खंडित.
खनित.
खेदित.
गगनचुंबित.
गणित.
गर्जित.
गर्भगलित.
गर्भपंडित.
गर्भित.
गर्वित.
गर्हित.
गलित.
गुणित.
गुपित.
गुंफित.

गेहेपंडित.
गोपित.
ग्रथित.
ग्रसित.
घटित.
घर्षित.
घूर्णित.
चकित.
चक्रांकित.
चरित.
चर्चित.
चर्वित.
चलित.
चालित.
चिकीर्षित.
चिंतित.
चित्रित.
चिन्हित.
चुंबित.
चेष्टित.
छेदित.
जनित.
जन्मलिखित.
जर्जरित.
जीवित.
जुगुप्सित.
ज्वरित.
ज्वलित.
तर्पित.
तर्षित.
ताडित.
तापित.
तारित.

तृषित.
तेजित.
त्रासित (भेवडविलेला.)
त्रोटित.
त्वरित.
दंडित.
दामित.
दयापूरित.
दयाभरित.
दरिद्रित.
दर्शित.
दलित.
दंशित.
दापित.
दाहित.
दिग्दर्शित.
दीक्षित.
दुःखित.
दूषित.
दोहित.
द्योतित.
द्विगुणित.
द्वेषित.
धातुसाधित.
धूपित.
ध्वनित.
ध्वंसित.
नभश्चुंबित.
नमस्कारित.
नवांकित.
नादित.
नामांकित.

निग्रहित.
निचेष्टित.
निंदित.
निद्रित.
निपठित.
निपातित.
निमंत्रित.
नियमित.
नियंत्रित.
निरासित.
निरीक्षित.
निरूपित.
निर्गलित.
निर्दलित.
निर्धारित.
निर्भर्त्सित.
निर्मित.
निवर्तित.
निवारित.
निवेदित.
निषेधित.
निष्कासित.
निस्सारित.
पठित.
पंडित.
पणित. (वचन दिलेलें, कबूल केलेलें.)
पतित.
परिपालित.
परिमार्जित.
परिमित.
परिवर्जित.

परिवेष्टित.
परिशीलित.
परीक्षित.
परोपदेशपंडित.
पर्युषित.
पलायित.
पलित.
पल्लवित.
पवित्रित.
पाचित.
पालित.
पीडित.
पुलकित.
पुष्पित.
पूजित.
पूरित.
पूर्णांकगणित.
पोषित.
प्रकटित.
प्रकाशित.
प्रचलित
प्रचारित
प्रज्वालित.
प्रतारित.
प्रतिध्वनित.
प्रतिपादित.
प्रतिपालित.
प्रतिबिंबित.
प्रथित.
प्रदर्शित.
प्रमित.
प्रमुदित.
प्रमोहित.

प्रमोदित.
प्रलोभित.
प्रवर्तित.
प्रवाहपतित.
प्रसादित.
प्रसारित.
प्रस्थापित.
प्रस्फुटित.
प्रापित.
प्रारिप्सित (आरंभि-
लेलें)
प्रार्थित.
प्राशित.
प्रेरित.
प्रेषित.
प्रेक्षित.
प्रोत्साहित.
प्रोषित.
प्रोक्षित.
फलित.
बाधित.
बीजगणित.
बुद्ध्यंकित.
बुभुक्षित.
बोधित.
ब्रम्हलिखित.
भणित.
भयपीडित.
भरित.
भर्जित.
भर्त्सित.
भक्षित.
भाजित.

भावगर्भित.
भावचलित.
भावित (कल्पना के-
लेलें.)
भाषापंडित.
भाषित.
भिक्षित.
भूषित.
भ्रंशित.
मंडित.
मंत्रित.
मथित.
मनःकल्पित.
मर्दित.
मानित
मापित.
मित.
मिश्रगणित.
मिश्रित.
मीलित.
मुंडित.
मुदित.
मुद्रित.
मोचित.
मोदित.
मोहित.
यंत्रित.
याचित.
योजित.
रचित.
रंजित.
रणपंडित.
रत्नखचित.

रत्नजडित.
रसभरित.
रहित.
रक्षित.
राशिघटित.
रुदित.
रेखागणित.
रेचित(रिकामें केलेलें)
रोपित.
रोमांचित.
लज्जित.
लंबित.
लक्षित.
लांच्छित.
लालित.
लिखित.
लुलित (कंप पावलेलें)
लेखित.
वंचित.
वंदित.
वर्गित.
वर्जित.
वर्णित.
वर्त्तित.
वर्धित.
वर्षित.
वलयित.
वलयांकित.
वंशानुचरित.
वहित (नेलेलें)
वाक्पंडित.
वांच्छित.
वादित.

वापित (पेरलेलें)
वारित.
वासित.
विकंपित.
विकर्षित.
विकसित.
विकासित.
विगलित.
विघटित.
विघ्नित.
विचारित.
विजित.
विडंबित.
वितर्कित.
विदारित.
विदित.
विधिसंकोचित.
विध्वंसित.
विनाशित.
विनियोजित.
विभागित.
विभावित.
विभूषित.
वियोजित.
विरचित.
विराहित.
विलंबित.
विलसित.
विलेपित.
विलोकित.
विवार्जित.
विवक्षित.
विवाहित.
विवेचित.
विशेषित.
विशोभित.
विश्वसित.
विसर्जित.
विस्तारित.
विव्हलित.
विज्ञापित.
वीक्षित.
वेदित.
वेधित.
वेष्टित.
व्यभिचरित.
व्ययशंकित (चिक्कू)
व्ययित (खर्च केलेलें)
व्यवकलित. (वजा केलेलें)
व्यवसित.
व्यवस्थापित.
व्याधित.
व्यापित.
व्युत्क्रममिश्रगणित.
व्रणित.
व्रीडित.
शंकित.
शब्दसाधित.
शद्बित.
शापित.
शासित.
शिक्षित.
शृंगारित.
शोधित.
शोभित.
शोषित.
श्रमित.
संकलित.
संकल्पित.
संकीर्तित.
संकुचित.
संकुलित.
संकेतित.
संकोचित.
संगोपित.
संघर्षित.
संचलित.
संचरित.
संचारित.
संतर्पित.
संतापित.
संतोषित.
सत्कारित.
संपादित.
संबोधित.
संभावित.
समन्वित.
समयोचित.
समर्थित.
समर्पित.
समापित.
समुदित.
समुद्रवलयांकित.
संमानित.
संयोगित.
संयोजित.

संरक्षित.
सवर्णित.
संवर्धित.
संशयित.
संशोधित.
संस्काररहित.
संस्कारवर्जित.
संस्कारविरहित.
संस्कारित.
संस्थापित.
सहित. (सहन केलेलें, बरोबर असलेलें)
सांत्वित.
साधित.
सिद्धांतित.
सुगंधित.
सुघटित.
सुभाषित.
सुरक्षित.
सुवर्णगणित.
सुवासित.
सुशिक्षित.
सुशोभित.
सूचित.
सेवित.
स्खलित.
स्त्र्यंकित (बायकोच्या आधीन असलेला).
स्थापित.
स्नेहांकित.
स्पर्शित.
स्फुटित.
स्वकपोलकल्पित.
स्वकल्पित.
स्वकष्टार्जित.
स्वकष्टसंपादित.
स्वानित.
स्वरचित.
स्वरित.
स्वादित.
स्वेदित.
स्वोपार्जित.
हर्षित.
हसित.
हृषित.
क्षरित.
क्षारित.
क्षालित.
क्षुधित.
क्षोभित.
ज्ञपित.
ज्ञापित.

परिशिष्ट ५ वें.

अंतीं जोडाक्षर असून ज्या शब्दांचे उपांत्य इ, उ, ऋ ऱ्हस्व लिहावयाचे ते:—

अछिद्र.
अछिन्न.
अंतरिक्ष.
अतिरिक्त.
अतुल्य.
अतुष्ट.
अतृप्त.
अंतेवासित्व.
अदंभित्व.
अदृश्य.
अदृष्ट.
अधर्मिष्ट.
अनभिज्ञ.
अनावृत्त.
अनित्य.
अनिंद्य.
अनिष्ट.
अनुच्छिष्ट.
अनेकजिव्ह.
अनौचित्य.
अपकृष्ट.
अपवित्र.
अप्रबुद्ध.
अप्रसिद्ध.

अबुद्ध.
अभिनिविष्ट.
अभिन्न.
अभियुक्त.
अभिज्ञ.
अयत्नसिद्ध.
अयनवृत्त.
अयुक्त.
अरिष्ट.
अर्थलुब्ध.
अलिप्त.
अल्पनिद्र.
अल्पवृत्त.
अल्पसंतुष्ट.
अल्पसिद्ध.
अल्पावशिष्ट.
अवाचिन्ह.
अवरुद्ध.
लिप्त.
वशिष्ट.
रवाक्षिप्त.
विच्छिन्न.
शिष्ट.
शुद्ध.
असंतुष्ट.
असिद्ध.
अस्तित्व.
आतिथ्य.
आम्लपित्त.
आयुष्य.
च्छातृप्त.
ष्ट.
ग्र.

उच्च.
उच्छिष्ट.
उत्कृष्ट.
उत्फुल्ल.
उत्सृष्ट.
उत्क्षिप्त.
उद्दिष्ट.
उद्बुद्ध.
उद्युक्त.
उद्रिक्त. (वि. सं. अतिशय.)
उद्विग्न.
उद्वृत्त.
उपदिष्ट.
उपभुक्त.
उपमानसिद्ध.
उपयुक्त.
उपलिप्त.
उपविष्ट.
उपवृत्त.
उपाश्लिष्ट.
उष्ण.
उष्ट्र.
ऋणमुक्त.
ऋक्ष.
एकचित्त.
एकचिन्ह.
एकनिष्ठ.
एकभुक्त.
एतदातिरिक्त.
ऐतिह्य. (ना. स. दंतकथा.)
ओढिस्त (ओढ + स्थ = विपत्तींत असलेला.)
औचित्य.
औत्सुक्य.
कंठमाधुर्य.
कनिष्ठ.
कन्यापुत्र.
कन्याशुल्क.
कपित्थ.
करपृष्ठ.
कर्णपुष्प.
कर्तृत्व.
कर्मनिष्ठ.
कर्मिष्ठ.
कलाभिज्ञ.
कल्पवृक्ष.
कवित्व.
कविनैरंकुश्य.
कळपशुद्ध. (म +सं. कळपांबरोबर असणारा, ओढाळ नाही तो.)
काठिन्य.
कारुण्य.
कालचरित्र.
काळाकभिन्न (वि. मरा. काळाकुळकुळीत.)
किन्निमित्त.
किंचिज्ज्ञ.
किर्र (वि. मरा. किर्र झाडी.)
कुपित्त.

कुपित्थ.
कुपुत्र.
कुब्ज.
कुलवृत्त.
कुलवृद्ध.
कुलित्थ.
कुष्ठ.
कुस्पृष्ट.
कूर्मदुग्ध.
कृच्छ्र.
कृत्य.
कृतकृत्य.
कृत्रिमपुत्र.
कृत्रिमामित्र.
कृत्रिमयुद्ध.
कृमिघ्न.
कृष्ण.
कोपाविष्ट.
कौटिल्य.
कौत्सित्य. (ना. सं. कुत्सिपणा).
क्रांतिवृत्त.
क्रुद्ध.
क्रोधिष्ट.
क्रोधाविष्ट.
क्लिन्न.
क्लिष्ट.
खंडितपांडित्य (ना. न. सं. Scrap Learning)
खनित्र.
खपुष्प.
खिन्न.

खुद. (वि+क्रि. वि. फार. स्वतःचे)
खिस्त. (ना. पु. मरा)
गगनपुष्प.
गंगापुत्र.
गतवित्त.
गयापुत्र.
गरिष्ठ.
गर्भगुल्म.
गर्विष्ट.
गलगुच्छ. (ना. पु. सं-कल्ले.)
गलत्कुष्ठ.
गलितकुष्ठ.
गुणग्राहित्व.
गुण्य.
गुप्त.
गुरुत्व.
गुरुचरित्र.
गुरुपुत्र.
गुरुवृत्त.
गुल्म.
गुह्य.
गृध्र.
गृहकृत्य.
गृह्य.
गैराशिस्त (वि. अ+ फा=हेतुरहित, अव्यवस्थित)
घृष्ट.
घोडपुत्र (ना. पु. म +सं)
घोडाशिष्य (ना. पु

म+सं. वयातीत-विद्यर्थी)
चंचलचित्त.
चतुर्थ.
चतुस्समुद्र.
चरित्र.
चातुर्य.
चित्त.
चिंत्य.
चित्र.
चित्रगुप्त.
चित्रविचित्र.
चुक्र. (ना. पु. सं= चुका) ना. न. सं =धान्यापासून केलेली दारू.
छांदिष्ट.
छिद्र.
छिन्न.
छिन्नभिन्न.
जगत्प्रसिद्ध.
जगन्निंद्य.
जगन्मित्र.
जगप्रसिद्ध [म+सं]
जीवन्मुक्त.
जीवित्व.
तपादित्य.
तारुण्य.
तालशुद्ध.
तिक्त.
तिलपुष्प.
तुच्छ.
तुन्न.

तुरुष्क
तुल्य.
तुष्ट.
तुष्टपुष्ट (वि. सं. तुष्ट +पुष्ट =संतुष्ट.)
तृप्त.
त्रैगुण्य.
दंडपारुष्य.
दंतोच्छिष्ट.
दयालुत्व.
दयासमुद्र.
दयायुक्त.
दयाविशिष्ट.
दरिद्र.
दर्शनसंतुष्ट.
दशांकाचिन्ह.
दशांशाचिन्ह.
दाक्षिणोत्तरवृत्त.
दातृत्व.
दारिद्य.
दा[illegible]पुत्र.
[illegible]ण्य.
[illegible]र्य.
दीपकिट्ट (ना. न.सं Lamp-black)
दुग्ध.
दुरुक्त.
शब्दांतील अंत्याक्षर ऱ्हस्व असल्यास उपांत्यावर आघात पडून त्यास सामान्यत्वें दीर्घत्व येतें, ह्मणून तो दीर्घ लिहावा. पण अंत्याक्षरावर आघात पडल्यामुळें त्यास दीर्घत्व आलें, तर उपांत्यास सामान्यत्वें लघुत्व येतें, ह्मणून तो ऱ्हस्व लिहावा. जसें:–

शांहणा–शांहणे (अनेकवचन)
गहांळ.
गहांण–गांहणाचा.
लहांन–लांहनाचा.
चाह (धातू) चांहणे, चांहतो, चाहांत, चांहतां.
बहांर–बांहरी (अ. व.)
महांर–महांर (अ. व.)
महांग (विशेषण), मांहगाई.
महांल–महांल (अ. व.)
महांत–महांत (अ. व.)
रहांट–रहांट (अ. व.)
कांहणी–कांहण्या (अ. व.)
बांहली, बहांल (विशेषण)
जहांज–जांहजें (अ. व.)
वहांण–वांहणा (अ. व.)
जहांल (विशेषण)
पहांर–पांहरा (लोखंडाची)
पहांट–पांहटेस.
वांहवा–वांहवा (अ. व.)
रांह (धातू)–रांहणे, रांहतो, राहांत, रांहतां, रांहणी.
पाह (धातू)–पांहणे, पांहतो, पाहांत, पांहतां, पाहणी.
वाह (धातू) वांहणे, वांहतो, वाहांत, वांहतां, वांहतूक.

पोंह (धातू) पोंहणे, पोंहतो, पोंहत, पोंहतां.
नांह (धातू)-नांहणे, नांहतो, नांहला, नाहांत, नांहतां, नांहणी.
सहांण–सांहणा (अ. व.)
आहांर–आहांर (अ. व.)
विहांर–विहांर (अ. व)
कांहता (तिरकस)
चांहडी–चांहड्या (अ. व.)
टांहळी–टांहळ्या (अ. व)
डांहळी–डांहळ्या (अ. व.)
तहांन.
चांहणा–चांहणे. (अ. व.)
कांहली.
चहां (नाम)
नहांक (क्रि. वि.)
पांहरा (सांभाळणे)
शांहरा–शांहरे (अ. व.)
जांहला (कवितेंत), जांहले (अ. व.)
पांहडी.
सोंहळा–सोंहळे (अ. व.)
अपवाद—सहांवा-वी-वें; दहांवा-वी-वें; लिहांवा-वी-वें.

टीपः—लहंर, नहंर , कहंर, प्रहंर , शहंर, जहंर वगैरे शब्द निराळ्या प्रकारचे आहेत व ह्यांत 'ह' लिहावा किंवा 'हा' लिहावा अशाबद्दल वाद नाही. 'ह' च लिहिण्याचा संप्रदाय आहे व तो सर्वांस संमत आहे; ह्मणून त्याविषयीं विचार करण्याचेंच कारण नाही. त्याप्रमाणें दाहक, दाहन, वाहक, वाहन, साहस, आहक (नाकाचा विशेष रोग), आहत (ताडन केलेलें), आहव, गाहन (स्नान करणे), गोहन (लपण्याची जागा), श्वेतवाहन (अर्जुन), मोहन वगैरे शुद्ध संस्कृत शब्दांबद्दलही वाद नाही. 'ह' लिहावा अथवा 'हा' लिहावा अशाविषयीं जेथें संशय येतो किंवा वाद असतो तेथें दोन दीर्घ शब्दांच्या कचाटींत 'हा' सांपडला असतां दोहोंच्या जोराने ह्या 'हा' स लघुत्व येऊन तो ऱ्हस्व बनतो, हें वरील उदाहरणांवरून समजून येईल. त्याचप्रमाणें अंतींचा स्वर ऱ्हस्व असण्याची आवश्यकता असेल, तर उपांत्य ' ह ' दीर्घ होतो; व ' हा ' दीर्घ

होऊन त्याच्यावर आघात पडल्यामुळें त्याच्या अगोदरच्या स्वरास लघुत्व येऊन तो ऱ्हस्व होतो, हेंही वरील उदाहरणांवरून कळून येईल. स्वराघाताची व्यवस्था मराठींत अद्यापि लागावी तशी लागली नसल्यामुळें हा खुलासा करणे अवश्य आहे.

गाहणाचा, लाहनाचा, पाहरा, पाहटेस, माहगाई हीं रूपें गहाणाचा, लहानाचा, पहारा, पहाटेस, महागाई अशीं लिहिण्याची वहिवाट आहे, तर ती कायम ठेवण्यास हरकत आहे असें नाही, पण असा विकल्प ठेवण्याची जरुरी कोणती, हें दिसत नाही. राहतो, पाहतो वगैरे रूपें रहातो, पहातो अशीं लिहितात; पण राहतो, पाहतो हीं रूपें स्वराघाताच्या तत्त्वास अनुसरून असल्यामुळें जशीं प्रशस्त समजावयाचीं व समजतात त्याप्रमाणें त्याच तत्त्वास अनुसरून गांहणाचा, लांहनाचा वगैरे रूपें समजावीं. आतां पाहणे, राहणे, वाहणे, नाहणे, चाहणे या धातूंचीं विध्यर्थी रूपें कशीं लिहावीं, एवढ्याच प्रश्नाविषयीं विचार करणे आहे. वरील नियमाप्रमाणें पाहवें, राहवें, वाहवें, नाहवें, चाहवें अशीं रूपें असावीं, परंतु तशीं तीं उच्चारांत अथवा लेखनांत आढळून येत नाहीत. तेव्हां कोणतीं रूपें लिहावीं हा प्रश्न आहे. पहावें, रहावें वगैरे रूपें लिहिण्यांत आढळतात, पण त्यामुळें मूळ धातूचा विपर्यास होतो. पाहावें, राहावें, नाहावें, चाहावें, वाहावें अशीं लिहिलीं असतां मूळ धातू कायम ठेवण्यांत येतो. दोन्ही प्रकारांत वरील नियमाचें अतिक्रमण होतेंच. आह्मांस वाटतें मूळ धातू कायम ठेवून पाहावें, राहावें वगैरे रूपें लिहावीं. असें केलें असतां द्व्यक्षरी धातू कर, लिह, बोल, चाल ह्यांच्या विध्यर्थी रूपांप्रमाणें रूपें

होतील; व मूळ धातूचा निष्कारण विपर्यास करण्याचें कारण राहणार नाही.

(ब) अंतींचा ह अथवा हा

दहा (संख्या), दाह (ताप), सहा (संख्या), व शाह (राजा) व पाहणे, राहणे, वाहणे, नाहणे, चाहणे ह्यांचीं आज्ञार्थी रूपें, ह्यांपैकीं दहा, सहा ह्या रूपांबद्दल वाद नाही. वाद असल्यास तो ह्यांतील उपांत्य ऱ्हस्व असावा किंवा दीर्घ असावा ह्याविषयीं आहे. व्युत्पत्तीविषयीं[1] विचार करतां उपांत्य ऱ्हस्व असावा असें समजतें. विद्वानांच्या लेखांत उपांत्य ऱ्हस्वच लिहिण्याचा प्रघात दिसतो व अंत्य दीर्घ असल्यास उपांत्य ऱ्हस्व असावा, असा जो मराठी भाषेचा सामान्य स्वभाव त्यास अनुसरून व्यवस्था आहे. तेव्हां उपांत्य ऱ्हस्व असावा हें उत्तम. दाह हा शुद्ध संस्कृत शब्द आहे, पण तो रूळल्यामुळें त्याचा उच्चार दाहा असा प्रायः करण्यांत येतो. तेव्हां हा शब्द दाह असा लिहावयाचा किंवा दाहा असा लिहावयाचा असा प्रश्न आहे.

'दाहा' असें रूप लिहिण्यास फक्त उच्चाराचा आधार आहे, व त्यासंबंधानेही वाद करणारे निघतील. 'दाह' असें रूप वापरण्यास व्युत्पत्तीवरून व लेखनप्रचारावरून आधार असून अंत्य व उपांत्यसंबंधाचा जो नियम कीं, अंत्य ऱ्हस्व असल्यास उपांत्य दीर्घ असावा त्यास अनुसरून व्यवस्था आहे, तेव्हां दाह असें रूप लिहिणें प्रशस्त; दाहा हें वैकल्पिक रूप समजावें.

---

१ संस्कृत-दश, पाली दस ह्यांवरून मराठी दहा हें रूप बनलें; व संस्कृत षट् पासून प्राकृताच्या द्वारें मराठींत सहा असें रूप प्रचलित झालें आहे.

शहा–शाह–ह्या शब्दांची व्युत्पत्ती पाहतां फारसी 'शाह्' ह्मणजे राजा ह्यापासून हीं रूपें प्रचलित झालीं आहेत.

ह्यांत शाह हें रूप मूळ रूपाला जवळ असून उच्चाराला व लिहिण्याला सोपें आहे, तेव्हां तेंच लिहिणे खरोखर उक्त होय. पण शहा असेंही रूप उच्चारण्याचा व लिहिण्याचा प्रचार असल्यामुळें शाह, शहा अशीं रूपें लिहावीं.

पाहणे, वाहणे, राहणे, चाहणे, नाहणे, पोहणे– ह्या धातूंचीं आज्ञार्थी रूपें पाह, वाह, राह, चाह, नाह, व पोह अशीं नियमाला अनुसरून आहेत, पण तशीं उच्चारांत अथवा लेखनांत आढळून येत नाहीत; सबब त्यांविषयीं विचार करावयास नको. पाहा, राहा, नाहा, चाहा, वाहा, पोहा अशीं रूपें उच्चारास धरून आहेत व तशीं लिहिलीं असतां मूळ धातूचा विपर्यास होत नाहीं; सबब हीं ग्राह्य समजावीं. परंतु पहा, रहा, नहा, चहा, व वहा अशीं रूपें लिहिण्याचा प्रघात असून नियमास अनुसरून आहेत, सबब तीहीं ठेवावयाचीं कीं काय ? जर पाहा, राहा अशीं रूपें कायम केलीं, तर पहा, रहा अशीं वैकल्पिक रूपें असण्याचें कारण नाही. उगीच भरती नको. मूळ धातूंचा विपर्यास करावा लागतो, हें एक कारण आहे.

टीपः—पितामह (बापाचा बाप), मातामह (आईचा बाप), वृत्रहा (इन्द्र), श्वेतवाह (अर्जून, इन्द्र) वगैरे शुद्ध संस्कृत शब्दांतील अंतींचा ह अथवा हा ह्याबद्दल वाद नाही. सबब त्यांविषयीं विचार करण्याचें कारण नाही.

(क) अंत्य व उपांत्य ह्यांशिवाय इतर ठिकाणचा ह अथवा हा.

ज्या शब्दांत अशा प्रकारचा ह अथवा हा ह्याबद्दल मेळ नाही त्यांपैकीं काहीं फारसी व अरबी भाषांतून आले आहेत व काहीं शुद्ध मराठी आहेत. त्यांचीं उदाहरणें पुढें दिलीं आहेत, व कोणतीं रूपें ग्राह्य समजावीं हें सांगितलें आहे.

जहालीम, जाहलीम, जालीम—हीं रूपें अरबी जालीम् ह्या रूपापासून अपभ्रंश होऊन आलीं आहेत. जालीम हें रूप व्युत्पत्तीला जवळ असून सोपें आहे, तेव्हां तेंच प्रशस्त होय. ह अथवा हा ह्या व इतर काहीं शब्दांत आगांतूक आहे. नियमाप्रमाणें जाहलीम रूप आहे; पण तें प्रशस्त मानण्याचें कारण दिसत नाहीं.

जाहजम, जहाजम, जाझम, जाजम—हीं रूपें जाजम् (अ) ह्यापासून आलेलीं आहेत; जाजम हें रूपव्युत्पत्तीला जवळ असून सोपें आहे; तेव्हां तेंच वापरण्याचा प्रघात पडल्यास बरें.

शहाजोग वगैरे—शहाजोग हा शब्द फारसी शाह म्हणजे सावकार किंवा राजा व जोग संस्कृत योग्य, प्राकृत जोग्ग व मराठी जोगा मिळून झालें असावें. तेव्हां शाहजोग हें रूप सर्वप्रकारें बरें. शहाजोग हें रूप विशेष प्रचारांत आहे, तेव्हां तेंही पाहिजे असल्यास कायम ठेवावें. त्याचप्रमाणें शाहनिशा, शहानिशा, (फार); शाहमत, शहामत (अर.); शाहमृग, शहामृग, (फा. सं.) अशीं रूपें ग्राह्य धरावीं.

जहांगीर वगैरे—जहांगीर हें रूप जहान् (फा.) = जग व गीर (फारसी गिरिफ्तन् घेणे) ह्यापासून झालेलें आहे. ह्याचें एकंदर मूळ रूप जांगीर असें असून तें सोपें आहे, तेव्हां तें वापरणे चांगलें. पण जहांगीर असें रूप विशेष प्रचारांत आहे, तेव्हां तेंही पाहिजे असल्यास असावें.

जहागीर, जाहगीर—हीं रूपें जागीर् = (फा. ' जा ' = स्थळ + गीर–गिरिफ्तन् घेणे) ह्यापासून अपभ्रंश होऊन आलेलीं आहेत. तेव्हां जागीर हें रूप व्युत्पत्तीला जवळ असून सोपें आहे तेव्हां तें वापरणे बरें. जाहगीर व जहागीर हीं रूपें वापरणे लोकांच्या मर्जीवर ठेवावें. त्याचप्रमाणें जांबांज (जान्–प्राण व बाज–खेळ, म्हणजे प्राणाची जो पर्वा करीत नाही तो.) हें रूप व्युत्पत्तीला जवळ व सोपें आहे, तेव्हां तें वापरण्याविषयीं शिफारस करावी; व जहांबाज व जहांबाज अशीं रूपें वापरणे लोकांच्या मर्जीवर ठेवावें.

बहादर, बहादुर, बाहादुर—बहादूर् ह्या मूळ रूपापासून हीं रूपें आलीं आहेत. बहादूर हें मूळ रूपाला जवळ आहे; तेव्हां तें पसंत करावें. बहादर हें निराळ्या अर्थानें उपयोगांत आलें आहे; तेव्हां तेंही कायम ठेवणे अवश्य आहे.

शहात्तर, शहायशी, शहाण्णव व बहात्तर—हीं रूपें पाली छसत्तरि, छलासीति, छनुवति व बासत्तरि ह्यांपासून आलीं आहेत किंवा कसें हें सांगतां येत नाहीं. जीं रूपें दिलीं आहेत तींच प्रचारांतील आहेत, तेव्हां

तींच ग्राह्य समजावीं. सत्तरि ह्याचा मराठींत हत्तर अपभ्रंश होतो, हें सांगावयास नको.

आंहळीव, आहांरणे (सुस्त होणे), अहांळणे [जळणे], अहांटणे [चिरडणे], कहांवणे, चहांटळ, शहांणपण अशीं रूपें मागें दिलेल्या नियमास अनुसरून आहेत, सबब तीं ग्राह्य समजावीं.

२ ल–ळ;

अग्निमीळे वगैरे जे फार प्राचीन प्रयोग त्यांशिवाय संस्कृतांत ‘ ळ ’चा उपयोग करण्यांत येत नाहीं. त्याप्रमाणें प्राकृतांतही ‘ ळ ’चा उपयोग केलेला आढळून येत नाहीं. ह्याचा उपयोग केव्हांपासून करण्यांत येऊं लागला, हें निश्चयात्मक सांगतां येत नाहीं. ज्ञानेश्वराच्या वेळेपासून पुढें एकसारखा तो उपयोगांत आहे. तो इतका कीं, प्रौढ रचनेंत अथवा संस्कृत सामासिक शब्दांतही मोरोपंतासांरख्या कवींनी त्याचा सररास उप-

---

१ न तूजवरि ज्या परी **पशुपपाळ** कोपे क्षण (मो. केका)
॥ जो कोणी **देवद्वासच्छळक** खळ तया रक्षिता अन्य नाहीं ॥
(मो. अंबरीष)
॥ जे **सर्वांहितबळसंपदा** सदा पी ॥ (कित्ता)
॥ **अमळाकमळाकेलिभवना** भवनाशना ॥ (कित्ता)

सुदामचरित्रः—(मोरोपंत) पुष्पांजळी, फळवांछा, गुरुकुळवास, दुयाकुळ.

रघुनाथपंडितः—(नलदमयंती) पुण्यश्लोकनृपावळी, वनमाळी, सहस्त्रदळ, चिंचफळभ्रमाने, सुशीतळ, महीतळ, राजमौळी, कमनीयलीळे, सुशीळे, दूर्वादळीं.

वामनः—(नामसुधा) पातकमूळ; वनसुधा–मेघनीळ; मंडळाकार; वेणुसुधा–चळराम; रुक्मिणीपत्रिका–पायधुळी; भूतळ.

वामनचरित्र–भिक्षाछळें, द्विजबाळका, पादतळ.

योग केलेला दिसतो; व उठल्याबसल्या संस्कृताकडे धाव घेण्याची जी हल्लीं कित्येक लोकांची प्रवृत्ती दिसते ती नसती, तर कदाचित् 'ळ' वापरण्याची विशेष वहिवाट दिसून आली असती; व सध्यां जो प्रश्न आहे त्याविषयीं विचार करण्याचेंही कारण नसतें. असो. ज्या शब्दांत 'ल' असून त्याचा उच्चार तसाच होतो त्या शब्दांबद्दल वाद नाही. उ० उलट, वेलदोडा, खलबत, खलाशी, दुलई, कंदील, चवली, पूल वगैरे; किंवा संस्कृतांतून अपभ्रंश होऊन मराठींत जे शब्द रूढ झाले आहेत त्यांतील किंवा शुद्ध मराठी शब्दांतील 'ळ' विषयीं वाद नाही. उ० आजोळ [आर्यालय], सोंवळा [सुमंगल], ओंवळा [अमंगल], विटाळें [इष्टकालय], वेला [वेळ], विळी, उधळ्या, ओळख, कंटाळा, किटाळ इ० हल्लीं जो प्रश्न आहे तो, जे शब्द शुद्ध संस्कृत शब्द असून जसेच्या तसेच वापरण्यांत येतात, त्यांतील 'ल' विषयीं मुख्यत्वें आहे. काहीं 'ल' कायम ठेवतात व काहीं 'ळ' लिहितात. उ० विठ्ठल–ळ, बल–ळ, फल–ळ, दयालु–ळु, कला–ळा, चपल–ळ, काल–ळ इ० हे व अशाचसारखे जे दुसरे शब्द त्या बाबतींत ठरीव व्यवस्था कर्तव्य आहे, तर ती कोणती असावी, असा प्रश्न आहे. कवी बोलून चालून 'निरंकुश' असल्यामुळें त्यांस आळा घालण्याच्या नादीं लागण्यांत तात्पर्य नाही, व तसें करण्याविषयीं यत्न केला असतां अंमलबजावणीही होणार नाही असें कांहीं मित्रांचें ह्मणणे आहे, तें कांहीं अंशीं बरोबर

आहे; पण गद्यात्मक ग्रंथांत ठरीव व्यवस्था कां असूं नये हें समजत नाही. आलेल्या अभिप्रायांविषयीं विचार करतां जी व्यवस्था निदान गद्यात्मक ग्रंथांत करण्यास हरकत नाही ती अशी:—

१. प्रौढ भाषेंत, किंवा विशेष प्रचारांत नसणाऱ्या शुद्ध संस्कृत शब्दांचा जेथें समास झाला आहे तेथें मुळांतील 'ल' जशाचा तसाच कायम ठेवावा. उ० शिलातट, आलवाल, मलवस्त्र, शब्दालंकार, फलाहार, कमलनेत्र, चंद्रमौली, मोहजाल, कालक्षेप, मंगलकार्य, शिलामय.

२. विशेष प्रचारांत नसणाऱ्या पण एकाकी शुद्ध संस्कृत शब्दांतील किंवा पारिभाषिक शब्दांतील 'ल' कायम ठेवावा. जसें:—-चौल, संमीलन, काली, लीला, शैथिल्य, शिथिलता, वैरल्य, विरलता, दौर्बल्य, दुर्बलता.

३. जे एकाकी अथवा समासघटित शब्द सामान्य लोकांच्या बोलण्यांत वारंवार येत असल्यामुळें केवळ मराठीच बनले आहेत त्यांतील मूळच्या 'ल' बद्दल ळ लिहावा. जसें. फळ, विरळ, मुसळ, वाचाळ, वातूळ, महाबळेश्वर, सिताफळ, काळस्वरूपी, रसाळ, धर्मशाळा, चपळ, त्रिशूळ, बाळकृष्ण, छळ, रसातळास, पाताळ-

यंत्री, तिळप्राय, क्षेत्रफळ, तुळशीपत्र, मंगळसूत्र, तुळशीदास, बाळगोपाळ, ज्वाळा इत्यादी. किंवा प्रचारांतिल भाषेंत लिहिणे झाल्यास 'ल' बद्दल 'ळ' लिहावा. जसें:–तुझा भांडण्याला बळ आहे पण मला कोठें आहे ? तो माझ्या हातचा मळ आहे.

४. इतर ठिकाणीं व इतर प्रसंगीं 'ल' अथवा 'ळ' लिहिला असतां चिंता नाहीं.

(३) शुद्ध संस्कृत शब्द अथवा अरबी, फारसी वगैरे परभाषांतील शब्द व्यंजनान्त असल्यास तो तसाच लिहावा किंवा स्वरान्त लिहावा.

मराठी भाषेचें धोरण लक्षांत आणतां आपणांस ही एक गोष्ट कळून येते कीं, संस्कृत किंवा इतर भाषांतील शब्द व्यंजनान्त असून तो मराठींत आला असतां त्याच्या अंत्य व्यंजनाचा लोप करावयाचा किंवा तो स्वरान्त करावयाचा. ही गोष्ट पुढील उदाहरणांवरून कळून येईल:–

संस्कृत:—कर्मन्–कर्म, वर्मन्–वर्म, यशस्–यश, दुर्वासस्–दुर्वास, पयस्–पय.

फारसीः––जवान्, चंग्, चाकर्, चादर्, चाबुक्, जंग्, जमीन्, नमाज्, नमूद्, नादान्, पर् (पंख), पासंग्, पोषाक्, बराबर्, बत् (पुरें), बहार्, बहाल्, बाग्, बाजार्, बारीक्, मान्, मेज्, याद् (स्मरण), रास्त्, लगाम् (अ. फा.), सरंजाम्, सामान्, सुस्त्, हजार्, बेहोष्, गंज्, गुंग्, गुमान्, गुलाब्, गोलंदाज्, जर्, जहर्, जहाज्, जाजम्, जीन्, जोर्, तंग्, ताकीद्, तार्, दंग्, दम्, दोबस्त्, दाद्, दुकान्, दुरुस्त, दोस्त्, नाखूष्, नौकर, पेच्,

पैजार, बगल्, बंद्, बंद्र्, बंदोबस्त्, मात्, मिजाज्, मेख्, मैदान्, रोज्, लाचार्, संगीन्, हंगाम् इ०

अरबी—आइतिमाम् (इतमाम), खातिर् (खातर), गम्, खरीफ् (खरीप), अमीन्, अमीर, इनाम्, इब्रत्, इमारत्, इलाज्, ईद्, औरत्, कंदील्, कनात्, करामत्, हुजूर्, बाबत्, करार्, कैद्, कौल्, खंदक्, खबर्, खराब्, खलास्, खैरात्. गरज्, गरीब्, गुलाम्, जरूर्, जलाल्, ताजीम्, तैनात्, ताल्, नूर्, नौबत्, तज्वीज्, तारीफ्, तालीम्, तमाम्, फकीर्, फौज्, बदल्, बरकत्, बाब्, मारेफत् (मारफत), माल्, वकील्, संदूक्, सफर्, साफ्, हकीम्, हजामत्, हयात् इ०.

वर जीं उदाहरणें दिलीं आहेत त्यांवरून समजून येईल कीं, कित्येक शब्द संस्कृत, फारसी व अरबी भाषांतून आले असून ते व्यंजनान्त न समजतां भाषेचें धोरण, लिहिण्याचें सौकर्य वगैरे कारणांसाठीं ते स्वरान्त समजून त्याप्रमाणें लिहिण्याची वहिवाट पडली आहे. पूर्वपीठिका, ह्मणजे इतिहास पाहावयाचा आहे, तर व्यंजनान्त शब्द असावयाचा नाहीं; इतिहास पाहावयाचा नाहीं, तर बोलावयास नको. संस्कृतांतील द्विवचनास मराठींत फाटा मिळाला, तो जसा प्राकृत नियमामुळें, तसा अंत्य व्यंजनास फाटा मिळाला तोही प्राकृत नियमामुळें होय. “ **अंत्यस्य हलः** ” [वररुची. परि ४. सूत्र ६.] ह्या सूत्राप्रमाणें अंत्य व्यंजनाचा लोप होतो. व्यंजनाच्याऐवजीं कोणकोणते आदेश होतात हें ‘ **स्त्रियांमात्**,’[1] ‘ **रोरा** ’[2] ‘ **दिक्प्रावृषोःसः** ’[3]

---

१ स्त्रीलिंगी शब्दांच्या अंत्य व्यंजनाबद्दल ‘ आ ’ आदेश होतो. वाच्–वाआ.

२ स्त्रीलिंगी शब्दाच्या अंतीं ‘ र् ’ व्यंजन असेल, तर त्याऐवजीं ‘ रा ’ आदेश होतो. उ० गीर्–गिरा.

३ दिक् व प्रावृष् ह्यांच्या अंत्य व्यंजनाबद्दल ‘ स ’ आदेश होतो. दिक्–दिसा; प्रावृट्–पाउस.

' **मो बिंदुः** '[1] वगैरे सूत्रांत निर्दिष्ट केलें आहे. मुख्य गोष्ट सांगावयाची ती ही कीं, अंत्याक्षराचा पाय मोडावयाचा नाही. ही सोईची व्यवस्था कित्येक वर्षें अव्याहत चालू होती व तीं विद्वानांचीही होती. कै. सदाशीव काशिनाथ छत्रे ह्यांच्या बाळमित्राची आवृत्ती कै. कृष्णशास्त्री तळेकर ह्यांनी तपासून प्रसिद्ध केली. कृष्णशास्त्री हे संस्कृताचे कमी अभिमानी होते असे नाही. त्यांच्या मनांत अंत्याक्षराचा पाय मोडण्याचें आलें असतें, तर त्यांस तसें करतां आलें असतें. पण त्यांनी मराठीच्या धोरणास अनुसरून तसें केलें नाही; अंत्याक्षर[2] स्वरान्त ठेवलें. ही गोष्ट ज्यांनी बाळमित्र वाचलें असेल त्यांच्या लक्षांत आली असेल. पण सांप्रत संस्कृताची लाट जी वाजवीपेक्षां फाजील उसळी मारूं लागली आहे तिजमुळें, बरीच व्यवस्था संस्कृताच्या धोरणावर करून सोडण्याचें काहीं विद्वानांच्या मनांत येऊन, पूर्व इतिहासास व अनुभवाने ठरलेल्या सोईच्या व्यवस्थेस झुगारून देऊन, सरसकट साऱ्या व्यंजनान्त संस्कृत अथवा इंग्रजींतून मराठींत येणाऱ्या शब्दांच्या व त्याचप्रमाणें काहीं मराठी शब्दांच्या अंत्याक्षरांचाही पाय मोडून ते लिहिण्याचा क्रम त्यांनी आरंभिला आहे. असें करण्याचें कारण काय, असें विचारतां मुळाकडे आह्मी जात आहो असें उत्तर मिळतें ! ! असो. वर निर्दिष्ट केलेलें म-

---

१ शब्दाचें अंत्य व्यंजन ' म् ' असेल तर त्याऐवजीं अनुस्वार करावा. जसें धनम्–धणं.

२ नजर चुकीने थोडे ठिकाणीं व्यंजनान्त शब्द राहून गेले आहेत. एकंदरीने विचार करतां शास्त्रीबोवांनी मुख्य धोरण झुगारून दिलें नाही.

राठीचें धोरण लक्षांत न आणतां पुढील शब्द व्यंजनान्त लिहिण्याचा काहींचा प्रघात दिसतो:—

विद्वान्, पश्चात्, साक्षात्, चटकन्, महान्, बलवान्, पृथक्, श्रीमान्, गुणवान्, युक्तिवान्, मूर्तिमान्, अकस्मात्, आसमंतात्, भाग्यवान्, पशुवत्, अर्थात्, बुद्धिवान्, रूपवान् इत्यादी. पूर्व इतिहासाच्या दृष्टीने व्यंजनान्त शब्द लिहिणे उक्त नाही. दुसरें असें कीं, वरील शब्दांपैकीं विद्वान, भाग्यवान, रूपवान, बुद्धिमान वगैरे जे शब्द आहेत त्यांचें व्याकरण करणे झाल्यास हे शब्द व्यंजनान्त आहेत, असें न म्हणतां अकारान्त असें ह्मणण्याचा सार्वत्रिक प्रघात आढळतो; व तो भाषेच्या धोरणास अनुसरून आहे. लिहितांना व्यंजनान्त शब्द लिहावयाचा व व्याकरण करतांना किंवा विभक्तिप्रत्यय लावतांना अकारान्त आहे असें धरून चालावयाचें, ह्या दोन गोष्टी परस्परांस विलग आहेत. व्यंजनान्त शब्द लिहावयाचा आहे, तर व्याकरण करतांना व्यंजनान्त असें व्याकरण करावें लागेल; पण विभक्तिप्रत्यय लावण्यापूर्वीं कसें करावयाचें ? जर अकारान्त असें व्याकरण करावयाचें आहे, तर व्यंजनान्त लिहिणे प्रशस्त दिसणार नाही. वर जे शब्द दिले आहेत ते व्यंजनान्त लिहिण्याचें प्रयोजनच दिसत नाही. कारण, राम, विनायक, नाम, विशेषण, घूस, कंदील, गूळ, पान, साप, कान वगैरे जे शेकडो अकारान्त शब्द मराठी भाषेंत आहेत त्यांच्या अंत्य वर्णाचा उच्चार काहींसा व्यंजनान्त शब्दासारखा जरी होतो, तरी व्यंजनान्त लिहिण्याचा मुळींच प्रघात नाही. हा प्रघात सोईचाही आहे. कारण अकारान्त शब्दांचा उच्चार काहींसा व्यंजनासारखा होतो, ह्मणन तो शब्द व्यंजनान्त लि-

हिण्याचा प्रघात सुरू ठेवला, तर सोईकडे लक्ष देण्याचें एकीकडे राहून गैरसोय व त्रास मात्र विकत घेण्यासारखें होईल. संस्कृतांत अशी सोय नाही, म्हणून संस्कृतांत तशी व्यवस्था असणे अवश्य झालें आहे; परंतु मराठींत चांगली सोय आहे, तर गैरसोय करण्याचें कारण दिसत नाही. जर विशेष सोय होत असेल, तर अवश्य विचार करावा. संस्कृत भाषेंतील व्यंजनान्त शब्द प्राकृतांत लिहिणे झाल्यास अंतींच्या व्यंजनाचा लोप होतो, असा भाषाशास्त्राचा स्पष्ट सामान्य नियम आहे ह्मणून, व्याकरण दृष्टीने हें करणे विलग दिसतें ह्मणून, व मुख्यत्वें सोईच्या दृष्टीने विचार करतां असें करणे योग्य दिसत नाही म्हणून, व्यंजनान्त संस्कृत शब्द जशाचे तसे ठेवणे योग्य दिसत नाही. तेव्हां ह्या बाबतींत जी व्यवस्था असावी तीः—

(१) ज्या व्यंजनान्त शब्दांस मराठींत विभक्तिप्रत्यय लागतात, मग असे शब्द मराठी असोत, शुद्ध संस्कृत असोत किंवा इतर भाषांतून आलेले अथवा येणारे असोत, ते शब्द स्वरान्त समजून त्या प्रमाणें स्वरान्त लिहावे.

जसें:—विद्वान, भगवान, बुद्धिमान, गुणवान, युक्तिवान, आडिटर, बुक, बूट इ०

ज्या शब्दांस विभक्तिप्रत्यय लागत नाहीत ते विकल्पें व्यंजनान्त किंवा स्वरान्त समजावे. मात्र अशा शब्दांपैकीं एकादा शब्द समासघटित शब्दांतील पूर्वपद असल्यास समासाच्या

संबंधानें जे नियम लागू आहेत ते त्यास लागू असावे. जसें:—

शुद्ध संस्कृत शब्द:—अर्थात्, कदाचित्, यःकश्चित्, पश्चात्, साक्षात्, किंचित्, पशुवत्, पिशाचवत्, तृणवत्, महान्, प्रसंगवशात्, आसमंतात्, यच्चयावत्, पृथक्, अकस्मात्, धिक्.

मराठी किंवा मराठी बनलेले शब्द:—चटकन्, वसकन्, गटकन्, दीन्दीन्, फांडकन्, ओंफस्, इश्श्, छिट्, छत्, फुस्, चप्, चिप्, चुप्, बस्, हट्, गप्, छट्, शुक्, टणाटण्, काव्काव्, सटकन्, मटकन्, धाडकन्.

समासघटित शब्द:—साक्षात्कार, पश्चाद्बुद्धी.

टीप:—वर जे अविभक्तिक शब्द दिले आहेत त्यांच्या अंत्याक्षरांचे तरी विकल्पें पाय कां मोडावे, असा प्रश्न उत्पन्न होतो. राम, वाघ वगैरे शब्दांच्या अंत्याचा उच्चार व्यंजनासारखा होत असून जर त्यांचा पाय मोडण्यांत येत नाही, तर चटकन्, वसकन् वगैरे शब्दांचा पाय कां मोडावा असें काहीं म्हणतील. वस्तुतः पाहतां ह्या संबंधानें सबळ कारण काहींच दिसत नाही. राम वगैरे शब्द स्वरान्त लिहिण्याचा सार्वत्रिक प्रचार आहे व त्याविषयीं प्रस्तुत वादही नाही. भगवान, विद्वान वगैरे शब्द काहीं विद्वान स्वरान्त लिहितात व काहीं व्यंजनान्त लिहितात. असे शब्द स्वरान्त न समजले, तर त्यांस विभक्तिप्रत्ययच लावतां येत नाही, ही मोठी अडचण आहे; ह्मणून ते स्वरान्त समजून त्याप्रमाणें लिहिण्याची आवश्यकता आहे. मग ते प्राकृताच्या द्वारें आले असोत किंवा परभारें आले असोत. जी अडचण आहे ती कायम राहते. व्यंजनान्त

शब्द चालविण्याच्या संबंधाने नवीनच व्यवस्था करावी लागेल. पण इतकी भानगड करण्यांत हाशील कोणतें ? सोपी व्यवस्था होत असून मुद्दाम अडचण करण्याचें कारण काय ? पश्चात् वगैरे जे संस्कृत शब्द दिले आहेत त्यांसंबंधाने मोठीशी अडचण उत्पन्न होत नाही. व्यंजनान्त लिहिण्याचा बराच प्रघात पडला आहे एवढेंच कायतें कारण दिसत आहे. काहीं मित्रांनी अशी शंका घेतली होती कीं, मरुत् वगैरे शब्द स्वरान्त लिहिले, तर समासांत त्यांपैकीं एकादा आला असतां काय करावें ? ह्यासंबंधाने नियमांत व्यवस्था सुचविली आहे; तेव्हां ती शंका निघण्याचें कारण दिसत नाही.

विद्वान्, भगवान् इ० शब्दांच्या अंत्याक्षराचा पाय मोडला, तरी समास करण्याच्या वेळीं पाय मोडलेलीं रूपें कायम राहात नाहीतच.

(४) प-ब

मराठी भाषेंत हे वर्ण ज्यांत आहेत असे काहीं शब्द आहेत, व ते लिहितांना केव्हां केव्हां अशी शंका उत्पन्न होते कीं, ‘ प ’ लिहावा किंवा ‘ ब ’ लिहावा. ह्या बाबतींत एकच नियम सर्वत्र लागू पडेल असें जरी नाही, तरी काहीं सुयंत्र व्यवस्था करतां येते. ती अशी:—

१ शब्दाच्या अंतीं ‘ ब ’ लिहावा, कठोर व्यंजन पुढें आलें असतां ‘प’ व मृदू व्यंजन पुढें आलें असतां ‘ ब ’ लिहावा. जसें:–

अंतींचा ब–अजब, ताबडतोब, संजाब (फा. संजाफ्), तहकूब, तकूब, अदब, अयब (अपराध), गजब, महकूब,

मोरतब, लकब, वकूब, खूब (फा. खूब्), गुलाब, (फा. गुलाब्), जरब, जुलाब (अर. जुल्लाब्, जुलाप्), पंजाब, किताब (अ. पुस्तक), रतीब (अ.), किनखाब (फा. किम्ख्वाब्), कसब (अ.), गुराब (अ. कावळा), मतलब (अ.), मनसब (अ.), मरातब (अ.), मेहरब (अ), रजब (अ. महिन्याचें नावें).

कठोर व्यंजनः—भपका, झुपका, ठिपका, थपका, आपकरा (आब्खूरा-फारसी).

मृदू व्यंजनः–चोबदार, वाकबगार, डबघाईस, कबजी, कबजा, आबदागीर (फा. आफ्ताब्गीर), आबदार (फा. आबदार् = भव्य), आबदारखाना (पाणी वगैरे ठेवण्याची जागा).

अपवादः—किताबखाना, थबथबणे, थबकणे, दबकणे, चाबकाचा.

टीपः—ज्या ठिकाणीं 'प' लिहावा किंवा 'ब' लिहावा ह्याविषयीं संशयच नाही, त्या ठिकाणीं वरील नियमाची व्याप्ती नसून जेथें अशा प्रकारें संशय येतो तेथेंमात्र अशी व्याप्ती आहे, हें सांगावयाचें कारण नाही. तबक बाबत वगैरे शब्दांत 'प' लिहावा किंवा 'ब' लिहावा ह्याबद्दल संशय नाही किंवा वाद नाही. ह्यांत 'ब' वर आघात पडून त्याचा उच्चार स्पष्ट होतो. ज्या ठिकाणीं त्याचा संयोग झाल्यामुळें किंवा तो अंतीं असल्यामुळें व्यंजनासारखा उच्चार होतो तेथें मात्र संशय येतो.

वरील नियमाखालीं येणाऱ्या उदाहरणांपैकीं धपका, ठिपका ह्या शब्दांच्या संबंधाने एकदोन मित्रांचें असें ह्म-

णणे आहे कीं, हे शब्द थबकणे व ठिबकणे ह्या धातूंपासून आले आहेत व मूळ शब्दांत 'ब' असल्यामुळें त्यापासून आलेल्या शब्दांत 'ब' असावा हें योग्य आहे. ही शंका योग्य आहे, पण मराठी भाषेच्या उच्चाराविषयीं व संधि-नियमांविषयीं विचार करतां पुढील कठोर व्यंजनामुळें 'ब' चें मृदुत्व जाऊन त्यास कठोरपणा येतो. 'ब' चा स्पष्टोच्चार न होऊन धप्का, ठिप्का असे उच्चार होतात; व अशा संयोगामुळें 'ब' चें 'ब' त्व नाहींसें होतें. तबक वगैरे शब्दांतील 'ब' संयोग पावत नाही; स्वतंत्र राहतो; व ह्यामुळें 'ब' चा उच्चार कायम राहतो. आपकरा ह्या शब्दाची वर जी व्युत्पत्ती दिली आहे तीवरून समजून येईल कीं, मुळांत जरी 'ब' आहे, तरी पुढील खु कठोर व्यंजनाच्या संयोगामुळें 'ब' चा 'प' झाला आहे; व हें मराठीच्या उच्चारपद्धतीस अनुसरून आहे. मुळांत आब् आहे तेव्हां त्याचा अपभ्रंश आप व खुराचा करा मिळून " आपकरा " रूप झालें व हें रूप ' अपकरा ' ह्यापेक्षां व्युत्पत्तीला जवळ आहे, सबब तें ग्राह्य समजावें.

(५) **म्ब्–म**—'प' व 'ब' ह्यांच्या बाबतींत जशी काहीं नियमित व्यवस्था करतां येते, तशी 'म्ब्' व 'म' ह्यांच्या बाबतींत करतां येत नाही. कारण, अशा शब्दांपैकीं काहींची व्युत्पत्ती कळण्यास मार्ग आहे व काहींच्या संबंधाने जसें साधन असावें तसें नाही. तथापि, संस्कृतांतून प्राकृताच्या द्वारें जे शब्द मराठींत आले आहेत त्या बाबतींत काहीं सामान्य नियम करतां येतो. " आम्रताम्रयोर्बः " (वर रूची. परि. ३ सूत्र ५३) ह्या सूत्राप्रमाणे संस्कृतांतील 'म'चा ' म्ब् ' असा अपभ्रंश

प्राकृतांत काहीं शब्दांमध्यें झालेला दिसून येतो. जसें—आम्र—अम्ब; ताम्र—तम्ब वगैरे. अम्ब, तम्ब ह्या प्राकृत शब्दांवरून मराठींत आंबा, तांबें अशीं रूपें झालीं आहेत. ह्यावरून धोरण काय असावें, हें साधारण रितीनें लक्षांत येतें. परंतु विद्वान मित्रांकडून आलेल्या अभिप्रायांवरून काहीं शब्दांच्या संबंधानें मतभेद असल्याचें दिसून येतें, सबब तेवढ्या शब्दांपुरतां विकल्प असणे जरूर आहे.

१. **आंबा** (सं. आम्र, प्रा. अम्ब), आंबेमोहोर, आंबरस (सं. आम्ररस), आंबराई (सं. आम्रराजि), आंबेहळद (सं. आम्रहरिद्रा प्रा. अम्ब हलद्दा).

२. **तांबें**, तांब्या (सं. ताम्र, प्रा. तम्ब), तांबट (सं. ताम्रकुट्ट, प्रा. तम्ब उट्ट ?)

३. **तांबडा** हें रूप उक्त; तामडा हें रूप सर्वांशीं अग्राह्य.

४. **आंबट, आंबटी**– (आम्लं–आंबटपणा) ह्या रूपापासून प्राकृताच्या द्वारें हीं रूपें झालीं असावीं. आमटी हें रूप गौण होय.

आंबील–(अम्लिका म्हणजे चिंचेचें झाड.) ह्यापासून प्राकृताच्या द्वारें आंबील रूप बनलें आहे.

५. **चामडें**—संस्कृत चर्म ह्याचा अपभ्रंश प्राकृतांत चम्म* व त्याचा मराठींत अपभ्रंश चाम असा होऊन व डा प्रत्यय लागून चामडें रूप झालें आहे, सबब चामडें हेंच रूप उक्त होय.

६. **कोंबडा**—कोमडा असें रूप वापरण्यांत येत नाही, सबब कोंबडा हेंच रूप ग्राह्य.

११ **चोंबडा**–हेंच रूप विशेष प्रचारांत आहे, तेव्हां तेंच ग्राह्य; चोमडा असें अग्राह्य.

१२ **ढुंबरी**, डांबर, डांबरणे (जड होणे) लोंबणे, तुडुंब, चंब-

---

* **शेषादेशयोर्द्वित्वमनादौ.** वर. परि. ३ सूत्र ५० प्रमाणें एका वर्णाचा लोप झाल्यामुळें अवशिष्ट वर्णास द्वित्व होतें.

ळा, हंचरडा, झुंचर, ओथंचणे, झोंचट, पाठिंचा, शेंचडा अशीं रूपें विशेष प्रचारांतील, सबब तींच व्युत्पत्तीच्या अभावीं ग्राह्य समजावीं. ठुमरी, डामर, डामरणे, लोमणे, तुडुम हीं रूपें गौण समजावीं.

१३ तंबाखू, तमाखू–तंबाखू कोणी केव्हां आणली हें आतां माहीत झालें आहे. ही वनस्पती आमच्याइकडील नसून बाहेरून आलेली आहे. तेव्हां तमालपत्र अशी भलती व्युत्पत्ती करणे वेड आहे. उच्चाराच्या संबंधाने विद्वानांमध्यें द्विधामत आहे; सबब दोन्हीं रूपें ग्राह्य.

१४. लामणदिवा—लम्ब+दीप अशी ह्याची व्युत्पत्ती कळते; तेव्हां लांबणदिवा हेंच रूप कायम ठेवावें. दुसरें अग्राह्य. मोलस्वर्थच्या कोशांतही हेंच रूप ग्राह्य मानलें आहे.

१५ इमला–हें रूप अरबी इम्ला यापासून आलें असावें; व असें असल्यास इमला हेंच रूप ग्राह्य समजणे अवश्य आहे. शिवाय विशेष प्रचारांतील हेंच रूप आहे.

१६ उंबरठा, उमरठा; ओंबण, ओमण; कोंबट[1], कोमट; वांबळ वामळ.––भिन्नमत असल्यामुळें व्युत्पत्तीच्या अभावीं दोन्हीं रूपें ग्राह्य धरावीं.

१७ आंबसूल, आंबटढाण, तंबुरा (अर. तंबूरा), कैंबरे, कैंबळ, कोंब, थेंब, कोंबणे, झिंबड, तुंबणे, तारंबळ, उचंबळणे, झोंबणे, डोंबारी, तुंबारा, तुंबडी, तुंबा, तुंबळ हीं रूपें व्युत्पत्तीच्या अभावीं ग्राह्य धरावीं, कारण हीं विशेष प्रचारांतील होत.

(६) संयुक्त वर्ण जोडून लिहिणे किंवा निरनिराळे लिहिणेः–

(अ.) तक्रार, तकरार; चबुत्रा, चबुतरा; दिढोत्रा, दिढोतरा; ज्वान, जवान; सुग्रण, सुगरण वगैरे शब्द दोन

१–' कोंबट ' हें रूप ' कोमट'पेक्षां विशेष ग्राह्य असें मोलस्वर्थच्या कोशांत स्पष्ट ह्मटलें आहे.

प्रकारें लिहितात. दोहोंच्या उच्चारांत फरक आहे. लिहिण्याच्या संबंधानें सोय, सौकर्य व उच्चाराचें मार्दव किंवा ठसठशीतपणा ह्यांविषयीं विचार करणे अगत्याचें आहे. ज्या ठिकाणीं दोन परिपाठ नसून केवळ संयुक्त वर्ण लिहिण्याचा अथवा उच्चारण्याचा प्रघात आहे त्या ठिकाणीं मुद्दाम वर्णांची ओढाताण करून निष्कारण वर्ण निरनिराळे करणे किंवा लिहिण्याच्या किंवा उच्चाराच्याच सोईसाठीं किंवा सुलभपणासाठीं शब्दांच्या आंतररचनेंत फिरवाफिरव करणे इष्ट नाही, हें सांगावयास नको; व असें करावें अशाबद्दल आमची सूचनाही नाही. जो जम बसला आहे त्यांत उगीच बिघाड करण्यासाठीं व्यवस्था करावयाची नाही. काहीं विशेष फायदा असेल, किंवा नियमित सुयंत्र व्यवस्था होत असेल, तर मात्र विचार करावयाचा. ज्या ठिकाणीं लेखनाचे-दोन अथवा अधीक प्रकार दृष्टीस पडतात त्या ठिकाणीं सोय, सुलभपणा वगैरे कारणांचा विचार करतां चांगला प्रकार कोणता हें पाहणे अवश्य आहे. असें समजून आम्ही काहीं सूचना केल्या होत्या; परंतु त्या बाबतींत काहीं मित्रांचा गैरसमज झाला असावा असें दिसतें. शब्दांतील संयुक्त वर्णांची मुद्दाम ताडातोड करून आम्ही घोटाळा मात्र करीत आहो, असा कांहीचा समज झाला असावा. अशी ताड्यातोड झाली असेल, तर ती पूर्वीच होऊन चुकली आहे व ती योग्य व सकारणही आहे, असें ह्मटलें पाहिजे. जी व्यवस्था बऱ्याच शब्दांसंबंधानें अगोदर होऊन चुकली आहे तीच बाकीच्या काहीं शब्दांच्या संबंधानें व्हावी एवढ्याविषयीं आमची सूचना आहे. संस्कृत पंडि-

तांची सर्व भर संस्कृताकडे असे, हें महशूर आहे. सामान्य लोकांच्या सोई गैरसोईकडे त्यांचें लक्ष बिलकूल नव्हतें, असें ह्मटलें असतां चालेल. जो काय अभिमान तो संस्कृताविषयीं; जी काय शुद्ध व पवित्र भाषा ती संस्कृत. इतर सर्व अपभ्रष्ट व अशुद्ध, अतएव अग्राह्य, असा त्यांचा व त्यांच्यामागून झालेल्या काहीं पंडितांचा अभिप्राय असे; व हल्लींही काहींचा आहे. संस्कृत भाषा बोलण्याची भाषा फार प्राचीन काळीं विद्वान लोकांची होती. ती बोलण्याची भाषा ह्या दृष्टीने कसोटीस उतरण्यासारखी नव्हती व नाही. जी भाषा बोलण्याच्या कसोटीस फार दिवस उतरते तीच फार दिवस टिकते. आर्य लोकांची संस्कृत भाषा मृत भाषा कां व्हावी, व त्यांचा धर्म फार दिवस कां राहावा, ह्याविषयींची जी कारणें आहेत त्यांपैकीं प्रधान कारण हें दिसतें कीं, संस्कृत भाषा संकुचित पायावर असल्यामुळें लयास गेली व धर्म काहीं अंशीं विस्तृत व मजबूत पायावर असल्यामुळें तो टिकला. भाषेच्या बाबतींत विद्वानांच्याच सोईकडे लक्ष पुरविण्यांत आलें, पण धर्माच्या बाबतींत विद्वान व सामान्य लोक ह्या उभयतांची सोय काढण्यांत आली. उभयतांस शुद्ध व मुक्त होण्याचीं साधनें करून ठेवलीं. भाषेच्या संबंधाने विचार करतां संस्कृत रूपेंमात्र शुद्ध; तीं जशाचीं तशींच ठेवलीं तर उपयोग; तीं वापरण्यास सुलभ असोत किंवा नसोत, उच्चाराच्या सोईसाठीं किंवा लेखनाच्या सोईसाठीं त्यांच्या रचनेंत यत्किंचित् बदल झाला की ती लागलींच अशुद्ध बनलीं, ह्मणून समजण्यांत येतें. सामान्य लोकांच्या सोईकडे लक्ष देऊन विद्वानांनी भाषेचा कठीणपणा कमी करण्याविषयीं लक्ष पुरविलें असतें, तर

हिंदुस्थानांत आज कित्येक भाषा झाल्या आहेत त्या झाल्या असत्या किंवा नाही ह्याविषयीं संशय आहे. इतका पाल्हाळ करण्याचें कारण नव्हतें; पण अलीकडे काहीं विद्वान लोक मराठीस संस्कृत-मराठी बनवूं पाहात आहेत. ही गोष्ट मराठी भाषेच्या शाश्वतच्या हितास व प्रसारास अनिष्टकारक आहे, ह्मणून असें करण्याची आवश्यकता आहे. संस्कृत भाषेंतील शब्दांत संयुक्त वर्णांची रेलचेल आहे, त्याबद्दल विद्वानांस काहींच अडचण वाटत नसेल; परंतु सामान्य लोकांस ते शब्द उच्चारण्यास व लिहिण्यास कठीण जातें. ह्या गोष्टीकडे लक्ष न पुरविलें तर, व विद्वान लोक आपलाच हेका धेऊन बसले, तर विद्वानांनी शुद्ध मानलेलीं अथवा शुद्ध ह्मणून राखून ठेवलेलीं रूपें कठीण अथवा गैरसोईचीं वाटल्यावरून सामान्य लोक ती झुगारून देतात; व ही गोष्ट मराठीच्या संबंधाने तर स्पष्ट दिसत आहे. मराठी भाषेच्या इतिहासाविषयीं स्थूल दृष्टीने विचार करतां आपणांस असें दिसून येतें कीं, संयुक्त वर्णांनी युक्त असे संस्कृत शब्द प्राकृताच्या द्वारें मराठींत येऊं लागले, तेव्हां काहीं व्यंजनांचा लोप होऊन व दुसरा फेरफार होऊन साधे व सोपे शब्द प्रचारांत आले व तेच भाषेचें जीवित होऊन बसले. ही गोष्ट पुढील उदाहरणांवरून स्पष्ट दिसून येईल :—

पहिला शब्द संस्कृत, दुसरा प्राकृत व तिसरा मराठी, अशी पुढील उदाहरणांत व्यवस्था आहे असें समजावें.

१ तक्र, तक्क, ताक. २ शय्या, सेज्जा, शेज. ३ हरिद्रा, हलद्दा, हळद. ४ युग्म, जुग्ग, जूग. ५ विद्युत्, विज्जू, वीज. ६ अद्य, अज्ज, आज. ७ गर्भिणी, गब्भिणी, गाभण.

८ जामातृक, जामाउओ, जावई. ९ निद्रा, णिद्दा, नीज. १० मक्षिका, मच्छिआ, माशी. ११ चतुर्दश, चउद्दह, चौदा. १२ कर्तरी, कत्तरी, कातर. १३ उत्तिष्ट, उट्ठेहि, ऊठ. १४ अरण्य, रण्ण, रान. १५ अक्षि, अच्छी, आख. १६ आत्मीय, अप्पुल्लो, आपला. १७ रुदित्वा, रोत्तूण, रडून. १८ लज्जाशीलः, लज्जिरो, लाजरा. १९ वृश्चिकः, विञ्छुओ, विंचू. २० शर्करा, सक्करा, साकर. २१ द्वादश, बारह, बारा. २१ त्रयोदश, तेरह, तेरा. २३ घर्म, घम्म, घाम. २४ मार्गः, मग्गो, माग. २६ जिव्हा, जीहा, जीभ. २६ वह्लि, वेल्ली, वेल. २७ इक्षु, उच्छू, ऊस. २८ स्मशान, मसाण, मसण. २९ मर्कट, मक्कड, माकड. ३० कुब्ज, खुज्ज, खुजा.

वर जीं उदाहरणें दिलीं आहेत तशीं आणखी शेकडो उदाहरणें आहेत. जीं दिलीं आहेत त्यांवरून असें समजून येईल कीं, संयुक्त वर्णांची भानगड सामान्य लोकांस कठीण वाटून सोपीं रूपें करण्याकडे त्यांची प्रायः प्रवृत्ती असते. वीज, आज, जावई, माशी, ऊठ, विंचू, ऊस वगैरे रूपें आज जीं प्रचलित झालीं आहेत तीं भाषेचें जीवित होऊन बसलेलीं आहेत. तीं शुद्ध किंवा अशुद्ध ह्याबद्दल वाद नाही. तीं वापरल्याबद्दल कोणी उपहासास पात्र होत नाही, इतकेंच नाही, तर त्यांऐवजीं प्रचारांतील भाषेंत कोणी विद्युत्, अद्य, जामातृक, मक्षिका, उत्तिष्ठ, वृश्चिक, इक्षु, अशीं रूपें वापरूं लागेल, तर तोच उपहासास पात्र होईल. संयुक्त वर्णांची भानगड मोडून सोपीं रूपें करण्याविषयींची सामान्य लोकांची प्रवृत्ती ही फक्त संस्कृत भाषेपुरतीच होती असें नसून अरबी व फारसी भाषांसंबंधानेही होती, असें पुढील उदाहरणांवरून समजून येईल.–

१ फर्क् (अ)-फरक; २ जल्द् (फा)-जलद्; ३ कब्र् (अ)-कबर; ४ कह्र् (अ)-कहर; ५ कस्ब् (अ)-कसब; ६ हुज्जत् (अ)-हुजत; ७ मुहर्रम् (अ)-मोहरम; ८ मुकद्दमः (अ)-मुकदमा, मोकदमा; ९ हज्जाम् (अ)-हजाम; १० हम्माल् (अ)-हमाल; ११ अत्तार (अ)-अतार; १२ गजूल् (अ)-गजल; १३ तरत्तुद्द् (अ)-तरतूद; १४ दग़ल्बाज् (अ)-दगलबाज; १५ बदूल् (अ)-बदल; १६ बिल्कुल्ल (अ)-बिलकूल; १७ मुरव्वत् (अ)-मुरवत; १८ लक्ब् (अ)-लकब; १९ लज्जत् (अ)-लजत; २० वज्न् (अ)-वजन; २१ हरकत् (अ)-हरकत; २२ सर्राफ् (अ)-सराफ; २३ कस्साब् (अ)-कसाब; २४ बिलाशक (अ)-बेलाशक; २५ फारिखत्ति (अ)-फारकत; अज्म् (अ)-अजम; २७ अब्बासी (अ)-अबाशाई; २८ इज्जत् (अ)-इजत; कल्लाल् (सिंधी)-कलाल; ३० कस्ब् (अ)-कसब=धंदा. ३१ खत्त (अ)-खत; ३२ खास्सा (अ)-खासा; ३३ दर्कदार् (अ+फा)-दरकदार; ३४ दल्लाल् (अ)-दलाल; ३५ नव्वाब् (अ)-नबाब; ३६ फर्राश् (अ)-फरास; ३७ बक्काल् (अ)-बकाल; ३८ मस-ल्हत् (अ)-मसलत; ३९ मुद्दत् (अ)-मुदत; ४० रद्बदल् (अ) रदबदली; ४१ सद्र् (अ)-सदर; ४२ सब्र् (अ)-सबर; ४३ किम्ख्वाब् (फा)-किनखाब; ४४ ख्वाजा (फा)-खोजा; ४५ गर्म् (फा)-गरम; ४६ गिल्लावा (फा)-गिलावा; ४७ जख्म् (फा)-जखम; ४७ तन्ख्वा (फा)-तनखा; ४९ दर्खास्त् (फा)-दर-खास्त; ५० मग्ज् (फा)-मगज. ५१ मुफ्त् (फा)-मुफत; ५२ शर्म् (फा)-शरम. ५३ निर्ख् (फा)-निरख.

फारसी व अरबी भाषांतील जीं उदाहरणें वर दिलीं आ-हेत त्यांशिवाय आणखी कित्येक उदाहरणें आहेत, त्यांपैकीं काहीं पुढील पानावर टिपेंत दिलीं आहेत, त्यांवरून मराठीचें धोरण कोणीकडे आहे हें समजेल.

टीप :—फारसी शब्द–१ नख़ा–नखरा; २ नज़ाना–नजराणा. ३ पर्वाना–परवाना; ४ बार्गीर्–बारगीर; ५ मख्मल्–मखमल; ६ मग्जी–मगजी; ७ सर्कार्–सरकार; ८ सर्दार्–सरदार; ९ सुर्मा–सुरमा; १० किशमिश्–खिसमीस; ११ गुल्जार्–गुलजार; १२*गोशवारः–गोषवारा; १३ दर्बार्–दरबार; १४ नाम्दार्–नामदार; फर्मायश्–फरमास; १६ रौशनी–रोशनाई; १७ शर्बत्–शरबत, सरबत; १८ सर्पेश्–शिरपेच; १९ शत्रंजी–सतरंजी; २० सब्ज़ा–सबजा; २१ शम्शेर्–समशेर; २२ दर्वीशी–दरवेशी. २३ खिल्बत्–खलबत; २४ अल्बत्–अलबत; २५ खिद्मद्गार्–खिदमदगार. २६ आतष्बाजी–आतषबाजी २७ खष्खष्–खसखस. २८ हर्दम्–हरदम (प्रत्येकक्षणीं) २९ अल्गुजा–अलगूज; ३० कल्मदान्–कलमदान; ३१ गर्मी–गरमी; ३२ गुल्कंद्, गुलकंद; ३३ गुल्बास्-गुलबास; ३४ जान्वर्-जनावर; ३५ जेर्बंद्-जेरबंद; ३६ दर्मियान्-दरम्यान; ३७ दर्वाजा-दरवाजा; ३८ दह्षत्-दहशत; ३९ पर्दा-पडदा; ४० पाद्षाह्-पादशाह; ४१ पुर्सिष्-पुरशीस; ४२ पेष्जी-पेशजी; ४३ पेष्वा-पेशवा; ४४ बद्नाम्-बदनाम; ४५ बर्खास्त्-बरखास्त; ४६ बार्दान्-बारदान; ४७ मस्त्वाल्-मस्तवाल; ४८ मांद्गी-मांदगी; ४९ मुर्दा-मुडदा; ५० षह्र्-शहर; ५१ सिर्का-शिरका (दारू); ५२ सर्हद्-सरहद्द. टीप चालू.

* फारसी अथवा अरबी ह्या दोन भाषांत विसर्ग नाही; परंतु गोशूवारः, मुकद्दमः, तुर्रः, अफ्वः वगैरे शब्दांच्या अंत्याचा उच्चार विसर्गासारखा होतो, सबब विसर्गाचा उपयोग केला आहे. दुसरी गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे ती ही कीं, मूळ अकारान्त रूपाच्या अंत्यापुढें विसर्ग असतां किंवा विसर्गासारखा त्याचा उच्चार होत असतां विसर्गाचा लोप करून अंत्यास दीर्घत्व करण्याकडे मराठीची प्रवृत्ती दिसते. जसें :—कृष्णः–कृष्णा; रामः–रामा; गोपालः–गोपाळा; तुर्रः–तुरा; मुकद्दमः–मुकदमा; अफ्वः–अफवा; गोशवारः–गोषवारा इ०

टीप—संयुक्त वर्णांची विशेष भानगड ठेवणे हें मराठीच्या स्वभावास अनुसरून नाहीं हें वर सांगितलें. विजातीय संयुक्त वर्ण असल्यास ते तोडणे किंवा त्यांतील एकादा वर्ण गाळून सोपें रूप प्रचारांत येऊं देणे हा मराठीचा सामान्य स्वभाव आहे, हें वरील उदाहरणांवरून कळून येईल. पण त्याच व्यंजनास द्वित्व करून ठसठशीतपणा आणण्यासाठीं रूपें बनविणे हाही तिचा सामान्य स्वभाव आहे, हें पुढील उदाहरणांवरून समजेल.

हिंदी--चप्रासी-चपरासी.

अरबी--१ नज्राना-नजराणा; २ मग्रूर्-मगरूर; ३ इम्ला-इमला; ४ उम्दा-उमदा; ५ तस्वीर्-तसवीर; ५ फुर्सत्-फुरसत; ७ मजूकूर्-मजकूर; ८ मजूबूत्-मजबूत; ९ मत्लब्-मतलब; १० हिक्मत्-हिकमत; ११ हिज्री-हिजरी; १२ हल्वा-हलवा (ना.); १३ तुर्रः-तुरा; १४ गफ्लत्-गफलत; १५ मिल्कत्-मिळकत; १६ नुक्सान्-नुकसान; १७ मुकद्दम्-मुकादम, मुकदम, मोकदम; १८ तफ्सील्--तपशील; १९ तस्दी-तसदी; २० तज्वीज्-तजवीज; २१ मुन्सिफ्-मुनसफ; २२ मुज्रा-मुजरा; २३ अफ्वः-अफवा; २४ अल्वान्-अलवान; २५ इन्साफ्-इनसाफ; २६ इर्साल्-इरसाल; २७ इस्म्-इसम; २७ कस्रत्-कसरत; २९ खिद्मद्गार्-खिदमदगार; ३० तक्वा-तकवा; ३१ तरबीय्यत्-तरबेत; ३२ तस्दी-तसदी; ३३ नक्शी-नकशी; ३४ निस्बत्-निसबत; ३५ बर्कत्-बरकत; ३६ बुर्खा-बुरखा; मक्दूर्-मकदूर; ३८ मस्नद्-मसनद; ३९ मुख्तार्-मुखत्यार; ४८ मुब्लग्-मुबलग; ४१ हज्रत्-हजरत; ४२ मह्राब्-मेहरब; ४३ सुल्तान्-सुलतान; ४४ मिस्कीन्-मिसकीन; ४५ मस्जीद्-मशीद; ४६ मरातबा-मरातब; ४७ मश्अल्-मशाल; ४८ महल्ल्-महाल; ४९ मशूहूर-महशूर; ५० मह्सूल्-महसूल; ५१ इख्तियार्-अखत्यार; ५२ ऐश्आराम्-ऐषआराम; ५३ कस्बा-कसबा; ५४ खास्स-खास.

अक्कड.	चिट्ठी.	पट्ट (राणी)
अज्जम.	चित्ता.	पट्टा.
अट्टल.	छक्का.	पट्टी.
अड्डा.	छक्केपंजे.	पन्नास.
अल्लड.	छट्टा.	पल्ला.
अस्सल.	छप्पर.	पिल्लूं.
उल्लू.	जब्बर.	पुड्डा.
कच्चा.	जय्यत.	फक्कड.
कज्जा.	जरव्ख.	फज्जा.
कट्टा.	जुब्बेबाज.	फट्टा.
कल्ला.	टक्केटोणपे.	फन्ना.
कफल्लक.	टक्कर.	फल्ले.
किट्ट.	टक्कल.	फिक्का.
किल्ला.	टर्र.	फिक्कट.
किल्ली.	ठिक्कर.	बत्तासा.
कुल्ला.	ठुस्सा.	बत्ती.
खच्च.	ढब्बू.	बद्दू.
खट्टू.	ढुस्सा.	बिब्बा.
खड्डा.	तट्ट.	बुक्का.
खलबत्ता.	तट्टूं.	बुक्की.
खुद्द.	तम्मा.	बुड्ढा.
गच्च.	तर्र.	भक्कम.
गच्ची.	तल्लख.	भट्टी.
गट्ट.	तुक्का.	भय्या.
गठ्ठा.	थक्क.	भुर्र.
गुद्दे.	थट्टा.	मज्जाव.
घट्ट.	दिक्कत.	मठ्ठ.
घट्टे.	दुप्पट.	मठ्ठा.
घुस्सा.	धक्का.	मरगठ्ठ.
चक्कर.	धट्टाकट्टा.	मुक्काम.
चर्र.	धिप्पाड.	मुद्दा.
चड्डी.	धुब्बा.	मुद्दाम.
चिक्कू.	पक्का.	मातब्बर.

रद्द.	सज्ज.	हल्लीं.
रट्टा.	सप्पा.	हुक्का.
लख्ख.	सद्दा.	हुक्की.
लट्ट.	सिद्दी.	हुद्दा.
लड्डु.	हक्क.	हुन्नर.
लुच्चा.	हट्ट.	हुल्लड.
वेलचुट्टी.	हत्ती.	क्षुल्लक.
शक्कल.	हद्द.	
शिक्का.	हल्ला.	

उलट पक्षीं मुळांत सजातीय द्वित्त वर्ण असतां सामान्य नियमाप्रमाणें त्यांतील एक वर्ण झुगारून दिल्याचींही थोडीं उदाहरणें आढळतात, जसें:—हज्जाम्, हम्माल्, तुर्रद्द्, मुहर्रम्, अत्तार्, मुरव्वत्, लज्जत्, कस्साब्, बिलाशक्क्, अब्बासी, इज्जत्, कल्लाल्, खत्त्, खास्सा, कल्लाल्, मुद्दत्, बक्काल् इ०. अशीं अपवादक उदाहरणें फारच थोडीं आहेत. हे थोडे अपवाद तरी कां असावे हें समजत नाही. लज्जत्, इज्जत् अशीं रूपें करण्याचा प्रघात दिसून येतो, त्याप्रमाणें हज्जाम, हम्माल वगैरे मूळ रूपें वापरण्याचा प्रघात पडला असतां मराठीचें धोरण संभाळण्याचें व मूळ सोपें रूप वापरल्याचें श्रेय येईल. जे संस्कृत शब्द अथवा इतर भाषांतील शब्द जशाचे तसेच ठेवण्यांत आले आहेत त्यांची गोष्ट निराळी.

वर जीं उदाहरणें दिलीं आहेत त्यांवरून असें दिसून

१ फारसी व अरबी भाषांतील दिलेल्या उदाहरणांवरून आणखी असें समजून येईल कीं, भाषेच्या सोईसाठीं वाटेल तशीं रूपें बनविण्यांत आलीं आहेत. अंत्य व्यंजनास तर अजी फाटा देण्यांत आला आहे, इतकेंच नाहीं, तर शब्दांमधील व्यंजनान्त वर्ण स्वरान्त केला आहे. कित्येक मूळ शब्द जसेच्या तसेच ठेवतां येण्यासारखे असून तसें करण्यांत आलें नाहीं, ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

येईल कीं, संस्कृत, फारसी, अरबी वगैरे भाषांतील शब्दांमधील विजातीय जोडाक्षर न ठेवतां सोपीं रूपें करण्याकडे व मुळांत अंतीं किंवा मध्यें व्यंजन असतां तें व्यंजन तसेंच न ठेवतां होतां होईल तो स्वरान्त लिहिण्याकडे भाषेची सामान्य प्रवृत्ती आहे. संयुक्त वर्णांची भानगड कमी केल्यामुळें लिहिण्यांत सोपेपणा किती आला आहे व सोय केवढी झाली आहे, हें सांगण्याचें कारण नाहीं. जी व्यवस्था वर सांगितली ती उगीच झाली आहे, असें नसून स्वराघाताचे जे मराठींत नियम आहेत त्यांस मुख्यत्वें अनुसरून आहे. हे नियम मराठी जाणणाऱ्यांपैकीं बहुतेकांस माहीत असतील, असें समजून शब्द लिहिण्याच्या बाबतींत आह्मी सूचना केल्या होत्या; परंतु काहीं मित्रांनी असा आक्षेप घेतला कीं, उच्चार करतांना आपण कर्तो, बोल्तो, बस्तो, निज्तो, खट्ला, इत्का, शिम्गा, घड्वून, तिस्रा, एक्वीस असा उच्चार करतो, ह्मणून लिहितांना असें लिहावयाचें की काय? स्वराघाताचे जे नियम मराठींत प्रचलित आहेत, व ज्यांअन्वयें तिची लेखनपद्धती ठरून गेलेली आहे तिकडे त्यांचें लक्ष गेलें असतें, तर हा आक्षेप काढण्यांत आला नसता. स्वराघाताच्या बाबतींत मुख्य नियम कोणते, हें डा॰ भांडारकर ह्यांच्या शब्दांनी मागें सांगितलेंच आहे; तथापि, ते नियम येथें सांगितले असतां बरें होईल, असें वाटल्यावरून पुनः सांगतो. ते असेः—

१ मराठी भाषेंतील अकारान्त शब्दांच्या (मग हे शब्द देशज, अपभ्रष्ट, शुद्ध संस्कृत, फारसी, अरबी, अथवा इंग्रजी वगैरे भाषांतील

असोत) अंत्याचा उच्चार नेहमीं व्यंजनासारखा करावयाचा, व लिहितांना ते शब्द स्वरान्त लिहावयाचे. जसें:—

हात्–हात; पाय्–पाय; टेबल्–टेबल; अपील्–अपील; जीवन्–जीवन; उदक्–उदक.

२ अंतीं 'अ' असून उपांत्य 'अ' असेल, तर उपांत्यावर आघात पडल्यामुळें त्याचा दीर्घ उच्चार करावा लागतो; परंतु तो दीर्घ लिहावयाचा नाहीं. जसें:-

तबंक्–तबक; प्रळंय्–प्रळय; उलंट्–उलट; पंण्–पण; नजंर्–नजर; बोथंट्–बोथट; प्रकंट्–प्रकट; अगंर्–अगर; अनुभंव्–अनुभव; मंन्–मन; उदंक्–उदक; चरंण्–चरण; कमंल्–कमल इ०.

३ इतर ठिकाणीं जेव्हां 'अ' कचाटींत सांपडला असेल तेव्हां त्याचा उच्चार व्यंजनासारखा करावयाचा; परंतु लिहितांना तो तसा लिहावयचा नाहीं; स्वरच कायम ठेवावयाचा. जसें:—

ठोक्ळा-ठोकळा; आर्शी-आरशी; राम्दास-रामदास; टोप्ली-टोपली; सग्ळा-सगळा; चोंब्डा-चोंबडा; लेख्णी-लेखणी; शिम्गा-शिमगा; किर्कोळ-किरकोळ; खान्देश-खानदेश; माम्लेदार-मामलेदार; मंगळ्वार- मंगळवार; बोल्तो-बोलतो; निज्तो-निजतो; सासुर्वास्-सासुरवास; वाग्णे-वागणे; कस्ला-कसला; भग्वा-भगवा; पोलिस्चा-पोलिसचा; तिस्रा-तिसरा; सुधार्णा-सुधारणा; कान्उघाड्णी-कानउघाडणी; एक्दम्-एकदम; उदासीन्पणा-उदासीनपणा इ०.

वर जे नियम दिले आहेत त्यांवरून असें दिसून येईल कीं, उच्चाराच्या व लिहिण्याच्या संबंधानें जी थोडीबहूत भानगड आहे ती मुख्यत्वें ' अ ' संबंधानें आहे; व वादग्रस्त शब्दांच्या बाबतींत भानगड उत्पन्न झाली असतां काय करावयाचें, हेंही वर जीं अनेक उदाहरणें दिलीं आहेत त्यांवरून कळून येईल. जी व्यवस्था सांगितली ती अगोदरच ठरून गेली आहे, व ती विद्वानांनाही संमत झाली आहे. ही व्यवस्था सोईची असल्यामुळें तिचेंच होतां होईल तो अवलंबन करावें असें आह्मांस वाटतें. ज्या शब्दांतील संयुक्त वर्णांची ताडातोड केली असतां अर्थविपर्यास होण्याचा अथवा स्वारस्य, जोर वगैरे कमी होण्याचा संभव आहे त्या शब्दांस बिलकूल धक्का लावावयाचा नाही, हें सांगावयास नको. जेथें अशा प्रकारचें काहीं एक होण्याचा संभव नाही, तेथें भाषेच्या ठरलेल्या सोप्या व सोईच्या नियमांप्रमाणें चालण्यास हरकत कोणती असावी, हें समजत नाही.

वरील विचार लक्षांत आणतां विकल्प ठेवण्याचें कारण दिसत नाही; तथापि, तो ठेवावा असें मित्र मंडळीस वाटत असेल, तर त्यांत नुकसान आहे असें नाही, इतकेंच कीं तो विकल्प निरर्थक होतो. असो. ठरलेल्या व सुयंत्र व्यवस्थेप्रमाणें जे शब्द लिहिणे योग्य आहे ते :—

मरजी—(अ. मर्‌जी); मसकरी (अ. मस्‌करी); आबरू (फा. आब्‌–पाणी, व रू–चेहरा); तरजुमा (हिं. तर्‌जुमा); दसतूर–(फा. दस्‌तूर); तकरार–(अ. तक्‌रार); मोरतब (अ. मर्‌तबा); खुषकी–(फा. खुष्‌की); गरदन (फा. गर्‌दन्); टरबूज–(फा. तरबुज़्, तरबूज्); दरजी–(फा. दर्‌जी); बरतरफ–(फा. बर्‌-

तरफ्); बरफी (फा. बर्फी); मरदानी–(फा. मर्दानी); मसका (फा. मस्का); मरफा–(फा. मर्फा); लशकर–(फा. लश्कर्); वसतरा–(फा. अ. वस्तरा, उसतुरा); वसताद–(उस्ताद); सरपोस–(फा. सरपोश्); इबरत (अ. इब्रत्); जवान–(फा. जवान्); पसतीस–(फा. पस्तीस); कुतरा–(कुत्रा); भितरा (भित्रा;) अकसाबोकशी–(अक्साबोक्शी); चबुतरा–(चबुत्रा); एकोतरा (एक + उत्तर); दिढोतरा (दीड व उत्तर = जास्त); दुरबीण (फा. दुर्बीन्); दुहोतरा (दुहोत्रा); भाडोतरी–(भाडे उतरणारा); निसतरणे (निस्तरणे); पंधरा (पंध्रा सं. पंचदश. प्रा. पण्णरह. पा. पन्नारस); सतरा (सत्रा. सं. सप्तदश. प्रा. सत्तरह. पा. सत्तरस); अठरा (अठ्रा–सं. अष्टादश. प्रा. अट्ठरह. पा. अठरस) अष्ट ह्याचा प्राकृतांत अट्ठ व मराठींत आठ असा अपभ्रंश होतो; व ' दश ' चा ' रह ' व नंतर मराठींत रा असा अपभ्रंश होतो. तेव्हां आठरा हें रूप व्युत्पत्तीला जवळ आहे; परंतु प्रचारांतील रूप अठरा आहे.

अधांतरी (अधांत्री); जागरण (जाग्रण); सुगरण (सुग्रण); पिसतूल (पिस्तूल), कोरडा (कोर्डा-चाबूक), मुकरर (मुक्रर्); झुरका (झुर्का); हैदराबाद (हैद्राबाद); वरदी (वर्दी); हंबरडा (हंबर्डा); गबरू (गब्रू); पसतावा (पस्तावा); वरदळ (वर्दळ); नुसता (नुस्ता); बढतरफी (बढतर्फी); मारफत (मार्फत); मोरचा (मोर्चा); फरडा (फर्डा); शिरके (शिर्के); तरतूद (तर्तूद); बुरदंड (बुर्दंड); कसपट (कस्पट); मुलकी (मुल्की).

टीप—वर जीं रूपें दिलीं आहेत त्यांपैकीं मरजी, दरजी वगैरे काहीं रूपांच्या संबंधाने आक्षेप निघण्याचा संभव आहे. परंतु शेकडो अशा प्रकारच्या शब्दांची काय व्यवस्था करण्यांत आली आहे हिकडे लक्ष पुरविलें असतां हीं रूपें अपवादांत कां काढावीं हें समजत नाही. विकल्प

ठेवूं नये असें आमचें म्हणणे नाही; परंतु तसा विकल्प ठेवण्यास सबळ कारण दिसत नाही.

(ब) संयुक्त वर्णांच्या बाबतींत वरील (अ) कलमांत जी भानगड सांगितली ती मुख्यत्वें संयुक्त वर्णांपैकीं प्रथमचा वर्ण व्यंजन ठेवावयाचा किंवा मराठी भाषेच्या स्वराघाताच्या नियमांस व त्यांवरून ठरलेल्या लेखनपद्धतीस अनुसरून स्वर ठेवावयाचा ह्याविषयीं होती. संयुक्त वर्णांच्या संबंधाने दुसरा एक प्रकार आहे; तो 'औ', 'उ' आणि 'व' ह्यांसंबंधाने आहे. उदाहरणार्थ—चौदा, चउदा, चवदा; टौकारणे, टउकारणे, टवकारणे; औत, आऊत; सौदा, सवदा; औजार, अवजार; दौत, दऊत; दौड, दऊड; चौथा, चउथा, चवथा; चौथ, चऊथ; चौऱ्यायशी, चवऱ्यायशीं; चौतीस, चवतीस; चौवीस, चोवीस, चव्वीस; चौसट, चवसट; चौऱ्याहत्तर, चवऱ्याहत्तर; चौऱ्याण्णव, चवऱ्याण्णव; चौकोन, चउकोन, चवकोन; चौथरा, चउथरा, चवथरा; औटकी, आउटकी.

---

१ दादोबा वगैरे काहीं विद्वान लोकांचें ह्मणणे आहे कीं, काहीं अडाणी लोकांची जीभ वळत नाही, ह्मणून संयुक्त वर्णांचे उच्चार निरनिराळे ते करतात. हें कारण असेल; परंतु मराठी भाषेचा स्वभाव पाहतां निरनिराळे वर्ण तोडून लिहिण्याचा विशेष प्रचार दिसतो. अपवाद प्रायः शुद्ध संस्कृत शब्द होत. हे जसेच्या तसेच ठेवण्याविषयीं फाजील कटाक्ष असल्यामुळें तशी स्थिती दृष्टीस पडते. एरवीं फारसी, अरबी वगैरे अनेक भाषांतील शब्दांस मागें सांगितलेले नियम लागू केले आहेत. स्वराघाताकडे लक्ष न गेल्यामुळें काहींच्या चमत्कारिक समजुती झाल्याचें दिसतें.

वरील शब्दांपैकीं काहीं संस्कृतांतून प्राकृताच्या द्वारें मराठींत आले आहेत व काहीं फारसी वगैरे भाषांतून आले आहेत. प्राकृतांत ऐ व औ हे संयुक्त वर्ण नाहीत. 'ऐत् ओत्' (वर. परि. १. सू. ३५) व 'औत् ओत्' (वर. परि. १ सू. ४१) ह्या सूत्रांप्रमाणें 'ऐ'च्या ऐवजीं 'ए' व 'औ'च्या ऐवजीं 'ओ' असे आदेश होतात. ही एक गोष्ट. दुसरें असें कीं, प्राकृतावरून आलेल्या शब्दांची व्युत्पत्ती पाहतां 'औ'चा किंवा 'व'चा प्रघात नसून 'उ'चा प्रघात आढळून येतो. व्युत्पत्तीवरून ग्राह्य रूप धरावयाचें आहे, तर ज्यांत 'उ' आहे, असें व्युत्पत्तीला जवळचें रूप आहे असें पुढील उदाहरणांवरून समजेल:–

सं.	प्रा.	म.
चतुर्दश.	चउद्दह.	चउदा.
चतुर्थी.	चोत्थी, चउत्थी.	चऊथ.
चतुर्थः	चउत्थो.	चउथा.
चतुष्कोण.	चउक्कोण.	चउकोण–न.
आयुध.	आउह.	आऊत.
चतुरशीति.	चउरसी.	चौऱ्यायशी.
चतुस्त्रिंशत्.	चउत्तीस.	चउतीस.
चतुष्षष्टि.	चउस्सट्टी.	चउसट.
चतुस्सप्तति.	चउसत्तरि.	चउऱ्याहत्तर.
चतुर्णवति.	चतुणवुति (पाली.)	चउऱ्याण्णव.

वरील उदाहरणांपैकीं 'आयुध' शिवाय बाकींचीं उदाहरणें एकसारखीं आहेत. संस्कृत 'चतुस्' चें प्राकृत रूप

'चउ' असें होतें. तेव्हां वरील शब्दांत प्रारंभीं 'औ' लिहिण्यास व्युत्पत्तीच्या दृष्टीने आधार मिळत नाही. दौत शब्द अरबी 'दवात्' ह्या पासून आला आहे. तो 'दौत' असें लिहिण्यास मुळांत आधार नाही. टौकारणे ह्याची व्युत्पत्ती कळत नाही. दौड हा हिंदुस्थानी शब्द आहे; व औजार व सौदा हे फारसी शब्द आहेत. औटकी हा औटकी ह्यां पासूनच आला आहे. पण औट हा तरी प्राकृताच्या द्वारें आला आहे किंवा शुद्ध देशज आहे, हें समजण्यास सध्या मार्ग नाही. तथापि, ह्या शब्दांत 'औ' लिहिण्यास काहीं आधार आहे. अशी एकंदर स्थिती असतां काय करावयाचें, असा प्रश्न उत्पन्न होतो. आम्हांस वाटतें कीं, काहीं तरी एक ठरीव व्यवस्था असली तर बरें. जीं मतें आलीं आहेत त्यांवरून निर्णयात्मक असें काहीं सांगतां येत नाही. तथापि, औ लिहिण्याविषयीं बऱ्याच मित्रांकडून सूचना आल्या आहेत. तेव्हां औ लिहिण्याचाच प्रघात पडला तर बरें आहे. ज्या ठिकाणीं फार दिवसांच्या प्रचारामुळें निराळीं रूपें ठरलीं आहेत त्या ठिकाणीं विकल्प ठेवावा. हल्लीं जो बऱ्याच रूपांच्या संबंधाने निष्कारण विकल्प आहे तो काढून अवश्य तेवढा विकल्प ठेवावा. हीं सर्व रूपें कशीं असावीं, हें पुढील यादीवरून कळेल

टीपः—काहीं थोड्या लोकांचें असें ह्मणणे आहे कीं, कवींसाठीं निरनिराळीं रूपें असणे बरें; कारण, कविता करतेवेळीं त्यांस अडचण पडते. हें ह्मणणे दिसण्याला बरें दिसतें; परंतु वस्तुतः पाहतां कवींस मुभा असल्यामुळें ते आपली व्यवस्था वाटेल तशी करून घेतात. जे खरे कवी आहेत त्यांच्या विचारांच्या ओघाबरोबर शब्दांचाही ओघ चाललेला असतो. आमच्या रूपांची त्यांस अडचण येत नाही. तेव्हां

औजड, अवजड.
औट (३½)
औटकी.
औडंबर, अवडंबर.
औरंगजेब.
औलाद (अ. औलाद्)
औदुंबर.
औलिया, अवलिया (अ. औलिया)
और (आणखी)
औरत-(अ. औरत्)
औरसचौरस.
औषध.
कौटाळणे, कवटाळणे.
कौटाळीण.
कौठ, कवठ (सं. 'कपित्थ' चा अपभ्रंश)
कौडी, कवडी (सं. 'कपर्दिक' प्रा. 'कवड्डिअ'चा अपभ्रंश)
कौडीचुंबक, कवडीचुंबक.
कौल (म.)
कौलार (म.)
कौल (अ.)
कौलकरार.
कौलनामा.
कौला (हिं. नारिंग)
कौशीकानडा (रागाचा प्रकार)
खौट, खवट.
गौंडी, गवंडी.
गौडबंगाल.
गौडसारंग (रागाचा प्रकार)
गौप्य, गोप्य.
गौर (देवी)
गौळी, गवळी (सं. 'गोपाल' ह्याचा अपभ्रंश)
चौक (हिं.)
चौकट (सं. चतुस् + काष्ट)
चौकडा.
चौकशी (हिं.)
चौकस (हिं.)
चौकळशा (चतुर् + कलश) = जात.
चौका (हिं. स्वयपाकरतां)
चौके.
चौकी, चौकीदार, चौकीपाहरा.
चौखणी.
चौसोपी.
चौखुंट.
चौगुणीने.
चौघडा.
चौघडी.
चौघे.
चौचाल, चवचाल.
चौणा, चवणा.

कवींच्या सोईसाठींच केवळ वैकल्पिक रूपें असण्याचें कारण आहे असें वाटत नाही. जर त्यांस अशी अडचण असेल, तर त्यांस मोकळीक आहेच. पण तेवढ्याकरतां गद्यात्मक ग्रंथाच्या लेखन पद्धतींत एक ठरीव व्यवस्था होत असल्यास ती कां अमलांत आणूं नये, हें समजत नाही.

चौतर्फा.
चौताळणे, चवताळणे.
चौताल (वाद्यांतील)
चौताली.
चौतीस.
चौथरा.
चौथा.
चौथाई.
चौदा.
चौधरी (कामगार)
चौधारी (निवडुंग)
चौपट.
चौपदरी.
चौपन, चोपन.
चौपायांवर.
चौपाळा, चोपाळा (चतुर् + पाद् ?)
चौफुला.
चौफेर (हिं.)
चौरंग.
चौबुरजी.
चौरस (चतुर् – चार + अस्व = कोन)
चौरी, चवरी (सं. ' चामर 'चा अपभ्रंश)
चौऱ्याहत्तर.
चौऱ्याण्णव.
चौऱ्यायशी.
चौवेचाळीस, चव्वेचाळीस.
चौशेरी.
चौसट, चौसष्ट.
टौका.
टौकारणे.
डौर (सं. 'डमरू 'चा अपभ्रंश)
डौल.
तौस (वाद्य)
दौड (हिं)
दौंडी.
दौणा, दवणा.
दौलत (अ)
दौलतजादा.
दौलताबादी (फा)
धौताल.
नौबद (हिं)
नौसागर, नवसागर.
पौंची, पोची.
पौबारा, पोबारा.
पौष.
फौज (अ)
फौजदार (अ + फा.)
मौज (अ)
मौजा (अ. खेडें)
मौजे.
मौलवी (अ)
मौल्य (सं. 'मूल्य ' चा अपभ्रंश)
लौकर, लवकर.
लौचीक, लवचीक.
सौदा (फा.)
सौदागर, सौदागीर (फा.)
सौदासूत (व्यापाराचा जिन्नस)
सौराथ (सं. ' स्वार्थ 'चा अपभ्रंश)
सौलत (अ.)
हौजा.
हौद (अ.)

हौदा (अ.) हौस (अ)
हौरा, हवरा. हौशी.

वरील यादीवरून समजून येईल कीं, फारसी, अरबी व हिंदुस्थानी भाषांतील शब्दांत प्रारंभीं प्रायः औ असतो. सं 'चतुर्' ह्याचा प्राकृतांत 'चउ' असा अदेश होतो. पण मराठींत चौ असा आदेश झाला आहे. हा उच्चाराच्या शीघ्रपणासाठीं झालेला असावा; व 'चउ' पेक्षां 'चौ' हाच आदेश बराच प्रिय झाला आहे असें दिसतें. फारसी, अरबी, हिंदुस्थानी व प्राकृत ह्यांच्या द्वारें आलेले शब्द बरेच आहेत. शिवाय देशज शब्दांपैकीं काहीं शब्द लिहितांना 'औ' लिहिण्याचा संप्रदाय दिसतो; तेव्हां एक ठरीव व्यवस्था करावयाची आहे, तर 'औ' लिहिण्याचा प्रघात पडला तर बरें. जेथें प्रस्तुतच्या प्रचारावरून तसें करतां येत नाही, तेथें विकल्प ठेवला आहे. कौठ, कौडी, खौट, गौंडी, गौळी, चौताळणे, चौपन, चौली, दौणा वगैरे रूपांपेक्षां कवठ, कवडी, खवट, गवंडी, गवळी, चवताळणे, चोपन, चवली, दवणा अशीं रूपें विशेष प्रचारांतील आहेत, सबब विकल्प ठेवला आहे. असा विकल्प नवीन नाही, जुनाच आहे.

[७] करितां, करतां; ठेवितां, ठेवतां; काढितां, काढतां; ओढितां, ओढतां; लावितां, लावतां; मारितां, मारतां वगैरे रूपांपैकीं एकच रूप ग्राह्य धरावें किंवा दोन्हीं कायम ठेवावीं ह्याविषयीं विचार.

करितां, करतां; ठेवितां, ठेवतां वगैरे दोन निरनिराळीं

रूपें वापरण्यांत येतात, तर हल्लींप्रमाणें दोन्हीं रूपें वापरण्यास सवड असावी किंवा ह्या दोन रूपांपैकीं एक रूप पसंत करून तें वापरण्याविषयीं शिफारस करावी असा प्रश्न आहे. वर ज्या प्रकारचीं रूपें सांगितलीं त्या प्रकारचीं सर्व धातूंवरून दोन निरनिराळीं रूपें होतात, असें नाहीं. सांग, बोल, चाल, ऊठ, बस, नीज वगैरे अनेक धातूंच्या रूपांविषयीं विचार करतां, सांगतां, बोलतां, चालतां, उठतां, बसतां, निजतां अशीं एक एकटीं रूपें होतात. ह्मणजे मूळ धातूस 'तां' प्रत्यय लागून सरळ रितीनें रूपें होतात. तीं उच्चाराप्रमाणें लिहिण्याचा परिपाठही आहे. तर मग दोन निरनिराळीं रूपें ग्राह्य धरण्याचें कारण काय? जर 'तां' प्रत्यय लागून ठेवतां, काढतां, ओढतां अशीं सरळ रूपें करतां येतात, व उच्चार करतांना ठेवतां, काढतां, ओढतां असा सामान्यत्वें उच्चार करण्यांत येतो, तर मुद्दाम इडागम करून लिहिण्यांत ठेवितां, काढितां, ओढितां अशीं रूपें कां लिहावीं हें समजत नाहीं. लिह वगैरे काहीं थोड्या धातूंस इडागम केल्याशिवाय सोय नसते, ह्मणून तशा धातूंस मात्र इडागम करून 'तां' प्रत्यय लावणे योग्य आहे. बाकीच्या धातूंविषयीं सरळ व्यवस्था व्हावी, ह्मणजे नुसता 'तां' प्रत्यय लावावा; व उच्चाराप्रमाणें रूपें लिहावीं, हें आह्मांस प्रशस्त दिसतें. कदाचित् कित्येक म्हणतील कीं "स्वरतिः, सूयतिः, सूतिः, धूञ्, तञ्चू, अञ्जू, तञ्जू मृजस्तथा" ह्या आधुनिक कारिकेंत एके ठिकाणीं गोवलेल्या संस्कृत धातूंस जर विकल्पें इडागम होतो व तो पाणिनीसही संमत पडला आहे, तर मराठींत असला इडागम कां असूं नये? हा आक्षेप दिसण्याला ठीक दिसतो, पण

उठल्या बसल्या संस्कृताकडे धाव घेणे हें प्रचलित भाषांच्या संबंधाने किती चुकीचें आहे, हें मागें अनेक वेळां सांगितलें आहे. जी भाषा फक्त थोड्या विद्वानांची होती व जींतील निष्कारण भानगड मोडण्याविषयीं उद्योग करण्याची आवश्यकता भासली नाही, तिचा वारंवार दाखला देण्यांत अर्थ नाही, असें आम्हांस वाटतें. उपयुक्त भाग जेवढा सांपडेल तेवढा खुशाल घ्यावा. 'करितां' वर्तमान कालवाचक धातुसाधित अव्यय व 'करतां' साठीं अशीं दोन रूपें निरनिराळे अर्थ दाखविणारीं आहेत, तेव्हां ह्यांचा निरानिराळ्या कामांसाठीं उपयोग करावा, अशी दादोबांची आज कित्येक दिवसांपासून सूचना आहे. ह्या सूचनेची अंमलबजावणी सार्वत्रिक होत नाही. ह्यावरून हा अपवाद ठेवण्यांत अर्थ दिसत नाही. तथापि, अपवादक रूप ठेवावयाचें असल्यास हें एकटेंच दिसतें.

[८] ओव–ओ, व ओ–अव

काहीं लोक 'ओ' व 'अव' ह्यांसंबंधाने घोटाळा करतात. परंतु तो प्रायः सामान्य लोकांत दृष्टीस पडतो; व तो मुख्यत्वें उच्चाराच्या संबंधाने होय. शब्दोच्चार लौकर करण्याच्या हेतूने 'ओव' ह्यांतील 'व' स अजी फाटा देऊन नुसता 'ओ'च उच्चारण्याचा प्रघात दिसतो. जसें :—

(अ) **ओव–ओ**—ओवर=ओर; ओवणे (शिवणे)=ओणे; ओवऱ्या=ओऱ्या; ओवळा=ओळा; कोवळा=कोळा; खोवणे=खोणे; गोवणे=गोणे; गोवरी=गोरी; भोवणे=भोणे; सभोवता=सभोता; भोवरा=भोरा; भोवळ–भोळ; रोवणे=रोणे; रोवळी=रोळी; सोवळा=सोळा; भोवई=भोई; पोवळें–पोळें.

(ब)ओ–अव–भरंवसा–भरोसा; अंगवठा–अंगोठा; अगवळ–अ-गोळ; म्हारवडा–म्हारोडा.

वरील सर्व शब्दांची व्युत्पत्ती कळत नाही ; काहींची कळते. तिजवरून असें दिसतें कीं, नाम–नाव, दाम–दावें, ग्राम-गाव, आचमन-आचवणे, विश्राम-विसावा, श्यामल-सा-वळा, जामातृक-जावई, आमलक-आवळा, सामंत-सावंत, चामर-चवरी, पंचम-पांचवा, जेमन-जेवण वगैरे शब्दांत 'म' चा 'व' झाला आहे. त्याप्रमाणें, ओंवळा (अमंगल), कोवळा (कोमल), भोवता, भोवरा, भोवळ (भ्रम), सोंवळा (सुमंगल) ह्यांत ' म ' चा 'व' झाला आहे. व उपरि-अवरि-वरि-वर, कृपा-किवा-कीव, प्रतिपत्-पडिवआ-पाडवा, कच्छप-कासव, नापित-ण्हावीओ-न्हावी, कपित्थ-कविठ्ठ-कवठ, कपर्दिक-कवड्डिअ–कवडी, रोपण-रोवण–रोवणे ह्यांत पो वः (वररूची–परि. २ सूत्र १५) ह्या सूत्राप्रमाणें मुळांतील ' प ' चा प्राकृतांत ' व ' होऊन तोच मराठींत कायम झाल्याचें दिसतें. गोवरी हें रूप 'गोविट्'पासून आलेलें आहे, व ओवर हें रूप सं. वधू + वर = प्रा. वहू + वर ह्यापासून अपभ्रंश होऊन बनलें असावें. तेव्हां व्युत्पत्तीच्या दृष्टीने ' व ' ठेवणे अवश्य आहे. समंजस लोकांचा लिहिण्याचा प्रघात नुसता ' ओ ' लिहिण्याचा नाही. मोलस्वर्थच्या कोशांत नुसता ' ओ ' दिलेला नाहीं. ह्या सर्व कारणांचा विचार करतां नुसता ' ओ ' लिहिणे अगदीच गौण, सबब अग्राह्य. ' ओव,' व ' अव ' असलेलीं पुढील रूपें मात्र ग्राह्य समजावीं.

ओवर, ओवणे, ओवऱ्या, ओंवळा, कोवळा, खोवणे, गोवणे, गोवरी, भोवणे, सभोवता, भोवरा, भोवळ, रोवणे, रोवळी, सोवळा, भोवई, पोवळें, भरंवसा, अंगवठा, अगवळ, म्हारवडा.

(९) प्रारंभींचा अ—आ.

मराठी भाषेंत प्रारंभींच्या अ, आच्या उच्चाराविषयीं जितका घोटाळा आहे तितका दुसऱ्या कोणत्याही वर्णाविषयीं नाही. अशा प्रकारें हा घोटाळा असल्यामुळें लेखनांतही तोच घोटाळा दृष्टीस पडतो. लेखनांत हा घोटाळा असाच राहूं द्यावयाचा किंवा काढून टाकावयाचा असा प्रश्न आहे. घोटाळा असूं द्यावा, असें कोणी ह्मणणारे असतील असें आह्मांस वाटत नाही. उच्चाराच्या बाबतींत सर्वत्र आळा घालणे काहीं अंशीं कठीण आहे. पण तशी गोष्ट लेखनाची नाही. ' दातुरिच्छा बलीयसी ' हें तत्त्व काहीं अंशीं खरें आहे, असें घेऊन चालल्याशिवाय सोय नसते. कारण, दात्यास प्रतिबंध करतां येत नाही. त्याप्रमाणें 'वकुरिच्छा बलीयसी ' हें तत्त्व आहे व लेखनपद्धती ठरवितांना तें लक्षांत ठेवलें पाहिजे, असें एका मित्राने सुचविलें आहे. आमच्या मित्राचें हें ह्मणणे काहीं अंशीं खरें आहे; पण ह्या तत्त्वाची व्याप्ती मर्यादित आहे, हें विसरतां कामा नये. स्थूल दृष्ट्या उच्चाराची पद्धत समंजस लोकांत बरीच ठरल्यासारखी आहे. असें नसतें, तर लोंनी, पानी, यनू, वंटा असे उच्चार करणारास धाम्या, शब्द नाकांतून उच्चारणाऱ्यास कोंकण्या, व करत्यात, बोलत्यात, व्हय असें ह्मणणारास कुणबट अशीं उपहासव्यंजक विशेषणें देण्याचें कारण नसतें; व विद्यार्थ्यांचे उच्चार बरोबर नाहीत, ह्मणून त्यांस नावें ठेवण्याचेंही कारण नसतें. जर हें तत्त्व खरें मानलें व त्याप्रमाणें चाललें, तर शिक्षकांस विद्यार्थ्यांचे व आईबापांस आपल्या मुलांचे उच्चार सुधारण्याविषयीं एकसारखे परिश्रम करण्याचें कारण काय ? ' वक्तुरिच्छा ब-

लीयसी ' हें सूत्र शिष्यानें अथवा मुलाने ह्मणून दाखविलें, तर शिक्षकास अथवा पालकास स्वस्थ बसणे भाग पडणार नाही काय ? जेव्हां दळणवळण विशेष नव्हतें, व शिक्षणाचा व ग्रंथांचा प्रसार झाला नव्हता, तेव्हां वरील तत्त्व बरेंच लागू होतें, असें ह्मटलें असतां चालेल. आतां ह्या तत्त्वाचा संकोच बराच झाला आहे, व पुढें जास्त होईल. ' वक्तुरिच्छा बलीयसी ' ह्या तत्त्वाची व्याप्ती मर्यादित आहे, ही गोष्ट लक्षांत न ठेवतां लेखनाच्या बाबतींत हें तत्त्व लागू करावयास उद्युक्त होऊन " लेखितुरिच्छा बलीयसी" असें ह्मणणारा कोणी निघाल्यास भाषेचें किती नुकसान आहे, व दोन्हीं तत्त्वें एकदा खरीं मानलीं, ह्मणजे भाषेची सुधारणा व तिजबरोबर दुसरी सुधारणा ह्यांचें नाव घेण्यास नको, हें सांगावयास पाहिजे असें नाही. ज्याने पाहिजे त्याने तसा शब्दाचा उच्चार करावा व पाहिजे तसें लिहावें. ही स्थिती अनिष्टकारक आहे, हें कोणासही कळून येईल. असो. इतका विस्तार करण्याचें कारण कीं, ह्या बाबतींत कांहीं लोकांच्या एकदेशीय समजुती झाल्या असाव्या असें दिसतें. त्या समजुतींचा निषेध करणे अवश्य आहे. उच्चाराच्या अथवा लेखनाच्या बाबतींत आळा घालणे हें एका व्यक्तीस कठीण आहे; ह्मणून अनेक समंजस गृहस्थांची ह्या कामास अनुकूलता पाहिजे. असो. घोटाळा कमी करून होतां होईल तो ठरीव व्यवस्था निदान लेखनांत असण्याची फार जरुरी आहे. अ, आच्या बाबतींतील घोटाळा कमी करणे आहे, तर जेथें प्रचाराच्या संबंधाने वाद अथवा शंका असेल, तेथें व्युत्पत्तीला ' अ ' जवळ असेल तेथें ' अ ', व जेथें ' आ ' जवळ असेल तेथें ' आ ' कायम

करावा. व्युत्पत्ती सर्वांस सारखी लागू आहे, तेव्हां त्याविषयीं वादाचें कारण राहणार नाहीं असें वाटतें. जेथें व्युत्पत्ती कळत नाहीं किंवा विद्वानांची सर्वांशीं जरी नाहीं, तरी बरीच एकवाक्यता होत नाहीं तेथेंमात्र विकल्प ठेवावा. कोशांत शब्द दिले आहेत किंवा काहीं विशिष्ट ठिकाणीं ते प्रचारांत आहेत, एवढ्याच कारणावरून ते विकल्पांत घालूं नये. हे विचार लक्षांत ठेवून जेथें व्युत्पत्ती कळली तेथें व्युत्पत्ती दिली आहे; किंवा ज्या रूपांच्या संबंधानें आमच्या विद्वान मित्रांची बरीच एकवाक्यता दिसल्याचें कळून आलें तीं रूपें पुढें दिलीं आहेत. ज्यांविषयीं माहिती न मिळाल्यामुळें विशेष वाद आहे तीं टिपेंत दिलीं आहेत. जेथें कशाचा आधार नाहीं, तेथें चालू वहिवाटीचा आधार घेऊन चालावयाचें, हें सांगावयास नको.

(१) **अखात, आखात**—आ+खन्=(खणणे) ह्यापासून हीं रूपें आलीं आहेत. लेखनांत आखात लिहिण्याचा प्रचार आहे, तेव्हां आखात हेंच रूप ग्राह्य.

(२) **अंग, आंग**—मूळ शब्द अंग आहे, पण उच्चार अंग व आंग असा करतात व लिहिण्यांत दोन्हीं रूपें आढळतात.

अंग हें रूप सर्व प्रकारें ग्राह्य आहे ह्याबद्दल वाद नाहीं. असें असतां आंग हें रूप कां ग्राह्य धरावें, असा प्रश्न आहे. काहींच्या लिहिण्यांत व बोलण्यांत हें रूप येतें, एवढयाच साठीं हें ग्राह्य धरावयाचें कीं काय? आह्मी एवढ्याचसाठीं हें रूप ग्राह्य धरीत नाहीं. असें रूप ग्राह्य धरण्यास दुसरें कारण आहे. तें हें कीं:--अंग हा शब्द प्राकृताच्या द्वारें आला असल्यास मराठींत आंग असें रूप होईल; कारण असा एक सामान्य नियम आहे कीं, प्राकृत शब्दांत जोडाक्षर असेल, तर त्यापैकीं एका अक्षराचा लोप होऊन पूर्व व-

र्णास दीर्घत्व येतें. ह्याचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. जसें:–अद्य-अज्ज-आज, हस्त-हत्थ-हात, कर्ण-कण्ण-कान, घर्म-घम्म-घाम, कार्य-कज्ज-काज (कामकाज ह्यांतील), चर्म-चम्म-चाम-डे, अग्नि-अग्गी-आग, अक्षि-अच्छी-आख, अष्ट-अट्ठ-आठ, सप्त-सत्त-सात, कर्म-कम्म-काम, कर्तरी-कत्तरी-कातर, नृत्य-णच्च-नाच, चक्र-चक्क-चाक, गर्दभ-गड्डह-गाढव, वृत्त-वत्त-वात, रक्ष-रक्ख-राखणे, मृत्तिका-मत्तिआ-माती. ह्या नियमास पट्टण, सब्व वगैरे काहीं थोडे शब्द अपवाद आहेत; पण वरील नियमाची व्यापकता फार आहे, ह्या बद्दल वाद नाही. वरील नियमाप्रमाणें पाहतां 'अङ्ग' ह्याचें आंग रूप होतें. ह्या ठिकाणीं ङ् अनुनासिक वर्ण जाऊन त्याचा खणखणीत अनुस्वार झाला आहे, ही विशेष गोष्ट आहे. ह्यास आणखी प्रत्यंतर पाहावयाचें असल्यास ताम्र-तम्ब-तांबें, लम्ब्र-लम्ब-लांब वगैरे रूपें सांपडतात. इतका विस्तार करण्याचें कारण कीं, 'अङ्ग' प्रमाणें दुसरीं रूपें आहेत, त्यांविषयीं हाच प्रश्न उत्पन्न होतो. तसा प्रश्न उत्पन्न झाला असतां त्याचा निकाल काय करावयाचा, ह्याविषयीं भानगड राहणार नाही. अंग शब्द एकदा सर्व प्रकारें ग्राह्य ठरला, ह्मणजे अंगडें, अंगरखा, अंगलोट, अंगधिटाई वगैरे शब्दांविषयीं खुलासा करणे नको. त्याचप्रमाणें 'आंग' हें रूप ग्राह्य धरलें, ह्मणजे आंगलोट, आंगडें, आंगधिटाई, आंगरखा वगैरे रूपें ग्राह्य धरणे अवश्य आहे.

(३) **अंचवणें, आंचवणें**—आ+चम् अशी ह्या रूपाची व्युत्पत्ती आहे. उच्चाराच्या बाबतींत घोटाळा आहे. पण लेखनांत आंचवणे रूप प्रायः प्रचारांत फार येतें; सबब तेंच पसंत करावें. अंचवणे हें रूप एकदेशीय आहे, सबब अग्राह्य. आंचवणे ह्यांतील अनुस्वार खणखणीत आहे, म्हणून तो ठेवण्यांत आला आहे.

(४) **अडगिऱ्हाईक, आडगिऱ्हाईक**––उच्चाराच्या बाबतींत घोटाळा आहे, पण मूळ शब्द आड+गिऱ्हाईक असा आहे; लेखनांतही 'आड' असें लिहिण्याचा प्रचार आहे; तेव्हां आडगिऱ्हाईक हेंच रूप प्रशस्त. आड (सरळ नाहीं) हें रूप ठरलें, ह्मणजे हें रूप असून जे सामासिक शब्द बनले आहेत, ते कसे लिहावे

हें सांगणे नको. त्यांतही 'आ' च असला पाहिजे. जसें:- आडमुठ्या, आडमाप, आडरान, आडमार्ग, आडफाटा, आडकाठी, आडबाप्या (तरूण मनुष्य), आडवार, आडदांड, आडणी, आडपेठ, आडबंक, आडनीड, आडदिवस, आडपडदा, आडपदर, आडबंदर, आडबाजूस, आडभिंत, आडवट, आडसर, आडसाल इ०.

(५) **आपटधोपट, अपटधोपट**--ह्याची व्युत्पत्ती कोणती हें समजत नाही. पण 'आपटणे' धातूपासून हीं रूपें बनलीं आहेत. 'अपटणे' पेक्षां आपटणे हें रूप लेखनांत विशेष प्रचारांतील आहे, तेव्हां आपटधोपट हें रूप ग्राह्य धरावें.

(६) **अंबा, आंबा**--ह्याची व्युत्पत्ती सं. आम्र, प्रा. अम्ब अशी आहे. तीवरून, व हल्लींचे लेखन प्रचारावरून आंबा हें रूप ग्राह्य.

(अंग शब्दाविषयीं दिलेली माहिती पाहा)

अंग शब्द शुद्ध संस्कृत शब्द आहे, तसा आंबा शब्द नाही. तो अपभ्रंश होऊन आंबा असें रूप होतें, अंबा असें होत नाही. आंबा हें रूप कायम झालें, ह्मणजे त्यावरून साधलेले आंबेमोहोर, आंबरस, आंबराई वगैरे शब्द कसे लिहावे हें सांगावयास नको.

(७) **आंबाडा, अंबाडा**--'आम्रातक' ह्यापासून हीं रूपें आलीं आहेत. 'आम्रातक' ह्याचें प्राकृताप्रमाणें 'अम्बाडअ' असें रूप होईल व त्यावरून आंबाडा असें रूप होतें. उच्चाराच्या व लेखनाच्या बाबतींत एकवाक्यता नाही. पण व्युत्पत्तीवरून 'आ' लिहिण्यास आधार आहे, सबब आंबाडा हें रूप प्रशस्त धरावें. अम्बालिका ह्मणजे देवी किंवा वनस्पती ह्यावरून आंबाडा हें रूप आलें आहे, असें काहींचें ह्मणणे आहे. हें काहीं असलें, तरी 'आ' लिहिण्यासच आधार आहे, तेव्हां 'आ' च लिहिणे उक्त.

(८) **अमावास्या, आमावास्या**—अमा + वस् (सूर्य व चंद्र एके ठिकाणीं येणे) ह्यापासून अमावास्या हें रूप झालें आहे, तेव्हां अमावास्या हेंच रूप उक्त.

(९) **अलीकडे, आलीकडे**—ऐल + कड (ह्या बाजूस) ह्यापासून हीं रूपें आलीं आहेत. पण ह्या व्युत्पत्तीवरून 'अ' असावा किंवा 'आ' असावा ह्याचा निर्णय करतां येत नाही. तथापि, लेखनप्रचार 'अलीकडे' असा आहे; तेव्हां अलीकडे हें रूप उक्त दिसतें.

(१०) **अंक, आंक**--मूळ रूप अंक आहे. उच्चार व लेखन ह्यांविषयीं विचार करतां हें रूप सर्व प्रकारें उक्त आहे; पण अंग शब्दाविषयीं दिलेल्या माहितीवरून आंक हेंही रूप ग्राह्य धरावें लागतें.

(११) **अकडा, आकडा, आंकडा**—अकडा हें रूप गौण आहे. त्यास फक्त उच्चाराचा आधार आहे. 'अंक' पासून 'अक' रूप होत नाही. आंकडा हें रूप 'अङ्क' ह्यापासून डा प्रत्यय लागून बनलेलें आहे; लेखनांतही हें रूप विशेष आढळतें; तेव्हां हेंच ग्राह्य समजावें. त्याचप्रमाणें आंखणे, आंखणी हीं रूपें अङ्क ह्यापासून आलीं असल्यामुळें ग्राह्य समजावयाचीं. अखणे, अखणी हीं गौण होत.

(१२) **अकाबाई, आकाबाई**—अक्का–वडील बहीण व बाई सन्मानार्थी नाव ह्यांपासून आकाबाई असें रूप सिद्ध होतें. ह्यास लेखनाचाही आधार आहे, तेव्हां आकाबाई हें रूप उक्त होय.

(१३) **अंगण, आंगण**--संस्कृत अङ्गन, प्राकृत अङ्गण अशी ह्याची व्युत्पत्ती आहे. मूळ संस्कृत रूप कायम ठेवण्यांत येत नाही. प्राकृत रूपावरून वर सांगितल्या नियमाप्रमाणें आंगण असें रूप होतें, तेव्हां तेंच ग्राह्य धरावें.

(१४) **अंगारा, आंगारा**--संस्कृत अंगारः ह्याचें प्राकृत रूप अंगालो असें होतें, व त्यावरून मराठी इंगळी हें रूप झालें असावें. ह्यावरून वरील रूपें प्राकृताच्या द्वारें आलीं नाहीत, ही गोष्ट निश्चयात्मक आहे. दीर्घत्वाचा नियम प्राकृत रूपास लागू आहे, मग आंगारा असें रूप लिहिण्यास आधार काय? संस्कृतांतून परभारें जीं रूपें आलीं आहेत त्यांपैकीं हें असलें पाहिजे; व त्याप्रमाणें पाहतां अंगारा हें रूप ग्राह्य. कृष्णः–कृष्णा, गो-

विंदः–गोविंदा, काणः–काणा वगैरे रूपांप्रमाणें अंगारः–अंगारा, असें रूप बनलें आहे; व असें लिहिणे उक्त होय.

(१५) **अंधळा, आंधळा**—संस्कृत अंध, प्राकृत अंध ह्यापासून मागें सांगितलेल्या नियमाप्रमाणें आंध हें रूप होतें व त्यास ळा प्रत्यय लागून आंधळा हें रूप होतें. हें रूप परभारें संस्कृतांतून आलें नाही; सबब आंधळा हें रूप प्रशस्त.

(१६) **अंधार, आंधार**—सं. अन्धकार, प्रा. अन्धयार, अन्धआर ह्यापासून आंधार असें रूप होतें, अंधार असे होत नाही. (अंग शब्दाच्या संबंधाने सांगितलेला नियम पाहा).

(१७) **अभाळ, आभाळ**—सं. अभ्र ह्याचें प्राकृत रूप अब्भ असें होतें व त्यापासून मराठीच्या नियमाप्रमाणें 'आभ' असें रूप बनतें व आळ प्रत्यय लागून आभाळ असें रूप झालें असावें असें दिसतें. हें काहीं असो. व्युत्पत्तीविषयीं विचार करतां हें रूप प्राकृताच्या द्वारें आलें आहे व वरील नियमाप्रमाणें पूर्व वर्णास दीर्घत्व आलें पाहिजे; तेव्हां आभाळ हेंच रूप उक्त रूप.

(१८) **अगळ, आगळ**—सं. अर्गला पासून प्राकृत रूप अग्गला होतें. ह्यावरून आगळ हें रूप बनतें; तेव्हां तेंच रूप प्रशस्त.

(१९) **अळशी, आळशी**—अलस हें विशेषण आहे व आलस्य हें नाम आहे; तेव्हां 'अळशी' हें रूप 'अलस' ह्यापासून आलें असावें, असें समजून काहीं अळशी असें रूप लिहीत असावे असें दिसतें; उलट पक्षीं 'आलस्य' ह्याचें प्राकृत रूप 'आलस्स' व त्यापासून आळस व त्यास ई प्रत्यय लागून आळशी हें रूप झालें असावें असें समजून आळशी असें लिहितात. आलस्य ह्यापासून आळस व त्यापासून आळशी रूप झालें असावें, असें आह्मांस वाटतें. अळशी हें एक प्रकारचें धान्य आहे; तेव्हां हें रूप अळशी असें लिहावें.

(२०) **अठरा, आठरा**—सं. अष्टदश, प्राकृत अट्ठरह ह्यापासून आठरा असें रूप सिद्ध होतें, मग अठरा असें रूप कां लिहावें,

असा प्रश्न आहे. खरोखर पाहतां अष्ट + वार ह्यापासून आठवडा असें रूप करावयाचें, तर 'अट्ठरह' आठरा असें रूप करावें. पण हें अपवादांत गणतात!! आह्मांला वाटतें आठरा, अठरा अशीं वैकल्पिक रूपें ठेवल्यास बरें.

(२१) **अगांतुकी, आगंतुकी**--मूळ संस्कृत रूप आगंतुक असें असून त्यास ई प्रत्यय लागून हीं रूपें झालीं आहेत. तेव्हां व्युत्पत्ती पाहतां 'आ' आहे 'अ' नाही, हें उघडें आहे. आतां आगंतुकी असें रूप लिहावयाचें किंवा आगांतुकी असें लिहावयाचें असा वाद आहे. दोन्हीं रूपें मराठी होत. बोलण्याचा विशेष प्रचार आगांतुकी असा आहे, तर तेंच ग्राह्य धरावें. आगंतुकी हें मूळ रूप असतें तर गोष्ट निराळी असती.

(२२) **अगाऊ, आगाऊ**--आ–गम् अशी व्युत्पत्ती असली, तर आगाऊ असें रूप प्रशस्त. मोलस्वर्थकृत कोशांत आगाऊ असें रूप दिलें नाही, अगाऊ असें दिलें आहे, व तें हिंदुस्थानीवरून आलें आहे असें ह्मटलें आहे. हें जर खरें आहे, तर हिंदींत वरील शब्द संस्कृताच्या द्वारें आला किंवा कसें हें कळत नाही. व्युत्पत्तीविषयीं संशय आहे; तेव्हां तूर्त दोन्हीं रूपें ग्राह्य धरून चालावें.

(२३) **आजा, अजा**--सं. आर्य, प्राकृत अज्जो ह्यापासून आजा रूप सिद्ध होतें; अजा असें नाही. त्याचप्रमाणें आजी हें रूप उक्त; अजी हें अप्रशस्त.

(२४) **अगळीक, आगळीक**--(हिं.) 'अगला' ह्मणजे वाजवीपेक्षां जास्त ह्यापासून अगळीक हें रूप झालें असल्यास अगळीक हें रूप ग्राह्य. पण निश्चयात्मक काहीं सांगतां येत नाही; सबब तूर्त दोन्हीं रूपें ग्राह्य.

(२५) **आघाडी, अघाडी**--संस्कृत अग्र व प्राकृत अग्घ ह्यापासून डी प्रत्यय लागून रूप बनलें असल्यास आघाडी असें रूप सिद्ध होतें. मोलस्वर्थकृत कोशावरून अघाडी हें रूप हिंदुस्थानी भाषेंतून

आलें आहे असें समजतें. व्युत्पत्तीविषयीं निश्चय होईपर्यंत दोन्हीं रूपें ग्राह्य धरावीं.

(२६) **आंघोळ, अंघोळ**—अंग+होळणे ह्मणजे धुणे, अशी ह्या शब्दाची व्युत्पत्ती समजते. आंघोळ हें रूपें मराठी आहे, मूळचें नाहीं; सबब मागें सांगितलेल्या नियमाप्रमाणें आंघोळ असें रूप असावें.

(२७) **आठळी, अठळी**–सं. 'अष्टीला' पासून 'अट्ठीला' असें प्राकृत रूप होतें व त्यावरून आठळी असें रूप व्हावे, अठळी असें नाहीं.

(२८) **आठवडा, अठवडा**––अष्ट + वार ह्यापासून प्राकृताच्या द्वारें आठवडा रूप आलें आहे; तेव्हां आठवडा हेंच रूप ग्राह्य.

(२९) **आढळणे, अढळणे**—व्युत्पत्ती समजत नाहीं; पण आढळणे रूप लिहिण्याचा परिपाठ बराच आहे, सबब व्युत्पत्तीच्या अभावीं तेंच ग्राह्य धरून चालावें.

(३०) **आंथरणे, अंथरणे**––सं. आस्तरण ह्याचें प्राकृत रूप आत्थरण व त्यापासून आथरणे असें रूप झालें पाहिजे; अथरणे असें नाही. अनुस्वार कां द्यावा ह्याबद्दल पूर्वी खुलासा केला आहे.

(३१) **आंदण, अंदण** —अंदण ह्याचा अर्थ देणगी असा आहे तेव्हां आ+दान अशी ह्याची व्युत्पत्ती असल्यास आंदण असें रूप उक्त. आंथरणे ह्यावर ज्या कारणाने अनुस्वार आला आहे त्याच कारणावरून ह्यावरही आला असल्यास न कळे. व्युत्पत्तीबद्दल संशय आहे. तेव्हां तूर्त अंदण, आंदण अशीं दोन्हीं रूपें ठेवावीं.

(३२) **अदावत, आदावत**––अरबी अदावत् ह्यापासून अदावत हें रूप आलें आहे; तेव्हां तेंच ग्राह्य.

(३३) **आबदागीर, अबदागीर**––फारसी भाषेंतील मूळ रूप आफ्ताबगीर असें आहे; मुळांत ' आ ' आहे; तेव्हां आबदागीर हेंच रूप प्रशस्त.

(३४) **आबरू, अबरू**--फारसी भाषेंतील मूळ रूप आबूरू असें आहे; तेव्हां आबरू हें रूप उक्त.

(३५) **आरसा, अरसा**—संस्कृत आदर्श ह्यापासून प्राकृताच्या द्वारें हीं रूपें आलीं आहेत. मुळांत ' आ ' आहे, तेव्हां आरसा हेंच रूप योग्य.

(३६) **आवाज, अवाज**—फारसी भाषेंतील मूळ रूप आवाज् आहे; तेव्हां आवाज असें रूप पाहिजे.

(३७) **आतुर, अतुर, आतूर**--संस्कृत मूळ रूप आतुर आहे, तेव्हां आतुर हें रूप उक्त; पण उपांत्याच्या ऱ्हस्व दीर्घांच्या संबंधानें टिपेंत जें मागें सांगितलें आहे त्याप्रमाणें आतूर, आतुर अशीं वैकल्पिक रूपें ग्राह्य धरावीं.

(३८) **आखेर, अखेर**--अरबी भाषेंतील मूळ रूप आखिर् असें आहे, सबब आखेर असें रूप पाहिजे.

(३९) **आजार, अजार**--फारसी भाषेंतील मूळ रूप आजार् असें आहे; सबब आजार हें रूप उक्त.

(४०) **आतसबाजी, अतसबाजी**--फारसी मूळ रूप आतस्बाजी आहे, सबब ' आ ' पाहिजे.

(४१) **आपकरा, अपकरा**—फारसी मूळ रूप आपखूरा आहे; सबब ' आ ' पाहिजे.

(४२) **आगटी, अगटी**--सं. ' अग्नि ' प्रा. ' अग्गी' पासून आग व त्यास टी लागून आगटी रूप सिद्ध होतें.

(४३) **आपआपसांत, अपअपसांत**--सं. आत्मा, प्रा. अप्प- पासून आप होऊन हीं रूपें सिद्ध झालीं आहेत, तेव्हां प्रारंभीं ' आ ' पाहिजे.

(४४) **आपोआप, अपोआप**—ह्याची व्युत्पत्ती बरोबर कळत नाहीं. ती समजेपर्यंत दोन्हीं रूपें ठेवावीं.

(४५) **आपोष्णी, अपोष्णी; आवस, अवस**—हीं रूपें अपोशन व अमावास्या ह्यांपासून आलीं आहेत; सबब प्रारंभीं ' अ ' पाहिजे.

(४६) **आकसणे, अकसणे**; आखडणे, अखडणे; आकळणे, अकळणे; आखाड, अखाड; आफत, अफत; आबादानी, अबादानी; आवरणे, अवरणे; आवार, अवार; आसुरी, असुरी वगैरे जोड्यांतील रूपें आकर्षण (सं), आकुंचन (सं), आकलन (सं), आषाढ (सं), आफत् (अर), आबादानि (फा), आवरण (सं), आवार (सं), आसुरी (सं) ह्या रूपांपासून आलीं आहेत. मुळांत 'आ' आहे, तेव्हां वरील वादग्रस्त रूपांत प्रारंभीं 'आ' पाहिजे.

(४७) **अरब, अदालत**, अनामत, अबाशाही, अलवान, असील हीं रूपें अरब्, अदालत्, अनामत्, अब्बासी, अल्वान्, व असील् ह्या शुद्ध अरबी रूपांपासून आलीं आहेत. त्याचप्रमाणें अंगूर, अंदाज, अंदेशा, अनार, अफू, अराकस हीं रूपें अंगूर्, अंदाज्, अंदेशा, अनार्, अफू, अराकश् ह्या फारसी रूपांपासून आलीं आहेत; मुळांत 'अ' आहे, तेव्हां वरील शब्दांच्या प्रारंभीं 'अ' पाहिजे.

(४८) **अजमास, अमदानी**, अरास, अलमगीर, अस्तनी, अस्मान, अयना, अलिजहा हीं रूपें आज्माइश्, आमद्नी, आराइश्, आलम्गीर्, आस्तीन्, आस्मान्, आईना, आलीजाह् ह्या फारसी रूपांवरून आलीं आहेत. मुळांत 'आ' आहे, तेव्हां वर दिलेल्या रूपांच्या आरंभीं 'आ' लिहिणे योग्य.

टीप:–ज्या शब्दांविषयीं खुलासा होणे आहे ते:-अचंबा, आचंबा; अट, आट; अटोका, आटोका; अटोकाट, आटोकाट; अट्यापाट्या आट्यापाट्या; अडकित्ता, आडकित्ता; अडखळणे, आडखळणे; अडगळ, आडगळ; अडत, आडत; अटपणे, आटपणे; अक्रोड, आक्रोड; अडोसा, आडोसा; अढेवेढे, आढेवेढे; अणीबाणी, आणीबाणी; अधण, आधण; अवड, आवड; अवंढा, आवंढा; अस्वल, आस्वल; अळणे, आळणे; अखाडा, आखाडा; अप्पालिप्पा, आप्पालिप्पा; अचळ, आचळ; असडा, आसडा; असपास, आसपास; अळिता, आळिता; अळीपाळीने, आळीपाळीने; अबकारी, आबकारी.

(१०) वर्णविपर्यय.

मराठी भाषेंत वर्णविपर्ययाचें एक प्रकरणच होऊन ब-सलें आहे. त्यापैकीं ल-ळ, म्ब-म, प-ब वगैरेविषयीं पू-र्वींच निरूपण करण्यांत आलें आहे; पण तेवढ्याने निर्वाह लागत नाही. त्याशिवाय आणखी काहीं वर्णांच्या संबंधाने विपर्यय दिसून येतो, त्याविषयीं प्रथम खुलासा करून नंतर किरकोळ शब्दांविषयीं विचार करूं. प्रथम न-ण बद्दल विचार करून मग इतर वर्णांविषयीं खुलासा करूं. ने-णे, नी-णी ह्या प्रत्ययांतील 'न' व 'ण', असे दोन्ही वर्ण वापरण्याचा थोडा फार संप्रदाय आहे. अशा शब्दांतील न-ण पैकीं एक कायम करावयाचा किंवा विकल्प ठेवावयाचा, असा प्रश्न आहे. ह्यांपैकीं काहीं शब्दांची व्युत्पत्ती कळण्यास मार्ग आहे व काहींच्या बाबतींत सर्वमान्य जरी नाही, तरी सांप्रतचा बहुमान्य लेखनप्रचार कोणता आहे, हेंही कळण्यास मार्ग आहे; तेव्हां ह्या बाबतींत काहीं ठरीव व्यवस्था करतां ये-ण्यासारखी आहे. ती अशीः—(१) ने-णे-नी-णी—ह्या प्रत्ययांची व्युत्पत्ती पूर्वींच सांगितली आहे, तीवरून पाहतां संस्कृतावरून ने व प्राकृतावरून 'णे' लिहिण्यास आधार आहे; पण क्रमिक वगैरे पुस्तकांत 'ने' लिहिण्याचा प्रचार विशेष दिसतो. 'णे' प्रत्यय वापरण्यांत येत नाही असें नाही, त्यास प्राकृत भाषेचा आधार आहे; तेव्हां दोन्ही प्र-त्यय कायम ठेवावे, असें रा. रा. विविधविज्ञानविस्तारक-र्त्यांचें ह्मणणे आहे. आमच्या मतें विकल्प ठेवण्यास फा-रशी हरकत नाही; पण विकल्प ठेवणे अवश्य आहे काय? दिवसेदिवस पुष्कळ विद्वानांचा ओढा 'ने' कडे विशेष दि-सून येतो; 'णे' कडे कमी दिसून येतो. क्रमिक पुस्त-

कांच्या द्वारें जी प्रवृत्ती पडत चालली आहे तीच बलवत्तर होत चालली आहे व पुढें विशेष होणार व ती वावगी नाही. तेव्हां 'ने' च लिहिण्याचा सार्वत्रिक प्रचार पडल्यास बरें, असें आह्मांस वाटतें.

अत्तरदाणी, अत्तरदानी–अरबी इत्र–अत्तर+दानि ह्यापासून अपभ्रंश होऊन हीं रूपें आलीं आहेत. प्रचारांतील रूप अत्तरदाणी आहे, ह्मणून तें ग्राह्य आहे.

उड्डान–उड्डाण—(सं) मूळरूप उड्डयन किंवा उड्डियन असें आहे; मराठींतील रूपें अपभ्रंश होऊन झालेलीं आहेत. प्रचारांतील रूप उड्डाण असें आहे, सबब तेंच प्रशस्त समजावें.

दुर्बीन, दुर्बीण, दुर्भीण—फारसी मूळरूप दुर्बीन् आहे; दुर्बीण हें रूप व्युत्पत्तीला जवळ आहे, तें कायम करावें. दुर्बीन हेंही प्रचारांत आल्यास बरें.

बयाना, बयाणा—अरबी 'बैआना' ह्याला जवळचें रूप बयाना आहे, पण बयाणा हें प्रचारांतील, सबब तें ग्राह्य. बयाना असें मूळ रूप असतें, तर विचार करण्यासारखी गोष्टी असती.

बोहनी, बोहणी—(सं) 'भवानी' ह्यापासून हीं रूपें आलीं आहेत. दोहोंपैकीं बोहनी हें व्युत्पत्तीला काहीं जवळ असून प्रचारांतील आहे, सबब तेंच उक्त.

(२) **ई–य. सोई–सोयी,** राई-रायी, समई-समयी, भरपाई-भरपायी, बाईल-बायील, ताईत-तायीत वगैरे शब्दांत 'ई' लिहिण्याचा व उच्चारण्याचा विशेष प्रचार आहे, सबब 'ई' युक्त रूपें ग्राह्य, यकार युक्त रूपें गौण.

टीपः—सोय, सोई अशीं प्रथमेचीं एक वचनी रूपें आहेत, पण एकवचनी रूप सोई हें आतां प्रचारांतून जात चाललें आहे. सु+ईर जाणे अशी ह्याची व्युत्पत्ती करतात, पण ती कितपत बरोबर आहे हें समजत नाही; तेव्हां एकंदर रूपें लिहावयाचीं तीं:—सोय

(३) **ताकतई–ताकतयी–ताकतय**––मोलस्वर्थकृत कोशांत 'ताकतई' चीं रूपें ताकतई, ताकतय, ताकतव, ताकतेय, ताकतेव, ताकत्येय, ताकत्येव, ताकतोय, ताकतोव अशीं दिलीं आहेत.

दादोबांनी आपल्या पूरणिकेंत ताकतयी असेंही आणखी १० वें रूप दिलें आहे ! ! इतकीं रूपें प्रचारांत असल्यास कदाचित् पूर्वी असतील; व बारा कोसांवरची भाषा बदलते, ह्या ह्मणण्यास ह्या शब्दाच्या व इतर कांहीं शब्दांच्या रूपांवरून प्रमाण मिळतें. ताकतोय असें एक रूप वर दिलें आहे, त्यावरून ह्या रूपांच्या व्युत्पत्तीचा पत्ता लावण्यास कांहीं आधार मिळतो. सं. तक्र ह्याचें प्रा. रूप तक्क होतें, व मागें सांगितलेल्या नियमांप्रमाणें क्क पैकीं एका वर्णाचा लोप होऊन पूर्व वर्णास दीर्घत्व येऊन ताक रूप बनतें; व तोय हा संस्कृत शब्द असून त्याचा अर्थ पाणी असा आहे. तेव्हां व्युत्पत्तीला जवळचें रूप ताकतोय हें होय; पण तें मुळींच प्रचारांत नाहीं, सबब तें ग्राह्य धरतां येत नाहीं. 'ताकतोय' ह्याच्या खालोखाल 'ताकतय' व्युत्पत्तीला जवळ असून व प्रचाराचा त्यास आधार असून सोपें आहे, सबब तें ग्राह्य धरावें; व ताकतई हेंही प्रचारांतलें आहे, ह्मणून तेंही वैकल्पिक रूप समजून ग्राह्य धरावें. बाकी राहिलेल्या रूपांचा संग्रह कोशांत आहे, तो तेथेंच बरा आहे.

किफाईत, किफायत:—मूळ अरबी रूप किफायत् असें आहे. किफायत हें रूप व्युत्पत्तीला जवळ असून प्रचारांतील आहे, सबब तें इष्ट.

जिराईत, जिरायत—मूळ अरबी रूप जिराअत् असें आहे. ह्यास जवळचें रूप जिरायत असें आहे, पण प्रचारांतलें रूप जिराईत असें आहे; सबब तें ग्राह्य.

(ए. व.)–सोई (अ. व.); सोईस, सोईने, सोयकर, सोईवार. राई हा शब्द फारसी किंवा हिंदुस्थानी भाषेंतून घेतल्याचें दिसतें. बाईल हा बाई ह्यास 'ल' प्रत्यय लागून बनला असल्यास न कळे. ताईत हा तावीज् ह्या अरबी शब्दापासून आल्याचें समजतें.

तागायत, तागाईत--अरबी व फारसी रूप ता + गायत् असें आहे. व्युत्पत्तीला जवळ रूप तागायत आहे; पण विशेष प्रचारांतील रूप तागाईत आहे, सबब तें माह्य. तागायत असें वैकल्पिक रूप घेऊन चालावयाचें किंवा कसें ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

(३) **च–छ. छचोर–छछोर**--एवढीं दोनच रूपें कोशांत सांपडतात असें नसून छिचोर, छिछोर, चचोर, चिचोर अशींही रूपें आढळतात. ह्या रूपांची व्युत्पत्ती कळत नाही. हे शब्द देशज असावे; तेव्हां प्रचारावरूनच निर्णय करावयाचा. छिछोर वगैरे चार रूपें पूर्वी प्रचारांत असतील, पण तीं आतां नाहीत; तेव्हां त्यांचें योग्य स्थल ह्मटलें ह्मणजे कोश होय. बाकी राहिलेल्या दोन रूपांपैकीं छचोर हें रूप विशेष प्रचारांतलें असल्यामुळें तेंच कायम करावें.

(४) **ड–ढ. ढेंडळणे, ढेंडाळणे**—ढेंढळणे, ढेंढाळणे हीं सर्व देशी रूपें होत. ह्यांतील प्रारंभींच्या 'ढ' बद्दल वाद नाही. दुसरें अक्षर 'ड' असावें किंवा 'ढ' असावें व त्यांत 'अ' असावा किंवा आ असावा, एवढाच प्रश्न आहे. दोन 'ढ' जवळ जवळ नसणे, हें उच्चाराच्या सौकर्यास बरें. बाकीच्या दोन रूपांपैकीं ढेंडाळणे हें रूप बरेंच प्रचारांतलें आहे, सबब तें कायम ठेवावें.

(५)**क–ख. काख–खाकः**—सं. कक्षा ह्याचें प्राकृतांत कक्खा रूप होतें व त्यापासून काख हें रूप होतें. काख ह्या रूपाला प्रचाराचाही आधार आहे, तेव्हां हें रूप सर्व प्रकारें उत्तम; पण खाक हेंही रूप प्रचारांतलें आहे, सबब तें कायम ठेवण्यास हरकत नाही. 'खाक' ह्मणजे नाश होणे हा शब्द फारसी भाषेंतील आहे. क, खचा विपर्यास होऊन फारसी 'कबूतर्'चें मराठींत खबूतर असें रूप झालें आहे व किसा (फा) ह्याचें 'खिसा' व किश्मिश् (फा.) ह्याचें खिसमीस अशीं रूपें झालीं आहेत.

पोषाख–ग–क–प्रचार ख व क ह्या दोहोंचा आहे. फारसी मूळ रूपांत क आहे, तर तोच कायम कां ठेवूं नये ?

हलुक–ख, हलाक—अरबी मूळ शब्द हलाक् आहे. व्युत्पत्तीला जवळचें रूप हलाक आहे, तें कायम करावयाचें किंवा प्रचारांतील रूप हलुक हें कायम करावयाचें ? मूळ रूप हलाक व प्रचारांतील रूप हलुक अशीं प्रशस्त समजून हलुख गौण समजावें.

(६) **ट–ठ. टपका–ठपका** (दोष देणे)– ठपका हा शब्द हिंदुस्थानी भाषेंतून घेतला आहे, त्यावरून वर्णविपर्यास होऊन टपका हें रूप झालें असावें. मूळचें रूप ठपका सोपें आहे, सबब हेंच ग्राह्य धरावें.

(७) **ज–झ. झांज–झांझ**––हाही शब्द हिंदुस्थानींतून घेतलेला आहे. मुळांत ज आहे. दोन महाप्राण होतां होईल तो जवळ जवळ नसणे बरें; ह्यासाठीं झांज हें रूप प्रशस्त.

(८) **त–द. सफेत–सफेद**, खुशामत-खुशामद, ताकीत-ताकीदः––फारसी मूळ रूपें सफेद्, सफेद्, खुफेद्, खुशामद्, ताकीद् अशीं आहेत, तेव्हां जीं रूपें ग्राह्य धरावीं तीं:––सफेद, खुशामद, खुशामत, ताकीद. खुशामद मूळ रूप असून सोपें आहे, तें प्रचारांत आल्यास वावगें नाही.

कवाईत–कवाईद, तरबेत-तरबेद-तरबेज, ताकत-ताकद, फिसात-फिसाद, मदत-मदद, मनमुरात-द, मोहबत-द, वासलात-द, शाबूत-द हीं रूपें अरबी कवाईद्, तर्बियत्, ताकत्, फसाद, मदद्, (सं) मन (अ.) मुराद्, मुहब्बत्, वासिलात्, सबूत् ह्यांपासून आलेलीं आहेत; तेव्हां जीं रूपें लिहावयाचीं तीं:–कवाईद–त, तरबेत, ताकत, फिसाद, मदद-मदत, मनमुराद, मोहबत, वासलात व शाबूत. कवाईद व मदद अशीं मूळ सोपीं रूपें प्रचारांत येणे बरें, असें वाटल्यावरून शिफारस केली आहे.

कतबा, कदबा–मूळ अरबी रूप ' कितबा ' आहे. मुळांत त आहे, तेव्हां कतबा हें रूप प्रशस्त.

तरतूद–त–मूळ अरबी रूप तर्तीब् आहे, पण तें अगदीच प्रचारांत नाही. प्रचारांतील रूप तरतूद ग्राह्य.

ताबूत–द–मूळ अरबी रूप ताबूत् आहे व तें व्युत्पत्तीला जवळचें रूप असून विशेष प्रचारांतील आहे, तेव्हां तेंच उक्त.

बाबत–बाबद–अरबी रूप बाबत् आहे, व तें प्रचारांतील असून व्युत्पत्तीला जवळ आहे, सबब तेंच उक्त.

(९) **ध–ढ. धुंडाळणे–ढुंडाळणे**–धुंडणे हें रूप हिंदीपासून घेतलें आहे; व त्यापासून धुंडाळणे असें नंतर रूप झालें. ह्याचाच लेखनांत व उच्चारांत विशेष प्रचार आहे, सबब हेंच ग्राह्य; ढुंडाळणे गौण.

(१०) **इ–वि. इजार, विजार**–अरबी 'इजार्'पासून इजार हें रूप आलें आहे; व वर्णविपर्यासामुळें विजार हें रूप झालें. व्युत्पत्तीचा आधार विजार ह्याला नाही. दोन्हीं रूपें उपयोगांत असल्याचें आढळून येतें; सबब दोन्हीं रूपें ठेवावीं.

(११) **र–ल. तरवार–तलवार**–संस्कृत मूळ शब्द तरवारि (ना. स्त्री.) असें आहे, तेव्हां तरवार हें रूप प्रशस्त; तलवार गौण. संस्कृत इकारान्त नामें असतां मराठींत अकारान्त करणे हा मराठीचा स्वभावच बनत चालला आहे. रीति– रीत, जाति–जात, गति–गत, संगति–संगत, पंक्ति–पंगत वगैरे कित्येक उदाहरणें आहेत. मूळ रूपापेक्षां अकारान्त रूपें फार लोकप्रिय आहेत. तपकीर–तपकील ह्यांतील र, ल ह्यांचा विपर्यास झालेला आहे. व्युत्पत्ती समजत नाही, परंतु रकारयुक्त रूप विशेष प्रचारांतील, सबब तें ग्राह्य धरावें.

(१२) **त–थ. उसंत, उसंथ**–उत् +संधि अशी ह्या रूपांची व्युत्पत्ती असल्याचें समजतें. तिजबद्दल खात्री नाही, सबब ' त ' असावा किंवा ' थ ' असावा ह्याचा निश्चय करतां येत नाही. उसंत हें विशेष प्रचारांतील, सबब तें ग्राह्य समजावें.

कात–थ–(सं) ' काथ ' पासून हीं रूपें आलीं आहेत. मुळांत थ आहे; परंतु आवडतें रूप कात आहे; तेव्हां तेंच कायम ठेवणे जरूर दिसतें. मूळ रूप काथ असतें, तर गोष्ट निराळी.

कुळीत–थ–द–(सं) ‘ कुलित्थ ’ पासून हीं रूपें आलीं आहेत. मुळांत थ आहे व तो उच्चारण्याचा व लिहिण्याचा प्रचार आहे, ह्मणून कुळीथ हेंच रूप कायम करावें.

मेतकूट, मेथकूट–मेथी + कूट ह्यापासून हीं रूपें आलीं आहेत. मूळ रूपाला जवळ मेथकूट आहे, तें ग्राह्य.

लात, लाथ–मूळ रूप लत्ता आहे व त्यालाजवळ लात हें रूप आहे; पण विशेष प्रचारांतील रूप लाथ आहे; ह्मणून तें कायम ठेवणे जरूर.

(१३) **ओ–हो. ओंट, होंट**–सं. ओष्ठ ह्याचें प्राकृत रूप ओट्ठ होऊन त्यापासून ओठच होतें; तेव्हां हेंच सर्व प्रकारें बरें. होट अगदी गौण.

(१४) **ख–ग. कजाख–ग**– हीं रूपें टर्किश भाषेंतून अपभ्रंश होऊन आल्याचें कळतें; पण मूळ रूप कळत नाही. विशेष प्रचारांतील रूप कजाग आहे. तें व्युत्पत्ती समजेपर्यंत ग्राह्य धरून चालावें.

(१५) **ल्ल–ल्ह. कल्लोळ, कल्होळ**–(सं) मूळ रूप कल्लोल आहे; त्यास जवळचें रूप कल्लोळ आहे; तें प्रचारांतीलही आहे; तेव्हां तें अधीक प्रशस्त. त्याचप्रमाणें उल्लास व उल्हास ह्याची व्यवस्था समजावी.

मशारनिल्हे–ल्ले–अरबी मूळ रूप मशारुनिलैहि असें आहे. मशारनिल्हे हें रूप विशेष प्रचारांतील आहे, सबब तेंच ठेवावें.

(१६) **प–फ. खरीप–फ**–अरबी मूळ रूप खरीफ असें आहे व तें व्युत्पत्तीला जवळ आहे. प्रचारांतील रूप खरीप आहे, तेव्हां तें कायम ठेवून मूळचें सोपें रूप प्रचारांत आलें तर विशेष चांगलें.

दफतर, दपतर–मूळ फारसी शब्द दफ़्तर् असा आहे, तर दफतर हें रूप व प्रचारांतील रूप दपतर कायम ठेवण्यास हरकत दिसत नाही.

(१७) **व--म. मेजवानी–मानी**–फारसी रूप मेजबानी असें आहे; पण तें प्रचारांतील नाही. मेजवानी हें रूप प्रचारांतील, सबब तें कायम ठेवावें. मेजबानी हें सोपें असून मूळ रूप आहे, तेव्हां तें प्रचारांत आल्यास वावगें नाही.

(१८) **ऋ--रि. ऋण, रीण**--(सं) ऋण, प्राकृत रिण व त्यापासून मराठी नियमाप्रमाणें रीण असें रूप होतें. दोन्हीं रूपें असावीं. त्याप्रमाणें ऋणानुबंध, रिणानुबंध अशीं रूपें असावीं. दुसरीं रूपें पहिल्यापेक्षां सोपीं असून प्रचा रांतील आहेत व पहिलीं विद्वानांच्या उपयोगीं आहेत.

(१९) **क्ष--ख्य. चाणाक्ष, चाणाख्य, चाणक्ष**–मूळ संस्कृत रूप चाणक्य असून त्यापासून अपभ्रंश होऊन हीं रूपें आलीं असावीं. मूळ रूप बिलकूल प्रचारांतील नाही; सबब तें घेतां येत नाही. तीन रूपांपैकीं 'चाणाक्ष' हें प्रचारांतील, सबब ग्राह्य.

(२०) **स--ज. मिजासखोर, मिजाजखोर**–मिजाज् (अ)+खोर (फा) अशी ह्या रूपांची व्युत्पत्ती आहे. मुळांत ज आहे तेव्हां मिजाजखोर हें रूप ग्राह्य.

(२१) **स–श–ष**––वर्णविपर्यासाच्या संबंधाने वर जीं उदाहरणें दिलीं त्यांशिवाय आणखी उदाहरणें आहेत. तीं मुख्यत्वें श, स, ष ह्यांसंबंधाने होत. ह्या बाबतींत घोटाळा नसून लिहिण्याची एक ठरीव व्यवस्था असावयाची आहे, तर मूळ रूपांत कोणता वर्ण आहे हें पाहून तो कायम केल्यास बरें, असें आह्मांस वाटतें. संस्कृतांत वर्णविपर्यासाचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. तेव्हां मराठींतही तीं असण्यास हरकत कोणती, असें काहींस कदाचित् वाटेल. पण मूळ रूपाच्या जवळ रूपें ठेवतां आलीं तर बरें असें व ठरीव व्यवस्था असावी असें ह्मणणारे काहीं आहेत, हीही गोष्ट विसरतां कामा नये. हे विचार लक्षांत आणून मूळ रूप देऊन मरा-

ठींत कोणतें रूप ग्रहण करावें, हें सुचविलें आहे. ह्या बाबतींत आमचा आग्रह कोणताच नाही, हें सांगणे नको.

(१) प्रवासी (सं)–प्रवासी.
(२) सावकाश (सं)–सावकाश.
(३) ऐश्आराम्(अ)–ऐशआराम.
(४) खलासी (अ)–खलासी.
(५) खास्सी (अ)–खासी.
(६) तह्सील् (अ)–तहसील.
(७) नसीब् (अ)–नसीब, नशीब.
(८) तक्सीम् (भाग)–(अ)–तकसीम.
(९) तक्सीर् (अ. चूक, अपराध)–तकसीर.
(१०) तफ्सील् (अ)–तफसील.
(११) मस्जिद् (अ)–मसीद, मशीद.
(१२) मआशूक ? (अ)–माशूक.
(१३) मुश्किल् (अ)–मुशकील.
(१४) मुसाफीर् (अ)–मुसाफीर, मुशाफर.
(१५) वसीला (अ)–वशिला.
(१६) शुरुआत् (अ)–शुरूवात, सुरवात.
(१७) शुरू (अ)–शुरू, सुरू.
(१८) शरबत् (अ)–शरबत.
(१९) हासिल (अ)–हासील, हाशील.
(२०) आतश्बाजी (फा)–आतशबाजी.
(२१) अराकश् (फा)–अराकश, अराकस.
(२२) किश्मिश् (फा)–किशमीश, खिसमीस.
(२३) खुश (फा)–खुश, खूष.
(२४) गुमाश्ता (फा)–गुमाश्ता, गुमास्ता.
(२५) गोशवारह् (फा) गोशवारा, गोषवारा.
(२६) चपरासी (फा) चपरासी.
(२७) चश्मा(फा)–चश्मा, चष्मा.
(२८) तश्त (फा)–तश्त, तस्त.
(२९) पैमाइश् (फा)–पैमाश, पैमाष.
(३०) पोशाक् (फा)–पोशाक, पोषाक.
(३१) मख्लसी (फा)–मखलसी.
(३२) रंजिश्(फा)–रंजीश, रंजीस.
(३३) सर्पोश्–सरपोश, सरपोस.
(३४) शुमार्–शुमार, सुमार.
(३५) हमेशा–हमेशा.
(३६) हुश्यार्–हुश्यार, हुषार.
(३७) तासा (अ)–तासा.
(३८) संन्यासी (सं)–संन्यासी.

(११) किरकोळ रूपें

(१) ह्याला–याला; हिला–इला; ह्यांना–यांना:—

ह्या रूपांची व्युत्पत्ती कळण्यास विश्वासनीय आधार मिळत नाही. 'अद्' ह्यांतील 'अ' चा अरण्य, अरघट्ट वगैरे शब्दांतील 'अ' प्रमाणें लोप होऊन 'द्' चा 'ह' होतो; व पुढील विसर्गाचा लोप होऊन 'ह' स कृष्ण, राम इत्यादी शब्दांप्रमाणें दीर्घत्व येऊन 'हा' असें रूप बनतें, असें काहींचें ह्मणणे असल्यास न कळे. विविधविज्ञानविस्तारकर्ते ह्मणतात "अनेन', 'अस्य' इत्यादी संस्कृत शब्दांकडे लक्ष दिल्यास 'ह्याला' पेक्षां 'याला' ची योग्यता उणी नाही. आतां पहिली जी व्युत्पत्ती सांगितली ती बरोबर आहे, असें घेऊन चालण्यास आधार काय? 'अ' चा लोप होणे व विसर्ग जाऊन पूर्व वर्णांस दीर्घत्व येणे ह्या गोष्टी कबूल करण्यासारख्या आहेत, पण 'द्' चा 'ह' कसा होतो? ह्यास आधार असल्याचें दिसून येत नाही. संस्कृतांतील 'द्' बद्दल प्राकृतांत द्, ड, अ, ल, र असे आदेश होतात, हें पुढील उदाहरणांवरून समजतें:–वृंदावन-वुंदावण, गर्दभ–गड्डह, हृदय–हिअअ, कदंब–कलंब, त्रयोदश–तेरह. 'द्' चा 'ह' झाल्याचें दिसून येत नाही. तेव्हां संस्कृतांतील 'द्' चा प्राकृतांत 'ह' होतो, असें मानण्यास सबळ आधार मिळेपर्यंत 'ह' रूप 'अदस्'पासून प्राकृताच्या द्वारें आलें आहे, असें मानणे बरोबर नाही. इतकेंही लांब जावयास नको. 'अदसो दो मुः' (वर परि. ६ सूत्र. २३) ह्या सूत्राप्रमाणें 'अदस्' शब्दांतील 'द'–बद्दल 'मू' आदेश होतो, 'ह' होत नाही, असें मानण्यास आधार आहे. आतां दुसऱ्या व्युत्पत्तीविषयीं विचार करूं. इदम इमः (वर. परि. ६ सूत्रः १३) व 'इदमे तत्कि यत्तद्भ्यष्टा इणा वा' (वर. परि. ६ सूत्रः ३) ह्या सूत्रांप्रमाणें 'अनेन' ह्याची प्राकृतांत इमिणा, इमेण अशीं रूपें होतात. तेव्हां ह्यावरून 'हा' स किंवा 'या' स आधार मिळत नाही. मिळालाच, तर फार लांब-

चा आधार इने, इणे ह्या रूपांस मिळेल. संस्कृत ' यः ' चें प्राकृतांत ' जो ' रूप होतें. ह्या एकंदर हकीकतीविषयीं विचार करतां व्युत्पत्तीवरून वरील रूपांचा निर्णय करण्यास तूर्त आधार नाही. उच्चारावरून काहीं निश्चय करतां येईल, अशीं हीं रूपें नाहीत. तेव्हां लेखनप्रचाराकडेच वळलें पाहिजे. ह्याविषयीं विचार करतां ' ने–णे' बद्दल जी स्थिती सांगितली ती ह्याही बाबतींत दृष्टीस पडते. ह्मणजे याला, इला वगैरे रूपांपेक्षां ह्याला, हिला वगैरे रूपांविषयीं विशेष प्रचार व आवड दिसून येते. तेव्हां हींच रूपें प्रशस्त मानणे बरें. दुसरें असें कीं, या, इ हे मूळ शब्द नसल्यामुळें याला, इला वगैरे रूपांचें व्याकरण करतांना मूळ शब्द ' ह्या ' ' ही ' अथवा ' हें ' असे घेऊन चालल्याशिवाय सोय नसते. जर अशी स्थिती आहे, तर कृति, रुचि वगैरे मूळ शब्द कायम ठेवावे, असें ह्मणणारांस किंवा होतां होईल तो मुळाकडे जावें असें प्रतिपादन करणारांस निदान ' हा, ही, हें ' हींच रूपें ग्राह्य धरावीं लागतील. आहेत तीं सर्वच रूपें ग्राह्य धरावीं, असें ह्मणणारांची मात्र गोष्ट निराळी. कोणताही शब्द कोणी, कोठें बोलो अथवा लिहो, तो संग्रहीं असावा, मग त्यास आगा पिच्छा वगैरे असो वा नसो, किंवा तो विशेष प्रचारांतील असो किंवा नसो, तो असूं द्यावा, त्यास फाटा देऊं नये, असें ह्मणणारांची गोष्ट वेगळी. असो. ह्या बाबतींत इतका पाल्हाळ करण्याचें कारण कीं, वरील रूपांच्या संबंधानें दोन पक्ष असून त्यांमध्यें आज बरेच दिवस वाद चालू आहे. तेव्हां ह्या बाबतींत विशेष खुलासा झाल्यास चांगलें असें आह्मांस वाटतें.

(२) **लक्ष–लक्ष्यः**—ह्या दोन शब्दांचे अर्थ मोलस्वर्थकृत कोशांत दिले आहेत तेः–

लक्ष *m* (1) a lakh, (2) *n.* a joyful mind, (3) An object or aim, (4) attention, aim, mind.

लक्ष्य–*n* (S.) an object or aim, (2) attention, the mind, (3) the sight.

लक्ष्य (*a*)—Proper to be attended to &c. संस्कृतांत लक्ष्य हें नाम व विशेषण आहे. विशेषण ह्या अर्थानें मराठींत त्याचा क्वचित् उपयोग करण्यांत येतो. तेव्हां त्याविषयीं तूर्त विचार करावयाचा नाही. संस्कृत कोशांत ध्यान, चित्त, मन असा लक्ष्य, लक्ष ह्याचा अर्थ दिला नाही. ह्यावरून हे शब्द मन, ध्यान ह्या अर्थानें मराठींत वहिवाटतात, त्या अर्थानें संस्कृतांत ते वापरण्याचा परिपाठ नसावा. Aim, mark असा दोन्ही शब्दांचा एकच अर्थ असल्याविषयीं संस्कृत कोशावरून दिसून येतें. ह्या अर्थावरून ध्यान, चित्त असा अर्थ मराठींत झाला आहे किंवा कसें, हें खात्रीनें सांगतां येत नाही. हें काहीं असो. व्युत्पत्तीवरून ह्याविषयीं विचार करण्यास सबळ आधार नाही. लेखनांत दोन्ही प्रचार आहेत. पण उच्चाराचा ओढा ' लक्ष ' ह्याकडे विशेष आहे. जर लक्ष्य ह्याचा ध्यान, चित्त ह्या अर्थानें नाम ह्मणून संस्कृतांत उपयोग करण्यांत आला असता, तर लक्ष्य हें वैकल्पिक रूप धरण्यास हरकत नसती. लक्ष शब्द नवीन असेल, पण तो बराच प्रचारांत असून उच्चारण्यास बराच सोपा आहे, तेव्हां तो त्याज्य तर नाहीच, पण विशेष ग्राह्य समजावा. लक्ष्य असें रूप लिहिण्याविषयीं थोडया विद्वानांचा आग्रह दिसतो.

३) **जास्त, ज्यास्त**:—जास्त हा अरबी भाषेंतून आलेला शब्द आहे, मुळांत ' ज्या ' नाहीं; सबब मुद्दाम ' या ' जोडण्याचें कारण नाही. ' ज ' चा तालव्यही उच्चार होतो, सबब जास्त असेंच रूप लिहिणे प्रशस्त.

(४) **अंगुस्तान, अंगुस्थान, अंगुष्टान**-(सं) अंगुलि + त्राण ह्यापासून हीं रूपें आलीं आहेत. प्रचारांतील रूप अंगुस्तान आहे; सबब तेंच कायम ठेवावें.

(५) **अत्यवस्था, अत्यावस्था, अंतरपट,-पाट**—संस्कृत मूळ शब्द अत्यवस्था व अंतरपट असून सोपे आहेत, तेव्हां तेच ग्राह्य धरावे.

(६) **अठराविश्वे, अठराविसवे**-(क्रि. अ.)—अठरा + विश्वा अशी ह्याची व्युत्पत्ती समजते. विश्वा ह्मणजे रुक्याचा विसावा भाग. मूळांत श्व आहे, तर तोच कायम ठेवण्यास हरकत नसावी.

(७) **उकरडा, उकिरडा**-(सं)- उत्कर, (प्रा.) उक्केर ह्यापासून डा प्रत्यय लागून हीं रूपें बनलीं असावीं. व्युत्पत्तीवरून प्रकृत रूपांविषयीं निश्चय करण्यास खात्रीलायक आधार नाहीं. विशेष प्रचार ' उकिरडा '. असें लिहिण्याचा आहे; सबब तेंच रूप ग्राह्य.

(८) **उद्धत-उद्धट**:--(सं) मूळ रूप उद्धत आहे, पण प्रचारांतील नाहीं. उद्धट विशेष प्रचारांतील, ह्मणून तें ग्राह्य होय. संस्कृत रूप उद्धत हें सोपें आहे, ह्मणून पाहिजे असल्यास कायम ठेवावें.

(९) **करंगळी, करंगुळी**:--मूळ संस्कृत रूप करांगुलि असें आहे. दोहोंमध्यें व्युत्पत्तीला थोडें जवळचें रूप करंगुळी आहे. पण करंगळी हें विशेष प्रचारांतील व आवडतें रूप आहे, सबब करंगळी हेंच कायम करावें.

(१०) **करवटी, करवंटी, करटी, करोटी**,—मूळ संस्कृत रूप 'करोटि ' असें आहे. पण तें प्रचारांतील नाहीं. तथापि करोटा व करवंटी हीं दोन्हीं कायम असल्यास हरकत नाहीं. करवटी, करटी ह्यांचा कोशांत संग्रह आहे, तो बरा आहे.

(११) **करदोटा, करदोरा, करगोटा**—(सं) ' कटि+दोरक ' ह्यापासून अपभ्रंश होऊन हीं रूपें आलीं आहेत. तिहींमध्यें व्युत्पत्तीला काहीं जवळचें रूप करदोरा आहे. पण तें प्रचारांतलें नाहीं; तेव्हां प्रचारांतलें रूप करगोटा हें पसंत करावें.

(१२) **कशीदा, कशिदा, कसिदा**—मूळ फारसी रूप कशीदा असें आहे. पण तें मराठीच्या नियमाला विरुद्ध आहे. कारण अंतींचा वर्ण ' अ ' शिवाय इतर असल्यास उपांत्य इ, उ ऱ्हस्व

असावयाचे. शिवाय, हें रूप रुळलेलें आहे; तेव्हां कशिदा हें रूप प्रशस्त.

(१३) **कामीण, कावीळ, कावीण**—मूळ (सं) रूप कामला होय. ग्राम–गाव, नाम–नाव ह्याप्रमाणें 'व' व्हावयाचा. तेव्हां व्युत्पत्तीला जवळ 'व' युक्त रूप होय. प्रचारांतील रूप कावीळ हें आहे; तेव्हां तेंच प्रशस्त.

(१४) **कीव, किंव**—(सं) कृपा, (प्रा.) किवा अशी व्युत्पत्ती आहे. मराठीच्या नियमाप्रमाणें उपांत्य दीर्घ पाहिजे; सबब कीव हेंच रूप ग्राह्य. सानुस्वाररूप अग्राह्य.

(१५) **कोहळा, कोहोळा**—(सं) कुष्मांड, प्रा. कूहाल अशी व्युत्पत्ती समजते. हिजवरून अमूकच रूप असावें, असा निश्चय करतां येत नाहीं; तथापि, कोहळा असें लिहिण्याचा विशेष प्रचार आहे, सबब तेंच रूप कायम करावें. ह, हा ह्यासंबंधानें जो खुलासा केला आहे त्याप्रमाणेंही हेंच रूप प्रशस्त ठरतें.

(१६) **खरेदी, खरिदी**—फारसी मूळ रूप खरीद् आहे. ह्यावरून मुळाला जवळचें रूप खरिदी आहे. पण लिहिण्याचा प्रघात खरेदी असल्याचें समजून येतें; तेव्हां कोणतें ग्राह्य धरावें हा प्रश्न आहे.

(१७) **खिदमतगार, खिसमतदार, खिसमतगार, खिजमतगार**--अरबी मूळ रूप खिद्मत् असें आहे; तेव्हां सकारयुक्त रूपें मान्य कां धरावीं हें समजत नाहीं. मोलस्वर्थ कोशांत पहिलें रूप पसंत केलें आहे. खिजमतगार हें रूप प्रथम पसंत करण्यांत आलें होतें व तें आमच्या मित्रांसही पसंत आहे. तेव्हां खिद्मतगार

(१९) **गिधाड, गिधड**—(सं) गृध्र (प्रा) गिद्ध ! ह्या व्युत्पत्तीवरून निश्चय होत नाहीं, पण गिधाड हें रूप प्रचारांतील सबब तेंच ग्राह्य.

(२०) **छकड, छक्कड**--हा शब्द हिंदुस्थानींतून मराठींत आला आहे. मूळ शब्द छकड असा आहे. पण प्रचारांतील रूप छक्कड असें आहे; सबब तें ग्राह्य.

(२१) **दुनया, दुनिया**--मूळ अरबी शब्द दुन्या असा आहे. व्युत्पत्तीला जवळचें रूप दुनया आहे. दुनिया प्रचारातलें रूप आहे. तेव्हां दुनया असावें किंवा दुनिया असावें असा प्रश्न आहे. दोन्हीं ठेवावीं.

(२२) **तब्येत, तबियत, तब्यत, तब्बेत**--अरबी मूळ रूप तबिअत् आहे. व्युत्पत्तीला जवळचें रूप तबियत आहे, व तें प्रचारांतीलही आहे; तेव्हां तें प्रशस्त. शिवाय तब्येत हें रूपही बरेंच प्रचारांतील आहे, ह्मणून तेंही कायम असावें. बाकीचीं रूपें गौण समजावीं.

(२३) **न्हावी, नाहावी, नहावी**—संस्कृत नापित. प्रा. ण्हावीअ अशी व्युत्पत्ती आहे, तर न्हावी हें व्युत्पत्तीला जवळ असून प्रचारांतील आहे, सबब तेंच ग्राह्य; बाकीचीं दोन रूपें गौण.

(२४) **बराबर, बरोबर**–मूळ फारसी रूप बराबर् असून त्यास जवळचें रूप बराबर आहे; पण प्रचारांतील बरोबर आहे; तेव्हां दोन्हीं रूपें असावीं.

(२५) **बिलंद, बिलंदर**–फारसी रूप बुलंद् आहे, पण तें अगदींच प्रचारांत नाहीं. त्यास काहीं जवळचें रूप बिलंद आहे; पण बिलंदर विशेष प्रचारांतलें आहे, सबब तें उक्त.

... फारसी रूप बिलौर आहे; त्यास काहीं

असावयाचे. शिवाय, हें रूप रुळलेलें आहे; तेव्हां कशिदा हें रूप प्रशस्त.

(१३) **कामीण, कावीळ, कावीण**—मूळ (सं) रूप कामला होय. ग्राम–गाव, नाम–नाव ह्याप्रमाणें 'व' व्हावयाचा. तेव्हां व्युत्पत्तीला जवळ 'व' युक्त रूप होय. प्रचारांतील रूप कावीळ हें आहे; तेव्हां तेंच प्रशस्त.

(१४) **कीव, किंव**—(सं) कृपा, (प्रा.) किवा अशी व्युत्पत्ती आहे. मराठीच्या नियमाप्रमाणें उपांत्य दीर्घ पाहिजे; सबब कीव हेंच रूप ग्राह्य. सानुस्काररूप अग्राह्य.

(१५) **कोहळा, कोहोळा**—(सं) कुष्मांड, प्रा. कूहाल अशी व्युत्पत्ती समजते. हिजवरून अमूकच रूप असावें, असा निश्चय करतां येत नाही; तथापि, कोहळा असें लिहिण्याचा विशेष प्रचार आहे, सबब तेंच रूप कायम करावें. ह, हा ह्यासंबंधानें जो खुलासा केला आहे त्याप्रमाणेंही हेंच रूप प्रशस्त ठरतें.

(१६) **खरेदी, खरिदी**—फारसी मूळ रूप खरीद् आहे. ह्यावरून मुळाला जवळचें रूप खरिदी आहे. पण लिहिण्याचा प्रघात खरेदी असल्याचें समजून येतें; तेव्हां कोणतें ग्राह्य धरावें हा प्रश्न आहे.

(१७) **खिदमतगार, खिसमतदार, खिसमतगार, खिजमतगार**—अरबी मूळ रूप खिद्मत् असें आहे; तेव्हां सकारयुक्त रूपें मान्य कां धरावीं हें समजत नाही. मोलस्वर्थ कोशांत पहिलें रूप पसंत केलें आहे. खिजमतगार हें रूप प्रथम पसंत करण्यांत आलें होतें व तें आमच्या मित्रांसही पसंत आहे. तेव्हां खिद्मतगार व खिजमतगार अशीं रूपें प्रशस्त व सकारयुक्त रूपें गौण समजावीं.

(१८) **गावठण गावठाण**—(सं) ग्रामस्थान, प्राकृत गावट्ठाण अशी व्युत्पत्ती आहे; प्राकृत रूपाला जवळचें व प्रचारांतील रूप गावठाण आहे; सबब तेंच ग्राह्य.

(१९) **गिधाड, गिधड**—(सं) गृध्र (प्रा) गिद्ध ? ह्या व्युत्पत्तीवरून निश्चय होत नाही, पण गिधाड हें रूप प्रचारांतील सबब तेंच ग्राह्य.

(२०) **छकड, छक्कड**--हा शब्द हिंदुस्थानींतून मराठींत आला आहे. मूळ शब्द छकड असा आहे. पण प्रचारांतील रूप छक्कड असें आहे; सबब तें ग्राह्य.

(२१) **दुनया, दुनिया**--मूळ अरबी शब्द दुन्या असा आहे. व्युत्पत्तीला जवळचें रूप दुनया आहे. दुनिया प्रचारातलें रूप आहे. तेव्हां दुनया असावें किंवा दुनिया असावें असा प्रश्न आहे. दोन्हीं ठेवावीं.

(२२) **तब्येत, तबियत, तब्यत, तब्बेत**--अरबी मूळ रूप तबिअत् आहे. व्युत्पत्तीला जवळचें रूप तबियत आहे, व तें प्रचारांतीलही आहे; तेव्हां तें प्रशस्त. शिवाय तब्येत हें रूपही बरेंच प्रचारांतील आहे, ह्मणून तेंही कायम असावें. बाकीचीं रूपें गौण समजावीं.

(२३) **न्हावी, नाहावी, नहावी**—संस्कृत नापित. प्रा. ण्हावीअ अशी व्युत्पत्ती आहे, तर न्हावी हें व्युत्पत्तीला जवळ असून प्रचारांतील आहे, सबब तेंच ग्राह्य; बाकीचीं दोन रूपें गौण.

(२४) **बराबर, बरोबर**-मूळ फारसी रूप बराबर् असून त्यास जवळचें रूप बराबर आहे; पण प्रचारांतील बरोबर आहे; तेव्हां दोन्हीं रूपें असावीं.

(२५) **बिलंद, बिलंदर**-फारसी रूप बुलंद् आहे, पण तें अगदींच प्रचारांत नाही. त्यास काहीं जवळचें रूप बिलंद आहे; पण बिलंदर विशेष प्रचारांतलें आहे, सबब तें उक्त.

(२६) **बिलोर, बिलवर**-फारसी रूप बिलौर आहे; त्यास काहीं जवळचें रूप बिलोर आहे; पण बिलवर प्रचारांतील आहे; सबब तें ग्राह्य.

(२७) **मजलस, मजालस**–अरबी मूळ रूप मज्‌लिस आहे, दोहोंत व्युत्पत्तीला जवळचें व प्रचारांतील रूप मजलस आहे, सबब तेंच ग्राह्य समजावें, मजालस गौण होय.

(२८) **मुतसद्दी, मुत्सद्दी**–मूळ अरबी रूप मुत्‌सद्दी आहे. पण प्रचारांतलें रूप मुत्सद्दी आहे; सबब तेंच कायम ठेवावें.

(२९) **मुरब्बा, मुरंबा, मुरांबा**-अरबी रूप मुरब्बा हें कायम ठेवून मुरंबा हें प्रचारांतील रूप आहे, सबब तेंही कायम ठेवावें, मुरांबा गौण होय.

(३०) **मुशाहिरा, मुशारा**–अरबी रूप मुशाहरा असें आहे. मुशारा रूप प्रचारांतील, ह्मणून तेंच कायम ठेवावें. दुसरें रूप पाहिजे असल्यास मूळचें रूप मुशाहरा हें प्रचारांत आल्यास बरें.

(३१) **मेहरबानी, मेहरबानी**–फारसी रूप मिह्‌र्बानी त्याला दोहोंतील काहीं जवळचें व प्रचारांतील मेहरबानी रूप आहे, सबब तेंच ग्राह्य. दुसरें रूप हवें असल्यास मिहरबानी हें मूळचें रूप सोपें आहे, ह्मणून प्रचारांत आल्यास बरें.

(३२) **रब्बी, रब्बी**–मूळ अरबी शब्द रबी असा आहे, व तो प्रचारांतीलही आहे; ह्मणून तोच उक्त होय.

(३३) **शागिर्द, शागीर्द**–फारसी शब्द शागिर्द असून प्रचारांत शागिर्द असें रूप आढळतें, तर तेंच कायम करावें; शागीर्द गौण.

टीप—मूळ रूप किंवा मुळाजवळील रूप ह्याचा व प्रचारांतील रूपाचा जेथें मिलाफ दिसून आला, तेथें एकच ठेवण्याची शिफारस केली आहे. जेथें मूळ रूप अगदींच प्रचारांतील नाहीं, तेथें प्रचारांतील कायम ठेवलें आहे. मूळ रूप सोपेंसें दिसून आल्यास व तें मराठीच्या सामान्य स्वभावास विलग न दिसून आल्यास विकल्पें ठेवण्याविषयीं शिफारस केली आहे. र्‍हस्व दीर्घांविषयीं मराठीचे जे सामान्य नियम आहेत किंवा ज्या विशेष गोष्टी तिच्या हाडीं खि-

ळल्या आहेत त्या लक्षांत आणून व्यवस्था करण्यांत आली आहे. सोपीं मूळ रूपें प्रचारांत आल्यास फायदा आहे, असें समजून तीं प्रचारांत यावीं, अशी सूचना केली आहे. व्युत्पत्तीविषयीं जी थोडी-बहूत माहिती मिळाली, तीवरून रूपें ठरविण्यास कांहीं साहाय्य होईल अशी आशा आहे.

(१२) **इतर निश्चित शब्द**—जे शब्द पुढें दिले आहेत, ते प्रथमच्या छापील यादींतील होत. ह्यासंबंधाने रावसाहेब नागेश विनायक बापट वगैरे मित्रांची व आमची एकवाक्यता आहे; तेव्हां हे निश्चित झाले, असें आह्मी समजतो. अनुस्वाराच्या बाबतींतील व्यवस्था आमची आहे. प्रथम निरनिराळीं रूपें देऊन नंतर प्रचारांतील निश्चित रूपें दिलीं आहेत.

अंदाधुंदी, अंदाधुंधी—अंदाधुंदी.
अनवणी, अनवाणी—अनवाणी.
अनारसा, अनरसा—अनरसा.
अबडधोबड, ओबडधोबड—ओबडधोबड.
इंग्रजी, इंग्रेजी—इंग्रजी.
इटकर, विटकर—विटकर.
इटीदांडू, विटीदांडू—विटीदांडू.
इळा, विळा—विळा.
ईट, वीट—वीट.
उकडा, उकाडा—उकाडा.
उजागर, उजागरा—उजागर.
उजेड, उजड—उजेड.
उजेडणे, उजाडणे—उजाडणे.
उपासमर-मार-मारा—उपासमारा.
उष्टवण,उष्टावण—उष्टावण.
एकावन-वन्न—एकावन.
एकाहत्तर-हात्तर—एकाहत्तर.
एकुणहत्तर, एकुणहात्तर—एकुणहत्तर.
एकादा, एखादा—एकादा.
एडका, येडका—एडका.
एरव्हीं, एरवीं—एरवीं.
ओलातिंब-चिंच—ओलाचिंच.
ओहोळ, ओहळ—ओहोळ.
कडाखा-का—कडाका.
कर्मचंडाळ-चांडाळ—कर्मचांडाळ.
कलप-फ—कलप.
काथाकूट, काथेकूट, काथ्याकूट—काथ्याकूट.
कामगार, कामदार—कामगार.
काळोख-क—काळोख.
कितीएक, कितेक, कित्येक—कित्येक.
कुक्कुटकुंभा, कुकुडकुंभा, कुक्केकोंबडा—कुकुडकुंभा.

कुचणी, कुंचणी–कुंचणी.
कुला, कुल्ला–कुल्ला.
कुसकरणे, कुसकुरणे–कुसकरणे.
केरसोणी, केरसुणी–केरसुणी.
केविलवाणा, केवलवाणा–केविलवाणा.
कैदाशीण,-सीण–कैदाशीण.
कोनडा, कोनाडा–कोनाडा.
कोमजणे, कोमेजणे–कोमजणे.
खडतर, खरतर–खडतर.
खरबडीत, खडबडीत, खरबरीत–खडबडीत.
खलबत्ता-बता–खलबत्ता.
गटंगळी, गटांगळी–गटंगळी.
गप, गप्प-गप (मुकाट्याने); गप्प (अफवा).
गांधीण, गांधीलमाशी–गांधीलमाशी.
गाठोडें, गाठोळें–गाठोडें.
गाराणें, गाऱ्हाणें–गाऱ्हाणें.
गारूडी, गारोडी–गारोडी.
*गांवढळ, गांवढाळ–गांवढळ.
गुडाकू-खू–गुडाखू.
गुतागूत, गुंतागुंत–गुंतागुंत.
गोणपाट, गोणताट–गोणपाट.
गोतावळ, गोतावळा–गोतावळा.
गोंद-ध–गोंद.
गोधडी, गोदडी–गोधडी.
घरबेगमी, घरबेजमी–घरबेगमी.
घुटमळणे, घुटमुळणे–घुटमळणे.
घुसा, घुस्सा–घुस्सा.
चटई, चटाई–चटई.
चटणी-नी चटणी.
चरफड, चडफड–चडफड.
चवतळणे, चवताळणे–चवताळणे.
चतकर, चतकोर–चतकोर.
चांभार, चाह्मार–चांभार.
चराट, चऱ्हाट–चऱ्हाट.
चांदई, चांधई–चांदई.
चिकू, चिक्कु–चिक्कु.
चिचोंदरी, चिचुंदरी–चिचुंदरी.
चिटनवीस, चिटणीस, चिटनीस–चिटणीस.
चिठी, चिट्ठी · चिट्ठी.
चिंचुका, चिंचोका–चिंचोका.
चिलखत, चिलकत–चिलकत.
जांबळा, जांभळा–जांभळा.
जांबूळ, जांभूळ–जांभूळ.
जायबंदी-दा–जायबंदी.
जास्वंदी, जासुंदी–जास्वंदी.
जिंदगी, जिनगी–जिनगी.
जिलबी, जिलिबी–जिलबी.
जिवाणूं, जिवाणें–जिवाणूं.
जूं, जुवें–जूं.
जेमतेम, जेमत्येम–जेमतेम.
जेवणखाण, जेवणेखाणे–जेवणखाण.
जोट, जोठ–जोठ.
ज्यादू, जादू–जादू.
ज्योत, जोत–जोत.
झिंज्या, झिंग्या–झिंज्या.

*उच्चार सानुस्वार ह्मणून सानुस्वार रूप.

झिलई, झिलाई, झिल्हई, झिल्हाई
  -झिलई.
टक्केटोणपे, टक्केटोणपे-टक्केटोणपे.
टपोर, टपूर-टपोर.
टरपल, टरफल-टरफल.
टिपण, टिप्पण-टिपण.
टेंगळ, टेंगूळ-टेंगूळ.
ठकबाजी, ठगबाजी-ठकबाजी.
डबुलें, डबोलें-डबोलें.
डाकीण, डंखीण-डाकीण.
डांगोरा, दांडोरा,-डांगोरा.
डिकेमाली, डिकामाली-डिके-
  माली.
डुकरी, डुकरीण-डुकरी.
ढबू, ढब्बू-ढब्बू.
ढुसा, ढुस्सा-ढुस्सा.
ढेकळ, ढेपळ, ढेकूळ-ढेकूळ.
तट्टू, तट्टं-तट्टू.
तडाका, तडाखा-तडाखा.
तंबुरा, तंबोरा-तंबुरा.
तरफड, तडफड-तडफड.
तापट, तापड-तापट.
ताह्मण-न-ताह्मन.
तिहिरी, तिहेरी-तिहेरी.
तुका, तुक्का-तुक्का.
त्रेचाळीस, त्रेताळीस-त्रेचाळीस.
त्र्याऐंशी, व्यायशी-त्र्यायशी.
थुकणें, थुंकणें-थुंकणें.
दत्तात्रेय, दत्तात्रय-दत्तात्रय.
दंभ, डंभ-दंभ.
दामटुपट, दामदुप्पट-दामदुप्पट.
दास्य, दास्यत्व-दास्य.
दाळ, डाळ-डाळ.

दाळिंब, डाळिंब-डाळिंब.
दिक्कत, दिक्त-दिक्कत.
दिपवाळी, दिवाळी-दिवाळी.
दुकळ, दुकाळ, दुष्काळ-दुकाळ
  (कमताई), दुष्काळ (आ-
  पत्तीचे दिवस).
दुभाषी, दुभाष्या-दुभाष्या.
दुभती, दुपती-दुभती.
दुरापस्त, दुरापास्त-दुरापास्त.
दुलई, दुलाई-दुलई.
दुवक्तां, दुवख्तां-दुवक्तां.
देवडी, देवढी-देवडी.
धडधाकट-ड-धडधाकड.
धडफड-पड-धडपड.
धरबंद-ध-धरबंद.
धर्मादाय, धर्मादाव-धर्माधाय.
धिक्, धिग्-धिक्.
धोकटी, धोंगटी-धोकटी.
धौशा, धोशा-धोशा.
नळकंडें, नळकांडें-नळकंडें.
निवडंग, निवडुंग-निवडुंग.
नैवेद्य, नेवेद्य-नैवेद्य.
न्यायमनसुबा-सोबा-न्यायमन-
  सुबा.
पटंगण, पटांगण-पटांगण.
पणतवंड, पणतुंड, पणतोंड, पतवं-
  ड-पतवंड.
पत्रास-ज-पत्राज.
परवचा-ता-वरवचा.
पवाडा, पोवाडा-पोवाडा.
पिडणे, पीडणे-पिडणे.
पिलूं, पिलें, पिढूं-पिलूं.
पोबारा, पवबारा-पोबारा.

फडतळ-ताळ–फडताळ.
फिकट, फिक्ट–फिक्ट.
फुपाटा, फुफाटा–फुपाटा.
फुरसूत-सत–फुरसत.
फेरिस्त, फेरीस्त–फेरिस्त.
फैलाव, फैलावा–फैलाव.
बचनाग-क–बचनाग.
बतासा, बत्तासा– बत्तासा.
बापडा, बापुडा–बापडा.
बारसकडी-खडी, बाराखडी–बाराखडी.
बावन-वन्न–बावन.
बिछाईत, बिछायत–बिछाईत.
बिदाई, बिदागी–बिदागी.
बिबा, बिब्वा, बिब्बा–बिब्बा.
बिशात-द, बिसात-द–बिशाद.
बुचकरा, बुचकुरा, बोचकुरा, बोचकारा–बोचकुरा.
बुदबळ, बुद्धिबळ–बुदबळ.
बुधला, बुदला–बुधला.
बुबळ, बुबूळ–बुबूळ.
बेगमी, बेजमी–बेगमी.
बेचिराख-ग–बेचिराख (फा).
बेदिकत, बेदिक्कत–बेदिक्कत.
बेवकूब, बेवकूफ–बेवकूब (फा).
बेहेडा, बेहडा, ब्याढा–बेहडा.
बेहोश, बेहोष–बेहोष (फा).
ब्याण्णोव, ब्याण्णव–ब्याण्णव.
ब्यांयशी, ब्यायशी–ब्यायशी.
भंगट, भंगड–भंगट.
भगदड, भगदाड–भगदाड.
भांजणी, भाजणी–भांजणी(रूपांतरकरणे), भाजणी (भाजणे).
भातकुली, भातुकली–भातुकली.
भारंभार, भारोभार–भारंभार.
भुसकट, भुसकूट–भुसकूट.
भेकट, भेकड–भेकड.
मकाण-न–मकाण.
मखमल, मखमाल–मखमल.
मठा, मट्ठा–मट्ठा.
मण्यार, मणेर–मण्यार.
महात-द–महात.
मागमूस-मोस–मागमूस.
माजर, मांजर–मांजर.
माणसळणे, माणसाळणे–माणसाळणे.
मातबर, ब्बर–मातब्बर.
मातुश्री, मातोश्री–मातुश्री.
मानगुटी, गोटी–मानगुटी.
मिरवण, मिरवणूक–मिरवणूक.
मिसकीन-ल–मिसकीन.
मुखवटा, मुखोटा–मुखवटा.
मुगटा, मुकटा–मुकटा.
मुंडन, ण–मुंडण.
मुदल-मुद्दल–मुद्दल.
मुलूख–क–मुलूख.
मुसकड-ट, मुसकूट, मुसकाड–मुसकट (सं. मुख).
मुळव्याध-व्याधी–मुळव्याध.
मेंदी-धी–मेंदी.
मोजदाद-त–मोजदाद.
मोतद्दार, मोताददार–मोतद्दार.
मोरचूत-द–मोरचूद.
मोहोरम, मोहरम–मोहरम.
मौन, मौन्य–मौन.
म्लेंच्छ, म्लेच्छ–म्लेंच्छ.

ह्मणून, ह्मणोन–ह्मणून.
यात्रेकरी-रू–यात्रेकरू.
येथें, एथें–एथें.
येरंड, एरंड–एरंड.
येवढा, एवढा–एवढा.
येव्हां, एव्हां–एव्हां.
येळकोट, एळकोट–एळकोट (कानडी+संस्कृत).
रक्तबंबाळ,रक्तबोंबाळ–रक्तबंबाळ.
राखुंडी, राखोंडी–राखुंडी.
राजकुमार -कुवर -कुमर–राजकुमार.
रिकबी, रिकिबी,रिकीब–रिकीब.
रुजणे, रुझणे–रुजणे.
रुजुवात, रुजवात–रुजवात.
रुपया, रुपाया–रुपया.
लवाजमा-जिमा–लवाजमा.
लकाकी, लखाकी–लखाकी.
लखलखाट,लकलकाट-लखलखाट
लगावणे, लगवणे, लगाविणे–लगावणे.
लबाडी, लबाडकी–लबाडी.
लांडोर, लांढोर–लांडोर.
लांबोडा, लांबुडा–लांबोडा.
लोड-ढ–लोड.
वजपा, वचपा–वचपा.
वरंगळ-घळ–वरंगळ.
वरतवळा, वरतावळा, वरताळा, वर्तवळा, वर्ताळा, वर्तावळा–वरताळा.
वलें, वल्हें–वल्हें.
वंशावलि-वळी-वळ–वंशावळ, वंशावली.
वसात, वसाहत–वसाहत.
वाकनवीस, वाकनीस–वाकनीस.
वाचाल-ळ–वाचाळ.
वाजंत्र-त्रें–वाजंत्रें.
वाटसर-सरू-सुरू–वाटसरू.
वाडगा, वाटगा–वाडगा.
वाढपी-प्या–वाढपी.
वातूल-ळ–वातूळ.
वात्रट-ड–वात्रट.
विटकर-कूर–विटकर.
वितळणे, वितुळणे–वितळणे.
विसार, विसारा–विसार.
वेट, वेठ–वेठ.
वेलबुटी-ट्टी–वेलबुट्टी.
वेलांटी, वेल्हांटी–वेलांटी.
शनिवार, शनवार–शनवार.
शह्याण्णव, शाण्णव, शाण्णौ–शह्याण्णव.
शिकें, शिंकें–शिंकें.
शिंपला, शिपला–शिंपला.
शिवीगाळ, शिवीगाळी-शिवीगाळ.
शेचाळ-चाळीस–शेचाळीस.
शेंदेलोण, शेंधेलोण–शेंदेलोण.
सकलात-द–सकलाद.
सत्यनाश-नास-सत्यानास–सत्यानास.
सत्याह्यात्तर, सत्याहत्तर–सत्याहत्तर.
सत्तेचाळ,-चाळीस, सत्तेताळताळीस–सत्तेचाळीस.
सनई-यी–सनई.
सागुती, सागोती–सागुती.

साजरा, साजिरा–साजरा.
सांजवणे, सांजावणे–सांजावणे.
सांभारें, सांबारें–सांबारें.
संभाळ, सांभाळ–सांभाळ.
साम्य, साम्यता–साम्य.
साळुंकी-खी–साळुंकी.
सिंव्ही, सिंव्हीण–सिंव्हीण.
सुकाण, सुकाणूं–सुकाणूं.
सुग्रीण, सुगरीण, सुगरण, सुग्रण–सुगरण.
सुरकंडी-कांडी-कुंडी–सुरकुंडी.
सोकटी, सोंगटी–सोंगटी.
सोज्वल-ळ–सोज्वळ.
सोटगा, सोडगा–सोडगा.
सोडचिटी-ठी-ट्ठी–सोडचिठ्ठी.
सोनचाफा-पा–सोनचाफा.
सोयरगत, सोयरीक–सोयरीक.
सोहळा, सोहोळा–सोहळा.
हजर, हजीर–हजर.
हजीरी, हाजिरी, हजिरी–हजिरी.
हट्ट, हट–हट्ट.
हनुवटी, हनवटी–हनवटी.
हमेश-ष–हमेष.
हरबरा-भरा–हरबरा.
हरयेक-एक–हरएक.
हरहुन्नर-नर–हरहुन्नर.
हलवई-वाई–हलवाई.
हलीं, हाल्लीं–हल्लीं.
हवलदिल-दील, हवालदिल-दील–हवालदील.
हसळी, हसोळी–हसळी.
हळहळ-हाळ–हळहळ.
हांडी, हंडी–हंडी.
हातचलाकी-खी–हातचलाखी.
हांबरणे-हंबरणे–हंबरणे.
हिणवणी, हिणावणी–हिणवणी.
हिंदुळा, हिंदोळा–हिंदोळा.
हिंमत, हिम्मत–हिंमत.
हिव, हीव–हीव.
हुकी, हुक्की–हुक्की.
हुलड, हुल्लड–हुल्लड.
हेकट-ड–हेकड.
होडकें, होडगें–होडकें.

---

(१३) ज्या शब्दांच्या बाबतींत मतभेद असल्यामुळें निर्णय व्हावयाचा तेः—

अजून, अझून.
अपूस, हपूस.
उलटपालट, उलटापालट.
एकएक, एकेक.
एकताळीस, एकेचाळीस.
एकताळ, एकेचाळ.
एकसष्ट, एकसट.
एकुणअशी, एकुणऐशी, एकुणआयशी, एकुणैशी.
एकोणचाळीस, एकुणचाळीस, ताळीस.
एकुणवीस, एकुणीस, एकोणीस.
एक्याऐशी, यशी.
ओरखडणे, ओरखाडणे.
ओरबडा, ओरबाडा.
ओलांडणे, ओलंडणे.

ओशट, ओषट.	देणेदार–देणेकरी.	लटांबर, लटंबर.
ओहोट, ओहट–टी.	देशोधडी, देशोधडीस.	लंगोटीयार, लंगोट्यार.
किचमीड–चीड, किजबीड.	दैनवाणा, दैन्यवाणा, दिनवाणा.	वर्षोनवर्ष, वर्षानवर्ष, वर्षानुवर्ष.
कुलंगा, कुलुंगा.	तारंबळ, तारांबळ.	वाढवा, वाढावा.
गपचीप, गपचूप, गुपचीप, गुपचूप.	बाभूळ, बाभळ, बाभळी.	वातट-ड.
गरसळी, गरसोळी, गळसरी.	बावची, बावंची.	वाताहत, वाताहात.
गोचडी, गोचिडी, गोचीड.	बाळंतशेप–शोप–शोपा.	शहायशी, शाऐशी, शायशी.
घमंड, घमंडी, घमेंडी.	बेडकुळी, बेटकुळी.	शिककई, शिकेकई–कायी, शिकीकाई.
चाऊल, चाहूल.	निजध्यास, निद्ध्यास, निदिध्यास.	शेणकला–काला–खळा.
जादुगर, जादुगीर.	निस्तरणे, निस्तारणे.	शेवती, शेवंती.
ज्वार, ज्वारी, जवार, जवारी, जोरी.	फुटकळी, फुटकुळी, पुटकुळी.	सालटें–डें.
ठावठिकाण, ठावठिकाणा.	फुफूस, फुफ्फूस, फुप्पूस.	हमरातुमरी, हमरीतुमरी, हुमरीतुमरी.
डागडुगी, दागडुजी.	फोपशा–सा.	हसू, हंसू, हसें, हंसें, हासूं, हांसूं.
दुदात, दुधात.	बचा, बच्या.	हकाटा, हाकाटा.
दरवडा, दरोडा.	बडीशोप, बडीशेप, बडिशोप.	हतवडा, हतोडा, हातवडा, हातोडा.
दागिना, डागिना.	भरकडणे, भरकटणे.	हातोपात–ती, हातोहात–ती.
दावेकरी, दावेदार.	मुरदाडशेंग-शिंग.	
दिरंग, दिरिंग.	लडदू–धू.	
देखणाऊ, देखाऊ, दिखाऊ.	लखोटा, लाखोटा.	

टीपः—वर जे शब्द दिले त्यांशिवाय पुढील शब्द मागाहून आढळले. हे कसे लिहावे हें सुचविले आहे; परंतु त्या बाबतींत निर्णय होणे आहे. (१) सामग्री, सामुग्री = सामुग्री; (२) दुजाभाव, दुजे भाव, = दुजाभाव; (३) उध्वस्त, उद्वस्त = उद्ध्वस्त; (४) चलाख, चलाक = चलाख; (५) उत्संखल, उछ्रिंखल = उछ्रिंखल; (६) अतिशय, अतिशायित = अतिशय; (७) चहोकडे, चोहोकडे, चोहोंकडे = चोहोकडे; (८) हुकुमांत, हुकमांत = हुक-

मांत; (९) फुरसत, फुरसूत, = फुरसत; (१०) जुलुमी, जुलमी = जुलमी (११) पालोपद्, पालुपद् = पालुपद्; (१२) कडूजहार, कडूजहर = कडूजहर; (१३) हकाटी, हाकाटी = हाकाटी; (१४) भूयमूग, भुइमूग = भुइमूग; (१५) रुजुवात, रुजवात = रुजवात; (१६) सांब, सांभ = सांब; (१७) संवगडी, सौंगडी = संवगडी; (१८) सांगायाचें, सांगावयाचें = सांगावयाचें; (१९) नव्हत, नव्हेत = नव्हत; (२०) वकिलीचा, वकीलीचा = वकिलीचा; (२१) दुहेरी, दोहेरी = दुहेरी; (२२) बोलतो आहे, बोलत आहे = बोलत आहे; (२३) अर्द्धामुर्द्धा, अर्धामुर्धा = अर्धामुर्धा; (२४) हसडणे, हासडणे = हसडणे; (२५) मुलुखांत, मुलखांत = मुलखांत; (२६) संबंधे, संबंधी = संबंधी; (२७) पानचट, पाणचट = पानचट; (२८) तऱ्हेतऱ्हेचे, तरतरेचे, तऱ्हतऱ्हेचे, तरतऱ्हेचे = तरतऱ्हेचे; (२९) सर्वोपरी, सर्वापरी = सर्वोपरी; (३०) बाव्हटा, बावटा = बाव्हटा; (३१) नाशकास, नाशिकास = नाशकास; (३२) तिढाभाव, तेढाभाव = तेढाभाव; (३३) बोरू, बरू = बरू; (३४) ताडातोड, तोडातोड = ताडातोड; (३५) हरिदास, हरदास = हरदास.

इंग्रजी भाषेंतील शब्द मराठींत लिहिणे झाल्यास ते कसे लिहावे ह्याविषयीं विचार.

इंग्रजी भाषेंतील शब्द मराठींत लिहिण्याच्या बाबतींत मुख्य भानगड दोन बाबींच्या संबंधाने आहे. एक 'Band' 'Bat' 'Bank' 'Act' 'Association' वगैरे शब्दांतील 'a' चा व 'college,' cock (पाण्याचा), congress वगैरे शब्दांतील 'o' चा उच्चार मराठींत दाखविणे झाल्यास तो कसा दाखवावा. Bank, Bat वगैरे शब्द ब्यांड, ब्याट, ब्यांक, आक्ट, आसोशिएशन असे लिहावे किंवा बँड, बॅट, बँक, ऍक्ट, ऍसोशिएशन असे लिहावे; त्याचप्रमाणें college वगैरे शब्द कालेज, काक, कांग्रेस असे लिहावे किंवा कॉलेज

कॉक, कॉंग्रेस असे लिहावे असा प्रश्न आहे. ह्मणजे मराठीच्या लेखनपद्धतींत अर्धचंद्राकृतीची भानगड नवीन सुरू करावी किंवा न करावी, एवढ्याच गोष्टीचा निर्णय करणे आहे. आमच्या मतें असली भानगड नसलेली बरी. अगोदरच बऱ्याच भानगडी आहेत व त्या दूर करण्याचा यत्न चालू आहे. त्या दूर होण्यास अडचण येत आहे. अशा स्थितींत अर्धचंद्राकृतीचें नवीन सोंग नसणे हें बरें. ज्या शब्दांचा प्रारंभ व्यंजनाने होऊन पुढें '*a*' येतो त्या ठिकाणीं '*a*' बद्दल 'या' व ज्या ठिकाणीं शब्दाचा प्रारंभ स्वराने होतो त्या ठिकाणीं '*a*' बद्दल 'आ' असावा; व '*o*' चा जो विशेष प्रकारचा उच्चार वर सांगितला आहे तो 'आ 'ने दर्शवावा. '*a*' व '*o*'चे इतर जे उच्चार आहेत ते दाखविण्याची मराठींत चांगली सोय आहेच, तेव्हां त्या बाबतींत विचार करण्याचें कारण नाही.

टीपः—वर जी सूचना केली आहे तीप्रमाणें पुढील शब्द लिहून दाखविले आहेत. ते होतां होईल तो मूळ रूपाला धरून लिहिले आहेत. इंग्रजी शब्दांच्या बाबतींत एव्हांपासून व्यवस्था ठरल्यास बरें, असें आह्मांस वाटतें. संयुक्त वर्णांच्या संबंधाने जी व्यवस्था पूर्वी सुचविली आहे, ती लक्षांत आणून जेथें वर्ण तोडून लिहितां येण्यासारखे होते, तेथें स्वराघाताचे नियमांस अनुसरून ते तोडून लिहिलेले आहेत. पुढील शब्द बरेच प्रचारांतील आहेत. त्यांपैकीं काहीं ग्रंथांतून अथवा वर्तमानपत्रांतून आढळून आलेले आहेत व काहीं खात्याखात्यांतील लोकांच्या तोंडीं बसलेले व नेहमीं वापरण्यांत येणारे असे आहेत. जसें शतशः फारसी व अरबी शब्द मराठींत पूर्णपणे रूढ झाले आहेत, तसे इंग्रजी शब्द होणार ह्याबद्दल शंका नाही; काहीं आज, काहीं उद्यां एवढाच प्रश्न आहे. जे शब्द थोड्याच वर्षांनी पूर्ण रूढ होणार त्यांविषयींचा विचार सध्यां न करतां जे सांप्रत बरेच रूढ झाले आहेत, असें आह्मांस वाटलें ते दिलें आहेत. इतकें सांगून ते शब्द पुढें देतो.

Accountant	आकौंटंट
,, General	आकौंटंट जनरल
Act	आक्ट
Amendment	आमेंडमेंट (उपसूचना)
Appeal	आपील
Appellant	आपेलंट
Application	आप्लिकेशन
April	एप्रिल
Article	आर्टिकल (वर्तमानपत्रांतील मुख्य लेख)
Assessor	आसेसर
Assistant Collector	आसिस्टंट कलेक्टर
,, Deputy	,, डेप्युटी
,, Engineer	,, एंजिनिअर
,, Master	,, मास्टर
,, Superintendent	,, सुपरिंटेंडंट
,, Surgeon	,, सर्जन
Association	आसोसिएशन
Atlas	आटलस
Attorney	आटरनी
Auditor	आडिटर (हिशेबतपासनीस)
August	आगस्ट
B. A.	बी. ए.
Badminton	ब्याडमिंटन
Bailiff	बेलिफ
Band	ब्यांड
Bank	ब्यांक
Banker	ब्यांकर
Baptism	ब्यापटिझ्म, बाप्तिस्मा
Barrack	ब्याराक, बराक
Barrister.	ब्यारिस्टर, बालिस्टर
Bat	ब्याट
Battalion	पलटण
Battery	ब्याटरी
Beef-market	बीफ-मारकेट
Bench	बेंच
Bible	बायबल
Bid	बिड (पत्यांतील)
Bill	बिल
Billiard	बिलियर्ड
Biscuit	बिसकिट, बिसकूट

Blotting-paper	ब्लाटिंग पेपर
Board	बोर्ड
Boarding-house	बोर्डिंग हौस
Boat	बोट
Bolt	बोल्ट
Boot	बूट
Book-binder	बुक-बाइंडर
Brandy	ब्र्यांडी
Brown-paper	ब्रौन पेपर
Brush	ब्रश
Buckle	बकल
Budget	बजेट
Bugle	ब्यूगल
Button	बटन
Butler	बटलर
By-law	बाय-ला
Captain	क्यापटन, कपतान
Carbolic acid	क्यारबालिक आसिड
Carpentry-class	कारपेंट्री क्लास
Case	केस
Cashier	क्याशियर
Catalogue	क्याटलाग
Cent	सेंट (माप)
Ceiling	सीलिंग
Certificate	सर्टिफिकेट, सर्टिफिकीट
Chain	चेन
Chairman	चेअरमन
Chamber	चेंबर
Chancellor	चानसेलर
Charge	चार्ज (आरोप)
Cheque	चेक
Chief-Engineer	चीफ एंजिनियर
Chimney	चिमनी, चिमणी
Circular	सर्क्युलर
Circus	सरकस
City Magistrate	सिटी म्याजिस्ट्रेट
Civil service	सिव्हिल सर्व्हिस
" Surgeon	" सर्जन
Class	क्लास
Clerk	क्लार्क
Club	क्लब

Coach-man	कोचमन
Coat	कोट
Cock	काक (पाण्याचा)
Cocoa	कोको
Code	कोड (कायदा)
Collector	कलेक्टर
College	कालेज
Colonel	कर्नल
Column	कालम
Coma	कामा
Commander-in-Chief	कमांडर-इन्-चीफ
Commissariat	कामिसारिएट
Commission	कमिशन
Commissioner	कमिशनर
Committee	कमिटी
Compass	कंपस
Compensation	कांपेनसेशन
Compound	कांपौंड
Conference	कानफरन्स
Congress	कांग्रेस
Conservator	कानसरव्हेटर
Contract	कानट्राक्ट, कंत्राट
Contractor	कानट्राक्टर, कंत्राटदार
Convocation	कानव्होकेशन
Copy	कापी
Couch	कौच, कोच
Council	कौनसिल
Court	कोर्ट, कोडत
Court-Martial	कोर्ट-मार्शल
Cricket	क्रिकेट
Cricket-Match	क्रिकेट-म्याच
Criminal Procedure code.	क्रिमिनल प्रोसीजर कोड
Custom Commissioner.	कस्टम कमिशनर
Danger-signal	डेंजर-सिग्नल
Daxina Prize Committee	दक्षिणा प्राईझ कमिटी
December,	डिसेंबर, दिजंबर
Deccan College	डेक्कन कालेज
" Sabha.	" सभा
" Orphanage.	" आरफनेज
" Association.	" आसोसिएशन

Deccan Vernacular Translation Society.	डेक्कन व्हर्न्याक्युलर-ट्रानस्लेशन सोसायटी
Decree.	डिक्री
Defence Fund.	डिफेन्स फंड
Degree.	डिग्री
Demy.	डेमी
Depot.	डीपो
Deposit.	डिपाजिट
Deputation.	डेप्युटेशन
Deputy Collector.	डेप्युटी कलेक्टर
,, Commissioner.	,, कमिशनर
,, Inspector.	,, इन्स्पेक्टर
,, Accountant.	,, आकौंटंट
Design.	डिझाइन
Desk.	डेस्क
Detective.	डिटेकटिव
Diary.	डायरी
Dictionary.	डिक्शनरी
Director of Public Instruction	डायरेक्टर आफ पब्लिक इनस्ट्रक्शन
Directors.	डायरेक्टर्स
Dismiss.	डिसमिस
District Court.	डिस्ट्रिक्ट कोर्ट.
Dividend.	डिव्हिडेंड
Dock.	डाक
Dock-yard.	डाक-यार्ड
Doctor.	डाक्टर
Dozen.	डझन
Draft.	ड्राफ्ट
Draftsman.	ड्राफ्टसमन
Drawing.	ड्राइंग
Drawing Master.	ड्राइंग मास्टर
Drill.	ड्रिल
Duke.	ड्यूक
Editor.	एडिटर
Educational Department.	एज्युकेशनल डिपार्टमेंट
,, Inspector.	,, इन्स्पेक्टर
,, Record.	,, रेकर्ड
Election.	इलेक्शन
Engine.	एंजिन
Engineer.	एंजिनियर

English.	इंग्लिश, इंग्रजी
Estate.	एस्टेट, इस्टेट
Estimate.	एस्टिमेट
Executive Engineer.	एक्झीक्यूटिव एंजिनियर.
,, Officer.	,, आफिसर
Factory.	फ्याक्टरी
Farce.	फार्स
Fashion.	फ्याशन, फासन
February.	फेब्रुआरी, फेब्रवारी
Fee.	फी
Female High School.	फीमेल हाय स्कूल
File	फाइल, फेल
Filter.	फिल्टर
Foot.	फूट (माप)
Foot-ball.	फुट-बाल
Form.	फार्म
Fruit-Market.	फ्रूट-मार्केट (फळबाजार)
Fund.	फंड
Gallery.	ग्यालरी
Game.	गेम
Gauge-karkoon.	गेजकारकून (पाणी मोजणारा)
Gas.	ग्यास
Gazette.	ग्याझेट
General.	जनरल
Gilt.	गिल्ट
Girls-School.	गर्लस्कूल
Glass.	ग्लास
Good-Friday.	गुडफ्रायडे
Governor.	गव्हरनर
Gown.	गौन
Graduate.	ग्राजुएट
Guard.	गार्ड
Guinea.	गिनी
Hall.	हाल
Hand-bill.	ह्यांडबिल
Handle.	ह्यांडल
Harmonium.	हारमोनियम
Head-clerk	हेड-क्लार्क

Head Karkoon.	हेड कारकून
,, Master.	,, मास्टर
,, Office.	,, आफिस
,, Signaller.	,, सिग्नलर
Health-Officer.	हेल्थ आफिसर
High Court.	हाय कोर्ट
,, School.	,, स्कूल
Honorable.	आनरेबल, आनराबल
Horizontal-bar.	हारिझांटल बार
Hospital.	आसपिटल, इस्पिताळ
Hotel.	हाटेल
Hundredweight.	हंड्रेडवेट
Inch.	इंच
Industrial-Association.	इंडस्ट्रियल आसोसिएशन
,, Conference.	,, कानफरन्स
,, Museum.	,, म्यूझियम
Inoculation.	इनोक्युलेशन
Insolvent.	इनसाल्व्हेंट
Inspector.	इनस्पेक्टर
Jailor.	जेलर
January.	जानुआरी, जानेवारी
Jubilee.	ज्युबिली
Job-work.	जाब-वर्क
Judge.	जज्य, जज्ज
Judgment.	जजमेंट
July.	ज्यूलाय, जुलई
June.	ज्यून
Juror.	ज्यूरर
Jury.	ज्यूरी
Justice.	जस्टिस (न्यायमूर्ती)
Label.	लेबल
Lady.	लेडी
Land Revenue Code.	ल्यांड रेव्हिन्यू कोड
Late.	लेट (उशिरां)
Latin.	ल्याटिन
Law-College.	ला कालेज
,, School.	,, स्कूल
Leave.	लीव
Leave-code.	लीव-कोड
Lecture.	लेक्चर
Letter-box.	लेटर-बाक्स

Levee.	लेव्ही
Level.	लेव्हल, लेवल
Libel.	लायबेल, लायबल
Liberal.	लिबरल (पक्ष)
Library.	लायब्ररी
License-Vendor.	लायसेन्स-व्हेंडर, लेसनव्हेंडर
Life Insurance Company.	लाइफ इनशुअरन्स कंपनी
Life-member.	लाइफ-मेंबर
Line.	लाइन
List.	लिस्ट
LL. B	एल. एल. बी.
Local-Board.	लोकल बोर्ड
" Fund.	" फंड
Lord.	लार्ड
M. A.	एम. ए.
Machine.	मशीन
Magic-lantern.	म्याजिक ल्यांटर्न
Magistrate.	म्याजिस्ट्रेट
Mail.	मेल
Manager.	म्यानेजर
March.	मार्च
Mark.	मार्क (गूण)
Masonry.	मेसनरी
Master.	मास्टर
Matriculation.	म्याट्रिक्युलेशन
May.	मे
Meaning-book.	मीनिंग बुक
Measurement.	मेझरमेंट
Medical-College.	मेडिकल कालेज
" School.	" स्कूल
Member.	मेंबर
Merchant.	मरचंट
Mess.	मेस (खाणावळ)
Metal-road.	मेटल-रोड
Mile.	माइल, मैल
Mill.	मिल (गिरणी)
Millowners' Association.	मिलओनर्स आसोसिएशन
Mint.	मिंट
Minute.	मिनिट (क्षण, इनसाफ)
Missionary.	मिशनरी
Mistress.	मिस्ट्रेस

Model.	माडेल
Money-Order.	मनी-आर्डर
Morning-Report.	मार्निंग रिपोर्ट
Municipal Commissioner.	म्युनिसिपल कमिशनर
Municipality.	म्युनिसिपालिटी
Mustering-Karkoon.	मस्टरिंग-कारकून
Muster-roll.	मस्टर-रोल
Native Accountant.	नेटिव आकौंटंट
,, Assistant.	,, आसिस्टंट
Nib.	निब (टाक)
Nihilist.	निहिलिस्ट
Not-paid.	नाटपेड
Notice.	नोटिस, नोटीस
Novelty-Theatre.	नाव्हल्टी थिएटर
November.	नोव्हेंबर, नवंबर
Number.	नंबर
Number-taker.	नंबर-टेकर
October.	आक्टोबर, आक्टंबर
Omnibus.	आम्निबस
Overseer.	ओव्हरसियर
Oxygen.	ऑक्सिजन
Packet.	प्याकेट, पाकीट
Parcel.	पारसेल
Para.	प्यारा
Parade.	परेड
Park.	पार्क
Parliament.	पार्लमेंट
Parallel-bar.	प्यारलल बार
Pass.	पास
Pen.	पेन
Pencil.	पेनसिल
Penny.	पेनी
Pension.	पेनशन
Pensioner.	पेनशनर
Petition.	पिटिशन
Photo.	फोटो
Plague.	प्लेग
,, Hospital.	प्लेग आस्पिटल
,, Officer.	,, आफिसर
Police.	पोलीस
Police-Commissioner.	पोलीस कमिशनर

Political-Agent.	पोलिटिकल एजंट
Post-Master.	पोष्ट-मास्टर
,, Office.	,, आफिस
,, Paid.	,, पेड
Pound.	पौंड
President.	प्रेसिडेंट, प्रेसिडंट
Press-Committee.	प्रेस-कमिटी
Principal.	प्रिनसिपाल
Printer.	प्रिंटर
Professor.	प्रोफेसर
Promissory Note.	प्रामिसरी नोट
Proprietor.	प्रोप्रायटर
Protestant.	प्राटेस्टंट
Public Prosecutor.	पब्लिक प्रासिक्यूटर
Pump.	पंप
Quarter.	कारटर (माप)
Quarantine.	कारंटीन
Quinine.	क्विनाइन, कोयनेल
Quorum.	कोरम
Race-course.	रेस-कोर्स
Railway.	रेल्वे
Reading-room.	रीडिंग-रूम
Receipt.	रिसीट, रसीट
Reception Committee.	रिसेपशन कमिटी
Refund.	रिफंड
Regent.	रीजेंट, रिजंट
Register.	रेजिस्टर, रजिस्टर
Registered letter.	रेजिस्टर्ड लेटर, रजिस्टर्ड लेटर
Registrar.	रेजिस्ट्रार, रजिस्ट्रार
Registration.	रेजिस्ट्रेशन, रजिस्ट्रेशन
Repair.	रिपेर, रिपेरी
Report.	रिपोर्ट, रपोट
Reserved compartment.	रिझर्व्हड कंपार्टमेंट
Residency.	रेसिडेन्सी, रसिडन्सी
Resident.	रेसिडेंट, रसिडंट
Revenue Commissioner.	रेव्हिन्यू कमिशनर
Right.	राइट
Road.	रोड
Round.	रौंड
Rubber.	रबर
Ruler.	रूलर, रूळ

Runs.	रन्स (धावा)
Savings-Bank.	सेव्हिंग ब्यांक
Scholarship.	स्कालरशिप
Screw.	स्क्रू
Seal.	सील
Secretariat.	सेक्रेटारियट.
Secretary.	सेक्रेटरी
Secretary of State.	सेक्रेटरी-आफ-स्टेट
Segregation Camp.	सेग्रिगेशन क्यांप
Senate.	सेनेट
Sentry.	सेंट्री, संत्री
Sepoy.	सीपाय, शिपाई
Session.	सेशन
Sessions-Judge.	सेशन जज्ज
,, commit.	सेशन कमिट
Share.	शेअर
Share-holder.	शेअरहोल्डर
Sheet.	शीट
Sheriff.	शेरिफ
Shirt.	शर्ट
Signal.	सिग्नल
Signaller.	सिग्नलर
Silk Manufacturing Company.	सिल्क म्यान्युफ्याक्चरिंग कंपनी
Sir.	सर
Site.	साइट
Slate.	स्लेट
Slaughter-house.	स्लाटर-हौस
Small Cause Court.	स्माल काज कोर्ट-कोडत
Soap.	सोप
Social Conference.	सोशियल कानफरन्स
Soda-water.	सोडा-वाटर
Soldier.	सोल्जर, सोजर
Solicitor.	सालिसिटर
Sponge.	स्पंज
Stamp.	स्टांप
Stand.	स्टयांड
Standard.	स्टयांडर्ड (यत्ता)
Standing Congress Committee.	स्टयांडिंग कांग्रेस कमिटी
State Secretary.	स्टेट-सेक्रेटरी

Station.	स्टेशन
,, master.	,, मास्टर
Stationery.	स्टेशनरी
Steamer.	स्टीमर
Stockings.	स्टाकिंग
Sub-judge.	सबजड्ज, जज्य
Summons.	समन्स
Superintendent.	सुपरिंटेंडेंट, सुपरिंटेंडंट
Surgeon-General.	सर्जन-जनरल
Surveillance.	सरव्हेलन्स
Suspend.	सस्पेंड, सस्पिड
Table.	टेबल
Table-Cloth.	टेबल-क्लाथ
Tape.	टेप
Technical Institution.	टेक्निकल इनस्टिट्यूशन
Telegram.	टेलिग्राम
Telephone.	टेलिफोन
Tender.	टेंडर
Tennis.	टेनिस
Term.	टर्म
Theatre.	थिएटर
Ticket.	टिकेट, तिकीट
Time.	टाइम
,, piece.	,, पीस
,, table.	,, टेबल
Tomato.	टोम्याटो (फळ)
Ton.	टन
Towel.	टोवेल, टुवाल
Tower.	टावर
Town-Hall.	टौनहाल
Training College.	ट्रेनिंग कालेज
Trained Master.	ट्रेंड मास्टर
Tramway.	ट्रामवे
Treasurer.	ट्रेझरर
Treasury Office.	ट्रेझरी आफिसर
Troop.	ट्रुप, तुरूप
Trustee.	ट्रस्टी
Tumbler.	टंबलर
Turpentine.	टरपेंटाईन
Type.	टाइप
University.	युनिव्हर्सिटी

Vegetable-Market.	व्हेजिटेबल-मार्केट
Veranda.	व्हेरांडा, व्हरांडा
Vernacular school	व्हरन्याक्युलर स्कूल
Viceroy.	व्हाइसराय
Visit-Book.	व्हिजिटबुक
Volunteer.	व्हालंटिअर
Vote.	व्होट
Voter.	व्होटर
Waggon.	व्यागन, वाघीण
Ward.	वार्ड
Ward Election.	वार्ड-इलेक्शन
Warrant.	वारंट
White-wash.	व्हाइट-वाश
Will.	विल (मृत्युपत्र)
Yard.	यार्ड

लेखनपद्धतीच्या बाबतींत वर सांगितलेल्या बाबींशिवाय किरकोळ काहीं बाबी आहेत, त्यांविषयीं थोडक्यांत विचार करून हें प्रकरण संपवूं.

(१) ओळ संपते वेळीं शब्द तोडण्याचें कारण पडलें, तर ते कसे तोडावे ?

ओळ संपते वेळीं शब्द तोडून लिहिण्याचें कारण अनेक वेळां पडतें. तेव्हां ह्या बाबतींत काहीं सयुक्तिक व्यवस्था असावी किंवा हल्लीं मनसोक्त प्रकार चालू आहे, तो तसाच चालू ठेवावा, असा एक प्रश्न आहे. हल्लींची व्यवस्था बरी आहे व वाटेल त्या स्थळीं शब्द तोडण्यास सवड असावी, असें म्हणणारे समंजस लोकांपैकीं काहीं असतील, असें आह्मांस वाटत नाही. इतके दिवस ह्या गोष्टीकडे लक्ष गेलें नाही, परंतु ह्या बाबतींत काहीं सुयंत्र व्यवस्था असल्यास बरें, अशी रा. रा. हरी कृष्ण दामले ह्यांनी सूचना केली

आहे, ती विचार करण्यासारखी आहे. पण ही व्यवस्था काय असावी, असा लागलीच प्रश्न उत्पन्न होतो. नवनीतांत शब्द तोडण्याची व्यवस्था कशी केली आहे, हिकडे लक्ष दिलें असतां वरील प्रश्नाचा उलगडा करण्यास कांहीं साहाय्य मिळेल. ही व्यवस्था पुढील उदाहरणांवरून दिसून येते.

वि-कत्थन, गो-धन, कुल-ज, महा-कुल-ज, अ-शुद्ध, अ-न्याय-लवें, अ-ज्ञात-वास-पण, सद्यः-कीर्ति-प्रज्ञा-घ्न-स्पर्श, पुं-भूषणें, नय-ज्ञ, अनु-गमन, स-बहु-मान, सागर-सा, लज्जा-प्र-द, सुर-न-गा, स-वि-नय, अंध-त्वाचा, भू-प, कुरु-कुळ, चंदन-द्रु-भुज-ग, स्व-सेनेतें, करि-ता (हत्तीपणा), जिष्णु-सह-वास, पितृ-कर-स्थळ-स्थ, पूर्व-जलधि-तीराला, जल-निधि-नृ-पतीचा, नि-वेदिजेले.

वरील शब्द मोरोपंताच्या सावित्री वगैरे आख्यानांतून घेतले आहेत. ते कसे तोडून लिहिले आहेत ह्याविषयीं विचार करतां आपणांस कांहीं नियम बसवितां येतात. ते असेः—

(१) प्र, परा, अप, सम्, आ, वि, नि, निस्, निर्, दुस्, दुर् वगैरे सर्व उपसर्ग व निषेधार्थी उपसर्गासारखा असणारा ‘ अ ’ व सहार्थी ‘ स ’ हे सर्व तोडून लिहिण्यास हरकत नाही. जसेंः— प्र-माद, परा-जय, अप-शकून, सं-कीर्तन, आ-कर्षण इ०.

(२) वाला, सा, दार, निशी, गिरी, भर, लायक, पूर्वक, पण, पणा, गर, वार, मान, वंत, मंत, खोर, वाणा, कडे, ता, त्व, तव्य वगैरे प्रत्यय तोडून लिहिले असतां चालेल. जसेंः— टुम-दार, घर-वाला, सही-निशी, दिवस-भर, काळजी-पूर्वक, शहाण-पण, हराम-खोर, सम-ता इ०.

(३) सामासिक शब्दांतले निरनिराळे अवयव, मग हे अवयव स्वतंत्र शब्द असोत किंवा नसोत, ते क्रिया दर्शविणारीं पदें असलीं, तरी ते तोडून लिहिले असतां चालेल. जसेंः—गो-धन,

जल-निधी, कमला-पती, लक्ष्मी-कांत, आई-बाप, बहीण-भावंडें, आते-बीर इ०

क्रियावाचक पदें ज्यांत आहेत असे सामासिक शब्दः—

भू-प, कुल-ज, न-ग, मान-द, कूट-स्थ, कृत-घ्न, कृत-ज्ञ, जल-धि, सुख-कर.

वर जी व्यवस्था सुचविली ती बहुतेकांस पसंत पडेल अशी आहे. कारण तींत नवीन कांहीं नाही. जी व्यवस्था काहीं पद्यात्मक ग्रंथांत शब्द तोडण्याच्या संबंधाने दृष्टीस पडते व जी आजपर्यंत पसंत असल्याचें दिसतें, तिचेंच गद्यात्मक लेखनांत अवलंबन करण्याविषयीं शिफारस केली आहे. ज्या प्रश्नाविषयीं आतां विचार करावयाचा आहे तो असा आहे कीं, शब्दयोगी अव्ययें, शुद्ध शब्दयोगी अव्ययें, विभक्तिप्रत्यय, ऊं, तां, तांना (धातुसाधित प्रत्यय), क्रियावाचक नामांचा प्रत्यय 'णे' किंवा काल दर्शविणारे प्रत्यय तो, ते, तें, ला, ली, लें वगैरे तोडून लिहावयाचे किंवा कसें. वाला, दार, सा, भर, वंत वगैरे प्रत्यय जर तोडून लिहिण्यास हरकत नाही, तर शब्दयोगी अव्ययें, शुद्ध शब्दयोगी अव्ययें व विभक्तिप्रत्यय वगैरे तोडून लिहिण्याचें कारण पडल्यास कां तोडून लिहूं नये,ह्याचें कारण समजत नाही. शब्दयोगी अव्ययें, शुद्ध शब्दयोगी अव्ययें, विभक्तिप्रत्यय वगैरे ह्यांस जशी स्वतंत्र मातब्बरी नाही तशी प्र, परा वगैरे उपसर्ग किंवा वाला, सा, दार वगैरे प्रत्यय ह्यांस किंवा ग, ज, स्थ, प, द वगैरे क्रियावाचक पदांसही स्वतंत्र मातब्बरी नाही. ह्यावर काहीं असा आक्षेप घेतील कीं, प्र, परा वगैरे उपसर्ग व वाला, सा, दर वगैरे प्रत्यय शब्दांस लागले असतां शब्दांच्या आंतररचनेंत बदल

होत नाहीं; ते जशाचे तसेच राहतात; तशी गोष्ट शब्दयोगी अव्ययांची किंवा विभक्तिप्रत्ययांची नसून हीं अव्ययें व हे प्रत्यय लागले असतां शब्दांस सामान्यत्वें सामान्यरूप होऊन विकार होतो. पण शुद्ध शब्दयोगी अव्ययें शब्दांस जोडलीं असतां किंवा, ऊं तां, तांना, तो, ला वगैरे प्रत्यय धातूंस लागले असतां मूळ धातूंस विकार होत नाहीं. ह्या व दुसऱ्या कारणांचा विचार करतां शब्दयोगी अव्ययें, विभक्तिप्रत्यय वगैरे तोडून लिहिण्यास हरकत नसावी, असें आम्हांस वाटतें. मुख्य तत्त्व लक्षांत ठेवावयाचें तें हें कीं, जे प्रत्यय वगैरे जोडून लिहितां येतात व तसे लिहिण्यास सवड ठेवली आहे, ते तोडूनही लिहितां यावे, व तसे तोडून लिहिण्यास हरकत नसावी. मात्र संधिनियमांप्रमाणें ज्यांचा शब्दांशीं पूर्ण संयोग होऊन जे मूळ शब्दाशीं मिळून गेल्यामुळें एकमय होऊन गेले आहेत, तेमात्र तोडून लिहिण्यांत येऊं नयेत. जसें:— घरीं, पायां, दयाळू, हस्तें, दारांत, वर्णनीय, बसूं, खेळूं, करीन, बसेल, खोबरेल इ०. ह्यांतील प्रत्ययांचा व मूळ शब्दांचा एक जीव झाला असल्यामुळें ते तोडून लिहितां येत नाहीत. इतर प्रत्यय तोडून लिहितां येण्यासारखे आहेत, हें पुढील उदाहरणांवरून समजेल. जसें त्या--शिवाय, भिंती-वर, रामा—देखील, कृष्णा--चा, विनू--ने, मथी-स, खा—ऊं, बस—तां, जेव--तांना, निज--णे, उठ--णे, कर--तो, जेव--ला.

टीप. घर + ई = घरीं, पाय + आं = पायां, दया + आळू = दयाळू, हस्त + एं = हस्तें, दार + आंत = दारांत, वर्णन + ईय = वर्णनीय, बस + ऊं = बसूं, कर + ईन =

करीन, बस + एल = बसेल ह्या उदाहरणांत पररूप संधी होऊन प्रत्यय व शब्द ह्यांचा एक जीव झाल्यामुळें त्यांची ताडातोड करतां येत नाही, व करणे वाजवी नाहीं; ह्मणून प्रत्ययांच्या संबंधाने हा अपवाद ठेवणे जरूर आहे.

(२) जोडाक्षरें.

क्त, क्र, प्र, त्र वगैरे काहीं जोडाक्षरें आजपर्यंत लिहीत आले आहेत तशींच तीं ठेवावयाचीं किंवा क्‍त, क्‍र, प्‍र, त्‍र अशीं लिहायाचीं, असा एक प्रश्न आहे. ह्या प्रश्नाविषयीं विचार व्हावा, अशी एक दोन मित्रांची सूचना आहे. ह्या प्रश्नाविषयीं विचार करावयाचा, ह्मणजे दोहींतून विशेष सुलभ पद्धत कोणती एवढ्याच प्रश्नाविषयीं विचार करणे जरूर आहे. विद्वानांस पहिली पद्धत कठीण जात नसेल, परंतु नवीन विद्यार्थ्यांस ती कठीण जाते, ह्याबद्दल वाद नसेल, असें आह्मांस वाटतें. शिवाय, एवढ्याच जोडाक्षरांविषयीं अपवाद कां करावा असा प्रश्न आहे.

ह्यावर काहीं कदाचित् असें ह्मणतील कीं, संस्कृत शब्दांच्या आंतररचनेस धक्का लावण्याचा ज्याप्रमाणें कोणास अधिकार नाही, त्याप्रमाणें हीं जोडाक्षरें संस्कृताच्या द्वारें परंपरेने प्राप्त झालीं आहेत, तीं संस्कृत ग्रंथांत दृष्टीस पडतात, व विद्वान लोक आजपर्यंत त्यांचा उपयोग करीत आले आहेत, तेव्हां त्यांच्या आंतररचनेस धक्का लावण्याचा कोणास अधिकार नाही. अधिकाराविषयींची ही बाब किती भ्रामक व पोरकट आहे ह्याविषयीं मागें खुलासा केला आहे. तेव्हां त्याविषयीं पुनः उल्लेख करण्याचें कारण नाही. शेकडो संस्कृत शब्दांच्या आंतररचनेंत बदल होऊन सोपीं रूपें प्रचारांत आलीं

आहेत व तीं विद्वानांस मान्य करणे भाग पडलें किंवा त्यांनी होऊन ग्राह्य धरलीं आहेत, हीं गोष्ट जर खरी आहे, व खरी आहे हें पूर्वींच दाखविण्यांत आलें आहे, तर अधिकाराची बाब पुढें करण्यांत तात्पर्य नाहीं. कठीण संस्कृत शब्दांच्याच आंतररचनेंत बदल करण्यांत आला आहे इतकेंच नाहीं, तर पूर्वींच्या संस्कृत ग्रंथांत आढळणाऱ्या कांहीं वर्णांतही बदल केल्याचें दिसून येतें. पूर्वीं 'अ' 'ग्र' असा लिहिलेला आढळून येत असे, व कलकत्याकडील देवनगरी लिपींत छापलेल्या संस्कृत ग्रंथांतून तो अद्याप दिसून येतो. तसेंच ऱ्हस्व ' उ ' हा पूर्वीं कांहीं अक्षरांना " ꣳ " अशा प्रकारें जोडीत असत. ' क्र ' हें जोडाक्षर पूर्वीं क्र अशा प्रकारें लिहीत असत. द्वित्त ' ध ' त्थ लिहीत. हे सर्व प्रकार जाऊन सरळ व सोपे प्रकार प्रचारांत आले आहेत. तेव्हां अधिकाराची बाब निरर्थक आहे. जर दुसरे कांहीं विचार असतील, तर गोष्ट निराळी. प्रस्तुतच्या पद्धतींत निष्कारण फेरफार करावा, असें आमचें मुळींच ह्मणणे नाहीं. जर दुसरा प्रकार खरोखर सोपा आहे, तर त्याप्रमाणें चालण्यास हरकत नसावी, असें आह्मांस वाटतें. सरळ, सोपा व जवळचा मार्ग असल्यावर मुद्दाम आड व कठीण मार्गानें आपण होऊन कां जावें व दुसऱ्यास तसें करण्यास भाग कां पाडावें हें समजत नाहीं. वर जीं जोडाक्षरें सांगितलीं तशांसारखेंच 'ह्म' हें जोडाक्षर आहे. ह्या बाबतींत बराच घोटाळा होतो. ह्यापेक्षां 'म्ह' हें लिहिण्यास सोपें जातें हें अनुभवसिद्ध आहे, तेव्हां म्ह असें लिहिण्यास हरकत नाहीं असें आह्मांस वाटतें. ह्यास अपवादक शब्द ब्रह्म, ब्राह्मण पाहिजे असल्यास ठेवावे.

टीप—क्र, त्र, प्र वगैरे जोडाक्षरांत जो ' र ' आहे तो मोडी ' र ' आहे. तो कसा आला हें समजण्यास मार्ग नाही. हा बालबोध लिपींत कां घ्यावा, असें काहींचें ह्मणणे आहे, पण त्याऐवजीं काय करावें, हें समजेपर्यंत आहे ही व्यवस्था कायम ठेवणे अवश्य आहे.

(३) **च, ज, झ** ह्यांच्या दोन उच्चारांबद्दल काहीं निराळी व्यवस्था असावी किंवा हल्लींचीच व्यवस्था कायम असावी ? च, ज व झ ह्या वर्णांचे दोन उच्चार होतात. एक दंततालव्य. जसें: चमचा, जत्रा, झटकन् इ०; व दुसरा तालव्य. जसें:—चमत्कार, राजाने इ०.

हल्लीं दोन निरनिराळ्या उच्चारांकरतां एकच वर्णाची योजना करण्याचा प्रघात आहे. बालबोध लिपींत दंततालव्य वर्ण नाही. म्हणून दादोबांनी असें सुचविलें होतें कीं, ओळीजवळच एक बिंदू देऊन तालव्य वर्णांनाच दंततालव्य वर्ण समजावें. ही सूचना केल्यास बरींच वर्षें झालीं, पण तिची अंमलबजावणी मुळींच झाली नाही. ही सूचना व्याकरणकर्ते रा० रा० गोविंद गणेश जोशी पेनशनर शिक्षक ह्यांनी पुनः केली आहे. त्यांच्या म्हणण्याचें तात्पर्य कीं,

संस्कृत ग्रंथ देवनगरी लिपींत असून मराठी ग्रंथही त्याच लिपींत आहेत. देवनगरींत दंततालव्य वर्ण नाहींत, ह्मणून ते मराठींत कां नसावे ? मराठींत येणाऱ्या संस्कृत शब्दांना जर मराठीचें वळण लावावयाचें, तर मराठीचें शुद्ध स्वरूप समजण्यासाठीं तेंच वळण लावावयास नको काय ? परिपक्व व प्रौढ भाषांच्या तोलास मराठी भाषेस आणून ठेवावयाची आहे, तर तिच्या अंगीं खिळून गेलेले जे तिच्यांतील कित्येक विशेष आहेत त्यांकडे दुर्लक्ष केल्याने तिचें स्वारस्य राहील काय ? ओळीजवळ बिंदू देण्याचें स्थळ

दादोबांनीं सुचविलें तें बरोबर नसल्यामुळें त्यांच्या सूचनेकडे काना-डोळा झाला असावा. तो बिंदू च़, ज़, झ़ असा द्यावा, किंवा त्याच्याऐवजीं मोडी लिपींतील च, ज, झ हे वर्ण किंवा दुसऱ्या काहीं आकृतींचे निराळे वर्ण ठेवावे, ह्मणजे सांप्रतची उणीव दूर होईल. कदाचित् असा आक्षेप निघेल कीं, लेखनपद्धती सुलभ करण्याचा यत्न चालू असतां हा नवीन आगंतुक विचार घुसड-ल्याने जास्त काठिन्य येणार आहे. प्रथम दर्शनीं असें होईल, पण आवश्यक गोष्टींविषयीं तसें ह्मणून उपयोग काय ? प्रघाताने आंगवळणीं पडून अवघडपणा वाटणार नाही. ''

वरील अभिप्रायाविषयीं विचार करतां निरनिराळे उच्चा-रांसाठीं निरनिराळे वर्ण असणे चांगलें, हें ह्मणणे दिसण्याला बरें दिसतें. पण त्याची अंमलबजावणी करतांना किती त्रास होतो, किती वेळ जातो व त्या मानाने फलप्राप्ती किती होते ह्याचा विचार करणे अगत्याचें आहे. असा विचार केला असतां सोईपेक्षां त्रास मात्र फार वाढेल, असें आह्मांस वाटतें. अनुस्वाराची अगोदरच गर्दी झाली आहे व त्यांसच बरेच लोक कंटाळून गेले आहेत. त्यांतच नवीन बिंदूंची भरती करण्यास सांगणे, म्हणजे त्यांस अधीक त्रासांत घालणे होय. उच्चाराच्या संबंधाने सोय होईल असें ज्याप्रमाणें आ-मच्या मित्रांचें ह्मणणे आहे त्याप्रमाणें अनुस्वाराच्या बाब-तींतही काहीं कारणें दाखविण्यांत येतात. मोडी च, ज, झ हे वर्ण किंवा अशांसारखे दुसरे दंततालव्याचा उच्चार दर्शविणारे वर्ण निराळे असावे, ही सूचना विचार कर-ण्यासारखी आहे. पण जी अडचण आहे असें रा. रा. जोशी ह्मणतात ती तशी आहे, असें इतर काहीं शिक्षकां-कडून कळण्याची जरुरी आहे; व ही अडचण पदोपदीं

नडतें असें कळून आल्यावर ह्या सूचनेचा अवश्य विचार व्हावा, असें आह्मांस वाटतें.

(४) मोडी लेखनांत ऱ्हस्वदीर्घाची योजना असावी किंवा कसें ह्याबद्दल विचार.

सांप्रत मराठी भाषेच्या लेखनपद्धतीविषयीं विचार चालू आहे; मोडी लेखनपद्धती हा तरी एकंदर लेखनपद्धतीचा भाग आहे; तेव्हां हिजविषयींही विचार व्हावा, अशी सूचना कै० रा. रा. नारायण तात्याजी नेवासकर ह्यांनी केली आहे. त्यांचें ह्मणणे ऱ्हस्व ' कि ' व दीर्घ ' की ' व ऱ्हस्व ' कु ' व दीर्घ ' कू ' काढणे झाल्यास पोकळी भरणे किंवा न भरणे ह्यावर नियम असावा. ही सूचना विचार करण्यासारखी आहे, पण ह्या सूचनेचा विचार करण्यापूर्वीं मोडी लिपीचा मुख्य हेतू काय, ह्याविषयीं विचार केला पाहिजे. बालबोध लिपी अगोदर सुरू झाली व तिच्या मागाहून मोडीची सुरवात झाली. मोडी लिपी सुरू होण्याचें कारण उघड आहे. तें हें कीं, आपले विचार थोड्या वेळांत जलद लिहून ठेवण्याचें साधन असावें. बालबोध लिपी अवजड असल्यामुळें तिच्या द्वारें एकादा मजकूर जलदीने लिहिण्यास अडचण पडते; कारण पदोपदीं हात उचलावा लागतो व कालाचा व्यय होतो. घाईच्या कामाला मोडीचा जितका उपयोग आहे तितका बालबोध लिपीचा नाही. तेव्हां ज्या योगाने वरील कार्य साधण्यास अडचण येईल ती गोष्ट सबळ कारणाशिवाय करण्यास प्रवृत्त होणे योग्य नाही, व त्या बाबतींत सक्तीचा नियम करणे तर अगदी प्रशस्त नाही. ही लिपी

आणखी सुलभ करून आणखी जलद लिहिण्याची कोणी युक्ती काढील, तर तिची विशेष आवश्यकता आहे.

ह्यावरून मोडी लिपींत वाटेल तसें लिहावें असें नाही. आमच्या म्हणण्याचा हेतू इतकाच कीं, ज्यांस मोडींत थोडें लिहिण्याचें कारण पडतें किंवा ज्यांस मुबलक वेळ आहे त्यांचे हातून वरील नियम पाळण्यांत येईल असें वाटतें. ज्यांस र्‍हस्वदीर्घापेक्षां वेळेची किंमत जास्त वाटते किंवा उठल्याबसल्या मोडीचें जास्त कारण पडतें त्यांच्या हातून वरील नियमाचें अवलंबन होणार नाही. हा नियम शाळांतील विद्यार्थ्यांपुरतां असल्यास तो वावगा नाही.

विक्रीस तय[illegible]

हीं सर्व पुस्तकें पुणें येथें ' आर्यभूष[illegible] छापखान्यांत मिळतील.

सरदार—परशुराम भाऊ पटवर्धन यांचे पराक्रम. अथवा पेशवाईतील धामधुमीचा देखावा. रचणार—धोंडो बाळकृष्ण सहस्रबुद्धे. हा ग्रंथ दक्षिणाप्राईज कमिटीनें पसंत करून त्याबद्दल बक्षि[illegible] दिलें आहे.

पटवर्धन हे ब्राह्मण सरदार असून प्रसिद्ध पुरुष निझामअली ह्यानें [illegible] [illegible]माणें पेशवाईची अव्वल अखेर सारी पाहिली, त्याप्रमाणेंच परशुरामभाऊ [illegible]वर्धन यांचे हयातींत पेशव्यांचे गादीवर चारपांच पेशवे होऊन गेले. [illegible]या अवधींत पेशव्यांच्या दरबारांत राज्यकारस्थानाची जी विलक्षण महा[illegible] उडाली होती व नाना फडणीस व महादजी शिंदे यांच्या मसलतीचा जो [illegible]हारीचा सामना चालला होता, त्याविषयींचें चित्तवेधक वर्णन या ग्रंथांत व[illegible] विस्तारानें देण्याचा यत्न केला असून हरिपंत फडके, त्रिंबकराव मामा,इत[illegible] [illegible]ग्लिश, निझाम, हैदर इत्यादिकांविषयीं विस्तृत माहिती योग्य [illegible] गो[illegible] [illegible]दली आहे.

मित्र [illegible] [illegible]ीत व बखरी भाषेला नाकें मुरडून इतिहासवाचनाचा जे कं[illegible] टाळा [illegible] असतील, किंवा कादंबऱ्यांतील काल्पनिक वीरवर्णनानेंच जे [illegible] आपली तहान भागवून घेत असतील व ब्राह्मण म्हणजे मूळचे नेभळे अशी ज्यांची भ्रामक समजूत असेल, अशा लोकांस हें चरित्र अत्यंत उपयुक्त व मनोरंजक वाटेल अशी उमेद आहे, कारण ऐतिहासिक कादंबरीच्या धर्तीवर रचलेल्या ह्या ग्रंथाच्या जोरदार व हृदयद्रावक भाषेखेरीज प्रत्येक ऐतिहासिक स्थलाची व प्रसंगाची सत्यता सिद्ध करण्याकरितां ग्रंथकर्त्यानें टीपेंत जागोजाग आधार दिले आहेत.

सारांश रा० मोडक, काव्येतिहासकार, ग्रांट डफ यांनीं सांठवून ठेविलेल्या सामुग्रीची ही पुढील वीररसप्रचुर पाकनिष्पत्ति आबालवृद्धांस रुचकर खमंग व चटकदार अशीच लागेल अशी आशा आहे. किंमत १२ आणे; ट[illegible] ख. २ आणे.

चार्लस ब्राडला, एम्. पी.—यांचें चरित्र 'विलायतचा प्रवास' या पुस्तकाच्या विद्वान् कर्त्यांनीं लिहिलें. पूर्णस्वातंत्र्यभक्त, दुर्बलांचा कैवारी, सत्पक्षाचा अभिमानी, धीरोदात्त पुरुषांत अग्रणी, या दुर्दैवी आर्यभूचा परम उपकारी मित्र अशा या अलौकिक पुरुषाचें बोधपर चरित्र वाचल्यापासून मनावर संस्कार झाल्याशिवाय राहणार नाहीं. किंमत ४ आणे टपालहांशील ६ पै

सार्थवाग्भट—अष्टांगहृदय (संस्कृत मूळ व मराठी भाषांतर यांसह) डा॰ गणेश कृष्ण गर्दे यांनीं केलेलें. भाग दोन. पृष्ठें १६०० बांधणी मजबूत. जाड पुठ्ठा कपड्याचा. नांव सोनेरी अक्षरांनीं कोरलेलें. टाईप स्वच्छ व सुवाच्य. कागद जाडा.-पहिल्यानें मूळ श्लोक (शब्दार्थ पुरा होईपर्यंत) त्याचे खालीं सुबोध मराठी अर्थ, ठिकठि... ...र्थ भरपूर टीपा, अखेरीस परिशिष्टाखालीं अवशिष्ट टीपा व स्पष्टी- ...र्ग, (रोगांचीं नांवें वगैरे) दुर्बोध शब्दांचा अर्थ समजण्याकरितां ...कदर पारिभाषिक शब्दांचा एक वर्णानुक्रमकोश, वैद्य नसणारांनाही ग्रंथाचा क्रियेमध्यें उपयोग व्हावा म्हणून सर्व ग्रंथाचें एक वर्णानुक्रम सू... चिपत्र,-इत्यादींच्या योगें ग्रंथ अत्यंत मूल्यवान् व उपयुक्त झाला अ... शिवाय यंत्रादिकांचीं चित्रेंही जोडलीं आहेत. प्रस्तावना (८५ पा... फारच महत्वाची आहे. तींत आर्यवैद्यकाचा अगदीं पुरातन काला... तों आजपर्यंतचा इतिहास, ग्रंथाचें पृथक्करण (म्हणजे त्याचा अंगप्र... विचार व आपल्या वैद्यकांतील मूलतत्वें यांविषयीं साधारण व ... पद्धतीनें विवेचन केलें आहे. ही प्रस्तावना वाचून एका विद्वान डा... आह्मांस असें लिहिलें कीं, तिचीच किंमत ग्रंथाच्या हल्लींच्या किं... इतकी आहे.

आजपर्यंत संस्कृत वैद्यकाच्या कांहीं ग्रंथांचीं भाषांतरें प्रसिद्ध झालीं आ... हेत; पण त्यांत अनेक दोष असून कांहीं ग्रंथ अर्वाचीन व एकदेशीय आ... हेत व कांहींत नव्याजुन्यांचें मिश्रण आहे. वाग्भटानें आपल्या अष्टांगहृदय ग्रंथांत चरक आणि सुश्रुत यांतील उपयुक्त भाग तेवढा घेतला असल्यानें व वैद्यकाच्या अंगप्रत्यंगांची संगतवार व पद्धतवार जुळणी केली असल्या- नें हाच एक ग्रंथ वाचल्यानें सर्व विषयांची माहिती पूर्णपणें व चांगल्या प्रकारें होऊन अनेक ग्रंथ वाचण्याचें फल अल्पायासानें मिळतें. सारांश, "सर्वांगसुंदर" हें नांव अरुणदत्तानें आपल्या अष्टांगहृदयावरील टीकेस जें दिलें आहे तें सार्थवाग्भट ग्रंथासच विशेष शोभेल. किंमत १२ रुपये. ट. हं. १ रु०.

विलायतचा प्रवास—हल्लींच्या काळीं महाराष्ट्रभाषेंत जो ग्रंथस- मूह होत आहे त्यांत प्रवासादिकांचीं वर्णनें फार कमी. अगोदर प्रवास करणारांची संख्या फार थोडी, त्यांत विलायतेपर्यंत मजल मारणारे फारच थोडे, त्यांतूनही मार्मिकपणा- नें देशांचें, देशस्थितीचें, सृष्टचमत्कारांचें, सृष्टिसौंदर्याचें, आचारविचारांचें अवलोकन करणारांची संख्या अत्यल्प—हजारांत एखादा सांपडल्यास

भाग्य. पण महाराष्ट्र भाषेच्या वाचकांच्या सुदैवानें अशा एका गृ
विलायतची यात्रा करण्याचा योग आला व त्याचें फल हें पुस्तक
यांत प्रवासांतील निरनिराळ्या प्रसंगांचें व अनुभवांचें मार्मिक वर्णन
येऊन, तांबडा समुद्र, केरो, इजिप्तमधील मनोर, आलेक्झांड्रिया, अथे
स्मर्ना, कॉन्स्टांटिनोपल, व्हियेना, पारिस इत्यादि शहरांचें सविस्तर
मनोरम वर्णन असून प्रसंगोपात् ठिकठिकाणच्या चालीरीतींचेंही दिग्दर्श
उत्कृष्ट वर्णन केलें आहे. भाषा गंभीर व अलंकृत आहे. भाग १
किंमत ०।१२ ट. हां. ०।१. भाग २ रा. किं. १ रु. ट. ०।१.

केसरींतील निवडक निबंध–भाग १ व २. केसरी वर्तमानपत्र ज्यास माहीत नाहीं असा महाराष्ट्र भाषा जाणणाऱ्या वाचकांत एक तरी सांपडेल किंवा नाहीं याची जो खास शंका आहे. या पत्रांत राजकीय व सामाजिक अनेक प्रश्नांवर मुद्देसूद ग्रंथांत व सुविचारयुक्त असे निबंध विद्वान लोकांनीं लिहिलेले येऊन गेले मामा, त. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर, रा० रा० बाळ गंगाधर टिळक, रा० गोपाळ गणेश आगरकर व त्यांचे सन्माननीय व विद्वान उपपदधारी मित्र (ज्यांचीं नांवें येथें घालतां येत नाहींत) अशांनीं आपले उदात्त व संस्कृत विचार ज्यांत गोवले आहेत, अशा बहुमोल निबंधांचा या दोन भागांत संग्रह केला आहे. सामाजिक व राजकीय विषयांसंबंधानें लोकमत जागृत करून त्यांस चांगलें वळण ज्या निबंधांच्या योगें लावलें गेलें, त्यांची योग्यता सहज ध्यानांत येण्याजोगी आहे. प्रत्येक भागाची किंमत १ रुपाया. ट. हं. ३ आणे.

त्राटिका नाटक–कै. वासुदेवराव बाळकृष्ण केळकर यांनीं लिहिलेलें. कजाग बायकोशीं मुद्दाम लग्न लावून तिला ताळ्यावर आणण्यासाठीं हरप्रयत्न करून शेवटीं नायकानें यश कसें मिळविलें आणि संसारसुखाची सिद्धता कशी केली हें या नाटकांत फार मार्मिक रीतीनें दाखविलें आहे. नायकाचा गडी पिल्या याचीं आडदांड पण मजेदारभाषणें वाचून कोणालाही हंसूं आल्यावांचून राहणार नाहीं. शिवाय राणोजीराव या नांवाचें जें एक पात्र या नाटकांत घातलें आहे त्याच्या बायको मिळविण्याच्या विचित्र युक्त्या, त्याची हरप्रसंगीं झालेली फटफजिती, शेवटीं एका द्वाष्ट बायकोशीं लग्न, तिच्यावर त्यानें केलेला प्रतापरावी मंत्राचा प्रयोग आणि त्याचा स्वतावरच उलटलेला परिणाम इत्यादि प्रकार फारच हास्यास्पद आहेत. किं० ८ आणे ट० ख० १ आणा.